जनमाध्यम



# कर्जमुक्तीसाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे


## जाणून घ्या लाभ मिळविण्याची प्रक्रिया, -शेतकरी बांधवांना राज्य शासनाकडून आवाहन

**अमरावती :** राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ पात्र शेतकऱ्यांना सुलभ, पारदर्शक आणि वेळेत मिळावा, यासाठी शासनाने निश्चित कार्यपद्धती आखली आहे. योजनेचा लाभ घेण्यास इच्छुक शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रे अद्ययावत ठेवण्याबरोबरच बँकेतील कर्ज खात्याची माहिती अचूक असल्याची खात्री करून घ्यावी, असे आवाहन राज्य शासनातर्फे करण्यात आले आहे.

योजनेबाबत शासन वेळोवेळी आवश्यक सूचना प्रसिद्ध करीत असून, लाभासाठी स्वतंत्र अर्ज आवश्यक आहे किंवा नाही, याबाबतचे निर्देशही स्वतंत्रपणे दिले जात आहेत. मात्र, लाभ वितरणाची प्रक्रिया सुरळीत पार पडण्यासाठी संबंधित बँकेकडे असलेली शेतकऱ्यांची माहिती अद्ययावत असणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

यासाठी शेतकऱ्यांनी सर्वप्रथम आपल्या कर्ज खात्याचा तपशील संबंधित बँकेत तपासून घ्यावा. कर्जाचा प्रकार, कर्जाची रक्कम, खाते क्रमांक, आधार क्रमांक, मोबाईल क्रमांक तसेच इतर आवश्यक माहिती बँकेच्या नोंदीत अचूक असल्याची खात्री करून घ्यावी.

योजनेचा लाभ मिळण्यासाठी आधार कार्ड, आधारशी संलग्न मोबाईल क्रमांक, बँक पासबुक अथवा कर्ज खात्याचा तपशील, पीककर्ज मंजुरीची माहिती किंवा कर्ज खाते क्रमांक, सातबारा उतारा (७/१२), आवश्यकतेनुसार आठ-अ उतारा (८अ), ॲग्रीस्टॅक नोंदणीची माहिती, ई-केवायसी पूर्ण झाल्याची नोंद तसेच बँकेने



मागितलेली इतर आवश्यक कागदपत्रे तयार ठेवावीत. या योजनेत आधार प्रमाणीकरण आणि ॲग्रीस्टॅक यांना विशेष महत्त्व देण्यात आले आहे. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांनी अद्याप ॲग्रीस्टॅकवर नोंदणी केलेली नाही, त्यांनी ती तातडीने पूर्ण करावी. तसेच आपल्या आधारशी मोबाईल क्रमांक जोडलेला असल्याची खात्री करून ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी.

योजनेची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने करण्यात येणार असून, संबंधित बँका आणि शासनाच्या यंत्रणांकडून पात्र कर्ज खात्यांची पडताळणी केली जाईल. त्यानंतर माहितीची छाननी करून पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करण्यात येईल आणि शासनाच्या निर्देशानुसार पुढील कार्यवाही केली जाईल. शेतकऱ्यांनी आपल्या बँकेशी नियमित संपर्क ठेवावा. बँकेकडून आवश्यक असल्यास अतिरिक्त माहिती किंवा कागदपत्रांची मागणी करण्यात आल्यास ती तातडीने सादर करावी. त्यामुळे लाभ वितरणाची प्रक्रिया अधिक वेगवान आणि सुलभ होण्यास मदत होईल.

शेतकरी बांधवांनी कोणत्याही अफवा किंवा अप्रमाणित संदेशांवर विश्वास न ठेवता शासन, संबंधित बँका, कृषी विभाग आणि महसूल यंत्रणेकडून देण्यात येणाऱ्या अधिकृत माहितीलाच प्राधान्य द्यावे. आवश्यक प्रक्रिया वेळेत पूर्ण केल्यास पात्र शेतकऱ्यांना या महत्त्वाकांक्षी योजनेचा लाभ सहजपणे मिळू शकणार आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना ही केवळ कर्जमाफीपुरती मर्यादित नसून शेतकऱ्यांच्या आर्थिक पुनर्बांधणीसाठीचा महत्त्वाचा टप्पा मानली जात आहे. त्यामुळे प्रत्येक पात्र शेतकऱ्याने आवश्यक कागदपत्रे तयार ठेवून, माहिती अद्ययावत करून आणि शासनाच्या सूचनांचे पालन करून या योजनेचा लाभ घेण्यासाठी सज्ज राहणे गरजेचे आहे.

# कर्जखाते 'आधार' संलग्न




नैसर्गिक संकट व कर्जबाजारीपणाच्या गर्तेत अडकलेल्या शेतकरी बांधवांना पुन्हा सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' सुरू केली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकरी बांधवांनी आपले पिककर्जखाते आधार संलग्न करणे आवश्यक आहे. याबाबत माहिती देणारा लेख....

राज्य शासनाने राज्यातील बळीराजाला मोठा दिलासा देण्यासाठी घोषित केलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती' योजनेची अंमलबजावणी आता अंतिम टप्प्यात आहे. या योजनेचा थेट लाभ शेतकऱ्यांना लवकर मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी आपली आधार क्रमांकाची माहिती बँकेच्या शाखेत द्यावी असे आवाहन सहकार विभागाने केले आहे.

आधार प्रमाणीकरण पूर्ण होताच, जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर लाभाची रक्कम जमा करण्याचे सहकार विभागाचे नियोजन आहे. या महत्त्वाकांक्षी योजनेमुळे महाराष्ट्रातील सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना सुमारे ३६ हजार ५०० कोटी रुपयांची आर्थिक मदत मिळणार आहे.

सहकार आयुक्त व निबंधक तसेच जिल्हा बँकर्स समितीकडून व्यापारी आणि सहकारी बँकांना पात्र शेतकऱ्यांचे आधार क्रमांक घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. योजनेच्या पारदर्शक अंमलबजावणीसाठी सर्व बँकांकडील पात्र शेतकऱ्यांची कर्ज खात्याची माहिती अपलोड झाल्यानंतर पात्र शेतकऱ्यांना स्वतंत्र विशिष्ट कर्ज खातेनिहाय नंबर दिला जाणार आहे. पात्र शेतकऱ्यांची यादी बँक शाखा, ग्रामपंचायत, तलाठी कार्यालय आणि पोर्टलवर प्रसिद्ध केली जाणार आहे.

आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतर शासनाकडून थेट संबंधित शेतकऱ्याच्या कर्जखात्यात लाभाची रक्कम जमा केली जाणार आहे. या योजनेचा लाभ मिळालेल्या शेकऱ्यांना चालू हंगामासाठी नव्याने कर्ज पुरवठा करण्याच्या सूचना सर्व बँकांना देण्यात आल्या आहेत.या योजनेमधील पात्र सर्व शेतकरी नवीन पीक कर्ज घेऊ शकतील.

या योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये आणि तरतुदी पुढील प्रमाणे आहेत. या योजनेअंतर्गत २ लाख रुपयांपर्यंतची अल्पमुदतीची पीक कर्जमुक्ती केली जाईल. यामध्ये थकीत, पुनर्गठित आणि फेरपुनर्गठित कर्जांचाही समावेश आहे. ज्या शेतकऱ्यांचे कर्ज २ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे, त्यांच्यासाठी विशेष तरतूद करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी दोन लाखावरील रक्कम बँकेत भरल्यानंतर त्यांना दोन लाखाच्या कर्जमुक्तीचा लाभ देण्यात देणार आहे.

नियमित कर्जफेड करणाऱ्यांना ५० हजारांचे प्रोत्साहन देण्यासाठी तरतूद केली आहे. प्रामाणिकपणे व नियमित कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी त्यांना ५० हजार रुपयांपर्यंतचे प्रोत्साहनपर अनुदान दिले जाणार आहे. विशेष म्हणजे, यापूर्वीच्या कर्जमाफी योजनांचा लाभ घेतलेले शेतकरीही या प्रोत्साहनपर लाभासाठी पात्र असणार आहेत.

या योजनेचा उद्देश केवळ कर्जमाफी देणे एवढाच नसून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, त्यांचा आत्मविश्वास वाढविणे आणि राज्यातील शेती क्षेत्राला नवसंजीवनी देणे हा आहे. शेतकऱ्यांनी कोणत्याही विलंबाशिवाय बँकेत जाऊन आपले कर्ज खाते आधारशी संलग्न करून घ्यावे.असे आवाहन सहकार विभागाकडून करण्यात आले आहे.

**- विभागीय माहिती कार्यालय,अमरावती**

# ३३ लाखांचा गांजा आणि एमडी जाळून नष्ट

## ३० वर्षांतील १२ गुन्ह्यांतील अंमली पदार्थांचा कायमचा बंदोबस्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** अंमली पदार्थांविरोधातील कारवाईला अधिक बळ देत अमरावती शहर पोलीस आयुक्तालयाने तब्बल ३३.२८ लाख रुपयांचा गांजा आणि एमडी (मेफेड्रोन) जाळून नष्ट केला. न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण झालेल्या १२ गुन्ह्यांमधील जप्त अंमली पदार्थांचा शनिवारी (४ जुलै) नागपूर जिल्ह्यातील बुटीबोरी एमआयडीसी येथील अधिकृत प्रकल्पात नाश करण्यात आला.पोलीस आयुक्तालयाच्या केंद्रीय गोडाऊनमध्ये ठेवण्यात आलेल्या या मुद्देमालामध्ये १४९.०२६ किलो गांजा आणि ६९.५४ ग्रॅम एमडीचा समावेश होता. या अंमली पदार्थांची एकूण किंमत ३३ लाख २८ हजार २२० रुपये इतकी होती. महाराष्ट्र एनवायरो पावर लिमिटेड, बुटीबोरी येथे अत्याधुनिक इन्सिनरेटरच्या सहाय्याने हा मुद्देमाल जाळून नष्ट करण्यात आला. या कारवाईत सन १९९६ पासून विविध पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या एकूण १२ गुन्ह्यांचा समावेश होता. यामध्ये नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या दोन, बडनेरा एक, गाडगेनगर चार, नांदगाव पेठ एक, फ्रेजरपुरा तीन आणि राजापेठ पोलीस ठाण्याच्या एका गुन्ह्याचा समावेश होता. संबंधित सर्व प्रकरणांमध्ये न्यायालयीन निकाल लागल्यानंतर अंमली पदार्थ नष्ट करण्याची प्रक्रिया राबविण्यात आली. यासाठी पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या अध्यक्षतेखाली ड्रग डिस्पोजल समिती गठीत करण्यात आली होती. समितीत पोलीस उपायुक्त शाम घुगे आणि पोलीस उपायुक्त (मुख्यालय) प्रांजली सोनवणे यांचा समावेश होता. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची परवानगी घेऊन ही प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी, कंपनीचे प्रतिनिधी, पंच तसेच पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत संपूर्ण कार्यवाही पार पडली. अंमली पदार्थांच्या अवैध व्यापाराविरोधात पोलिसांनी घेतलेल्या या ठोस भूमिकेमुळे गुन्हेगारीला आळा घालण्यास मदत होणार असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

# माहेरहून ५० लाख आणण्यासाठी विवाहितेचा छळ

## पतीसह सासू, नणंदेवर गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** लग्नाला पाच वर्षे पूर्ण झाल्यानंतरही सासरच्या मंडळींनी विवाहितेकडे माहेरहून ५० लाख रुपये आणण्याची मागणी करत शारीरिक व मानसिक अत्याचार केला. या छळाला कंटाळून विवाहितेने दिलेल्या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी पती सह सासू-सासरे व नणंद-नणंदोई यांच्याविरोधात गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

ही घटना राजापेठ पोलीस ठाणे हद्दीत घडली. माहिती नुसार, सिंधुदुर्ग येथील राहणाऱ्या ३० वर्षीय विवाहितेचा विवाह २०२१ मध्ये शहरातील कृष्णार्पण कॉलनी निवासी स्वप्नील बोरेकर यांच्याशी झाला होता. लग्नानंतर काही दिवस चांगले गेले. त्यानंतर सासरचे लोक पिडितेला माहेरच्या प्रॉपर्टीतील हिस्सा मागत होते. ५० लाख रुपयांची मागणी करून तिचे शारीरिक आणि मानसिक शोषण करत होते. या अत्याचारांना कंटाळून पीडितेने राजापेठ पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

सुरुवातीला हे प्रकरण महिला सेलमध्ये समुपदेशनासाठी पाठवण्यात आले होते. मात्र तिथे तडजोड न झाल्याने पोलीस उपायुक्त परिमंडळ-२ यांच्या लेखी आदेशावरून राजापेठ पोलिसांनी स्वप्नील बोरेकर, सासू, दोन नणंद आणि नणंदोई यांच्याविरुद्ध कलम ११५(२), ३५१(२), ३(५) बीएनएस अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

# विनयभंगाच्या गुन्ह्यात आरोपीला अटकपूर्व जामीन मंजूर

## -ॲड. राहुल कडूस्कर यांचा यशस्वी युक्तिवाद

### -गाडगेनगर पोलीस ठाण्यातील प्रकरण



**अमरावती/प्रतिनिधीः-** पोलीस स्टेशन गाडगे नगर हद्दीतील राधानगर येथून फिर्यादीला आरोपीने जबरदस्तीने त्याच्या दुचाकी वर बसवून नेऊन तिला मारहाण केली अशा आरोपावरून गाडगे नगर पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्ह्याची नोंद केली होती. त्यानंतर आरोपीच्या वकिलांनी विद्यमान जिल्हा व सत्र न्यायालय अमरावती येथे अटकपूर्व जामीनासाठी अर्ज दाखल केला होता. आरोपीच्या वतीने ॲड. राहुल हेमंत कडूस्कर यांनी अटकपूर्व जामीनासाठी अर्ज केला होता, विद्यमान न्यायालयाने आरोपीच्या वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरून आरोपीला अटकपूर्व जामीन मंजूर केला.

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार तरुणीने आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता,२०२३ च्या कलम ११५(२),१२६(२), ३०८(२), ३५१(२), ७४, ७८ अंतर्गत गुन्हा नोंदवला होता. दि. २ मे २०२६ रोजी सायंकाळी तक्रारदार ही मैत्रिणीला भेटायला जात असताना आरोपीने तिला जबरदस्तीने दुचाकीवर बसवून नेले, इतर मित्रांशी संपर्क न ठेवण्यास सांगितले आणि फिर्यादी ने नकार दिला असता, आरोपीने फिर्यादीला कंबरेच्या पट्ट्याने मारहाण करून सार्वजनिक ठिकाणी तिचे कपडे फाडल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला होता.

त्यानंतर आरोपीचे वकील ॲड. राहुल कडूस्कर यांनी विद्यमान न्यायालयात जामिनसाठी अर्ज दाखल केला होता व त्या अर्जावर सुनावणी दरम्यान प्रभावी युक्तिवाद केला व तथ्य न्यायालया समोर मांडले. विद्यमान न्यायालयाने आरोपीच्या वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरत आरोपीला अटकपूर्व जामीन मंजूर केला. या प्रकरणात ॲड.विक्रम सरवटकर यांचे सहकार्य मिळाले.

# कृषी संजीवनी प्रकल्प २.० अंतर्गत लेहेगाव येथे वृक्षारोपण



**मोर्शी/प्रतिनिधीः-** उपविभागीय कृषी अधिकारी मोर्शी यांच्या मार्गदर्शनाखाली नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प २.० अंतर्गत वृक्षारोपण दिनांक ०३ जुलै २०२६ रोजी मोर्शी तालुक्यातील लेहेगाव येथे वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमावेळी रेखा वासनिक (उपसरपंच), राम फुलकर (सहाय्यक कृषी अधिकारी), योगेश बारबूध्ये (नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन समन्वयक), श्रीकृष्ण गोफने(तंत्रज्ञान समन्वयक), दिपाली उगले (समूह सहाय्यक), सचिन कळमकर(रोजगारसेवक) तसेच गावातील गावकरी उपस्थित होते.

यावेळी योगेश बारबुध्ये यांनी शेततळे, विहीर पुनर्भरण, मूलस्थानी जलसंधारण याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. पावसाचे पाणी साठवण, भूजल पातळी वाढवणे आणि शेतीसाठी शाश्वत पाणी उपलब्धता निर्माण करण्यासाठी जास्तीत जास्त शेततळे उभारण्याचे तसेच शेताचे पाणी अडवून जमिनीत मुरविने, पिकांना सरी वरंबा पद्धत करणे, अतिरिक्त पाण्याचा निचरा करणे सेंद्रिय खताचा वापर करणे तसेच श्रीकृष्ण गोफने यांनी हवामान अनुकूल तंत्रज्ञान याबद्दल माहिती दिली व ते अवलंब करण्याचे आवाहन त्यांनी केले.

मूलस्थानी जलसंधारण, वृक्षारोपण , नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन मूलस्थानी गावाच्या विकासासाठी ग्रामस्थांनी दिलेला उत्स्फूर्त सहभाग प्रेरणादायी ठरला.

# चार महिन्यांनंतर दुचाकी चोर पोलिसांच्या जाळयात

**अमरावती/प्रतिनिधीः-** गाडगेनगर परिसरातून चोरीस गेलेल्या दुचाकी प्रकरणाचा अखेर उलगडा झाला असून गुन्हे शाखेने एका सराईत चोरट्याला अटक केली आहे. आरोपीकडून चोरीची स्प्लेंडर मोटारसायकल जप्त करण्यात आली असून त्याला पुढील कारवाईसाठी गाडगेनगर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ४ फेब्रुवारी २०२६ रोजी श्रद्धा कॉलनी, नवसारी येथील रहिवासी उमेश बाबुलाल जाधव यांनी त्यांच्या हिरो होंडा स्प्लेंडर प्लस मोटारसायकल चोरीची तक्रार गाडगेनगर पोलीस ठाण्यात नोंदवली होती. जिल्हा स्त्री रुग्णालयाजवळील जिल्हा प्रशिक्षण केंद्रासमोर उभी केलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने पळवून नेली होती. या गुन्ह्याचा तपास सुरू असतानाच गुन्हे शाखेला हैदरपुरा परिसरात एक व्यक्ती संशयास्पदरीत्या स्प्लेंडर मोटारसायकल विक्रीसाठी ग्राहक शोधत असल्याची माहिती मिळाली. या माहितीची पडताळणी करत पोलिसांनी सापळा रचून संबंधित व्यक्तीला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपीने गाडगेनगर परिसरातून दुचाकी चोरी केल्याची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी त्याच्याकडून सुमारे १५ हजार रुपये किंमतीची चोरीची स्प्लेंडर मोटारसायकल जप्त केली. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव वसीम खान बब्बू खान (वय ३९) असे असून तो हैदरपुरा परिसरातील रहिवासी आहे. जप्त वाहन आणि आरोपीला पुढील तपासासाठी गाडगेनगर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. गुन्हेगारांचा माग काढण्यासाठी सुरू असलेल्या विशेष मोहिमेदरम्यान गुन्हे शाखेने ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली. चोरीच्या गुन्ह्यांवर अंकुश ठेवण्यासाठी पोलिसांकडून अशाच प्रकारच्या मोहिमा पुढेही सुरू राहणार असल्याचे सांगण्यात आले.

## १ व १० वरिल उर्वरित

### धारणी-परतवाडा मार्गावर झाड

तासन्तास अडकून पडली.प्रवासी, रुग्ण आणि अत्यावश्यक कामासाठी जाणाऱ्या लोकांना मोठा त्रास सहन करावा लागला. दोन्हीकडे वाहनांच्या मोठ्या रांगा लागल्या होत्या.घटनेची माहिती मिळतात झाड हटवण्यासाठी मदत आणि बचाव पथकाला जागेवर पाठवण्यात आले आहे.मात्र सततच्या पावसामुळे झाड हटवणे आणि वाहतूक सुरळीत करण्यात मोठी अडचण आली. प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. जेसीबीच्या मदतीने झाड हटवण्याचे काम करण्यात आले. पाऊस जोरात असल्याने अडथळे आले.

### लालखडीत सराईत

माहितीची खातरजमा होताच पोलिसांनी परिसरात सापळा रचून संशयिताचा शोध सुरू केला. काही वेळातच संशयित व्यक्ती आढळून आल्याने त्याला ताब्यात घेण्यात आले. झडतीदरम्यान आरोपीच्या कमरेला पाठीमागील बाजूस पॅन्टमध्ये लपवून ठेवलेले देशी बनावटीचे लोखंडी पिस्तूल आढळून आले. पिस्तूलाची तपासणी केली असता त्याच्या मॅगझीनमध्ये एक जिवंत काडतूस असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी तात्काळ शस्त्र आणि काडतूस जप्त करून आरोपीविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू केली. अटक करण्यात आलेल्या आरोपीची ओळख अब्दुल मोसिन उर्फ सदू अब्दुल रौफ (वय २९) अशी झाली आहे. त्याच्याकडून सुमारे ३० हजार रुपये किमतीचे पिस्तूल आणि २ हजार रुपये किमतीचे जिवंत काडतूस असा एकूण ३२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी व जप्त मुद्देमाल पुढील तपासासाठी नागपुरी गेट पोलीस ठाणे यांच्या ताब्यात देण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, प्रांजली सोनावणे, सहायक पोलीस आयुक्त कैलास फुंडकर व निलेश ब्राम्हणे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेच्या पथकाने पार पाडली.

### पत्नीच्या अंत्यविधीनंतर

शोधून काढत पोलिसांनी प्रामाणिकपणा आणि कार्यतत्परतेचे उदाहरण घालून दिले.

साईनगर येथील गजानन अंबर वर्धे हे पत्नी संगीता वर्धे यांच्या उपचारासाठी कुटुंबासह हैदराबादमधील एआयजी रुग्णालयात गेले होते. उपचारासाठी मोठ्या आर्थिक खर्चाची शक्यता लक्षात घेऊन त्यांनी अंदाजे १४० ते १५० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने एका लाल रंगाच्या बॅगेत ठेवून सोबत नेले होते. मात्र उपचारादरम्यान पत्नीची प्रकृती अधिक खालावल्याने त्यांना अमरावतीला परत आणण्यात आले. दुर्दैवाने वाटेतच त्यांचे निधन झाले. कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळलेला असतानाच अंत्यविधीनंतर सोन्याचे दागिने ठेवलेली बॅग हरवल्याचे लक्षात आले. त्यामुळे कुटुंबीयांवर आणखी एक मोठे संकट ओढवले. तक्रार मिळताच राजापेठ पोलिसांनी या प्रकरणाचा कसून तपास सुरू केला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक थेट हैदराबादला रवाना करण्यात आले. तपासादरम्यान एआयजी रुग्णालय, आदिलाबाद शासकीय रुग्णालय तसेच प्रवास मार्गावरील विविध ठिकाणांवरील ३० ते ४० सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करण्यात आली.अखेर हैदराबाद-आदिलाबाद मार्गावरील जनता रेस्टॉरंट परिसरात हरवलेली बॅग शोधण्यात पोलिसांना यश आले. विशेष म्हणजे बॅगेतील सर्व सोन्याचे दागिने आणि उपचाराशी संबंधित महत्त्वाची कागदपत्रे सुरक्षित अवस्थेत मिळून आली.

त्यानंतर संपूर्ण मुद्देमालाची खातरजमा करून तो गजानन वर्धे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. लाखो रुपयांचा ऐवज परत मिळाल्याने वर्धे कुटुंबाने राजापेठ पोलिसांचे आभार मानले. पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त श्याम घुगे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त संजय खटाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या कारवाईचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# विद्युत वितरण कंपनीच्या गलथान कारभारामुळे साईधाम नगरवासी त्रस्त

## -लोंबकळत्या तारांमुळे अपघाताची भीती

**अंजनगाव सुर्जी / प्रतिनिधीः-**अंजनगाव सुर्जी येथील महावितरण अधिकाऱ्यांचा गलथान कारभार चव्हाट्यावर आला आहे. सुर्जी गावठाण फिडरवरील टाकरखेडा रोडच्या साईधाम नगरात विद्युत तारा गेल्या अनेक वर्षांपासून लोंबकळत असल्याने येथील नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. साईधाम नगरातील मुख्य विद्युत वाहिन्यांच्या तारा अत्यंत जीर्ण झाल्या असून अनेक ठिकाणी त्या लोंबकळत आहेत. रहिवाशांच्या घरांना अगदी लागूनच या तारा जात असल्याने पावसाळ्यात किंवा वादळी वाऱ्यात त्या तुटून मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता आहे. या तारा वारंवार तुटतात, आणि प्रत्येक वेळी त्याच जुन्या तारांना केवळ मलमपट्टी करून तात्पुरती जोडणी केली जाते. त्यामुळे आठवड्यातून ३-४ वेळा विद्युत पुरवठा खंडित होतो.



'मागील ५-६ वर्षांपासून आम्ही हा त्रास सहन करत आहोत. पोरं-बाळं अंगणात खेळत असतात, वर लोंबकळणारी तार कधी अंगावर पडेल सांगता येत नाही. रात्री-अपरात्री लाईट जाते, इन्व्हर्टरही साथ देत नाही. अंधारात साप, विंचू यांची भीती वेगळीच' असे साईधाम नगरातील रहिवासी धिरज नवले यांनी सांगितले.

या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी साईधाम नगरातील रहिवाशांनी अनेक वेळा अंजनगाव सुर्जी येथील महावितरण कार्यालयात लेखी अर्ज दिले. नागरिकांची प्रमुख मागणी आहे की, जुन्या व जीर्ण झालेल्या उघड्या तारा काढून त्याऐवजी सुरक्षित एबीसी केबल टाकण्यात यावी. मात्र, महावितरणकडून ना दुरुस्ती करण्यात आली ना केबल टाकण्यात आली. स्थानिक नागरिक सचिन अब्रुक म्हणाले, 'बिल भरण्यास एक दिवस उशीर झाला तर दुसऱ्या दिवशी लाईन कट करायला कर्मचारी येतात. वसुलीसाठी कंपनी तत्पर आहे, पण ग्राहकांना सुरक्षित आणि सुरळीत सेवा देणे हे कंपनीचे कर्तव्य आहे हे अधिकारी विसरले आहेत का? वीज ही अत्यावश्यक सेवा असून ग्राहकांना अखंडित व सुरक्षित वीज पुरवठा करणे हे महावितरणचे आद्य कर्तव्य आहे. मात्र येथील अधिकारी केवळ वसुली करण्यात मग्न असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. कंपनीच्या या दुर्लक्षामुळे नागरिकांच्या मनात प्रचंड रोष निर्माण झाला आहे. याबाबत अंजनगाव सुर्जी महावितरण कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळू शकला नाही. जर लवकरात लवकर यावर कार्यवाही झाली नाही, तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा साईधाम नगरातील नागरिकांनी दिला आहे.

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ रविवार, ५ जुलै २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# कुपटा घाटात टिप्पर आणि कारचा भीषण अपघात

## मानोरा येथील दोन तरुण व्यापा-यांचा जागीच मृत्यू

■ प्रतिनिधी | कारंजा ■

व्यापाराच्या निमित्ताने अमरावतीकडे प्रवास करणाऱ्या मानोरा येथील दोन तरुण व्यापाऱ्यांचा कार अपघातात जागीच मृत्यू झाल्याची अत्यंत दुर्दैवी घटना घडली आहे. हा भीषण अपघात ४ जुलै रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास कुपटा गावाजवळील घाटात झाला. या दुर्घटनेमुळे मानोरा शहरासह व्यापारी वर्गावर दुःखाचे सावट पसरले आहे. अपघातानंतर पोलिसांनी तत्परता दाखवत फरार टिप्पर चालकाला अटक केली आहे.

सुफियान कादर लघा (वय २५) आणि इम्रान जरीब शेख (वय २९, दोघे रा. मानोरा) अशी अपघातात प्राण गमावलेल्या युवकांची नावे आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, सुफियान कादर लघा हे मानोरा येथील रेडीमेड कपड्यांचे व्यावसायिक होते, तर त्यांचे मित्र इम्रान जरीब शेख हे जनरल स्टोअर्सचे व्यापारी होते. आपापल्या दुकानासाठी नवीन मालाची खरेदी करण्याच्या उद्देशाने हे दोघेही कारने अमरावतीच्या दिशेने निघाले होते. दरम्यान, कुपटा गावाजवळील घाट रस्त्यावरून जात असताना, समोरून येणाऱ्या एका भरधाव टिप्पर चालकाने त्यांच्या कारला जोरदार धडक दिली.



हा अपघात इतका भयानक होता की, टिप्परच्या धडकेमुळे कारचा समोरील भाग पूर्णपणे दाबला गेला. धडक एवढी जबरदस्त होती की, दोन्ही युवक कारच्या आतच गंभीर रित्या दबले गेले आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला.

या घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी आणि पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. कारच्या चक्काचूर झालेल्या भागातून मृतदेह बाहेर काढण्यात आले. अपघातानंतर घटनास्थळावरून पळून गेलेल्या टिप्पर चालक उत्तम तिरमाळे (उल्लासवाडी , पुसद ) याला पोलिसांनी अटक केली आहे.

# सोयाबीनचे पेरलेले बियाणे उगवलेच नाही

- कृषी सेवा केंद्राच्या बियाण्यावर प्रश्नचिन्ह
- नुकसानीची जबाबदारी कुणाची?

■ प्रतिनिधी | मानोरा ■

तालुक्यातील बेलोरा येथील शेतकरी मुंगशीराम उपाध्ये यांना निकृष्ट दर्जाच्या सोयाबीन बियाण्यामुळे दुबार पेरणीचे आर्थिक भुर्दंड सोसावे लागत आहे. कृषी सेवा केंद्रातून खरेदी केलेले बियाणे जमिनीत पुरेसा ओलावा असतानाही आठवड्यानंतर न उगवल्याने शेतकऱ्याला परत नवीन बॅग विकत आणून पेरणी करण्याची नामुष्की आली आहे.

याबाबत सविस्तर असे की, मुंगशीराम उपाध्ये यांनी खरिपाच्या पेरणीसाठी स्थानिक कृषी सेवा केंद्रामधून प्रमाणित कंपनीचे सोयाबीन बियाणे खरेदी केले. हवामान विभागाचा अंदाज व जमिनीतील ओल पाहून त्यांनी वेळेवर पेरणी उरकली. मात्र आठवडा उलटूनही शेतात एकही कोंब डोकावला नाही. संपूर्ण शेत उघडे-नागडे पडल्याने उपाध्ये कुटुंब हवालदिल झाले आहे.

'बियाण्याची बॅग ३५००/ रुपयाला घेतली. ट्रॅक्टर, मजुरी, खत यांचा खर्च वेगळा. आता पुन्हा बियाणे विकत घ्यावे लागणार, दुबार पेरणीचा खर्च, मजुरी... पिकाचे नुकसान झाले आणि पेरणीची वेळही निघून गेली. याला जबाबदार कोण?' असा संतप्त सवाल मुंगशीराम उपाध्ये यांनी केला.

तर उपाध्ये कुटुंब पुन्हा नव्याने टोकण यंत्राने पेरणी करताना दिसत आहे. शेतात मागील पेरणीच्या सऱ्या स्पष्ट दिसत आहेत, परंतु त्यावर एकही रोप नाही. दुबार पेरणीच्या ताणामुळे कुटुंबातील महिला व तरुणही शेतात राबत आहेत.



**शेतकऱ्यांची मागणी:**

१. कृषी विभागाने तातडीने पंचनामा करून नुकसानीचा अहवाल तयार करावा.
२. निकृष्ट बियाणे विकणाऱ्या कृषी सेवा केंद्राचा परवाना रद्द करावा.
३. शेतकऱ्याला दुबार पेरणीचा खर्च, बियाणे व मजुरीसह नुकसान भरपाई द्यावी.
४. तालुक्यातील सर्व बियाण्यांच्या लॉटची तपासणी करून उगवण चाचणी अहवाल प्रसिद्ध करावा.

याबाबत तालुका कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधला असता, 'शेतकऱ्याने लेखी तक्रार द्यावी. आम्ही बियाण्याचे नमुने घेऊन तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवू. अहवालानुसार संबंधित कंपनी व विक्रेत्यावर कारवाई केली जाईल,' असे सांगण्यात आले. एकूणच मान्सूनच्या सुरुवातीलाच निकृष्ट बियाण्यामुळे शेतकरी देशोधडीला लागत असून कृषी विभाग व बियाणे कंपन्यांच्या भोंगळ कारभाराविरोधात संताप व्यक्त होत आहे. वेळीच कारवाई न झाल्यास शेतकरी संघटनांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

**कृषी विभागाचे दुर्लक्ष?**

खरिपाच्या तोंडावरच बियाणे उगवण क्षमता नसल्याच्या तक्रारी वाढत आहेत. बियाणे विक्री करणाऱ्या दुकानदारांनी बिल देणे, बॅगवरील लॉट नंबर, उत्पादक कंपनीचे नाव देणे बंधनकारक आहे.

मात्र अनेकदा शेतकऱ्यांना बिलच दिले जात नाही. बियाणे कायदा १९६६ व बियाणे नियंत्रण आदेश १९८३ नुसार बियाण्याची उगवण क्षमता ७० टक्के पेक्षा कमी असेल तर उत्पादक कंपनी व विक्रेता जबाबदार धरला जातो.

# नोकरीच्या आमिषाने बनावट नियुक्ती आदेश देत तीन लाखांची फसवणूक?

## गुन्हे शाखेकडे सखोल चौकशीची मागणी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

सिव्हिल हॉस्पिटलमध्ये वॉर्ड अटेंडंट पदावर नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवत बनावट नियुक्ती आदेश देऊन प्रत्येकी १ लाख ५० हजार रुपये उकळल्याप्रकरणी दोन युवकांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे तक्रार दाखल करत सखोल चौकशी व कठोर कारवाईची मागणी केली आहे.

शिरसाळा (ता. मालेगाव) येथील वैभव प्रभाकर पडघान आणि आकाश राजेश पट्टेबहादूर यांनी स्वतंत्र निवेदनाद्वारे पोलीस अधीक्षक, गुन्हे शाखा, वाशीम यांच्याकडे तक्रार केली आहे. तक्रारीनुसार, तांदळी बुद्रुक येथील प्रतीक प्रभाकर कांबळे याने सिव्हिल हॉस्पिटल, वाशीम येथे वॉर्ड अटेंडंट पदावर नियुक्ती करून देण्याचे आश्वासन देत बनावट नियुक्ती आदेश दिले. त्यासाठी दोघांकडून प्रत्येकी १ लाख ५० हजार रुपये घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. अशा प्रकारे एकूण ३ लाख रुपयांची फसवणूक झाल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे. या प्रकरणात वापरण्यात आलेल्या नियुक्ती आदेशांवर शासकीय शिक्के व स्वाक्षऱ्यांची बनावट कागदपत्रे वापरण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. त्यामुळे ही फसवणूक एखाद्या मोठ्या रॅकेटमार्फत करण्यात आली असण्याची शक्यता तक्रारदारांनी व्यक्त केली आहे. दोन्ही तक्रारदारांनी या प्रकरणाची प्रत शहर पोलीस स्टेशन, वाशीम येथेही दिली असून गुन्हे शाखेमार्फत सखोल तपास करण्याची मागणी केली आहे. आरोपीचे मोबाईल, कॉल रेकॉर्ड्स व आर्थिक व्यवहारांची चौकशी करून अशा प्रकारे फसवणूक झालेल्या इतर पीडितांचा शोध घ्यावा आणि संपूर्ण रॅकेट उघडकीस आणून संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

दरम्यान, या तक्रारीमुळे नोकरीच्या आमिषाने बनावट नियुक्ती आदेश देऊन फसवणूक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश होणार का, याकडे जिल्ह्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# अल निनोच्या पार्श्वभूमीवर शाश्वत सोयाबीन शेतीचे मार्गदर्शन; कृषी विज्ञान केंद्राचा प्रशिक्षण कार्यक्रम



**मालेगाव :** कृषी विज्ञान केंद्र, वाशिम यांच्या वतीने खरीप हंगाम २०२६ अंतर्गत सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी पेरणीपूर्व प्रशिक्षण कार्यक्रम ३ जुलै रोजी नागरतास येथील सनराईज इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये उत्साहात पार पडला. कार्यक्रमाला वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. आर. एल. काळे, तालुका कृषी अधिकारी कैलास देवकर तसेच कृषी विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ उपस्थित होते.

डॉ. आर. एल. काळे यांनी अल निनोच्या संभाव्य परिणामांच्या पार्श्वभूमीवर हवामान-स्मार्ट कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब, मृदा आरोग्य, संतुलित खत व्यवस्थापन, दर्जेदार बियाणे, वेळेवर पेरणी व सरी-वरंबा पद्धतीचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी मृदा परीक्षण, बीजप्रक्रिया, आंतरपीक पद्धती, तण, कीड व रोग व्यवस्थापन तसेच सोयाबीन पीक अर्थकारण आणि बाजारपेठ नियोजनाबाबत शास्त्रज्ञांनी मार्गदर्शन केले. तालुका कृषी अधिकारी कैलास देवकर यांनी शेतकऱ्यांना पेरणीयोग्य पाऊस झाल्यानंतरच पेरणी करण्याचे तसेच प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमात शेतकऱ्यांना सोयाबीन पीक व्यवस्थापनावरील माहितीपत्रके व प्रात्यक्षिकासाठी आवश्यक निविष्ठांचे वितरण करण्यात आले. मालेगाव तालुक्यातील शेतकरी या प्रशिक्षणात सहभागी झाले.

# इनरव्हिल नॉर्थचा पदग्रहण सोहळा संपन्न

**अकोला :** सामजिक व सांस्कृतिक सेवेत सक्रीय असणाऱ्या महिलांच्या इनरव्हील क्लब ऑफ अकोला नॉर्थचा २०२६- २७ च्या कार्यकारणीचा पदग्रहण सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.यात नवीन अध्यक्षा म्हणून ज्योती रुहाटीया व सचिव म्हणून नितीशा कोठारी यांनी कमान संभाळली.स्थानीय वेलकम सभागृहात संपन्न या सोहळ्यात मावळत्या अध्यक्षा हेमा खटोड यांनी नवनिर्वाचित अध्यक्ष ज्योती रुहाटीया यांना अध्यक्षपदाचा पदभार सोपविला. या सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून पीडीसी आशा तारे,पिडीसी वीणा वाघेला,पीडीसी वैजयंती पाठक,नगरसेविका उषा विरक उपस्थित होत्या.

# पाचव्या मजल्यावरून कोसळून मजुराचा दुर्दैवी मृत्यू



- बांधकामस्थळी सुरक्षेवर प्रश्नचिन्ह
- विद्याभारती कॉलेज परिसरातील घटना
- सुरक्षा नियमांचे पालन झाले होते का?

■ प्रतिनिधी | कारंजा ■

शहरातील विद्याभारती कॉलेज परिसरात सुरू असलेल्या बांधकामादरम्यान पाचव्या मजल्यावरून खाली पडून एका तरुण मजुराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. या घटनेमुळे बांधकामस्थळी कामगारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून संबंधित यंत्रणांच्या कार्यपद्धतीवरही प्रश्न उपस्थित होत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, सुजल दिलीप सदय (वय १८ वर्षे, रा. राणाघाट, पश्चिम बंगाल) हा मजूर इमारतीच्या पाचव्या मजल्यावर काम करत असताना अचानक तोल जाऊन खाली कोसळला. घटनेची माहिती मिळताच आई एकवीरा रुग्णवाहिकेचे रुग्णसेवक विनोद खोड यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन जखमी मजुराला कारंजा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले.

तेथे प्राथमिक उपचार केल्यानंतर त्याला पुढील उपचारासाठी अमरावती येथे रेफर करण्यात आले. मात्र अमरावतीकडे नेत असताना वाटेतच त्याचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून विद्यार्थी, पालक आणि नागरिकांमध्येही चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

या दुर्घटनेनंतर अनेक गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. संबंधित कामगाराने सेफ्टी बेल्ट, हेल्मेट किंवा अन्य सुरक्षा साधनांचा वापर केला होता का? बांधकामस्थळी आवश्यक सुरक्षा व्यवस्था उपलब्ध होती का? कामगारांचा विमा काढण्यात आला होता का? उंचावर काम करणाऱ्या मजुरांसाठी आवश्यक नियमांचे पालन करण्यात आले होते का? याबाबत सखोल चौकशीची मागणी होत आहे.

कामगार संघटनांनीही या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. संबंधित कंत्राटदार, बांधकाम व्यवस्थापन तसेच जबाबदार अधिकाऱ्यांची भूमिका तपासली जावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. सदर इमारतीच्या बांधकामासंदर्भातील मंजूर नकाशा, बांधकाम परवाना, सुरक्षाविषयक अटी व त्यांची अंमलबजावणी यांचीही चौकशी होणे आवश्यक असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. विद्यार्थ्यांच्या वापरासाठी उभारण्यात येणारी इमारत सर्व सुरक्षा निकषांची पूर्तता करणारी असावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान, या दुर्घटनेची सखोल चौकशी करून सत्य परिस्थिती जनतेसमोर आणावी व भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कठोर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी सर्व स्तरांतून होत आहे.

# १८ वर्ष सैन्यदलात, १७ वर्ष पोलीस दलात सेवा

## ज्ञानबा खिल्लारे यांचा सेवानिवृत्ती निमित्त सत्कार



**वाशीम :** देशसेवा आणि जनसेवा अशा तब्बल ३५ वर्षांच्या प्रदीर्घ व कर्तव्यनिष्ठ सेवेनंतर महाराष्ट्र पोलीस दलातून सेवानिवृत्त झालेले ज्ञानबा निंबाजी खिल्लारे (रा. वाघी, ता. मालेगाव, जि. वाशीम) यांचा नुकताच जिल्हा पोलीस दलाच्या वतीने सपत्नीक सत्कार करण्यात आला.

अत्यंत गरीब कुटुंबातील असलेल्या ज्ञानबा खिल्लारे यांनी जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या बळावर प्रथम भारतीय सैन्यात भरती होत तब्बल १८ वर्षे देशसेवा बजावली. त्यानंतर महाराष्ट्र पोलीस दलात दाखल होऊन आणखी १७ वर्षे प्रामाणिकपणे कर्तव्य बजावत जनतेच्या सेवेत योगदान दिले. सेवाकाळात त्यांनी शिस्त, प्रामाणिकपणा आणि कर्तव्यदक्षतेचा आदर्श कायम जपला. सेवानिवृत्तीनिमित्त आयोजित सत्कार सोहळ्यात जिल्हा पोलीस दलाच्या वतीने त्यांचा व त्यांच्या पत्नीचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी पोलीस विभागातील अधिकारी, कर्मचारी तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत जे. सी. हायस्कूलचा झंझावात

■ प्रतिनिधी | कारंजा ■

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता ५ वी) व पूर्व उच्च माध्यमिक (इयत्ता ८ वी) शिष्यवृत्ती परीक्षेत जे. सी. हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, कारंजा (लाड) येथील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेचा पुन्हा एकदा ठसा उमटविला आहे.

इयत्ता ५ वीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत शहरी विभागातून ओवी विजयकुमार काष्टे हिने जिल्ह्यात द्वितीय क्रमांक पटकावत मानाचा बहुमान मिळविला. याशिवाय स्वराज विकास सोनेकर (४ था मेरिट), अवनीश उमेश मांजरे (७ वा मेरिट), सोहम गौरव नवरे (८ वा मेरिट), आरोही सुदीप मिश्रीकोटकर (११ वा मेरिट), ओजस्वी हेमंत पापळे (२० वा मेरिट), स्वरा वैभव पांडे (२१ वा मेरिट), वरद निलेशराव वानखडे (२६ वा मेरिट), स्वराली प्रवीण गांजरे (३१ वा मेरिट), वेदश्री जितेंद्र व्यास (४५ वा मेरिट), राजवीर दिनेश भोयर (५१ वा मेरिट), रिद्धी अमोल बानगावकर (५५ वा मेरिट), ज्ञानेश्वरी श्याम सवई (५६ वा मेरिट), आराध्या चौधरी (५७ वा मेरिट) आणि पार्थ नंदकिशोर सुरजुसे (६५ वा मेरिट) यांनी जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळवत विद्यालयाचा गौरव वाढविला.



इयत्ता ८ वीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत तर विद्यालयाने आणखी एक मानाचा तुरा रोवला. शहरी विभागातून अनुष्का पंकज वानखडे हिने जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तिच्यासह विराज हरीश देशमुख (३ रा मेरिट), जितेंद्र रामेश्वर शिंदे (८ वा मेरिट), सर्वेश परमानंद बोन्ते (१० वा मेरिट), विघ्नेश भूषण अलमवार (२० वा मेरिट), स्वरा प्रसन्ना साखरकर (२२ वा मेरिट), स्नेहल जगदीश दिघडे (२५ वा मेरिट), सानवी सुनील देशमुख (२८ वा मेरिट), जयराज योगेश देशमुख (२९ वा मेरिट), शांभवी सचिन विभुते (३२ वा मेरिट), साईश हरीश वानखडे (३५ वा मेरिट), स्वरा विशाल इंदाने (३९ वा मेरिट) आणि नैतिक अतुल तालन (४० वा मेरिट) यांनीही उल्लेखनीय यश संपादन केले. विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण अध्ययन, कठोर परिश्रम, पालकांचे प्रोत्साहन आणि शिक्षकांचे नियोजनबद्ध मार्गदर्शन यामुळे हे यश शक्य झाल्याचे विद्यालय प्रशासनाने सांगितले.

# माजी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांची जयंती आता 'जलसंधारण दिन'


## २१ ऑगस्टला राज्यभर शासकीय स्तरावर साजरा होणार

**मानोरा :** महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व 'जलसंधारणाचे प्रणेते' स्व. सुधाकरराव नाईक यांच्या जन्मदिनानिमित्त २१ ऑगस्ट हा दिवस यापुढे राज्यात दरवर्षी 'जलसंधारण दिन' म्हणून साजरा केला जाणार आहे. मृद व जलसंधारण विभागाने दि. ०३ जून २०२६ रोजी राज्यपालांच्या नावे शासन निर्णय जारी केला आहे.

माजी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांच्या जलसंधारण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यामुळे त्यांचा स्मृती दिवस १० मे हा राज्यात सन २००३ पासून 'जलसंधारण दिन' म्हणून साजरा करण्यात येत होता.मात्र आता १० मे ऐवजी माजी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांचा जन्मदिवस २१ ऑगस्ट हा 'जलसंधारण दिन' म्हणून राज्यात साजरा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

दुष्काळात दिला मूलमंत्र स्व. सुधाकरराव नाईक हे सन १९९१ ते १९९३ या कालावधीत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना राज्यात तीव्र दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली होती. खालावलेली भूजल पातळी आणि पाणी टंचाईवर कायमस्वरूपी उपाय म्हणून, मोठ्या धरणांवर अवलंबून राहण्याऐवजी पाणलोट विकास आणि भूजल पुनर्भरणावर भर देण्यासाठी 'पाणी अडवा, पाणी जिरवा' हा मूलमंत्र देत राज्यात जलसंधारणाची मोठी चळवळ त्यांनी उभी केली. लहान संरचनांवर भर नविन प्रकल्पांपेक्षा अस्तित्वात असलेले जुने जलस्त्रोतांचे पुनरुज्जीवन करण्यावर आणि माती नाला बांध, सलग समतल, नाला बंडींग यासारख्या छोट्या मृद व जलसंधारण संरचना बांधण्यावर त्यांनी भर दिला. याकरिता त्यांनी सन १९९२ साली स्वतंत्र जलसंधारण विभागाची स्थापना करून जलसंधारणाची कामे हे केवळ सरकारी योजना न राहता लोकचळवळ बनावी यासाठी त्यांनी राज्यभर दौरे केले.

रोहयो द्द जलसंधारण महाराष्ट्रातील प्रसिद्ध रोजगार हमी योजनेचा वापर जलसंधारणाच्या कामासाठी करून दुष्काळी काळात मजुरांच्या हाताला काम दिले. यामुळे राज्यात ग्रामीण भागात एकाच वेळी रोजगार निर्माण झाला आणि जलसाठे निर्माण होण्यास मदत झाली. शासन निर्णयानुसार २१ ऑगस्ट रोजी क्षेत्रिय स्तरावर खालील कार्यक्रम घेणे बंधनकारक आहे. सर्व क्षेत्रिय कार्यालयांमध्ये सुधाकरराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून 'मृद व जलसंधारणाची शपथ' घेण्यात येईल. मृद व जलसंधारणाच्या विविध योजनांतर्गत कामांचे भूमीपूजन, लोकार्पण व जलपूजन करण्यात येईल. प्रिंट मिडिया, सोशल मिडिया, न्यूज वाहिनी व स्थानिक पातळीवर जलसंधारणाचे महत्त्व पटवून दिले जाईल. उत्कृष्ट व उल्लेखनीय काम करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना पुरस्कार/प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात येईल. विविध योजनांतर्गत लोकसहभागाची/ श्रमदानाची कामे केली जातील.



**कोण होते सुधाकरराव नाईक**

२१ ऑगस्ट १९३४, गहुली या यवतमाळ जिल्ह्यातील गावात झाला होता. २५ जून १९९१ ते २२ फेब्रुवारी १९९३ पर्यंत ते राज्याच्या मुख्यमंत्रीपदी होते.जलसंधारणाचे प्रणेते दुष्काळमुक्त महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून त्यांची राज्यामध्ये ओळख आहे. माजी मुख्यमंत्री नाईक यांनी १९९२ साली देशातील पहिला स्वतंत्र जलसंधारण विभाग स्थापन करण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतलेला आहे. सन २००३ पासून सुधाकरराव नाईक यांचा स्मृतिदिन १० मे हा 'जलसंधारण दिन' म्हणून साजरा होत होता. मात्र त्यांचे जलसंधारणातील योगदान हे त्यांच्या जन्मदिनाशीच अधिक संबंधित असल्याने व त्यांच्या विचारांना जन्मदिनीच उजाळा मिळावा, या हेतूने १० मे ऐवजी २१ ऑगस्ट हा 'जलसंधारण दिन'म्हणून साजरा करण्याचा प्रस्ताव होता. तो आता मंजूर झाला आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २१८ ■ रविवार, ५ जुलै २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## सडक्या सोयाबीनचा विळखा... बाजार समिती झोपेतच

### ओले सोयाबीन शेडमध्येच वाळविण्याचा प्रकार; दुर्गंधीने नागरिक हैराण, व्यापाऱ्यांना मोकळे रान, प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात सडलेल्या व ओली झालेल्या सोयाबीनमुळे दुर्गंधीचे साम्राज्य पसरले असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. बाजार समितीच्या शेडमध्ये मोठ्या प्रमाणात खरेदी करण्यात आलेले सोयाबीन महिनोनमहिने खचाखच भरून ठेवण्यात आले आहे. गेल्या आठवड्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक पोती पाण्याखाली गेल्याने सोयाबीन ओले झाले. त्यानंतर या सोयाबीनला सड येण्यास सुरुवात झाली. परिणामी संपूर्ण परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली असून बाजार समितीत येणारे शेतकरी, व्यापारी, हमाल, वाहनचालक तसेच या मार्गाने ये-जा करणाऱ्या नागरिकांना नाक दाबून वावरावे लागत आहे. मात्र या गंभीर समस्येकडे कृषी उत्पन्न बाजार समिती प्रशासनाने पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

धक्कादायक बाब म्हणजे, पावसात भिजलेले आणि ओली झालेले सोयाबीन सर्रासपणे बाजार समितीच्या शेडमध्येच वाळविण्यात येत आहे. शेडमध्ये सोयाबीन पसरवून वाळत घातल्याने सडलेल्या धान्याचा उग्र वास आणखी वाढत असून संपूर्ण परिसर दुर्गंधीच्या विळख्यात सापडला आहे. बाजार समितीच्या शेडचा वापर तात्पुरत्या साठवणुकीसाठी होणे अपेक्षित असताना त्याचे रूपांतर ओले व खराब झालेले सोयाबीन वाळविण्याच्या ठिकाणात झाल्याचे चित्र दिसत आहे. या प्रकारामुळे बाजार समिती प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.



सोयाबीनची खरेदी-विक्री पूर्ण झाल्यानंतर संबंधित व्यापाऱ्यांनी मालाची तातडीने विल्हेवाट लावणे ही त्यांची जबाबदारी आहे. मात्र अनेक व्यापाऱ्यांकडून महिनोनमहिने सोयाबीन शेडमध्येच पडून ठेवले जात असल्याचा आरोप होत आहे. एवढेच नव्हे, तर अशा प्रकाराला बाजार समिती प्रशासनाकडून मूक संमती दिली जात असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. जर खरेदी झालेला माल तातडीने हलविण्याचा नियम असेल, तर काही व्यापाऱ्यांना वर्षानुवर्षे शेडमध्ये माल ठेवण्याची मुभा का दिली जाते, असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत.

सडलेल्या सोयाबीनमुळे माशा, डास आणि इतर कीटकांचे प्रमाण वाढले असून परिसरात अस्वच्छतेचे वातावरण निर्माण झाले आहे. दुर्गंधीमुळे परिसरातील व्यापारी, कामगार आणि नागरिक त्रस्त झाले असून आरोग्याच्या दृष्टीनेही ही परिस्थिती धोकादायक ठरत आहे. अनेकांनी बाजार समिती प्रशासनाकडे तक्रारी केल्याचे सांगितले जात असले तरी अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही.

या संपूर्ण प्रकरणाची जिल्हा प्रशासनाने गांभीर्याने दखल घेण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने बाजार समितीची पाहणी करून सडलेले व ओले सोयाबीन हटविण्याचे आदेश द्यावेत, शेडमध्ये ओले सोयाबीन वाळविण्याचा प्रकार त्वरित बंद करावा, संबंधित व्यापाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी तसेच निष्काळजी अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी, अशी जोरदार मागणी होत आहे. अन्यथा नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या या निष्क्रिय व्यवस्थेविरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही संतप्त नागरिकांनी दिला आहे.

## दोन महिन्यांपासून अंधारात मुख्य मार्ग

## संतप्त नागरिकांचा आंदोलनाचा इशारा

### जुने बसस्टँड ते मोर्शी टी-पॉईंट मार्गावरील स्ट्रीट लाईट बंद-तक्रारींकडे नगरपंचायतीचे दुर्लक्ष-नागरिकांनीच सुरू केली प्रकाश व्यवस्था

**आष्टी शहीद जनमाध्यम :** आष्टी नगरातील जुने बसस्टँड ते मोर्शी टी-पॉईंट हा मुख्य मार्ग गेल्या दोन महिन्यांपासून अंधारात असल्याने नागरिकांना रात्री जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. स्ट्रीट लाईट बंद असल्याबाबत नगरपंचायतीकडे वारंवार लेखी व तोंडी तक्रारी करूनही कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, तातडीने कायमस्वरूपी दुरुस्ती न झाल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

इंदिरानगर प्रभाग क्रमांक २ मधील नागरिकांनी सांगितले की, स्ट्रीट लाईट पोलवरील मुख्य विद्युत यंत्रणा (मेन) खराब झाल्यामुळे संपूर्ण मार्गावरील प्रकाश व्यवस्था ठप्प झाली आहे. याबाबत अनेक वेळा नगरपंचायतीच्या संबंधित अधिकाऱ्यांचे लक्ष वेधण्यात आले. मात्र, खराब यंत्रणा बदलण्यास प्रशासनाने टाळाटाळ केल्याने मुख्य रस्ता अंधारात बुडाला आहे. त्यामुळे अपघात, चोरी तसेच महिला, ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.



प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही होत नसल्याने अखेर नागरिकांनीच पुढाकार घेत बंद पडलेली प्रकाश व्यवस्था सुरू केली. या उपक्रमात चंद्रशेखर मदनकर, प्रज्वल हीरुडकर, महादेव दारोकर, विलास कावनपुरे, मंगेश बजाईत, सचिन सुरजुसे, अक्षय वानखेडे, तेजस मामुरकर, अक्षय शेळके आणि भूषण कालोकर यांनी सक्रिय सहभाग घेतला.

नगरपंचायतीच्या निष्क्रिय कारभारावर संताप व्यक्त करत, 'कर आम्ही भरायचा आणि मूलभूत सुविधा देखील आम्हीच सुरू करायच्या का?' असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला. खराब मेन तातडीने बदलून कायमस्वरूपी प्रकाश व्यवस्था सुरळीत करावी, अन्यथा तीव्र जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

## दुर्गवाड्यात ४१ वर्षीय शेतकऱ्याची आत्महत्या

**आष्टी शहीद जनमाध्यम :** आष्टी तालुक्यातील दुर्गवाडा येथील शेतकरी विनोद रंगराव खंडाळे (वय ४१) यांनी शुक्रवारी पहाटे राहत्या घरी आत्महत्या केल्याची घटना घडली. या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त होत असून कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. प्राथमिक माहितीनुसार, विनोद खंडाळे हे शेतीसंदर्भातील आर्थिक विवंचना आणि कर्जाच्या वाढत्या ओझ्यामुळे मानसिक तणावाखाली होते. या कारणातून त्यांनी टोकाचे पाऊल उचलल्याची माहिती मिळाली आहे.



मृत विनोद खंडाळे यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी आणि दोन मुले असा परिवार आहे. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. संबंधित घटनेची नोंद पोलिसांनी घेतली असून पुढील तपास सुरू आहे.

## शिवसेनेच्या पाठपुराव्याने हलले जल प्राधिकरण

## आर्वीतील पाण्याच्या टाकीची अखेर सफाई सुरू

**गढूळ पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर**
**निष्काळजीपणावर शिवसेनेचा हल्लाबोल**
**तीव्र आंदोलनाचा इशारा**

**आर्वी जनमाध्यम :** आर्वी शहरातील नागरिकांना गढूळ, दुर्गंधीयुक्त आणि अनियमित पाणीपुरवठ्याचा सामना करावा लागत असल्याच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर अखेर शहरातील पाण्याच्या टाकीची सफाई सुरू करण्यात आली. अनेक वर्षांपासून टाकीची स्वच्छता न झाल्याने मोठ्या प्रमाणात गाळ साचल्याचे पाहणीत उघड झाले. या प्रकारामुळे नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू असल्याचा आरोप शिवसेनेने करत जल प्राधिकरणाच्या कारभारावर तीव्र टीका केली आहे.

आर्वी शहरात उन्हाळ्यात पाणीटंचाई तर पावसाळ्यात गढूळ व दूषित पाण्याचा पुरवठा अशी दुहेरी समस्या निर्माण झाली आहे. दूषित पाण्यामुळे साथीच्या आजारांचा धोका वाढला असून शाळकरी मुलांनाही दुर्गंधीयुक्त पाणी पिण्याची वेळ येत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. रस्ते, नाले आणि पाणीपुरवठा यांसारख्या मूलभूत सुविधांबाबत प्रशासनाच्या उदासीन भूमिकेमुळे शहरवासीयांचा रोष वाढला आहे.

शिवसेनेने २६ व २७ जूनपासून या प्रश्नाचा पाठपुरावा सुरू केला. त्यानंतर २८ जून रोजी करण्यात आलेल्या पाहणीत शहराच्या पाण्याच्या टाकीत मोठ्या प्रमाणात गाळ साचल्याचे निदर्शनास आले. संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केल्यानंतर टाकीची सफाई करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. त्यानुसार शनिवारी टाकीतील गाळ काढण्याचे काम सुरू करण्यात आले.



शिवसेनेचे नगरसेवक तथा तालुकाप्रमुख योगेश गुड्डू गावंडे यांनी सांगितले की, शहरवासीयांना स्वच्छ पाणी मिळेपर्यंत आपण मागे हटणार नाही. जनतेचा सेवक म्हणून नागरिकांना शुद्ध पाणी मिळणे हीच आपली प्राथमिक जबाबदारी आहे. विधानसभा समन्वयक सनी गौतम यांनीही जल प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून परिस्थितीची माहिती दिली. उपकार्यकारी अभियंता सतीश बोरलीवार यांनी ऊइ क्लॅरिफायरची साफसफाई सुरू करण्यात आल्याची माहिती देत समस्या लवकरच दूर होईल, असे सांगितले.

मात्र ही साफसफाई वेळेवर झाली असती तर नागरिकांना आंदोलन करण्याची वेळ आली नसती, अशी प्रतिक्रिया शिवसेनेने देत जल प्राधिकरणाच्या निष्काळजीपणावर प्रश्न उपस्थित केला. शहरातील पाणीपुरवठा कायमस्वरूपी स्वच्छ व सुरळीत करण्यासाठी तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात. अन्यथा नागरिकांसह तीव्र लोकआंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही शिवसेनेने प्रशासनाला दिला आहे.

## वर्धेत दोन दिवस रंगणार कामगार हक्कांचे मंथन

**वर्धा जनमाध्यम :** केंद्र सरकारच्या नव्या श्रमसंहितांमुळे कामगार क्षेत्रात होत असलेल्या बदलांच्या पार्श्वभूमीवर कामगार चळवळीची पुढील दिशा निश्चित करण्यासाठी अखिल भारतीय ट्रेड युनियन काँग्रेस (आयटक)च्या वतीने ५ व ६ जुलै रोजी वर्धा येथे दोन दिवसीय राज्यस्तरीय शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यभरातील कामगार संघटनांच्या प्रतिनिधींना एकत्र आणणारे हे शिबिर कामगार हक्कांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

शिबिरात केंद्र सरकारने लागू केलेल्या चार नवीन श्रमसंहितांचा कामगारांच्या हक्कांवर, सामाजिक सुरक्षिततेवर, वेतन संरचनेवर, औद्योगिक संबंधांवर तसेच कामगार कल्याणावर होणाऱ्या परिणामांचा सखोल अभ्यास केला जाणार आहे. बदलत्या कामगार धोरणांमध्ये संघटनांनी कोणती भूमिका घ्यावी, कामगारांच्या प्रश्नांवर प्रभावी लढा कसा उभारावा आणि जनजागृतीचे नियोजन कसे करावे, यावरही व्यापक विचारमंथन होणार आहे.

शिबिराचे उद्घाटन आयटकचे राष्ट्रीय सचिव तथा वीज कामगारांचे नेते कॉम्रेड मोहन शर्मा यांच्या हस्ते होणार असून, आयटकचे ज्येष्ठ नेते कॉम्रेड प्रा. तानाजी ठोंबरे, दिल्लीचे कॉम्रेड सुकुमार दामले तसेच सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ डॉ. श्रीनिवास खांदेवाले विविध विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत. त्यांच्या व्याख्यानातून नव्या श्रमसंहितांचे सामाजिक आणि आर्थिक परिणाम उलगडून सांगितले जाणार आहेत.

## राधानगरात बेकायदेशीर विदेशी दारू विक्रीवर रामनगर पोलिसांचा छापा

### दोन आरोपी अटकेत १६ हजारांचा मुद्देमाल जप्त

**वर्धा जनमाध्यम :** रामनगर पोलीस ठाण्याच्या दारूबंदी पथकाने राधानगर परिसरात धाड टाकून बेकायदेशीरपणे विदेशी दारूची विक्री करणाऱ्या दोन आरोपींना अटक केली. या कारवाईत विविध ब्रँडच्या विदेशी दारूसह एकूण १६ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



रामनगर पोलीस ठाण्याच्या दारूबंदी पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे शुक्रवार (३ जुलै) रोजी सायंकाळी ४.५० ते ५.३० वाजताच्या दरम्यान स्वावलंबी शाळेच्या मैदानाजवळ, राधानगर येथे छापा टाकण्यात आला. यावेळी शंतनू बंडू इंगळे (२५, रा. गांधीनगर, वर्धा) व सुरज गजानन गाडगे (२६, रा. साबळे ले-आउट, राधानगर, वर्धा) हे दोघे बेकायदेशीरपणे विदेशी दारूची विक्री करताना आढळून आले. पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून रॉयल स्टॅग, ऑफिसर चॉईस ब्ल्यू, ऑफिसर चॉईस, आयकॉनिक व्हाईट, रॉयल चॅलेंज या ब्रँडच्या १८० मिलीच्या बाटल्या, ट्यूबर्ग बिअरचे १७ कॅन तसेच प्लास्टिकचे दोन पाण्याचे कॅन असा एकूण १६,१०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी रामनगर पोलीस ठाण्यात अपराध क्रमांक ६१३/२६ नोंदविण्यात आला असून, महाराष्ट्र दारूबंदी कायद्यातील कलम ६५ (ई), ७७ (अ) व ८३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे व उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील महाडीक यांच्या मार्गदर्शनाखाली, रामनगर पोलीस ठाण्याच्या निरीक्षक पौर्णिमा राखोंडे यांच्या नेतृत्वात दारूबंदी पथकातील अवि. बनसोड, मनोज भोमले, मुकेश वांदिले, विकी अणेराव आणि महिला अंमलदार कांचन कौरती यांनी पार पाडली.

## खा.अमर काळे यांच्या मध्यस्थीने रास्तभाव दुकानदारांच्या आंदोलनाला दिलासा

**वर्धा जनमाध्यम :** विविध प्रलंबित मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरू असलेल्या वर्धा जिल्हा रास्तभाव धान्य दुकान व केरोसीन परवानाधारक संघटनेच्या साखळी उपोषणाला अखेर सकारात्मक वळण मिळाले. खासदार अमर काळे यांनी आंदोलनस्थळी भेट देत प्रशासनाशी मध्यस्थी केली. त्यानंतर बहुतांश मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन मिळाल्याने संघटनेने उपोषण मागे घेतले.

रास्तभाव धान्य दुकानदारांनी सहा महिन्यांपासून प्रलंबित असलेले कमिशन तातडीने अदा करावे, कमिशन प्रति क्विंटल ३०० रुपये करावे, प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेपर्यंत कमिशन खात्यात जमा करावे, पोर्टेबिलिटीमुळे होणाऱ्या अतिरिक्त धान्य वितरणासाठी स्वतंत्र पासिंगची सुविधा उपलब्ध करावी, प्रति क्विंटल एक किलो तूट मंजूर करावी तसेच एप्रिल महिन्यातील प्रलंबित व्यवहारांचा डेटा पीओएस मशीनमध्ये अद्ययावत करावा, अशा प्रमुख मागण्या प्रशासनासमोर मांडल्या होत्या.



आंदोलनस्थळी खासदार अमर काळे यांनी दुकानदारांशी सविस्तर चर्चा करून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. त्यानंतर जिल्हा पुरवठा अधिकारी आणि सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी साबळे यांच्यासोबत प्रत्येक मागणीवर चर्चा करण्यात आली. चर्चेनंतर सहापैकी बहुतांश मागण्यांवर तातडीने कार्यवाही करण्याचे प्रशासनाने मान्य केले. उर्वरित तांत्रिक स्वरूपाच्या मागण्यांसाठी शासनस्तरावर पाठपुरावा करून त्या मार्गी लावण्याचे आश्वासनही देण्यात आले.

## 'मंकी बात'ने उलगडले व्यवस्थेचे विदारक वास्तव

**वर्धा जनमाध्यम :** अध्ययन भारती संचालित ॲग्रो थिएटर निर्मित आणि हरिष इथापे दिग्दर्शित मंकी बात या प्रयोगशील नाटकाने वर्धेकरांना अस्वस्थ वर्तमानाचा आरसा दाखविला. स्थानिक मगन संग्रहालयाच्या सभागृहात झालेल्या या प्रयोगाला रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

फिजिकल थिएटर शैलीत सादर झालेल्या या नाटकात जंगलातील सत्तासंघर्ष आणि मानवी समाजातील बदलत्या व्यवस्थेचे प्रभावी रूपक मांडण्यात आले. नाटकाच्या पहिल्या भागात जंगलातील माकडांचे विविध गट सत्तेसाठी संघर्ष करताना दिसतात. या संघर्षातून एका हुकूमशहाचा उदय होतो आणि सत्तेच्या केंद्रीकरणाचे प्रतीकात्मक चित्र उभे राहते.

दुसऱ्या भागात हीच माकडे मानवी रूप धारण करतात. एका सामान्य कुटुंबाची कथा पुढे सरकते. कुटुंबातील कारसेवक आजोबांना पेन्शन मिळविण्यासाठी शासकीय प्रक्रियेला सामोरे जावे लागते. प्रत्येक टप्प्यावर भ्रष्टाचार, लाचखोरी आणि प्रशासकीय अडथळ्यांमुळे त्यांच्याकडील मौल्यवान वस्तू हिरावल्या जातात. अखेरीस त्यांची ओळखच नाकारली जाते. एका प्रामाणिक नागरिकाला व्यवस्था कशा पद्धतीने गिळंकृत करते, याचे हृदयस्पर्शी चित्रण नाटकातून करण्यात आले.

## देशी गोवंश संवर्धनाचा संदेश देत 'राज्यमाता गोमाता संवादयात्रे'चा वर्ध्यात समारोप

**वर्धा जनमाध्यम :** पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र गोसेवा आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यमाता गोमाता संवादयात्रा २०२६ चा वर्धा जिल्ह्यातील करुणाश्रम पिपल फॉर ॲनिमल येथे उत्साहात समारोप झाला. संपूर्ण महाराष्ट्रातील २५ जिल्ह्यांचा प्रवास पूर्ण करून ही संवादयात्रा वर्ध्यात दाखल झाली.

कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांच्या हस्ते झाले. यावेळी माजी खासदार सुरेश वाघमारे, आयोगाचे अशासकीय सदस्य डॉ. सुनील सूर्यवंशी, उद्धव नेरकर, सदस्य सचिव डॉ. श्यामकांत पाटील, हभप सयाजी महाराज तसेच जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. जगदीश बुकतरे यांची प्रमुख उपस्थिती होती.





प्रास्ताविकात डॉ. सुनील सूर्यवंशी यांनी संवादयात्रेचा उद्देश स्पष्ट केला. शेखर मुंदडा यांनी देशी गोवंशाचे संवर्धन, गोशाळा स्वावलंबी करण्यासाठी गोमय उत्पादने, सेंद्रिय शेती, भेसळमुक्त दूध व सात्विक दुग्धजन्य पदार्थांच्या निर्मितीवर भर देण्याची गरज व्यक्त केली. शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन गोशाळा आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊ शकतात, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमात संत लहानुजी महाराज भजन मंडळ, टाकरखेडा यांनी दिंडीद्वारे सहभाग नोंदविला. जिल्ह्यात गोसंवर्धन, गोआधारित नैसर्गिक शेती आणि गोसेवा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या रूपाली हुमेश पाटील (नालवाडी), गौळाऊ गोवंश जतन, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पल्लवी पुरोहित यांनी केले, तर आभार रवींद्र टप्पे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आशीष गोस्वामी, वसंतराव पंचभाई, बाळासाहेब पावडे, जयंत येरावार तसेच जिल्ह्यातील सर्व गोशाळा संचालकांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला गोशाळा पदाधिकारी, गोपालक, गोरक्षक आणि गोसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आधी न्याय द्या, मगच सेवा; हिवताप कर्मचाऱ्यांचा सरकारला इशारा

**वर्धा जनमाध्यम :** दोन वर्षांपासून रखडलेली पदोन्नती, अन्यायकारक बदल्या आणि प्रलंबित मागण्यांकडे शासनाकडून होत असलेल्या दुर्लक्षाविरोधात महाराष्ट्र राज्य हिवताप निर्मूलन कर्मचारी मध्यवर्ती संघटनेने सोमवार, ६ जुलै रोजी मुंबईतील आझाद मैदानावर राज्यव्यापी 'लक्षवेध आक्रोश धरणे' आंदोलनाची घोषणा केली आहे. दुपारी १२ ते सायंकाळी ५ या वेळेत होणाऱ्या या आंदोलनात राज्यभरातील हजारो कर्मचारी सहभागी होणार असून, मागण्यांवर तातडीने निर्णय न झाल्यास बेमुदत कामबंद आंदोलनाचा इशाराही संघटनेने दिला आहे.

संघटनेचे राज्याध्यक्ष डी. एस. पवार यांनी सांगितले की, १६ फेब्रुवारी २०२४ च्या शासन निर्णयामुळे गट 'क' आणि गट 'ड' कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती प्रक्रियेत बदल करण्यात आले. त्यानंतर ज्येष्ठता यादी, पदोन्नती, बदल्या आणि बिंदूनामावली यामध्ये मोठी गुंतागुंत निर्माण झाली. परिणामी गेल्या दोन वर्षांपासून एकाही कर्मचाऱ्याला पदोन्नती मिळालेली नसून, हा शासन निर्णय तात्काळ रद्द करण्याची मागणी संघटनेने केली आहे.

याशिवाय नागपूर विभागातील समुपदेशनाद्वारे करण्यात आलेल्या बदल्या रद्द करणे, आरोग्य पर्यवेक्षक व आरोग्य निरीक्षक संवर्गाची पदोन्नती प्रक्रिया तातडीने सुरू करणे, क्षेत्र कर्मचाऱ्यांचा कायम प्रवासभत्ता १,५०० रुपयांवरून ५,००० रुपये करणे, आरोग्य कर्मचारी व आरोग्य पर्यवेक्षकांच्या पदनामात बदल करणे तसेच ३ एप्रिल २०२६ रोजी शासनाकडे सादर केलेल्या सर्व मागण्यांवर त्वरित निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली आहे.

या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन राज्याध्यक्ष डी. एस. पवार यांच्यासह प्रदीप चंदे, पुरुषोत्तम आडेप, दीपक गोतमारे, लक्ष्मण मराठे, अशोक संकपाळ, सतीश कांबळे, चंद्रकांत मुटकुळे आणि देवेंद्र थेटे यांनी केले आहे. शासनाने आंदोलनानंतरही सकारात्मक भूमिका घेतली नाही, तर राज्यभर बेमुदत कामबंद आंदोलन छेडण्याचा स्पष्ट इशारा संघटनेने दिला आहे.


## जाहीर नोटीस

माझे अशील श्री. प्रशांत अण्णाजी कावडे हे मौजा–पिंपळगाव (म.), ता. हिंगणघाट, जि. वर्धा, मौजा क्र. १०३ पी.एच. क्र. ३४, ग्रामपंचायत पिंपळगाव (म.) हद्दीतील सर्व्हे क्र. ९०/१/९१/अ/९१/ब/८९/१ मधील प्लॉट क्र. १८५, क्षेत्रफळ ६०.६३ चौ. मी. (६५३.०० चौ. फूट) या मालमत्तेचे मालक आहेत.

सदर मालमत्तेच्या चतु:सीमा पुढीलप्रमाणे आहेत :

पूर्वेस : प्लॉट क्र. १८६,

पश्चिमेस : प्लॉट क्र. १८४,

उत्तरेस : ६ मीटर रुंदीचा ले-आऊट रस्ता ,दक्षिणेस : सर्व्हे क्र. ९३ चा उर्वरित भाग श्री. शेख सलीम शेख खलिज यांनी वरील नमूद प्लॉट क्र. १८५, क्षेत्रफळ ६०.६३ चौ. मी. (६५३.०० चौ. फूट) हा दिनांक २८/०३/२०२४ रोजी दस्तऐवज क्र. २०७१/२०२४ अन्वये विक्रीखत करून माझे अशील श्री. प्रशांत अण्णाजी कावडे यांना विक्री केला आहे. सदर विक्रीखतामध्ये नमूद केलेल्या मोबदल्याप्रमाणे संपूर्ण विक्री किंमत अदा करण्यात आलेली असून त्यानुसार मुद्रांक शुल्कही भरलेले आहे. त्यामुळे सदर प्लॉट क्र. १८५, क्षेत्रफळ ६०.६३ चौ. मी. (६५३.०० चौ. फूट) या मालमत्तेवरील सर्व हक्क, मालकी हक्क व हितसंबंध माझे अशील श्री. प्रशांत अण्णाजी कावडे यांचेकडे कायदेशीररीत्या हस्तांतरित झालेले आहेत.

तसेच, सदर मालमत्तेचे मूळ लिंक विक्रीखत दिनांक १७/०१/२०१८ दस्तऐवज क्र. ३१०/२०१८, , ते मूळ विक्रीखत माझ्या अशिलाकडून हरवले आहे.

माझ्या अशिलांनी आधार हाउसिंग फायनान्स लिमिटेड (आधार हाउसिंग फायनान्स लिमीटेड) येथे कर्जासाठी अर्ज केलेला आहे.

यास्तव सर्व संबंधितांना जाहीर कळविण्यात येते की, वरील व्यवहाराबाबत कोणाचा काही हरकतीचा दावा अथवा हक्क असल्यास किंवा हरवलेले मूळ विक्रीखत कोणास मिळून आल्यास, त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधून लेखी हरकत नोंदवावी. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

**ॲड. आर. आर. तिवारी**
रामनगर, वर्धा – ४४२००१
मोबा. क्र.: ९९२२४२६१६८

# ‘ॲट्रॉसिटी’ कायद्याअंतर्गत दाखल गुन्ह्यांमधील दोषसिद्धीचे प्रमाण वाढवा -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## राज्यस्तरीय दक्षता व संनियंत्रण समिती बैठक



**मुंबई/प्रतिनिधी :** अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक अर्थात ‘ॲट्रॉसिटी’ कायद्याअंतर्गत दाखल गुन्ह्यांमध्ये दोषसिद्धीचे प्रमाण वाढविण्यात यावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान भवन येथे अनुसूचित जाती, जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम अंमलबजावणीसाठी गठीत राज्यस्तरीय दक्षता व संनियंत्रण समितीच्या बैठकीत दिले. या कायद्यासारख्या विशेष कायद्यामध्ये सरकारी वकिलांमार्फत दोषसिद्धी वाढविण्यासाठी करण्यात आलेल्या कार्याचा उल्लेख त्यांच्या मूल्यमापनात करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. बैठकीस खासदार हेमंत सवरा यांच्यासह समितीमधील आमदार उपस्थित होते.भारतीय न्याय संहितेमध्ये कुठल्याही खटल्यात दोन वेळा तडजोड किंवा समायोजन करण्याची तरतूद असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातही या तरतुदींवर आधारित कायद्यात सुधारणा करण्यासंदर्भातील प्रस्ताव सादर करावा. विशेष कायद्यांमध्ये दोन वेळा समायोजनाचीच तरतूद असावी. जेणेकरून अशा गुन्ह्यांमध्ये आरोपी सुटणार नाहीत. राज्यातील ज्या जिल्ह्यांमध्ये ‘ॲट्रॉसिटी’चे गुन्हे जास्त आहेत, त्या ठिकाणी जलदगती न्यायालय उभारावीत. या न्यायालयांच्या माध्यमातून खटल्यांच्या निकालांना गती मिळेल. त्यामुळे पीडितांना गुन्हा दाखल झाल्यापासून कमी कालावधीत न्याय मिळणार असल्याचा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

गृह विभागाच्या मार्वल संस्थेच्या माध्यमातून ‘ॲट्रॉसिटी’ गुन्ह्यांमधील दोषसिद्धी न होण्याची कारणे शोधून गुन्हा दाखल झाल्यापासून ते न्यायालयामध्ये खटला दाखल करेपर्यंत विशिष्ट कार्य पद्धती तयार करण्यात यावी. यामध्ये तकलादू पुरावे, चेन ऑफ इव्हेंट, साक्षीदार फितूर होणे या बाबींचा अभ्यास करून ही विशिष्ट कार्यपद्धती असावी. या कायद्याअंतर्गत तपास अधिकारी हा उपविभागीय पोलीस अधिकारी असतो. त्यामुळे राज्यभरात घेण्यात येणा-या कार्यशाळांमध्ये प्रकर्षाने उपविभागीय पोलीस अधिकारी स्तरावर प्रशिक्षण घेण्यात यावीत. या कायद्याअंतर्गत दाखल खटल्यांच्या न्यायालयीन सुनावणीची भारतीय न्यायसंहितेमधील तरतुदीनुसार व्हिडिओ चित्रीकरण करावे, जेणेकरून साक्षीदार फितूर होण्याचे प्रमाण कमी होईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यात सोलापूर, अहिल्यानगर, परभणी, नांदेड व यवतमाळ जिल्ह्यांमध्ये ‘ॲट्रॉसिटी’ कायद्याअंतर्गत दाखल होणा-या गुन्ह्यांचे प्रमाण जास्त असण्यासंदर्भात पोलीस यंत्रणेने या मागील कारणे शोधावीत, याबाबत अधिक खोलवर चौकशी करून गुन्ह्यांचा शोध घेत अहवाल सादर करावा. कुठेही खोटे गुन्हे असल्यास तपासाअंती ते दाखल करण्यात येउ नयेत. या कायद्याअंतर्गत दाखल खटल्यांच्या सुनावणी दरम्यान खून, बलात्कार, दरोडे आदी गंभीर गुन्हे प्रकारातील साक्षीदारांचे संरक्षण करावे. त्यासाठी साक्षीदार संरक्षण कार्यक्रम राबविण्यात यावा.

जिल्हास्तरावर कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करीत सरकारी वकिलांशी संवाद व समन्वय वाढविण्यात यावा. या कायद्याच्या अंमलबजावणी संबंधित असलेल्या सर्व यंत्रणांची कार्यशाळा घेउन त्यांना प्रशिक्षित करावे. तसेच कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरावर मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली आणि पोलीस महासंचालक यांच्या अध्यक्षतेखाली वर्षातून सहा महिन्याच्या अंतराने बैठक आयोजित करण्यात यावी, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. बैठकीत सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांनी सादरीकरण केले. यावेळी मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (गृह) मनीषा म्हैसकर, पोलिस महासंचालक सदानंद दाते, प्रधान सचिव (विधि व न्याय) दिलीप घुमरे, सचिव (आदिवासी विकास) विजय वाघमारे, अपर पोलिस महासंचालक (नागरी हक्क संरक्षण) अश्विती दोरजे, समाज कल्याण आयुक्त दीपा मुधोळ आदी उपस्थित होते.

**‘ॲट्रॉसिटी’ कायद्याअंतर्गत देण्यात आलेली आर्थिक मदत व हेल्पलाईनविषयी माहिती-** ‘ॲट्रॉसिटी’ कायद्यांतर्गत २०२५-२६ मध्ये ४ हजार ५२४ पीडित व्यक्तींना आर्थिक मदत देण्यात आली आहे. यापोटी ५३ कोटी ५७ लाख रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे. तसेच २०२६-२७ मध्ये आतापर्यंत २ हजार ८१ पीडित व्यक्तींना २७ कोटी ४० लाख रुपयांची मदत करण्यात आली आहे. अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत १४५६६ या हेल्पलाइनवरही तक्रारी स्वीकारण्यात येतात. या हेल्पलाइनवर प्राप्त २८२ तक्रारी १ जून २०२६ पूर्वी निकाली काढण्यात आल्या आहेत.

## राम मंदिरातील नियमांत मोठा बदल

# जमिनीवर बसून होणार दान मोजणी

**अयोध्या /- वृत्तसंस्था-** राम मंदिरातील दान मोजणी व्यवस्थेत सुरक्षा आणि पारदर्शकता वाढवण्यासाठी एक मोठा बदल करण्यात आला आहे. मोजणी कक्षात आता कर्मचा-यांना कडक सुरक्षा व्यवस्था आणि डबल चेकिंग केल्यानंतरच प्रवेश दिला जात आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मोजणी करणा-या कर्मचा-यांसाठी आता नवा ड्रेस कोड लागू करण्यात आला आहे.

कर्मचा-यांना नो प?केट असलेला डार्क ब्लू रंगाचा पोशाख घालणं बंधनकारक असेल. यासोबतच मोजणी कक्षात प्रवेश करण्यापूर्वी प्रत्येक कर्मचा-याला दोन टप्प्यांच्या सुरक्षा तपासणीला सामोरे जावे लागेल. दानाची मोजणी आता खुर्ची-टेबलवर नव्हे, तर जमिनीवर बसून केली जाईल. मोबाईल, कॅमेरा, बॅग आणि इतर वैयक्तिक सामान मोजणी कक्षाच्या आत घेउन जाण्यावर पूर्णपणे



बंदी घालण्यात आली आहे.कर्मचा-यांना मोजणी कक्षात प्रवेश करण्यापूर्वी आपल्या चपला बाहेरच काढाव्या लागतील. याच दरम्यान राम मंदिरातील दान चोरीचे प्रकरण सातत्याने नवीन खुलाशांमुळे चर्चेत आहे. या प्रकरणातील आरोपी अनुकल्प मिश्रा याच्याबाबत एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अनुकल्प मिश्राच्या नावावर मंदिरात व्यवस्था कार्यकर्ता म्हणून एन्ट्री पास जारी केला जात असे. मंदिरात होणा-या प्रत्येक विशेष कार्यक्रमादरम्यान अनुकल्प मिश्राच्या नावाने एन्ट्री पास तयार केला जात होता, असा आरोप आहे. याच व्यवस्था कार्यकर्ता पासच्या माध्यमातून त्याला मंदिर परिसरात प्रवेश मिळत असल्याचा दावा केला जात आहे. दुसरीकडे, दान चोरीच्या प्रकरणात श्री रामजन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टचे सदस्य महंत दिनेंद्र दास महाराज यांनी दोषींसाठी कठोर शिक्षेची मागणी केली आहे.

# सोने आणि चांदीचे दर गगनाला

## आठवडाभरात सोनं तब्बल 6,500 तर चांदी 17,000 हून अधिक महाग

**मुंबई/प्रतिनिधी :** डॉलर इंडेक्सवरील दबाव आणि जागतिक स्तरावर महागाई कमी होण्याच्या शक्यतेमुळे या आठवड्यात सोनं आणि चांदीच्या किमतींमध्ये मोठी तेजी पाहायला मिळाली. दोन्ही मौल्यवान धातूंना मिळालेल्या जोरदार मागणीमुळे सोनं सुमारे ६,५०० आणि चांदी १७,००० पेक्षा जास्त महाग झालंय. देशांतर्गत बाजारासोबतच जागतिक बाजारातही सोने-चांदीचे दर वधारलेत. आंतरराष्ट्रीय बाजारात सोने ४,९७० डालर प्रति औंस आणि चांदी ६२ डालर प्रति औंसच्या जवळपास ट्रेड करत आहे.

**विविध कॅरेटनुसार सोन्याचे नवे दर (प्रति १० ग्रॅम)-** 'इंडिया बुलियन ज्वेलर्स असोसिएशन' नं जारी केलेल्या आकडेवारीनुसार, सोन्याच्या दरात झालेली वाढ खालीलप्रमाणे आहे:२४ कॅरेट सोनं : या आठवड्यात ६,४७१ ची मोठी झेप घेत सोनं १,४६,३४४ वर पोहोचलं आहे, जे पूर्वी १,३९,८७३ वर होतं.२२ कॅरेट सोनं : याचे दर आता १,३४,०५१ झाले आहेत,



जे पूर्वी १,२८,१२४ होते.१८ कॅरेट सोनं : गेल्या आठवड्यात १,०४,९०५ वर असलेले १८ कॅरेट सोनं आता ?१,०९,७५८ वर विकलं जात आहे.या आठवड्यात सोन्याची सर्वात कमी पातळी १ जुलैच्या सकाळी १,३९,४३४ नोंदवली गेली, तर ३ जुलैच्या संध्याकाळी सोन्यानं १,४६,३४४ चा आठवड्यातील सर्वोच्च स्तर गाठला.नागपूरच्या RTO अधिका-यानं २२ रुपयांत बुक केली Rapido बाईक आणि मग जे झालं... त्यानं कंपनीची झोप उडवली

**चांदी २.३३ लाखांच्या पार-**सोन्याप्रमाणेच चांदीच्या दरातही या आठवड्यात प्रचंड वाढ झाली आहे. चांदीचा दर १७,३१७ च्या वाढीसह २,३३,८५८ प्रति किलोग्राम या ऑल-टाइम हाय पातळीवर पोहोचला आहे, जो पूर्वी २,१६,५४१ वर होता.

# मुंबईसह राज्यात मुसळधार पाउस

## मुख्यमंत्री फडणवीसांनी नागरिकांना केले आवाहन

**मुंबई :** हवामान विभागाकडून आज (०४ जुलै) मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे आणि रायगड या जिल्ह्यांना पावसाचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने सर्व यंत्रणा सतर्क केल्या असून, महापालिका, आपत्ती व्यवस्थापन विभाग, अग्निशमन दल आणि इतर आपत्कालीन यंत्रणा हाय अलर्टवर आहेत. तसेच नागरिकांनी अत्यावश्यक काम असल्याशिवाय घराबाहेर पडू नये, सखल भाग, समुद्रकिनारे आणि धोकादायक ठिकाणी जाणे टाळावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. त्यानंतर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील नागरिकांना महत्त्वाचं आवाहन केलं आहे. माध्यमांशी संवाद साधताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यामध्ये विशेषतः एमएमआर रिजन असेल ठाणे, रायगड, पालघर असेल पुण्याचा काही भाग असेल नाशिकचा काही भाग असेल आणि इतरही काही भागांमध्ये अतिशय मुसळधार पाउस पडत आहे. त्यामुळे कालपासून आपण वेगवेगळे अलर्ट दिलेले आहेत. विशेषतः या भागांमध्ये सहा तारखेपर्यंत सातत्याने अतिशय मुसळधार पाउस असेल आणि वादळ देखील येईल. एव्हरेजच्यापेक्षा



कितीतरी जास्त पाउस होईल, अशा प्रकारची जी काही अलर्ट्स आहेत, ही अलर्ट्स आपण देत आहोत. त्या भागातल्या नागरिकांना देखील आपण सातत्याने दर तीन तासांनी एसएमएस देखील पाठवत आहोत आणि वेगवेगळ्या प्रकारचे अलर्ट्स देखील आपण देत आहोत.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आज अनेक ठिकाणी शाळांना आपण सुट्टी दिली आहे. लोकांना आपण विनंती केलेली आहे की, प्रवास टाळता आला तर तो टाळला पाहिजे. जेणेकरून आता ज्या प्रकारे पाउस आणि ज्या प्रकारच वादळ आहे, त्याच्यामुळे काही अपघात त्या ठिकाणी होउ नयेत, या दृष्टीने त्याचा देखील अलर्ट आपण दिलेला आहे. एनडीआरएफ, एसडीआरएफ आणि आपत्ती व्यवस्थापन कक्ष प्रत्येक गोष्टीवर नजर ठेवून आहे. ज्या-ज्या ठिकाणी अडचणी तयार होत आहेत, त्या-त्या ठिकाणी अडचणी दूर करण्याचा प्रयत्न चाललेला आहे. फक्त माझी विनंती आहे की, यावेळी आपण नीट अलर्ट सगळ्यांना देत आहोत. लोकांनी ते अलर्ट्स फ?लो करावेत आणि शक्यतो त्या अलर्ट्स प्रमाणेच आपण त्या ठिकाणी बाहेर पडावं, अशा प्रकारची विनंती देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

# जालन्यात भीषण अपघात; दोन एसटी बसेसची समोरासमोर धडक

**जालना / प्रतिनिधी-** जालन्यातील अंबड-वडीगोद्री रस्त्यावरील शहापूर परिसरात दोन एसटी बसचा अत्यंत भीषण अपघात झाल्याची घटना समोर आली आहे. दोन बसची समोरासमोर जोरदार धडक झाली आहे. या अपघातात दोन्ही बसचे चालक गंभीर जखमी झाले आहेत. तसेच बसमधील शाळकरी विद्यार्थ्यांसह साधारण २५ ते ३० प्रवासी जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे.



स्थानिक प्रतिनिधीने दिलेल्या माहितीनुसार, मानव विकास मिशन ची बस शाळकरी विद्यार्थ्यांना घेउन भांबेरी येथून अंबडच्या दिशेने जात होती. याच दरम्यान शहापूर परिसरात समोरून येणा-या दुस-या बससोबत या बसची जोरदार धडक झाली. मानव विकासच्या बसमध्ये जवळपास २५ ते ३० विद्यार्थी होते, तर दुस-या बसमध्ये १२ ते १५ प्रवासी प्रवास करत होते. या धडकेत दोन्ही बसेसचे मोठे नुकसान झाले आहे.अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी आणि पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. बसमधील जखमी विद्यार्थी आणि इतर प्रवाशांना तातडीने अंबड येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. प्राथमिक उपचार सुरू असून गंभीर जखमींवर विशेष लक्ष दिले जात आहे. या अपघातामुळे रस्त्यावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. शहापूरजवळील गल्हाटी नदीच्या पुलावर या दोन्ही बसची समोरासमोर जोरदार धडक झाली. या अपघातात दोन्ही बसचालकांसह काही प्रवाशांना गंभीर दुखापत झाल्याची प्राथमिक माहिती असून, त्यांच्यावर रुग्णालयात वैद्यकीय उपचार सुरू आहेत.

# मतदार पुनरिक्षण प्रक्रियेत घोटाळा?

## ‘एसआयआर’ योजनेत डेटामध्ये फेरफार

**मुंबई / प्रतिनिधी-** लोकशाही प्रक्रियेची पारदर्शकता आणि राष्ट्रीय सुरक्षेशी थेट संबंधित असलेल्या मतदार याद्या शुद्ध करण्यासाठी निवडणूक आयोगाकडून राबवण्यात येणा-या विशेष संक्षिप्त मतदार पुनरिक्षण कार्यक्रमात नवी मुंबईत अनियमिततेचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.नवी मुंबईमधील ऐरोली-बेलापूर मतदारसंघांमध्ये एसआयआरयोजनेअंतर्गत करण्यात येणा-या ऑनलाईन मॅपिंग प्रक्रियेत थेट डेटा फेरफार करून कामाची टक्केवारी कृत्रिमरीत्या वाढवण्यात आल्याचा आरोप पुढे आला आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, नवी मुंबईतील ऐरोली परिसरात कार्यरत असलेल्या एका अधिका-याने महिला बीएलओ कर्मचा-यांना दबाव आणि दमदाटी करत अधिकृत साफ्टवेअरचे गोपनीय ओटीपी स्वतःकडे घेतले. त्यानंतर प्रत्यक्षात केवळ १० ते २० टक्के काम पूर्ण झालेले असतानाही सिस्टीममध्ये फेरफार करून ऑनलाईन मॅपिंगची प्रगती थेट ५० टक्क्यांपर्यंत दाखवण्यात आल्याचे उघड झाले आहे.या घटनेमुळे संपूर्ण मतदार पुनरिक्षण प्रक्रियेच्या विश्वासार्हतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, निवडणूक व्यवस्थेतील पारदर्शकतेबाबत नवे वाद निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. आता याप्रकरणी संबंधित मतदार नोंदणी अधिकारी नेमका काय खुलासा करतात, याकडे राजकीय वर्तुळासह नागरिकांचे लक्ष लागले आहे.




केंद्र सरकारने देशभरातील मतदार याद्यांमध्ये असलेली बोगस नावे हटवणे, मतदारांचे अचूक पत्ते तपासणे आणि दुबार नोंदणी रोखणे या उद्देशाने एसआयआरयोजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत स्थानिक प्रशासनांना ऑनलाईन पडताळणी आणि मॅपिंगची जबाबदारी देण्यात आली आहे. नवी मुंबई महापालिका प्रशासनाने या कामासाठी खासगी शिक्षक, आशा वर्कर्स आणि अंगणवाडी सेविकांची बीएलओ म्हणून नियुक्ती केली आहे. मात्र आता याच प्रक्रियेत गोपनीय माहितीचा गैरवापर करून अधिकृत डेटामध्ये छेडछाड झाल्याचे समोर आल्याने निवडणूक यंत्रणेतील सुरक्षाव्यवस्थेवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

# भर पावसातही आमिर खानच्या घरी तिस-या लग्नाची तयारी

**मुंबई/प्रतिनिधी :**आमिर खान वयाच्या ६१ व्या वर्षी तिस-यांदा बोहल्यावर चढणार आहे. १५ वर्ष लहान गौरी स्प्रॅटसोबत तो उद्या लग्न करणार आहे. हे लग्न आमिरच्या मुंबईतील राहत्या घरी अगदी साध्या पद्धतीने होणार आहे. दोघं रजिस्टर्ड मॅरेज करणार आहेत. तसंच लग्नाला मोजक्याच लोकांना आमंत्रण देण्यात आलं आहे. नातेवाईक आणि जवळच्या मित्रमंडळींचा यात समावेश आहे. भर पावसात आमिरच्या घरी लग्नाची तयारी सुरु झाली आहे. पाली हिल येथील घराबाहेरील व्हिडीओ आता व्हायरल होतोय. आमिर खानचं पाली हिल येथील घर सजलं आहे. लाइट्स आणि फुलांची सजावट करण्यात आली आहे. त्याच्या घराबाहेर आलेला टेम्पो व्हिडीओत दिसत आहे. भर पावसातही त्याच्या घरी खुर्च्या आणि इतर सजावटीचं सामान घेउन लोक आले आहेत. मुंबईत सध्या धो धो पाउस कोसळत असताना हे लोक रेनकोट घालून आमिरच्या लग्नाची तयारी करत आहेत. आमिरचे नातेवाईकही त्याच्या घरली दाखल झाले आहेत. सेलिब्रिटी फोटोग्राफर वरिंदर चावला यांच्या इन्स्टाग्राम पेजवर व्हिडीओ अपलोड करण्यात आला आहे. आमिर नुकताच प्रीतम अँड पेड्रो सीरिजच्या स्क्रीनिंगला आला होता. तिथे त्याने सर्वांसमोर लग्नाची घोषणा केली. अगदी साध्या घरगुती पद्धतीने हे लग्न होणार असल्याचं त्याने सांगितलं. तसंच आम्हाला आशीर्वाद द्या अशीही विनंती केली.



# इथेनालमिश्रित पेट्रोलमुळे मायलेज कमी

## केंद्र सरकारची कबुली

**नवी दिल्ली / वृत्तसंस्था**-देशात पर्यावरणपूरक इंधनाला चालना देण्यासाठी केंद्र सरकारकडून ई-२० (२० टक्के इथेनालमिश्रित) पेट्रोलचा वापर वाढवला जात आहे. मात्र, या इंधनामुळे वाहनांच्या मायलेजवर काही प्रमाणात परिणाम होउ शकतो, अशी कबुली केंद्र सरकारने पहिल्यांदाच दिली आहे. केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायुमंत्री हरदीपसिंह पुरी यांनी दिल्लीत घेतलेल्या पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. मात्र, मायलेजमधील ही घट अत्यंत किंचित असेल आणि ती केवळ इथेनालमुळेच नाही, तर इतर अनेक घटकांवरही अवलंबून असू शकते, असे त्यांनी स्पष्ट केले. हरदीपसिंह पुरी यांनी मायलेज



कमी होण्याच्या चर्चेवर स्पष्टीकरण देताना सांगितले की, इथेनालचा वापर आता रेसिंग कार्समध्येही मोठ्या प्रमाणावर केला जातो, हे आता सिद्ध झाले आहे. यामुळे वाहनाचे ऑक्सिलेशन (पिक-अप) सुधारते आणि इंजिनमधील नाकिंग ची (खडखडाट) समस्याही कमी होते.

त्यामुळे मायलेजमध्ये जर थोडी घट झाली, तर त्याला कारमधील इतर तांत्रिक गोष्टी किंवा ड्रायव्हिंगची पद्धत यासारखे इतर अनेक घटक कारणीभूत असू शकतात. वाहन उत्पादक संघटना आणि ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया यासारख्या सर्वसंबंधित संस्थांशी चर्चा करूनच ई-२० पेट्रोल बाजारात आणले गेल्याचे त्यांनी सांगितले.



# बलुचिस्तानमध्ये आत्मघाती हल्ला ३० हून अधिक जवान ठार

बलुचिस्तान / वृत्तसंस्था- बलूच लिबरेशन आर्मीने पुन्हा एकदा पाकिस्तानात मोठा रक्तपात घडवून आणला आहे. ग्वादरमधील जिवानी भागातील पनवान येथे असलेल्या पाकिस्तान कोस्ट गार्डच्या छावणीवर बीएलएने भीषण आत्मघाती हल्ला केला. द बलुचिस्तान पोस्टच्या वृत्तानुसार, या शक्तिशाली हल्ल्यात पाकिस्तानचे ३० हून अधिक जवान जागीच ठार झाले असून अनेकजण गंभीर जखमी झाले आहेत. या धाडसी हल्ल्याची जबाबदारी बलूच लिबरेशन आर्मीने अधिकृतपणे स्वीकारली आहे.शुक्रवारी संध्याकाळी बीएलएच्या विशेष मजीद ब्रिगेडने हा हल्ला घडवून आणला. स्थानिक वेळेनुसार संध्याकाळी ६:३२ च्या सुमारास अताउल्लाह बलूच उर्फ अजमल नावाच्या आत्मघाती हल्लेखोराने स्फोटकांनी भरलेला ट्रक कोस्ट गार्डच्या तळामध्ये घुसवला आणि काही सेकंदांतच संपूर्ण परिसरात प्रचंड मोठा स्फोट झाला.

**लष्करी छावणीचे रूपांतर ढिगा-यात-** बीएलएचा प्रवक्ता जियांद बलूच याने अधिकृत पत्रक जारी करून या हल्ल्याची माहिती दिली. या शक्तिशाली स्फोटामुळे पाकिस्तान कोस्ट गार्डची लष्करी छावणी पूर्णपणे उद्ध्वस्त झाली असून तिचे रूपांतर केवळ ढिगा-यात झाले आहे, असा दावा प्रवक्त्याने केला आहे.

# भूतानचा भारताकडून E20 पेट्रोल घेण्यास नकार: गाड्या खराब होण्याच्या धोक्याची शक्यता, म्हटले- जोपर्यंत मिळत आहे; सामान्य पेट्रोलच द्या

**नवी दिल्ली-**भारत सरकारच्या E20 म्हणजेच २०ऽ इथेनाल मिश्रित पेट्रोलच्या निर्णयावर देशात वाद आणि विरोध सुरू असताना, शेजारील देश भूतानने भारतीय तेल कंपन्यांकडून (OMCs) E20 पेट्रोल घेण्यास नकार दिला आहे. भूतानी मीडिया 'द भूटानीज' च्या अहवालानुसार, भूतानने भारताला विनंती केली आहे की, जोपर्यंत भारतीय बाजारात सामान्य पेट्रोल उपलब्ध आहे, तोपर्यंत त्यांना भेसळ नसलेले जुने पेट्रोलच पुरवले जावे.

**जुनी साठवणूक आणि पाणी गळती हे सर्वात मोठे कारण-** भूतानच्या अधिका-यांनुसार, देशातील इंधन साठवणुकीची पायाभूत सुविधा खूप जुनी आहे. तेथील पेट्रोल पंपांचे इंधन टाक्या जमिनीखाली (अंडरग्राउंड) बनवलेल्या आहेत, ज्यात पाणी झिरपण्याचा म्हणजेच सीपेजचा धोका असतो. सामान्य पेट्रोलच्या तुलनेत इथेनाल मिश्रित क२० पेट्रोलमध्ये हायड्राक्सिल ग्रुप असतो, जो हवा किंवा आसपासची आर्द्रता खूप वेगाने शोषून घेतो (हायग्रोस्कोपिक नेचर). जर क२० पेट्रोल अशा टाक्यांमध्ये ठेवले गेले जिथे पाण्याची गळती होते, तर पेट्रोलमध्ये पाणी मिसळेल. हे पाणी पेट्रोलपासून वेगळे करणे खूप कठीण असते. याशिवाय, टाकीत पाणी असल्यामुळे स्टीलच्या टाक्या आणि पाइपलाइनमध्ये गंज लागण्याचा धोका वाढतो, ज्यामुळे गाड्यांचे इंजिन खराब होउ शकतात.डोंगराळ रस्त्यांवर गाड्यांच्या कार्यक्षमतेची चिंता भूतानचा प्रदेश पूर्णपणे डोंगराळ आणि चढ-उताराचा आहे. अशा चढणीच्या रस्त्यांवर गाड्यांना चालण्यासाठी जास्तीत जास्त शक्तीची म्हणजेच अधिक ताकदीची गरज असते. भूतानी अधिका-यांना भीती आहे की इथेनाल मिसळलेले पेट्रोल डोंगराळ रस्त्यांवर गाड्यांना सामान्य पेट्रोल जेवढी कार्यक्षमता आणि शक्ती देते, तेवढी देउ शकणार नाही.

**भारतात E20 पेट्रोलला विरोध का होत आहे?-**भारतात २०% इथेनाल आणि ८०% पेट्रोलच्या या मिश्रणाला (E20) विरोध होत आहे. विशेषत? २०२३ पूर्वी बनवलेल्या पेट्रोल गाड्यांचे मालक चिंतेत आहेत. त्यांचा दावा आहे की या इंधनामुळे गाड्यांचे मायलेज कमी होत आहे, देखभालीचा खर्च वाढला आहे आणि इंजिनचे भाग लवकर खराब होत आहेत. तथापि, भारत सरकारचे म्हणणे आहे की इथेनालमुळे मायलेजमध्ये थोडी घट नक्कीच येते.



# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## 'शेतकरी महिला'

देशातील ग्रामीण भागात आर्थिक दृष्ट्या सक्रिय असलेल्या एकूण महिलांपैकी ८० टक्क्यांहून अधिक महिला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे शेती आणि पूरक व्यवसायांमध्ये कार्यरत आहेत. शेतीत काम करणाऱ्या एकूण महिलांपैकी ४८ टक्के महिला कौटुंबिक शेतीत काम करतात, तर ३३ टक्के महिला कृषी मजूर आहेत. उर्वरित महिला पशुपालन आणि दुग्ध व्यवसायात आहेत. कृषी जनगणनेनुसार भारतातील एकूण शेतजमिनीपैकी केवळ १३.९६ टक्के शेतजमीन महिलांच्या नावावर आहे. प्रत्यक्ष लागवडीखालील क्षेत्राचा विचार केल्यास हे प्रमाण ११.७२ टक्के आहे. 'पीएम किसान' योजनेच्या आकडेवारीनुसार, एकूण लाभार्थ्यांमध्ये केवळ २५ टक्के महिला लाभार्थी आहेत. कारण, ही योजना जमिनीच्या मालकीशी जोडलेली आहे. ज्याच्या नावावर सातबारा तोच शेतकरी अशी व्याख्या रूढ आहे. बँकिंग यंत्रणा, कर्जपुरवठा आणि पीक विमा याच व्याख्येवर आधारित आहेत. जमीन नावावर नसल्यामुळे दिवस-रात्र शेतात राबूनही लाखो महिला कायद्याच्या नजरेत केवळ मजूर ठरतात. कुटुंबातील पुरुषाच्या मृत्यूनंतर जमीन मुलांच्या नावावर करण्याची प्रथा होती.या वारसा हक्काच्या आणि कौटुंबिक कायद्यांच्या गुंतागुंतीमुळे महसूल विभागाला थेट हस्तक्षेप करून केवळ काम करणाऱ्या महिलांना स्वतंत्र अधिकार देणे कायदेशीरदृष्ट्या कठीण जात होते. भारतात कृषी धोरणे आणि योजना आखताना 'शेतकरी कुटुंब' हा एक घटक मानला गेला. कुटुंबांतर्गत स्त्री की पुरुष असा फरक केला गेला नाही. यामुळे कुटुंबाचा प्रमुख म्हणून पुरुष हाच सर्व सरकारी लाभ आणि कर्जाचा चेहरा बनला. महिलांच्या श्रमाला कौटुंबिक कर्तव्याचा भाग मानले गेल्याने त्यांना स्वतंत्र 'आर्थिक उत्पादक' म्हणून कायदेशीर मान्यता देण्याची गरज आजवरच्या सरकारांना जाणवली नाही. या पार्श्वभूमीवर पावसाळी अधिवेशनात 'महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक २०२६' मंजूर करून फडणवीस सरकारने ऐतिहासिक पाऊल टाकले आहे. शेती क्षेत्रातील महिलांच्या योगदानाची दखल घेत असे धोरणात्मक पाऊल टाकणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य ठरले. या कायद्याने ७५ वर्षांची जुनी 'जमीन मालकीची अट' मोडीत काढून, केवळ शेतीत काम करण्याच्या निकषावर महिलांना 'शेतकरी?' म्हणून कायदेशीर मान्यता देण्यात येणार आहे.संयुक्त राष्ट्राने २०२६ हे वर्ष 'इंटरनॅशनल इयर ऑफ द वुमन फार्मर?' म्हणून घोषित केले असताना महाराष्ट्राने हा ऐतिहासिक कायदा केला. कृषी अथवा कृषीसंलग्न क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना 'शेतकरी' म्हणून ओळख मिळावी, हा या विधेयकाचा मुख्य उद्देश आहे. महिला शेतकऱ्यांची स्वतंत्र ओळख निर्माण करून त्यांना आर्थिक सक्षम करण्याचा हा प्रयत्न आहे. गेल्या काही दशकांत ग्रामीण भागातून लाखो पुरुष रोजगारासाठी शहरांत आले. यामुळे गावातील शेतीची धुरा महिलांच्या खांद्यावर आली. निर्णय घेण्यापासून ते प्रत्यक्ष कष्ट करण्यापर्यंत महिलाच आघाडीवर राहिल्या. जमिनीची मालकी बदलत नाही, तोपर्यंत महिलांना शेतकरी मानता येणार नाही, या कायदेशीर चौकटीत प्रशासन अडकले होते. बाजारव्यवस्थेत एखादी व्यक्ती आर्थिक निर्णय घेण्यास आणि स्वतःच्या श्रमाचा थेट आर्थिक लाभ मिळवण्यास स्वतंत्र नसते, तोपर्यंत तिला 'उत्पादक?' मानले जात नाही. हे विधेयक याच मानसिकतेवर आणि धोरणात्मक त्रुटीवर प्रहार करणारे आहे. सकाळी उठून स्वयंपाक करणे, पाणी भरणे, शेण काढणे, त्यानंतर कुटुंबासोबत शेतात पेरणी, लावणी, कोळपणी ही कामे महिला वर्षानुवर्षे करत आल्या; पण त्याला घरगुती कर्तव्याचा भाग मानले गेले.दुसऱ्याच्या शेतात कष्ट करून मजुरी मिळवणाऱ्या श्रमाची गणना आर्थिक म्हणून केली जायची; पण घरातील महिला कौटुंबिक शेतात १० ते १२ तास राबूनही तिला थेट पगार किंवा रोख मोबदला मिळत नसल्यामुळे अर्थशास्त्राच्या परिभाषेत त्यांचे हे योगदान 'बिगर आर्थिक?' होते. हा मोठा दोष होता. शेतात राबणाऱ्या महिलेची नोंद सरकारी कागदपत्रांमध्ये 'गृहिणी?' अशी असेल, तर ती देशाच्या उत्पादक श्रमशक्तीचा भाग नाही, असा प्रशासनाचा समज होता. यामुळे धोरणकर्त्यांना महिलांच्या स्वतंत्र आर्थिक अस्तित्वाची जाणीवच झाली नाही.बँक खाते, सहकारी संस्थेचे सभासदत्व किंवा शेतीमाल विक्री या सर्व गोष्टी पुरुषाच्या नावावर होत होत्या. उत्पादन बाजारात नेऊन विकण्याचा आणि त्यातून येणारा पैसा खिशात ठेवण्याचा अधिकार पुरुषाचा होता. यामुळे सर्व योजना पुरुषाच्या नावाने राबवल्या, तरी त्याचा फायदा कुटुंबाला मिळेलच, असा समज रूढ होता. या मानसिकतेमुळे महिलांची 'स्वतंत्र आर्थिक उत्पादक' ही ओळख पुसली गेली. नव्या विधेयकामुळे महिला शेतकऱ्यांना अधिकार आणि दर्जा मिळणार असून विविध योजनांमधून त्यांना वित्तपुरवठा केला जाणार आहे. यासाठी राज्य महिला शेतकरी निधीची स्थापना केली जाणार आहे. पशुपालन, मत्स्यपालन, कुक्कुटपालन तसेच इतर शेतीसंलग्न व्यवसाय करणाऱ्या महिलांनाही त्यांच्या नावावर सातबारा नसला, तरी शेतकरी दर्जा मिळणार आहे. 'लाडकी बहीण' योजनेनंतरचा दुसरा मास्टरस्ट्रोक म्हणून या विधेयकाचा फायदा महायुती सरकारला होणार, हे निश्चित आहे. महाराष्ट्राने कायदे करायचे आणि देशाने त्याचे अनुकरण करायचे ही जणू परंपरा बनून गेली आहे.या कायद्याबाबतही ही परंपरा पुढे जाताना दिसावी. विरोधी पक्षांनी काही सुधारणा सुचविल्या, तर त्या विचारात घ्याव्यात. अंमलबजावणीत प्रशासनाला काटेकोर भूमिका घ्यावी लागेल. 'लाडकी बहीण' योजनेत अपात्र महिला, काही ठिकाणी पुरुषांचा समावेश झाला, तशी परिस्थिती निर्माण होऊ शकते. शेतीशी संबंध नाही किंवा गावात केवळ जमीन असणाऱ्या शहरातील सुखवस्तू कुटुंबातील महिलादेखील राजकीय दबावाचा वापर करून महिला शेतकरी प्रमाणपत्र मिळवू शकतात. बोगस महिलांना प्रमाणपत्र मिळाले, तर कृषी अनुदान, स्वस्त कर्ज किंवा ड्रोन अनुदान योजनांचा फायदा खऱ्या गरजू शेतमजूर महिलांपर्यंत न पोहोचता, राजकीयदृष्ट्या प्रबळ लोकांच्या घरातच राहील. स्थानिक सरपंच, राजकीय नेते, धनदांडगे लोक ग्रामसभेला हाताशी धरून स्वतःच्या कुटुंबातील महिलांचे अर्ज तातडीने मंजूर करून घेतील, तर खऱ्या भूमिहीन आणि गरीब महिलांचे अर्ज लालफितीत अडकण्याची भीती आहे. थेट जमिनी महिलांच्या नावावर करण्याचा सक्तीचा कायदा आणला, तर कौटुंबिक वाद, जमिनीचे तुकडे पडणे आणि प्रचंड सामाजिक असंतोष निर्माण होऊ शकतो. त्यामुळे सरकारने मध्यम मार्ग काढत मालकी हक्काला हात न लावता 'ओळख प्रमाणपत्र' देण्याचा हा सुरक्षित मार्ग निवडला आहे.

# महिलांना 'शेतकरी' दर्जा देऊन काय होणार?

**जर सरकारला महिलांना 'शेतकरी' हा दर्जा द्यायचा असेल, तर त्या जो शेती व्यवसाय करतात तो किफायतशीर कसा होईल, यासाठी प्रयत्न करायला हवेत. शेतकरी म्हणून त्यांना कोणत्या अडचणींना सामोरे जावे लागते याचा विचार व्हायला हवा.**

कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक २०२६ ८ नुकतेच विधानसभेत मांडले. महिलांना 'शेतकरी' हा स्वतंत्र दर्जा देऊन त्या शेतकरी असल्याचे प्रमाणपत्र सरकार त्यांना देणार आहे.महिलांना कागदोपत्री शेतकरी दर्जा दिल्याने त्यांच्या आयुष्यात काय बदल होणार आहे? हा महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो.

महिलांच्या शेतीमालाला वेगळा, जास्त भाव मिळणार आहे का? त्यांना शेती करायला परवडेल अशा काय उपाययोजना सरकार करणार,आहे का?त्यांना सरकार बी-बियाणे मोफत अथवा सवलतीत देणार आहे का?त्यांना परवडतील अशा दरात निविष्ठा मिळणार का मशागत, खाते, बी-बियाण्यासाठी त्यांना नेहमी प्रमाणे आपले मंगळसूत्र गहाण ठेवावे लागणार नाही का? की सरकार त्यांचं कर्ज माफ करून त्यांचा सातबारा कोरा करणार?त्यांची शेती नफ्यात येण्यासाठी सरकार काय उपाय योजना करणार हे महत्त्वाचे आहे.

शेतीचा शोध स्त्रियांनी लावला. बियाणे संवर्धनाचे काम पण सुरुवातीपासून स्त्रियांनीच केलेले आहे. शेतात सर्वांत जास्त कष्ट महिला करतात. बीज सुरक्षित करणे, पेरणीच्या अगोदर बीज संस्कार करणे, शेतात बियाणे लावणे हे काम महिलाच करतात. शेतातली बहुतेक किचकट कामे महिला करतात. पीक घरात आल्यावर त्याचे वर्गीकरण करणे, बियाण्यासाठी चांगल्या प्रतीचे बी पुढील पेरणीसाठी बाजूला काढून ठेवणे, चांगला भाव मिळेल असे कोणते धान्य बाजारात घेऊन जायचे व त्यातले किती धान्य घरी ठेवावे म्हणजे लेकराबाळांना वर्षभर पोटभर खायला मिळेल, हे सगळे शेतीचे गणित शेतकरी महिला वर्षानुवर्षे करत आल्या आहेत. खळ्यावर राहिलेले मातेरे धुऊन साफ करून त्याचे सांडगे, पापड, डाळ ही कामेही महिलाच करतात. एवढे करूनही शेतीमाल बाजारात विकून जे पैसे येतात त्यातून गाडी भाडे, बी, खत, ओषधांची उधारी मिटवून, मजुरांचे सगळे पैसे वाटून जे पैसे घरात येतात त्यातून तिला स्वतःसाठी काही घेता येत नाही. हौस मौज नाही, इतके पैसे उरतच नाहीत. ही शेतकरी महिलांची शोकांतिका आहे.



जर सरकारला महिलांना 'शेतकरी' हा दर्जा द्यायचा असेल तर त्या जो शेती व्यवसाय करतात तो किफायतशीर कसा होईल, यासाठी प्रयत्न करायला हवेत. शेतकरी म्हणून त्यांना कोणत्या अडचणींना सामोरे जावे लागते याचा विचार व्हायला हवा. शेतकरी महिलांचे आयुष्य सुखकर होऊन त्यांचा राहणीमानाचा दर्जा कसा उंचावेल याचा विचार व्हायला हवा. शेती धंद्यावर सरकारने लादलेले तोट्याचे गणित बदलून ते फायद्याचे कसे होईल, असे धोरणात्मक बदल करावे लागतील. महिलांचे शारीरिक कष्ट कमी करण्यासाठी शेतीत नवनवीन तंत्रज्ञान विकसित झाले पाहिजे, विकसित देशांकडून असे तंत्र आपण स्वीकारले पाहिजे. शेतकरी महिलेची नेमकी व्याख्या काय? ज्या महिलेच्या नावावर शेती आहे तिलाच हा

दर्जा देणार आहात का? की ज्यांच्या कुटुंबाकडे शेती आहे त्यांना हा दर्जा मिळणार आहे? जी महिला शेतीत मजुरी करते पण नावावर जमीन नाही तिला हा दर्जा मिळणार का? ज्या महिलेच्या नावावर सात-बारा आहे पण ती शहरात नोकरी करते, ती हा दर्जा मिळविण्यास पात्र राहील का ? सरकार महिला बचत गटांना जमीन भाडेतत्त्वावर देणार आहे, त्या महिलांना सुद्धा शेतकरी दर्जा मिळणार का? हे स्पष्ट व्हायला हवे.

एकूणच शेती हा धंदा तोट्याचा आहे, तो जर नफ्याचा झाला तर शेतकरी महिलाच काय पूर्ण कुटुंब सुखी होईल. गाव सुखी होईल. सरकारच्या लुटीच्या धोरणामुळे तोटा होतो कर्जाच्या बोज्याखाली दबलेला, तिचा आधार असलेला बाप, भाऊ किंवा पती आत्महत्या करेल का? ही धास्ती तिच्या मनात कायम असते. आपले कुंकू तरी सुरक्षित आहे का? अशी चिंता ही कदाचित तिच्या मनात घर करून बसली असेल. शेतकरी महिलांचे कुंकू सुरक्षित ठेवण्यासाठी, महिलांना सुखाने आणि सन्मानाने जगता यावे यासाठी कोणत्या 'दर्जाची' गरज नाही, शेतीची लूट थांबवण्याची आवश्यकता आहे, शेती व्यवसायाला स्वातंत्र्य देण्याची गरज आहे, तरच खऱ्या अर्थाने शेतकरी महिला आनंदाने जगतील.

**- सीमा नरोडे,**
प्रदेशाध्यक्ष, स्वतंत्र भारत पक्ष महिला आघाडी

# बेफाम वागणाऱ्यांकडून तुम्ही राजीनामे घ्या!

**श्री. देवेंद्र फडणवीस,**

भारतीय जनता पक्षाच्या केंद्रातील लोकांना सत्तेचा माज आला आहे, हे पूर्व , पश्चिम, उत्तर,दक्षिण भारतातील लोकं सर्रास बोलत आहेत. केंद्रातील लोकं वाट्टेल तसे वागत आहेत याचा राग लोकांच्या मनात होता आणि आहेच. पण हा संसर्ग आता आपल्या राज्यापर्यंत पसरला आहे? आणि तुम्ही तो पसरू देता?

देशातील इतर राज्यातील राजकारण आणि महाराष्ट्रातील राजकारण यात जमीन अस्मानाचा फरक होता. महाराष्ट्रच्या राजकीय नेत्यांच्या विचारांचं आणि उमदेपणाचं एक कौतुक आणि कुतूहल साऱ्या देशात होतं ! पण गेल्या काही वर्षांत आपण आपली बरोबरी उत्तरेकडील काही मागास विचारांच्या राज्यांबरोबर करायला लागलोय हे आता स्पष्टपणे जाणवत आहे.

तुमचा एक आमदार आणि पदाधिकारी लोकांच्या मृत्यूवर फिदीफिदी हसतो आणि त्यावर कारवाईचा एकही आसूड ओढला जात नाही. एक फार प्रसिद्ध वाक्य आहे जे तुम्ही पण कधी ऐकलं असेल, 'Power tends to corrupt, and absolute power corrupts absolutely' पण या वाक्याचा अर्थ उद्या समजून सांगायची वेळ आली तर सध्याचे भारतीय जनता पक्षाचे तुमचे सहकारी हे आदर्श उदाहरण ठरतील अशी परिस्थिती आहे.कोणाला कशाचाच खेद नाही, खंत नाही, अशी परिस्थिती आहे. आणि या सगळ्यात तुम्ही एकही अवाक्षर बोलत नाही यामुळे सगळे बेफाम झाले आहेत.

देवेंद्र फडणवीस हे सुसंस्कृत मुख्यमंत्री आहेत, संवेदनशील आहेत असे महाराष्ट्राला वाटत होते, आणि मलाही वाटत होते.पण हे असले प्रकार जेंव्हा होतात आणि त्यावर जेंव्हा काहीही खेद तुमच्या कडून व्यक्त केला जात नाही, तेंव्हा मात्र तुमच्या संवेनशीलतेबद्दलच शंका घ्यावी लागते.

मी गेली ३७ वर्ष राजकारणात सक्रिय आहे.या काळात महाराष्ट्रात एखाद्या नेत्याकडून प्रमाद घडला,चूक झाली तर तो स्वपक्षाचा आहे म्हणून त्याच्या चुकांवर त्यावेळच्या राज्यातील नेत्यांनी कधी पांघरूण घातले असे झाले नाही. बाळासाहेब असोत, पवार साहेब असोत की प्रमोदजी असोत किंवा कोणीही असोत, म्हणून महाराष्ट्राचे राजकारण वेगळे आहे अशी देशभर प्रतिमा होती.

आज तुम्ही हा आपला आहे ना मग त्यांनी काहीही केले तरी घाल त्याला पाठीशी सुरु केले आहेत.याने तुम्ही तुमची आणि महाराष्ट्राची प्रतिमा डागाळत आहात असे वाटत नाही का?तुमचे मंत्री रोज बेताल विधान करत आहेत, त्याबद्दल तुम्ही काही बोलत नाही.तुमचे इतर नेते असंवेदनशीलता उघडपणे दाखवतात त्यांना तुम्ही काही बोलत नाही.(बोलला असता तर परत त्यांची तीच चूक करायची हिम्मत झाली नसती पण ते तसेच वागत आहेत यावरून समजते की तुम्ही त्यांना काहीच समज देत नाही आहात)तुमच्या मौनाचे नेमके कारण काय आहे?

तुमच्याकडून म्हणण्यापेक्षा या महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांकडून काही संकेतांची अपेक्षा कायम असते.मग तो कुठल्या का पक्षाचा का असेना. त्याचा अपेक्षाभंग करू नका. अन्यथा देवेंद्र फडणवीस हा माणूस फक्त स्वकीयांच्या चुकांना पाठीशी घालणारा भाऊ इतकीच तुमची प्रतिमा राहील आणि यांत सगळ्यात महत्वाचे म्हणजे महाराष्ट्राच्या राजकारणात चुकीचे पायंडे पडतील.

खरंतर असे बेफाम वागणाऱ्यांकडून तुम्ही राजीनामे घ्यायला हवेत.पण तुम्ही ते का करत नाही आहात माहित नाही.वेडेवाकडे वागणाऱ्यांना फडणवीस जबर शासन करतात हे एकदा दाखवून द्या म्हणजे सगळेच सुतासारखे सरळ येतील.

तुम्ही सुज्ञ आहात. तुमच्याकडून अपेक्षा आहेत.

**राज ठाकरे**

# ..आता 'मुंबई' तुमची नाही का?

पावसाळा सुरू झाला की, दरवर्षी मुंबई,पालघर, ठाणे, महाबळेश्वर, कोकण, इगतपुरी, त्र्यंबकेश्वर आदी 'पर्जन्यमान'क्षेत्रात मुसळधार पाऊस पडतो. काही ठिकाणी तर 'ढगफुटी'सदृष्य पाऊस कोसळून, नद्या, नाले दुथडी भरून वाहून पूरसदृष्य परिस्थिती निर्माण होते. पर्यायाने, वाहतूककोंडी होणे, रेल्वे, विमान, एस.टी. बस व इतर वाहतूक सेवांवर परिणाम होऊन, जनजीवन विस्कळीत होते.पावसाळ्यात मुंबईत रस्त्यावर पाणी साचणे, ही नित्याचीच बाब झाली आहे. म्हणूनच 'मुंबईची झाली तुंबई' हे जणू काय सुभाषितच रुढ झाले आहे.यावेळीही पावसाळा सुरू होताच नित्यनियमाप्रमाणे पुन्हा एकदा 'मुंबईची तुंबई' झाली. चेंबूर येथे स्कूल बसवर झाड कोसळून विहान श्रीवास्तव या ११ वर्षीय विद्यार्थ्याचा मृत्यू झाला. कुर्ल्यातील साकीनाका परिसरातील एका उघड्या मॅनहोलमध्ये पडून अस्लम इसाक शेख नामक ५५ वर्षीय पादचा-याचा मृत्यू झाला. तर, मीरा-भाईंदरमध्ये दुचाकीवर नारळाचे झाड पडून, राहुल पाटील या युवकाचा मृत्यू झाला. खरेतर, हे तिनही भ्रष्ट व्यवस्थेने केलेले खून आहेत, असे म्हणणेच योग्य ठरेल. या तिन्ही दुर्घटनांमुळे विरोधकांना विशेषतः 'उबाठा' गटाला सत्ताधा-यांवर टीका करण्याची अजून एक संधी मिळाली आहे. ते कंठ फुटोस्तर सत्ताधा-यांवर तोंडसुख घेत आहेत. कोणी आयुक्तांचा, तर कोणी महापौरांचा राजीनामा मागत आहेत. आदित्य ठाकरेने तर थेट उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्याच राजिनाम्याची मागणी केली आहे. अर्थातच, 'विरोधक' म्हणून जनतेच्या होणा-या गैरसोईबद्दल सत्ताधा-यांना जाब विचारण्याचा तुमचा हक्कच नव्हे तर, तो तुम्हाला संविधानाने बहाल केलेला अधिकार आहे, हे मान्य आहे. परंतु, अतिसंवेदनशील घटनांत केवळ विरोधाला विरोध करणे, कितपत योग्य आहे? जसे तुम्ही तुमच्या स्वतःच्या स्वार्थासाठी एखाद्या निवडणुकीत आपला उमेदवार 'बिनविरोध' करण्यासाठी विरोधाचे शस्त्रे बाजूला ठेवून सत्ताधा-यांशी 'हातमिळवणी' करता. त्याचप्रमाणे, अशा संवेदनशील दुर्घटनांत जनतेसाठी माणुसकी धर्म समजून 'लोकप्रतिनिधी' या नात्याने सत्ताधा-यांची 'गळाभेट' घेणे, हे तुमचे कर्तव्य होत नाही का?

गेली २५ वर्षे आम्ही महानगरपालिकेत सत्तेत होतो, तेव्हा इतकी भयानक परिस्थिती होत नव्हती, असे हे वारंवार सांगतात. थोडक्यात, आमचा कारभार कसा 'धुतल्या



तांदळासारखा स्वच्छ' होता, हे सांगण्याचा आटापिटा करताना हे दिसतात. पण, यांच्या हातातून सत्ता गेल्याने, पर्यायाने, 'आवक' बंद झाल्यामुळे ही यांच्या मनातील 'खदखद' आहे व ही जनतेप्रती 'तळमळ' नसून, सत्तेसाठीची 'मळमळ' आहे, हे सूज्ञ नागरिक ओळखून आहेत. तसेच, जनता आता तुम्ही समजता इतकी 'दूधखुळी' तर नक्कीच राहिलेली नाही. मोठा गाजावाजा करत आणि 'ऐतिहासिक सुवर्णक्षण' असा उल्लेख करत, अपशकुनी संजय राऊतने 'उबाठा' गट आणि 'मनसे' यांना 'ठाकरे ब्रँड' या बॅनरखाली एकत्र आणले. त्यानंतर झालेल्या 'बेस्ट' पतसंस्थेच्या किरकोळ निवडणुकीत यांच्या हाती भोपळा आला.

आतातरी भानावर येत, अहंकार बाजूला ठेवून, उगीचच सत्ताधा-यांच्या नावाने 'बोटे मोडण्या'पेक्षा, बाराही महिने करत असलेले राजकारण थोडे बाजूला ठेवून, पावसाने होणा-या संवेदनशील दुर्घटनांचे राजकारण न करता मुंबईकरांचे जनजीवन सुरळीत राहून, तो सुरक्षित कसा राहील; आणि दुर्घटना टळून बळींची संख्या कशी कमी करता येईल? यासाठी सत्ताधा-यांना सहकार्य करत, काय उपाययोजना करता येतील? यावर काम केले तर, किमान पुढच्या निवडणुकीत मुंबईकर तुमचा विचार तरी करतील. 'मुंबई ही फक्त आमची आहे ', असा ढोल तुम्ही कायम बडवत असता. मग आता मुंबई संकटात व मुंबईकर अडचणीत असताना, राजकारण करून आपली पोळी भाजून घेणे तुम्हाला पटते का? आज तुमची सत्ता नाही म्हणून, मुंबई तुमची नाही का? खरेच मुंबईला आपली समजत असाल तर, राजकारण बाजूला ठेवून सत्ताधा-यांच्या हातात हात घालून कामाला लागा. हवे तर, पावसाळ्यानंतर पुन्हा तुमचे राजकारण चालू करा. ही अपेक्षा.

**प्रदीप खोलमकर**
मो.८७६७५९२९८०

# तीर्थक्षेत्री असलेल्या नद्या प्रदूषित

जलप्रदूषणाच्या अनेक कारणांपैकी औद्योगिक सांडपाणी मुख्यत्वे आहे.मोठे उद्योग, कारखाने यातील रासायनिक पाणी,कचरा नदीत सोडल्या जाते. तसेच घरगुती कचरा, प्लास्टिक इत्यादी गोष्टींमुळे सुद्धा जलप्रदूषण होते. त्याचप्रमाणे हल्ली शेतीसाठी पिकांवर रासायनिक फवारणी केली जाते, त्यामुळे सुद्धा नद्यांचे पाणी प्रदूषित होते. काही ठिकाणी नदीकाठी कपडे धुतले जातात, त्यातील डिटर्जंट ने जलप्रदूषण होते. नदीतील जल प्रदूषित झाल्यास त्याच्या वापरामुळे मनुष्याच्या व प्राण्यांच्या आरोग्यावर त्याचा गंभीर परिणाम होतो.प्रदूषित गढूळ पाणी पिल्याने कॉलरा, कॅन्सर, त्वचा विकार,श्वसनाचे विकार मनुष्याला होतात. तर प्राणी सुद्धा याला बळी पडतात.

संपूर्ण भारतातील महानद्या तर प्रदूषित आहेतच पण त्यांच्या उपनद्या सुद्धा प्रदूषित आहेत. महाराष्ट्रात आपल्या तीर्थक्षेत्री असलेल्या सर्व नद्या प्रदूषित आहेत. कोल्हापूर येथील श्रीमहालक्ष्मी शक्तीपीठ असलेल्या शहरातील पंचगंगा नदी, वारकऱ्यांसाठी अति पवित्र असलेली चंद्रभागा,आळंदी येथील इंद्रायणी, पुण्यातील मुळा -मुठा,लवकरच जिथे महा कुंभ होणाऱ्या नाशिक मधील गोदावरी नदी, वाडीची कृष्णा, गाणगापुरातील भीमा -अमरजा अशा अजून बऱ्याच नद्या प्रदूषणाच्या विळख्यात आहेत. वर्ष २०२५ च्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रात साधारण ९० कोटी लिटर सांडपाणी निर्माण होते. त्यापैकी ५०% हून अधिक पाणी प्रक्रिया न करता थेट नदीत सोडले जाते. आळंदी येथील इंद्रायणी नदी इतकी प्रदूषित झाली आहे की वारीच्या काळात, वारकऱ्यांनी या पाण्याने स्नान करू नये, त्यामुळे त्वचारोग होऊ शकतो अशी पाटी स्थानिक प्रशासनाला लावावी लागते.यापेक्षा दुसरी नामुश्की ती काय? राज्यातील या महत्त्वाच्या नद्यांची अशी विदारक स्थिती का झाली?गणेश मूर्तीचे विसर्जन कृत्रिम टाकीत करायला लावणारे अंनिसवाले सांडपाणी आणि कारखान्यातील पाणी नदीत सोडतात त्यावर का बोलत नाही? यावर सरकारने उपाययोजना म्हणून सध्या मंदिर कॉरिडार साठी जो निधी उभारला तसा निधी तीर्थक्षेत्री असलेल्या नद्यांच्या प्रदूषण मुक्ततेसाठीही द्यावा.आणि नागरिकांनीही जबाबदारीने वागून हे प्रदूषण थांबवावे.

**माधवी पत्की**
नागपूर

सवाद

# कठोर शिक्षा आणि पारदर्शक परीक्षा पद्धती हाच उपाय!

यंदाच्या 'नीट' परीक्षेच्या पेपरफुटीनंतर महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे घेण्यात येणाऱ्या टीईटी परीक्षेचा पेपर फुटल्याने ही परीक्षासुद्धा रद्द करण्याची नामुष्की आयोजकांवर ओढवली आहे. परीक्षा पेपरफुटी ही आज आपल्या शिक्षण व्यवस्थेला लागलेली एक महाभयंकर कीड असून संपूर्ण शिक्षण क्षेत्राला एकप्रकारे शाप ठरत आहे. पेपरफुटीमुळे लाखो प्रामाणिक विद्यार्थ्यांचे भविष्य टांगणीला लागते आणि संपूर्ण शिक्षण व्यवस्थेच्या पारदर्शकतेवरचा विश्वासच उडून जातो. दिवसरात्र अभ्यास करून परीक्षेची तयारी करणाऱ्या प्रामाणिक विद्यार्थ्यांची मेहनत अक्षरशः वाया जाते. पेपरफुटीमुळे ऐनवेळी परीक्षा रद्द झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड मानसिक दडपण आणि नैराश्य येते. काही नैराश्यग्रस्त विद्यार्थी आत्महत्या करतात. 'नीट' परीक्षा रद्द झाल्याने बारा विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या आणि आपले जीवन संपवले. फेरपरीक्षांमुळे सरकार आणि पालक दोघांनाही मोठा आर्थिक भुर्दंड पडतो. पेपरफुटीमुळे पैशांच्या जोरावर पेपर विकत घेणारे भ्रष्ट, सुमार दर्जाचे अकार्यक्षम आणि अयोग्य विद्यार्थी चुकीच्या मार्गाने पुढे येऊ शकतात. लवकरच टीईटी पेपरफुटीला जबाबदार असलेल्या लोकांचे रॅकेट समोर येईल. दोषींना शिक्षा होईल. परंतु पुन्हा पुन्हा असे प्रकार घडू नयेत म्हणून आणि पेपरफुटीचे हे ग्रहण कायमचे मिटवण्यासाठी दोषींसाठी कठोर शिक्षा, तंत्रज्ञानाचा वापर आणि पारदर्शक परीक्षा पद्धती याची एकत्रित कडक अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.


**-प्रदीप मोरे**

# तो मनदेव घाट मृत्यूचा सापळा..!

## जनमाध्यम चा सतर्कतेचा इशारा तरीही दिलीप बिल्डकॉनचा करार कायम, तातडीच्या चौकशीची मागणी

### अपघाताची वाट पाहतंय राष्ट्रीय महामार्ग प्रशासन?

✦जनमाध्यम | प्रतिनिधी








**यवतमाळ, दि. ४ :** विदर्भ आणि मराठवाड्याला जोडणाऱ्या यवतमाळ–तुळजापूर राष्ट्रीय महामार्ग (NH-३६१) वरील जेतवन ते मनदेव घाट हा दिवसेंदिवस अधिक धोकादायक बनत असून, राष्ट्रीय महामार्ग प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे हजारो प्रवाशांचा जीव धोक्यात आला आहे.

विशेष म्हणजे, याच गंभीर प्रश्नावर 'जनमाध्यम'ने यापूर्वीही वृत्त प्रकाशित करून शासन आणि संबंधित यंत्रणेला सतर्कतेचा इशारा दिला होता. मात्र, त्यानंतरही कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. महामार्ग रुंदीकरणाच्या कामावेळी डोंगर फोडून रस्ता तयार करण्यात आला. मात्र, अनेक ठिकाणी प्रचंड खडक आणि दरडी अर्धवट अवस्थेतच सोडण्यात आल्या आहेत. पावसाळ्यात भूस्खलन किंवा मुसळधार पावसामुळे हे खडक थेट महामार्गावर कोसळण्याचा धोका निर्माण झाला आहे. या मार्गावरून दररोज शेकडो दुचाकीस्वार, चारचाकी, बस आणि अवजड वाहने प्रवास करतात. त्यामुळे एखादी मोठी दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, या महामार्गाच्या कामाशी संबंधित दिलीप बिल्डकॉन या कंपनीचा करार अद्याप कायम असल्याची चर्चा असून, कामातील त्रुटींची जबाबदारी निश्चित करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग विभागाने तातडीने सखोल तांत्रिक चौकशी करावी, अशी मागणी जोर धरत आहे. संबंधित अभियंते, कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून मनदेव घाटातील धोकादायक कड्यांचा स्वतंत्र अहवाल तयार करण्यात यावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. तज्ज्ञांच्या मते, या ठिकाणी रॉकफॉल नेटिंग, रिटेनिंग वॉल, स्लोप स्टॅबिलायझेशन आणि सैल झालेल्या दरडी तातडीने हटविण्याची आवश्यकता आहे. केवळ तात्पुरती मलमपट्टी करून हा प्रश्न सुटणार नसून कायमस्वरूपी उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे. जनमाध्यमने वेळोवेळी इशारा देऊनही संबंधित यंत्रणा जागी होत नसेल, तर भविष्यात घडणाऱ्या कोणत्याही जीवितहानीची नैतिक आणि प्रशासकीय जबाबदारी राष्ट्रीय महामार्ग विभाग आणि संबंधित कंत्राटदारावरच राहील, अशी तीव्र भावना नागरिक व्यक्त करीत आहेत. आता तरी राष्ट्रीय महामार्ग प्रशासन खडबडून जागे होणार, की आणखी एका भीषण दुर्घटनेची वाट पाहणार? हा प्रश्न आज संपूर्ण यवतमाळ जिल्ह्याला अस्वस्थ करणारा ठरत आहे.

**'जनमाध्यम'चा इशारा पुन्हा दुर्लक्षित!**

## महागावमध्ये एचपी गॅस ग्राहकांची लूट मनमानी कारभार

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागांव, दि. ४ :** येथील एचपी गॅस एजन्सीच्या मनमानी कारभारामुळे तालुक्यातील ग्राहक त्रस्त झाले असून, गॅस वितरणाची व्यवस्था पूर्णपणे कोलमडल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

भारतीय जनता पक्ष शहर उपाध्यक्ष विवेक राजेंद्र नरवाडे यांनी या गंभीर समस्येकडे जिल्हाधिकाऱ्यांचे लक्ष वेधले असून, एजन्सीच्या या गैरकारभाराचा तीव्र निषेध केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, महागाव येथील एचपी गॅस एजन्सीकडून ग्राहकांना घरपोच गॅस सेवा देण्यास टाळाटाळ केली जात आहे. केवळ काही विशिष्ट ठिकाणीच सेवा दिली जात असल्याने सामान्य ग्राहकांची मोठी कोंडी झाली आहे. धक्कादायक बाब म्हणजे, ग्राहकांना गोदामावर जाऊन गॅस घेण्यासही मनाई केली जात असून, 'ओटीपी लवकर एक्सपायर होतो' असे बालीश कारण देऊन ग्राहकांची बोळवण केली जात आहे. इतकेच नव्हे, तर ऑनलाइन पेमेंट घेण्यासही टाळाटाळ केली जात असल्याचे समोर आले आहे. या अनागोंदी कारभारामुळे महिला, ज्येष्ठ नागरिकआणि दिव्यांग व्यक्तींना मोठ्या शारीरिक व मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. ज्या ग्राहकांकडे स्वतःची वाहने नाहीत, त्यांना गॅस मिळवण्यासाठी वणवण फिरावे लागत आहे. एजन्सीकडून ग्राहकांकडून पैसे घेऊनही त्यांना अपेक्षित सेवा मिळत नसल्याने ग्राहकांमध्ये प्रचंड संताप व्यक्त केला जात आहे. याप्रकरणी भारतीय जनता पक्ष शहर उपाध्यक्ष विवेक राजेंद्र नरवाडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन कडक कारवाईची मागणी केली आहे. "एजन्सीची ही मनमानी खपवून घेतली जाणार नाही. तातडीने चौकशी करून ग्राहकांना सुरळीत आणि प्रभावी घरपोच सेवा मिळावी आणि दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी," असा आक्रमक पवित्रा त्यांनी घेतला आहे. आता जिल्हा प्रशासन या एजन्सीवर काय कारवाई करते, याकडे महागावच्या जनतेचे लक्ष लागले आहे.

## 'घबाळकुंड'ची राज्यभर दमदार एंट्री..!

### यवतमाळच्या प्रीतम एस. के. पाटील यांच्या यशाला प्रेक्षकांची दाद

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ४ :** यवतमाळचे सुपुत्र, दिग्दर्शक, लेखक आणि अभिनेते प्रीतम एस. के. पाटील यांच्या निर्मितीतील बहुचर्चित मराठी चित्रपट 'घबाळकुंड' राज्यभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला असून प्रेक्षकांकडून त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. चित्रपटाच्या प्रदर्शना निमित्त यवतमाळ येथे आयोजित पत्रकार परिषदेत प्रीतम पाटील यांनी चित्रपटाच्या निर्मितीप्रक्रियेपासून ते कथानकाच्या वैशिष्ट्यां पर्यंत विविध पैलूंवर संवाद साधला.

यवतमाळ मध्ये शालेय व महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करून एमसीए (सॉफ्टवेअर इंजिनिअरिंग) पदवी मिळविल्यानंतर ही त्यांनी चित्रपटसृष्टीची वाट निवडली. 'खिचीक', 'डॉक्टर डॉक्टर', 'धिशक्याऊ', 'आल्याड पल्याड' यांसारख्या चित्रपटांनंतर आता 'घबाडकुंड' च्या माध्यमातून त्यांनी मराठी चित्रपटसृष्टीत वेगळी छाप उमटविली आहे. रहस्य, थरार आणि लोक कथेचा प्रभावी संगम असलेला 'घबाडकुंड' हा चित्रपट शेवटपर्यंत प्रेक्षकांना खिळवून ठेवणारा असल्याचा दावा पाटील यांनी केला. दर्जेदार छायांकन, प्रभावी पार्श्वसंगीत आणि तांत्रिकदृष्ट्या भक्कम मांडणी ही चित्रपटाची जमेची बाजू असल्याचे त्यांनी सांगितले. चित्रपटाचे निर्माते डॉ. रशीद कदम असून देवदत्त नागे, कुशल बद्रिके, संदीप पाठक, शशांक शेंडे, प्राजक्ता हनमघर, वैष्णवी कल्याणकर आणि गडचिरोलीचे युवा अभिनेते साहिल अन्नादेवर यांनी प्रमुख भूमिका साकारल्या आहेत. यवतमाळचे स्थिर छायाचित्रकार ऋषिकेश गोळे, अमरावतीचे लेखक अक्षय धर्मपाल, अकोल्याच्या सहायक दिग्दर्शिका राजश्री देशपांडे आणि वर्ध्याचे वैभव दूधकोले यांच्यासह विदर्भातील अनेक कलाकार व तंत्रज्ञांना या चित्रपटातून संधी देण्यात आली आहे. विदर्भातील गुणवंत कलाकारांना मोठे व्यासपीठ मिळवून देणारा 'घबाळकुंड' हा चित्रपट सहकुटुंब पाहून मराठी चित्रपटसृष्टीला प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन प्रीतम एस. के. पाटील यांनी केले.

## पांढरकवडा पोलिसांची धडक कारवाई!

### दुचाकी चोरीचा पर्दाफाश, दोन आरोपींसह ३५ हजारांची मोटारसायकल जप्त

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पांढरकवडा, दि. ४ :** घराच्या समोरून चोरलेली मोटारसायकल शोधून काढण्यात पांढरकवडा पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाला मोठे यश आले आहे.तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीगारांच्या जाळ्याचा चोख वापर करत पोलिसांनी या प्रकरणी दोन सराईत आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. त्यांच्या ताब्यातून चोरीला गेलेली ३५ हजार रुपये किमतीची हिरो स्प्लेंडर कंपनीची दुचाकी जप्त करण्यात आली आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या अधिकृत माहितीनुसार,१६ जून २०२६ रोजी ताडडमरी ता.केळापूर येथील रहिवासी हेमंत देवराव कोडापे यांच्या घरासमोरून रात्रीच्या सुमारास त्यांची काळ्या रंगाची हिरो स्प्लेंडर मोटारसायकल क्रमांक एम.एच २९ एच ५४०६ अज्ञात चोराने लंपास केली होती. याप्रकरणी पांढरकवडा पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. क्र.८०९/२०२६,भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अंतर्गत अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू करण्यात आला होता.ठाणेदार एल.डी.तावरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथक तपास करत असताना,गोपनीय बातमीदाराकडून पोलिसांना एक महत्त्वाची टीप मिळाली.ताडडमरी येथील प्रणय नामदेव नैताम वय १८ वर्षे,०८ महिने याने सदर दुचाकी चोरून ती घाटंजी येथील नेहरू नगर येथील रहिवासी प्रेम अमर धुल वय २२ वर्षे याच्याकडे ठेवली असल्याची खात्रीशीर माहिती समोर आली.पोलिसांनी तात्काळ घाटंजी येथे धाड टाकून आरोपी प्रेम धुल याच्या घरातून चोरीची मोटारसायकल हस्तगत केली आणि दोन्ही आरोपींना गुन्ह्याखाली ताब्यात घेतले.सदरची उल्लेखनीय कामागिरी यवतमाळ पोलीस अधीक्षक कुमार चिंता,अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी रॉबीन बन्सल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक एल.डी.तावरे,पोलीस उपनिरीक्षक नितीन सुशिर,पोहेकॉ.प्रमोद जुनुनकर,विलास जाधव,रजनीकांत पाटील,सुनील राठोड,सचिन काकडे आणि राजू मुत्तलवार यांनी यशस्वीपणे पार पाडली.या गुन्ह्याचा पुढील तपास नापोकॉ संदीप मडावी व जया रोगे करीत आहे.

## थोडक्यात



### गरजू लोकांना मदतीचा हात देऊन वाढदिवस साजरा

**महागाव :** महागाव: तालुक्यातील हिवरा (स) ग्राम पंचायतचे सदस्य राजुभाऊ धोतरकर यांच्या वाढदिवसानिमित्त गावातील गरजु नागरिकांना ब्लँकेटचे वाटप करण्यात आले गरजू लोकांना मायेची ऊब देऊन वाढदिवस सामाजिक कार्य करून व साध्या पद्धतीने साजरा करण्यात आला. तसेच सेवानिवृत्त शिक्षक श्री कैलास भगवानराव कदम यांचा शाल श्रीफळ देऊळ सत्कार करण्यात आला, यावेळी हिवरा ग्रामपंचायत उपसरपंच श्री. शरद कदम पाटील ,दादाजी सत्संग आश्रमाचे अध्यक्ष श्री.सुधाकरराव जामकर मनसे तालुकाध्यक्ष,पत्रकार श्री.सुनिल चव्हाण,महागाव तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष महेश कामारकर,विशाल कदम, बाळु राठोड,शेख सलाम,संतोष कदम, नानाराव कदम,वसंतराव चिकराम,किशन गिरी,मनोज बोरुळकर,जिल्हा परिषद शाळेचे बांडे सर,सहाय्यक शिक्षक, उर्दु शाळेचे आमजत सर ,ग्राम पंचायत कर्मचारी सुधीर कदम,राहुल आंडगे यांच्यासह गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### जि.प. शाळेत आगळावेगळा प्रवेशत्सव..! बैलगाडीतून शाळेत आले चिमुकले

**उमरखेड :** तालुक्यातील दिंडाळा येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत प्रवेशासाठी चिमुकल्यांना सजविलेल्या बैलगाडीतून पारंपारिक बंजारा वाद्य हलगीच्या निनादात आगळा वेगळा विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव नुकताच साजरा करण्यात करण्यात आला. यावेळी शाळेच्या मुख्य प्रवेशद्वारावर विविध विविध प्रकारची रांगोळी काढून सजावट करून विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ, खाऊ देऊन त्यांचा प्रवेश उत्सव साजरा केला. दरम्यान शाळेतील मुलांची नारळी फांद्यात व फुग्यांनी सजवलेल्या बैलगाडीतून पारंपरिक बंजारा वाद्य हलगीच्या गजरात गावातून प्रभातफेरी काढण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांच्या भविष्यातील व शाळेच्या प्रगती साठी सरपंच कैलास राठोड, उपसरपंच गजानन जाधव, भागोराव जाधव व व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अनिल राठोड यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी समस्त गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

## अवनी करंदीकर यांना 'लाइफ कोचिंग'मध्ये गुणवत्ता प्रमाणपत्र

### चेन्नईतील दिमाखदार सोहळ्यात सन्मान; पूजा पुनीत यांच्या हस्ते गौरव

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ४ :** गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर यांच्या कन्या तथा 'हिडन पॉवर ऑफ मॅरिड वूमन' या पुस्तकाच्या लेखिका अवनी अथर्व करंदीकर (देवयानी) यांनी चेन्नई येथे आयोजित भव्य कार्यक्रमात 'लाइफ कोचिंग' क्षेत्रातील गुणवत्ता प्रमाणपत्र (Merit Certificate) मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले.

भारतातील अग्रगण्य लाइफ कोच, मोटिव्हेशनल स्पीकर व 'लाइफ बाय डिझाईन'च्या संस्थापक पूजा पुनीत यांच्या हस्ते त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला. अवनी यांच्या सातत्यपूर्ण अभ्यास, जिद्द आणि व्यक्तिमत्त्व विकास क्षेत्रातील कार्याची ही दखल मानली जात आहे. लेकीच्या यशाबद्दल धनंजय तांबेकर यांनी आनंद व्यक्त करत, तिच्या मेहनतीचा व समर्पणाचा अभिमान असल्याचे सांगितले. ज्ञान, सकारात्मक विचार आणि समाजहिताची भावना जपत अवनी यांनी भविष्यातही अनेकांना प्रेरणा द्यावी, अशा शुभेच्छा त्यांनी व्यक्त केल्या. या यशाबद्दल विविध स्तरांतून अवनी करंदीकर यांचे अभिनंदन होत आहे.

## दमदार पावसाने खरिपाला दिला जीव..!

### जिल्ह्यात पेरण्यांना वेग, काही भागात दुबार पेरणीची धास्ती

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ४ :** संपूर्ण जून महिना पावसाअभावी चिंतेत असलेल्या यवतमाळ जिल्ह्यात जुलैच्या सुरुवातीलाच दमदार पावसाने हजेरी लावल्याने खरीप हंगामाला मोठा दिलासा मिळाला आहे. सलग तीन दिवस झालेल्या पावसामुळे पेरण्यांना वेग आला असून ४५ टक्क्यांहून अधिक क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली आहे. मात्र, काही तालुक्यांमध्ये अल्पावधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे माती वाहून जाणे, बियाणे दबणे किंवा वाहून जाण्याच्या घटना घडत असल्याने काही शेतकऱ्यांसमोर दुबार पेरणीचे संकट उभे राहण्याची शक्यता आहे.

जून महिनाभर पावसाने दडी मारल्यामुळे जिल्ह्यातील शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत होते. मात्र, जुलैच्या पहिल्याच आठवड्यात हवामान विभागाचा अंदाज खरा ठरवत पावसाने जिल्हाभर दमदार हजेरी लावली. वणी, मारेगाव आणि झरीजामणी तालुक्यांत मुसळधार पाऊस झाला, तर यवतमाळसह इतर भागांत रिमझिम स्वरूपाचा पाऊस दिवसभर सुरू राहिला. गेल्या तीन दिवसांत जिल्ह्यात एकूण १३३.९ मिलीमीटर पावसाची नोंद झाली असून, सकाळी साडेअकरापर्यंत आणखी २ मिलीमीटर पाऊस झाला. या पावसामुळे रखडलेल्या खरीप पेरण्यांना वेग आला असून, जिल्ह्यात ४५ टक्क्यांहून अधिक क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली आहे. हवामान अनुकूल राहिल्यास येत्या आठवडाभरात हा आकडा ८० टक्क्यांपर्यंत पोहोचण्याची शक्यता कृषी विभागाने व्यक्त केली आहे.

### पूस नदीचे पात्र अखेर प्रवाहित

**महागाव पावसाळ्याचा जवळपास एक महिना उलटल्यानंतरही कोरडे पडलेले पूस नदीचे पात्र अखेर प्रवाहित झाले आहे. मागील पाच दिवसांतील समाधानकारक पावसामुळे नदीत पुन्हा पाण्याची धार वाहू लागल्याने परिसरातील शेतकरी आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.**

**नदीत पाणी आल्याने परिसरातील विहिरींच्या जलपातळीत वाढ होण्याची शक्यता असून खरीप हंगामालाही याचा लाभ होणार आहे. सध्या नदीला मोठा पूर नसला तरी सातत्याने सुरू असलेल्या पावसामुळे प्रवाह कायम आहे. पुढील काही दिवस पावसाचा जोर टिकून राहिल्यास पूस नदी पूर्ण क्षमतेने वाहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.**

**नदीत पुन्हा पाणी वाहू लागल्याने परिसरातील निसर्गाला नवसंजीवनी मिळाली असून शेतशिवार हिरवाईने नटू लागले आहे. नदीतील वाहता प्रवाह पाहण्यासाठी नागरिकही नदीकाठावर गर्दी करत आहेत.**

## महागाव कचऱ्याच्या विळख्यात..!

### घनकचरा व्यवस्था ठप्प, प्रशासनाविरोधात आंदोलनाचा इशारा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**महागाव, दि. ४ :** महागाव नगरपंचायतीची घनकचरा व्यवस्थापन व्यवस्था पूर्णपणे कोलमडल्याचा आरोप नगरसेवक तथा शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शैलेश कोपरकर यांनी केला आहे. शहरात घराघरातील कचरा उचलण्यासाठी एकही घंटागाडी फिरत नसल्याने सर्वत्र कचऱ्याचे ढीग साचले असून महागावचे रूपांतर कचराकुंडीत झाल्याचा दावा त्यांनी केला. त्यामुळे दुर्गंधी, डास व माशांचा प्रादुर्भाव वाढून साथीच्या रोगांचा धोका निर्माण झाला असून नागरिकांच्या आरोग्याशी प्रशासन खेळ करत असल्याचा आरोपही त्यांनी केला. कोपरकर म्हणाले, सत्ताधारी केवळ फोटो सेशन पुरती स्वच्छता मोहीम राबवतात; प्रत्यक्षात नागरिकांना नियमित सेवा मिळत नाही. मुख्याधिकारी नियमितपणे कार्यालयात उपस्थित राहत नसल्याने स्वच्छता व्यवस्थेकडे पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप त्यांनी केला. नगरपंचायत प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे शहराची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत असल्याचेही त्यांनी नमूद केले. या संपूर्ण प्रकरणाची जिल्हा प्रशासनाने तातडीने चौकशी करून जबाबदार अधिकारी व संबंधितांवर कठोर कारवाई करावी, नियमित घंटागाड्या सुरू करून साचलेला कचरा त्वरित उचलावा, अशी मागणी कोपरकर यांनी केली. अन्यथा नागरिकांना सोबत घेऊन तीव्र लोकआंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

## एकल महिलांचे सक्षमीकरण उमेदची बळकटी..!

### ३४ हजारांहून अधिक महिलांना बचत गटांचा आधार

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ४ :** जिल्हा परिषदेच्या महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) अंतर्गत राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत जिल्ह्यातील ३४ हजारांहून अधिक एकल महिलांचा स्वयं-सहाय्यता बचत गटांमध्ये समावेश करण्यात आला आहे.

या उपक्रमामुळे महिलांना आर्थिक स्वावलंबनासह विविध शासकीय योजनांचा लाभ मिळण्याचा मार्ग खुला झाला आहे. आंतरराष्ट्रीय विधवा दिनानिमित्त २३ ते २५ जूनदरम्यान जिल्हाभर आयोजित कार्यशाळांमध्ये उपजीविका, वैयक्तिक विकास व सामाजिक सक्षमीकरणावर मार्गदर्शन करण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे यांच्या संकल्पनेत आणि प्रकल्प संचालक आनंद पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली. शिबिरांमध्ये यशस्वी महिला उद्योजिकांचे अनुभव, कमी भांडवलातील व्यवसाय संधी आणि बचत गटांच्या माध्यमातून आर्थिक प्रगतीचे मार्ग सांगण्यात आले. अद्याप बचत गटात सहभागी न झालेल्या एकल महिलांचाही ग्रामसखीमार्फत समावेश करून त्यांना प्रशिक्षण, उपजीविका उपक्रम आणि वित्तीय सहाय्य उपलब्ध करून दिले जाणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## पक्ष कार्यालयातील अनैतिक कृत्यांनी त्रस्त महिलेचा पक्ष कार्यालयात राडा

### आयुष्य बरबाद केल्याची पक्षाच्या व्हॉट्स ॲप ग्रुपवर टाकली पोस्ट

✦जनमाध्यम | प्रतिनिधी




**यवतमाळ, दि. ४ :** शहरातील एका बड्या राजकीय पक्षाच्या कार्यालयात सध्या जनसेवेऐवजी भलतीच 'रंगेल सेवा' सुरू असल्याची खमंग चर्चा चव्हाट्यावर आली आहे. पक्षाच्या व्हॉट्सॲप ग्रुपवर एका पदाधिकाऱ्याच्या पत्नीने टाकलेल्या अत्यंत खळबळजनक पोस्टमुळे संपूर्ण राजकीय वर्तुळ ढवळून निघाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पक्ष कार्यालयात कामासाठी ठेवण्यात आलेल्या तरुणींसोबत काही सुस्त कार्यकर्ते 'पायघड्या' पसरवत असल्याचा संशय एका जागृत गृहिणीला आला.

आपले पतीदेव घरी 'दर्शन' देण्याऐवजी कार्यालयातच कोणाचे 'दर्शन' घेत आहेत, याचा शोध घेण्यासाठी त्यांनी थेट कार्यालय गाठले आणि चांगलाच दांगडू' घातला. हा प्रकार केवळ फॅमिली मॅटर नसून पक्ष कार्यालयातील अनैतिक कारभार असल्याचा थेट आरोप करत या महिलेने व्हॉट्सॲप ग्रुपवर जणू ' बॉम्ब टाकल्यासारखी' पोस्ट टाकली. "तुमच्या पक्ष कार्यालयात अत्यंत खालच्या दर्जाचे प्रकार आणि लफडे चालतात, ज्यामुळे माझे आयुष्य खराब झाले," असा उद्वेग तिने मांडला. वरिष्ठांनी याकडे दुर्लक्ष केल्याने तिने इतर महिला कार्यकर्त्यांना सतर्क राहण्याचा इशारा दिला आहे. या संपूर्ण प्रकरणामागे एका महाभागाने कार्यकर्त्यांना 'प्रफुल्लित' ठेवण्यासाठी ही विशेष 'यंत्रणा' लावल्याची चर्चा आहे. तर शासकीय योजनांचा लाभ लाटण्यात पटाईत असलेल्या 'योग' नावाच्या असामीने या संपूर्ण 'खर्चाची' जबाबदारी उचलल्याचे बोलले जात आहे. या 'घरगुती सर्जिकल स्ट्राईक'मुळे कार्यालयातील 'योजना' आणि 'कारभार' दोन्ही हवेत विरले असून, संबंधित नेत्यांची मात्र शहरात चांगलीच गोची झाली आहे. भ्रष्टाचाराच्या या चिखलात आता पक्षाला एका खंबीर आणि निस्वार्थी नेतृत्वाची गरज असल्याचे बोलले जात आहे.

### वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी

# चिखलदराकरीता आता एकमार्गी वाहतुकीचा पर्याय

**अमरावती/का.प्र.**

पावसाळा सुरू होताच सातपुडा पर्वतरांगा निसर्गाच्या हिरव्यागार शालूने नटून जातात. याच पर्वतरांगांमध्ये चिखलदरा हे पर्यटनस्थळ पावसाळी पर्यटनासाठी प्रसिद्ध आहे. धुक्याची दुलई, खळखळणारे धबधबे आणि नयनरम्य घाटांचा अनुभव घेण्यासाठी पर्यटकांची पावले या ठिकाणी वळतात. पर्यटकांची मोठी गर्दी होते. शनिवारी आणि रविवारी सुट्टीच्या दिवशी हजारो पर्यटक मौजमजा करण्यासाठी जात असतात. त्यामुळे वाहतुकीची कोंडी होते. ती टाळण्यासाठी आता प्रशासनाने एकमार्गी वाहतुकीचा पर्याय निवडला आहे.



चिखलदरा येथे सुट्टीच्या दिवशी तसेच शनिवार व रविवारला भरपूर प्रमाणात पर्यटक येत असतात. परतवाडा ते चिखलदरा मार्ग हा अरुंद व घाट वळणाचा असल्याने अपघात होण्याची शक्यता असते. त्यामुळे येत्या २७ सप्टेंबर २०२६ पर्यंत महत्त्वाचे सण, उत्सव, शासकीय सुट्टीच्या दिवशी तसेच शनिवार / रविवार या दिवशी परतवाड्या वरुन चिखलदराकडे जाणारी वाहतुक ही परतवाडा वरुन धामणगांव गढी मार्गे चिखलदरा तसेच चिखलदरा वरुन परतवाडाकडे जाणारी वाहतुक ही चिखलदऱ्यावरुन घटांग मार्गे परतवाडा या एक मार्गी पध्दतीने (वन-वे) वळवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

चिखलदरा येथे विशेष बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

यावर्षीच्या पावसाळी पर्यटन हंगामात सुमारे २०० पोलीस अधिकारी, अंमलदार आणि १०० होमगार्ड विविध ठिकाणी तैनात करण्यात आले आहेत. पर्यटनस्थळे, वीव्ह पॉईन्ट, मुख्य रस्ते, गर्दीची ठिकाणे, पार्किंग व्यवस्था तसेच वाहतुक नियमन यावर विशेष लक्ष ठेवण्यात येणार आहे.पर्यटकांना तात्काळ मदत, मार्गदर्शन व जनजागृती करण्यासाठी १४ पोलीस मोटरसायकल रायडर्सना बॉडी वोर्न कॅमेरा तसेच सार्वजनिक सुचना प्रणाली देण्यात आली आहे. हे १४ पोलीस मोटरसायकल रायडर्स सतत गस्त घालून वाहतूक नियंत्रण, पर्यटकांना मार्गदर्शन तसेच आपत्कालीन परस्थितीत त्वरीत प्रतिसाद देतील.

मद्यप्राशन करून वाहने चालविणाऱ्याविरूध्द कठोर कारवाई करण्यासाठी तपासणी नाके विविध ठिकाणी उभारण्यात आले असून वाहन चालकांची नियमित तपासणी करण्यात येणार आहे. तसेच दारू पिऊन वाहने चालवणाऱ्या चालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. वेगमर्यादेचे उल्लंघन, धोकादायक वाहन चालविणारे, ट्रिपलसीट, हेल्मेट व सीटबेल्ट नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे पोलीस प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

## अप्पर वर्धा जलाशयाच्या पाण्याच्या पातळीत वाढ

**अमरावती/का.प्र.**

पावसाळा सुरू होऊन जवळपास एक महिना झाला असला तरी गेल्या आठवड्यापासून अप्पर वर्धा धरणाच्या कार्यक्षेत्रात झालेल्या जोरदार पावसामुळे परिसरातील नदी नाल्याची पातळी वाढली आहे. त्याचप्रमाणे अप्पर वर्धा धरणात येणाऱ्या जाम व वर्धा नदीला मोठा पूर आल्याने अप्पर वर्धा धरणाचा जलस्तर वाढला आहे. १ जून रोजी अप्पर वर्धा धरण ४५.७१ टक्के एवढा जलसाठा होता. सततधार होत असलेल्या पावसामुळे नदी नाल्याला आलेल्या पुरामुळे ३ जुलै रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत अप्पर वर्धा



जलाशय ४९.६२ टक्के भरल्यामुळे अप्पर्वता धरणाच्या जलाशयाच्या पाण्याच्या पातळीत वाढ झाली आहे.

## बीएलओला सहाय्यक म्हणून नियुक्त शिक्षकांचे आदेश रद्द करा

### शिक्षक संघटना कृती समितीचे तहसिलदार व गटशिक्षणाधिकारी यांना निवेदन

**अमरावती/का.प्र.**

बी.एल.ओ. सहाय्यक म्हणून नियुक्त झालेल्या सर्व शिक्षकांचे आदेश रद्द करण्याबाबत वरुडचे तहसीलदार, गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी यांची सर्व संघटनेच्या पदाधिकारी व शिक्षक बंधू भगिनी यांनी भेट घेऊन निवेदन सादर केले. तहसीलदार व गटशिक्षणाधिकारी विनोद गाढे यांच्याशी सकारात्मक चर्चा होऊन, मुख्याध्यापक, ज्यांनी जनगणनेचे कार्य केलेले आहे.

दिव्यांग शिक्षक , द्विशिक्षकी शाळेतील शिक्षक, जुलै व ऑगस्ट या दरम्यान सेवानिवृत्त होणारे शिक्षक यांना वगळण्याबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली.यांचे आदेश रद्द करण्याची मागणी करण्यात आली.



निवेदन देतेवेळी नंदकिशोर पाटील,सिध्दार्थ ढोरे,महेश्वर पवार,आशिष पावडे,रेखा झामडे,आश्विनी चांभारे,ईमरान खान एहसान खान, मंदा राऊत,मीना फुसे,कल्पना घाटोळे, कांचन पोतदार,मीना सोनकुसळे. किरण ठाकरे, कल्पना ढोरे,सुमनी वानखडे, संगीता रोडे,अक्षय साबळे, आशिष गेडाम,विलास गोंडे, अरुण देशमुख,वनिता कडू, अरुण पावडे,गजानन हुड, दिपाली मांडोकर, प्रभाकर टाकरखेडे, विजय खोडस्कर, प्रमोद फरतोडे,गोपाल वानखडे, सविता खोडस्कर,संजय गाडबेल,रंजना कडू,जया टाकरखेडे भोजराज पांडे,संजय कुंभारे रज्जाक दिलदार शहा,स्वाती अंबळकार आदी शिक्षक उपस्थित होते.

## रस्त्याच्या उंचीमुळे शेतात साचतेय पाणी

### सोयाबीन, कापूस पिकांचे नुकसान, पंचनामा करण्याची शेतकऱ्यांची मागणी; अन्यथा पाण्यातच उपोषण

**चांदूरबाजार/वार्ताहर**

तालुक्यातील हिरूळ पूर्णा ते साऊर या रस्त्याचे काम चालू असून, रस्ता उंच व शेती खाली गेली आहे.शेतातून निघणारा नैसर्गिक पाण्याचा प्रवाहात संबंधित यंत्रणेने काढून न दिल्याने, आज शेतकऱ्यांच्या शेतामध्ये तलावाचे स्वरूप आले आहे.परिणामी शेतकऱ्यांचे नुकसान झाले. त्वरित पंचनामा करून, नुकसान भरपाई देण्याची मागणी शेतकऱ्याने केली आहे.अन्यथा पाण्यातच आमरण उपोषणाला बसण्याचा इशारा, प्रशासनाला दिला आहे.



हिरूर पूर्णा येथील शेतकरी पंजाबराव नामदेवराव तायडे व अनिल पंजाबराव तायडे यांनी शेतात सतत पाणी साचत असल्याने कायमस्वरूपी निचऱ्याची व्यवस्था करून नुकसानग्रस्त पिकांचा पंचनामा करण्यात यावा,अशी मागणी तहसीलदारांना निवेदन देऊन केली आहे. मागणीकडे दुर्लक्ष झाल्यास येत्या तीन दिवसांत शेतात साचलेल्या पाण्यातच उपोषण करण्याचा इशाराही त्यांनी त्या निवेदनात दिला आहे.हिरूर पूर्णा शिवारातील गट क्रमांक ४४२ व ४४५ मधील शेती पावसामुळे जलमय झाली आहे.रस्त्यांची उंची वाढविल्यामुळे,नैसर्गिक पाण्याचा निचरा बंद झाला आहे.रस्त्याची उंची वाढविताना नैसर्गिक पाण्याचे प्रवाहचे ठिकाणी,पायली न टाक्याचे पाण्याचा प्रवाह बंद झाला आहे.परिणामी शेतातील पाणी बाहेर जात नसल्याने , शेतात जलाशय निर्माण झाले आहे.आरोप त्यामुळे सोयाबीन व कापूस पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच जमिनीची सुपीकता ही घटत आहे,असे शेतकऱ्यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे. याच समस्येबाबत १७ जुलै २०२५ ला तहसील कार्यालयात,लेखी निवेदन देण्यात आले होते. मात्र अद्याप ही कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात आली नाही.त्यामुळे यंदाही तीच परिस्थिती निर्माण झाली आहे.संबंधित तलाठी व कृषी अधिकाऱ्यांनी तातडीने पंचनामा करून नुकसानभरपाई द्यावी.तसेच पाण्याचा कायमस्वरूपी निचरा करण्यासाठी, आवश्यक उपाययोजना कराव्यात.अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

> 'रस्त्याचे काम चालू असून रस्ता उंच झाला आहे.संबंधित विभागाने नैसर्गिक रित्या वाहून जाणाऱ्या पाण्याचे योग्य नियोजन न केल्यामुळे,माझ्या शेतात पाणी साचले असून माझे कापूस सोयाबीन व तूर पिकाचे नुकसान झाले आहे.झालेल्या नुकसानाचा पंचनामा करून मला नुकसान भरपाई देण्यात यावी.तसेच नैसर्गिक रित्या वाहून जाणाऱ्या पाण्याचे, कायम स्वरूपी नियोजन करण्यात यावे.
>
> **अनिल तायडे,**
> शेतकरी

## 'कॉकरोच जनता पार्टी' ची चांदूर रेल्वेत एंट्री

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

देशभरात चर्चेचा विषय ठरलेल्या 'कॉकरोच जनता पार्टी (सीजेपी)' या नावाने आता चांदूर रेल्वे शहरातही युवक एकत्र येऊ लागले आहेत. कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंध नसलेल्या या व्यासपीठाच्या माध्यमातून विद्यार्थी, युवक आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर आवाज उठविण्याचा निर्धार करण्यात आला आहे.यासाठी चांदूर रेल्वे येथे ऑफलाइन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत आगामी आंदोलनाची रूपरेषा निश्चित करण्यात आल्याची माहिती देण्यात आली.

आंदोलनात एसएससी (जीडी), नीट, टीईटी व इतर भरती परीक्षांमधील पेपरफुटी थांबविणे, सर्व परीक्षा पारदर्शक पद्धतीने घेणे, एमपीएससी परीक्षा ऑनलाइन न घेणे, परीक्षा शुल्क कमी करणे तसेच सरकारी शाळा बंद न करण्याची मागणी करण्यात येणार आहे. यासोबतच दरवर्षी

### विद्यार्थी प्रश्नांवर सीजेपीच्या माध्यमातून आंदोलनाची तयारी

सर्व स्पर्धा व भरती परीक्षा निश्चित वार्षिक कॅलेंडरनुसार वेळेवर घेण्यात याव्यात आणि त्यांचे निकालही निश्चित कालावधीत जाहीर करण्यात यावेत, अशीही प्रमुख मागणी करण्यात येणार असल्याचे बैठकीत ठरविण्यात आले.

यात सहभागी असलेल्या युवकांनी स्पष्ट केले की, 'कॉकरोच जनता पार्टी' हे नाव सध्या देशभर चर्चेत असल्याने त्याच नावाखाली युवक सहजपणे एकत्र येऊ शकतात. हा कोणताही राजकीय पक्ष नसून विद्यार्थी, युवक आणि नागरिकांच्या प्रश्नांसाठी उभे राहणारे स्वतंत्र व्यासपीठ आहे. बैठकीत युवकांनी पक्षीय राजकारण बाजूला ठेवून सामाजिक प्रश्नांवर एकत्र येण्याचे आवाहन केले.

## सलोना व भुलोरी जि.प. शाळांमध्ये आता 'अरीटे इठूबा'

### मराठी भाषेची गोडी लागण्याकरिता मेळघाटात अनोखा प्रयोग

**अमरावती/का.प्र.**

मेळघाटातील कोरकू भाषिक विद्यार्थ्यांना मराठी शिकताना भाषेची अडचण येऊ नये, वर्गातील शिक्षक विद्यार्थ्यांचा संवाद हिंदी ऐवजी थेट मराठीत व्हावा आणि त्यासाठी विद्यार्थ्यांच्या मातृभाषेचाच आधार घ्यावा या उद्देशानं चिखलदरा तालुक्यातील सलोना आणि भुलोरी येथील जिल्हा परिषद शाळांमध्ये 'अरीटे इठूबा' अर्थात आनंदानं शिकूया या बहुभाषिक शिक्षण केंद्राची सुरुवात करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना मराठी भाषा आणि शिक्षकांनाही कोरकू भाषा सहज शिकता येणार असून दोघांमधील संवाद अधिक परिणामकारक होणार आहे. स्थानिक भाषेचा सन्मान राखत मराठी शिकविण्याचा हा अभिनव प्रयोग मेळघाटातील शिक्षण क्षेत्रासाठी नवा टप्पा ठरेल. अमरावती जिल्हा परिषदेच्या पालवी उपक्रमाला क्वेस्ट एज्युकेशन सपोर्ट ट्रस्ट या संस्थेनेकेलेल्या मदतीमुळे या नव्या उपक्रमाला सुरुवात झाली.

मातृभाषेतून मराठीकडे शिक्षणाचा प्रवास : मेळघाटातील बहुतांश विद्यार्थी घरी कोरकू भाषा बोलतात. मात्र, शाळेतील शिक्षण मराठीत असल्यानं सुरुवातीला त्यांना भाषेची मोठी अडचण जाणवते. यामुळे अनेक विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास कमी होतो. हीच दरी दूर करण्यासाठी अरीटे इरुकवा? केंद्राची निर्मिती करण्यात आली आहे. या केंद्रात मुलांना त्यांच्या मातृभाषेतून संकल्पना समजावून सांगितल्या जातील आणि त्यानंतर त्याच गोष्टी मराठीत शिकवल्या जातील. त्यामुळे मराठी भाषा आत्मसात करणं अधिक सोपं, आनंददायी आणि नैसर्गिक होणार असं क्वेस्ट अर्थात कॉलिटी एज्युकेशन सपोर्ट ट्रस्टचे प्रकल्प व्यवस्थापक तुषार मराडे यांनी सांगितलं.



**मेळघाटात शिक्षणाचा नवा प्रयोग**

**वर्गखोलीच बनली द्विभाषिक शब्दकोश :** या उपक्रमाचा आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण वर्ग खोलीच शिक्षणाचं जिवंत साधन बनविण्यात आली आहे. फळा, दप्तर, पुस्तक, दिनदर्शिका ,आरसा, कंगवा, दार, भिंत, खिडकी, झाड, फुल अशा दैनंदिन वापरातील वस्तूंची नावं कोरकू आणि मराठी या दोन्ही भाषांमध्ये आकर्षक फलकाद्वारे वर्गात लावण्यात आले आहेत. त्यामुळं? विद्यार्थ्यांना वस्तूंची नावं सहज लक्षात राहतात तर शिक्षकांनाही कोरकू भाषेतील शब्दांची ओळख होत जाते. शिक्षण आणि भाषा दोन्हींचा विकास एकाच वेळी घडवून आणण्याचा हा प्रयत्न आहे असं तुषार मराडे म्हणाले.

**खेळ, गोष्टी, गाणी आणि तंत्रज्ञानाची जोड :** अरीटे इठूबा केंद्रात केवळ पुस्तकी शिक्षणावर भर नसून मुलांच्या दैनंदिन अनुभवांवर आधारित गोष्टी, खेळ, गाणी, संवाद, सहभागी वाचन, लेखन तसेच द्विभाषिक शैक्षणिक साहित्याचा वापर केला आहे. यासोबतच 'रीड विथ कोरकू' ॲपद्वारे मोबाईलवरही कोरकू आणि मराठी भाषेतील पुस्तकं उपलब्ध करून दिली जाणार आहेत. यामुळं वर्गाबरोबरच घरी ही मुलांना शिक्षणाची संधी मिळेल.

**पालवी उपक्रमातून बहुभाषिक शिक्षणालाही नवी दिशा :** पालवी उपक्रम हा अमरावती जिल्हा परिषदेच्या माजी कार्यकारी अधिकारी संजीता महोपात्रा यांच्या संकल्पनेतून वेस्ट या संस्थेमार्फत राबविण्यात येत आहे. या उपक्रमाला टाटा ट्रस्ट, इंदिरा फाउंडेशन आणि मोटिवेशन फॉर एक्सलन्स यांचं आर्थिक सहकार्य लाभला आहे.

क्वेस्ट संस्था २००९ पासून महाराष्ट्रासह विविध राज्यांमध्ये बालशिक्षण, भाषा विकास आणि गणित शिक्षणाच्या क्षेत्रात शासनासोबत काम करत आहे. अमरावती जिल्ह्यात सुरू असलेल्या पालवी उपक्रमातून आता बहुभाषिक शिक्षणालाही नवी दिशा मिळेल अशी अपेक्षा देखील तुषार मराडे यांनी व्यक्त केली.

**'विद्यार्थ्यांची अभ्यासात वाढेल गोडी' :** मुलांच्या मातृभाषेला वर्गात स्थान दिलं की त्यांचा आत्मविश्वास वाढतो. वर्गातील चित्र, स्थानिक अनुभव, कथा आणि प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून मुलांना बोलतं केलं जातं.

त्यातून त्यांचा मराठीकडे जाण्याचा प्रवास अधिक सहज होतो. स्थानिक भाषेचा सन्मान राखत आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन हा उपक्रम राबविला जात असल्याची माहिती देखील तुषार मराडे यांनी दिली.

**शिक्षकांनाही होणार मोठा फायदा :** विद्यार्थ्यांची बोलीभाषा कोरकू आणि पुस्तकाची भाषा मराठी असल्याने सुरुवातीला संवादात अडथळे निर्माण होतात. हा उपक्रम त्या अडथळ्यांवर प्रभावी उपाय ठरणार आहे. विद्यार्थ्यांबिरोबरच शिक्षकांनाही कोरकू भाषा समजण्यास मदत होणार असून भविष्यातील वर्गातील संवाद अधिकाधिक मराठीत होईल असं भूलोरी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक प्रवीण वासनकर म्हणाले.

# संक्षिप्त

## आयआयएमसीत मराठी पत्रकारितेसाठी १५ जुलै रोजी स्पॉट ॲडमिशन

**अमरावती-** भारतीय जन संचार संस्थान (आयआयएमसी) मध्ये मराठी पत्रकारिता डिप्लोमा अभ्यासक्रमाच्या रिक्त जागांसाठी बुधवार १५जुलै रोजी थेट प्रवेश फेरी (स्पॉट ॲडमिशन राऊंड) घेण्यात येणार आहे. प्रवेश अर्ज गूगल फॉर्म द्वारे किंवा आयआयएमसीच्या अमरावती कार्यालयात येऊन भरता येईल.थेट प्रवेश फेरी (स्पॉट ॲडमिशन राऊंड) अंतर्गत ३ जुलै २०२६ पासून नोदणी प्रक्रिया सुरु असून ती १५जुलै सकाळी १०.३० पर्यंत सुरु राहील. तदनंतर ११ वाजता सामाईक चाचणी परीक्षा घेण्यात येईल. ही परीक्षा भारतीय जन संचार संस्थानच्या संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परिसरातील पश्चिम क्षेत्रीय केंद्रावर आयोजित करण्यात येणार आहे.मराठी पत्रकारितेत पी.जी.डिप्लोमा हा एक वर्षाचा अभ्यासक्रम असून तो पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना पत्रकारिता आणि मीडियाच्या क्षेत्रातील रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होणार आहे.मान्यताप्राप्त विद्यापीठातून कोणत्याही शाखेतील पदवी प्राप्त विद्यार्थी मराठी पत्रकारिता अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी अर्ज करू शकतात.जे विद्यार्थी त्यांच्या बॅचलर पदवीच्या अंतिम वर्षात किंवा सेमिस्टर परीक्षेत बसले आहेत किंवा जे विद्यार्थी परीक्षा देणार आहेत ते देखील अर्ज करण्यास पात्र आहेत. प्रवेश करीता वयोमर्यादेची अट असून अनारक्षित प्रवार्गासाठी २५ वर्ष, ओबीसी करीता २८ वर्ष तर अनुसूचित जाती/जमाती आणि दिव्यांग उमेदवारा करीता ३० वर्ष आहे. इच्छुक उमेदवारांनी प्रवेश अर्ज व गूगल फॉर्म लिंक करीता आयआयएमसीच्या अधिकृत वेबसाइट https://iimc.gov.in/language-courses-26-27 kर संपर्क करावा. प्रवेश प्रक्रिया संबंधी अधिक माहितीसाठी किंवा अडचणी संदर्भात डॉ. राजेश सिंह कुशवाहा ९४१५८६२३७७,डॉ.विनोद निताळे९८६००४६७०६, यांच्याशी दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधावा. विद्यार्थ्यांना व्हॉट्सॲपद्वारे माहिती मिळवायची असल्यास सदर मोबाईल क्रमांकावर संदेश पाठवू शकतात, अशी माहिती संस्थानचे क्षेत्रीय संचालक डॉ. राजेश सिंह कुशवाहा यांनी दिली आहे.

## सोमवारी 'नवीन सेवार्थ प्रणाली' प्रशिक्षण

**अमरावती-** शासनाच्या नवीन सेवार्थ प्रणालीची जिल्ह्यात प्रभावी, पारदर्शक आणि सुरळीत अंमलबजावणी व्हावी, या उद्देशाने जिल्हा कोषागार कार्यालय, अमरावती यांच्या वतीने दुसऱ्या टप्प्यातील विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रशिक्षण सोमवार ६ जुलै रोजी सकाळी ११ वाजता नवीन प्रशासकीय इमारत, उपविभागीय कार्यालय, अचलपूर येथे आयोजित करण्यात आले आहे. या महत्त्वपूर्ण प्रशिक्षणासाठी अचलपूर, दर्यापूर, चिखलदरा, धारणी आणि अंजनगाव सुर्जी या पाच तालुक्यांतील सर्व आहरण व संवितरण अधिकारी तसेच संबंधित कार्यालयांतील सेवार्थ प्रणाली हाताळणारे अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

## बांधिलकी पावसाळी काव्यमहोत्सव आज आयोजन

**अमरावती-** साहित्यिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या बांधिलकी प्रतिष्ठान अमरावती, मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय मराठी विभाग तसेच बोली संपदा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भव्य पावसाळी काव्यमहोत्सव तसेच ॲड डॉ. नीता प्रफुल्ल कचवे लिखित 'जंगल सफारी' या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन रविवार ५ जुलै २०२६ रोजी मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय अमरावती येथे करण्यात आले असून या काव्यमहोत्सव तसेच पुस्तक प्रकाशन सोहळ्याच्या उदघाटनपर सत्राचे अध्यक्ष डॉ. स्मिता देशमुख, उदघाटक डॉ.वि.गो ठाकरे तर स्वागताध्यक्ष मा. डॉ. मंदा नांदुरकर आदि मान्यवरांची प्रामुख्याने उपस्थिती असेल.

## डॉ. हेडगेवार हॉस्पीटलला १ लाखाची देणगी

**अमरावती-** देवरणकर नगर येथील प्रतिष्ठित नागरिक आणि सेवानिवृत्त विस्तार अधिकारी विजय वानखडे आणि त्यांच्या पत्नी शोभा वानखडे यांनी एक लाख रुपयांची देणगी जनकल्याण सेवा संस्था संचालित डॉ. हेडगेवार हॉस्पिटलला प्रदान केली.धनादेश जनकल्याण सेवा संस्थेचे विश्वस्त आनंद दशपुते, अविनाशी भोजापुरे आणि डॉ.हेडगेवार हॉस्पिटलचे प्रकल्प संचालक डॉ. यशोधन बोधनकर यांनी स्वीकारला.जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी कार्यालय आणि दर्यापूर पंचायत समितीमध्ये नियोजन विभागात सेवा प्रदान केली आहे.तसेच स्वेच्छेने निवृत्ती घेवून त्यानंतर त्यांनी विजयश्री कॉमर्स क्लासेस चालविले आणि अनेक विद्यार्थी घडविले. या कामी त्यांच्या सुविद्य पत्नी शोभा यांनी देखील सहकार्य केले. या देणगीसाठी संस्थेने वानखडे यांचे आभार मानले आहेत.



## गौरक्षण संस्थेला वंध्यत्व शिबिराचा लाभ

**दर्यापूर-** महाराष्ट्र शासनाच्या पशुवैद्यकीय कार्यालयाद्वारे तालुक्यातील सर्वच केंद्रावर तथा गोरक्षण स्थळी वेळोवेळी विविध मोफत शिबिरांचे आयोजन करण्यात येत असते.यानुसार तालुक्यातील नरदोडा या केंद्रा अंतर्गत येत असलेल्या गाडगेबाबा गोरक्षण संस्था स्थळावर नुकतेच वंध्यत्व तपासणी तथा निवारण शिबीर झाले. यामध्ये जवळपास शंभर गायींची तपासणी करण्यात आली . सुविधा व संगोपन यासाठी तपासणी अहवाला नुसार गोरक्षण संस्थेस काळजी व औषध उपचार याबाबत योग्य सुचना देण्यात आल्या.शिबिरात पशुसंवर्धन दर्यापूर विभाग सहाय्यक आयुक्त डॉ प्रतिक बोडखे यांचे प्रमुख मार्गदर्शनात नरदोडा उपकेंद्राचे पशुसंवर्धन विकास अधिकारी डॉ वृषभ मानकर , परीचर अंकुश माहुलकर यांनी कार्य पूर्तता केली . याप्रसंगी सेवानिवृत्त पशुसंवर्धन आयुक्त डॉ दिपक उफाळे यांचा शिबीरातील उत्स्फूर्त सहभाग मोलाचा तथा प्रेरणादायी ठरला . गोरक्षण संस्थेच्या वतीने संस्थेचे संचालक प्रा . गजानन भारसाकळे यांनी शासनाच्या पशुसंवर्धन कार्यालयाचे तथा सर्व डॉक्टर सेवार्थी यांचे आभार व्यक्त केले . संस्थेचे व्यवस्थापक बाळासाहेब भारसाकळे यांचे सह दैनंदिन गोसेवक अंकुश घरडे, संतोष गवई, श्रीकृष्ण पोटे व ज्ञानेश्वर गवई यांचेही यथोचित सहकार्य लाभले .



# प्रेमात हरवलेली माणुसकी..

प्रेम... हा शब्द उच्चारला की डोळ्यांसमोर विश्वास, आपुलकी, त्याग आणि एकमेकांसाठी जगण्याची भावना उभी राहते. मात्र आजचे चित्र अनेकदा अस्वस्थ करणारे आहे. ज्या डोळ्यांत एकत्र आयुष्याची स्वप्ने असायला हवीत, त्याच डोळ्यांत कधीकधी सूड आणि द्वेषाची आग पेटताना दिसते. प्रेमाची व्याख्या इतकी कशी बदलली? लोहगडाचे नाव काही दिवसांपूर्वी इतिहास, पर्यटन आणि वारसा संवर्धनामुळे चर्चेत होते. पण आज लोहगडावर झालेल्या प्रकरणामुळे भयावह ओळख निर्माण केली आहे. यावेळी जे घडले, तो अपघात नव्हता; तो एका थंड डोक्याने आखलेला कट असल्याचा आरोप तपासात समोर आला आहे.

पुण्याजवळच्या लोहगड किल्ल्यावर घडलेली केतन अग्रवाल याच्या मृत्यूची घटना सुरुवातीला एक दुर्दैवी अपघात वाटली होती. अवघ्या काही महिन्यांवर आलेले लग्न, आयुष्याची नवी स्वप्ने पाहणारा एक तरुण अचानक दरीत पडून मृत्यूमुखी पडल्याची बातमी स्क्रोल झाली आणि सगळ्यांनाच वाईट वाटले. पण जसजसा तपास पुढे सरकत गेला तसतसे या प्रकरणाचे स्वरूप बदलत गेले. पोलिस तपासात समोर आलेल्या आरोपांनुसार ही घटना अपघात नसून पूर्वनियोजित कटकारस्थान रचल्याचे समोर आले. त्याहून धक्कादायक म्हणजे या कटात त्याची होणारी पत्नी सिया गोयल आणि तिचा प्रियकर चेतन चौधरी यांचा सहभाग असल्याचा आरोप झाला. या एका घटनेने सर्वांनाच हादरवून सोडले. कोण दोषी आणि कोण निर्दोष हे कायदा ठरवेल. मात्र या प्रकरणाने समाजासमोर काही गंभीर प्रश्न उभे केले आहेत. हे केवळ कटकारस्थानच नाही तर प्रेमाच्या नावाखाली वाढणाऱ्या मालकीहक्काच्या भावनेची, संवाद हरवत चाललेल्या कुटुंबांची, भावनिकदृष्ट्या असुरक्षित होत चाललेल्या तरुण पिढीची आणि आधुनिकतेच्या शर्यतीत मागे पडलेल्या संस्कारांची.

केतन अग्रवाल आणि सिया गोयल यांचे लग्न नोव्हेंबरमध्ये होणार होते. दोन्ही कुटुंबांनी मोठ्या उत्साहाने तयारी देखील केली होती. राजस्थानमध्ये कोट्यवधी रुपये खर्च करून महाल बुक करण्यात आला होता. बाहेरून सगळे स्वप्नवत दिसत होते. पण या चमकदार चित्रामागे वास्तव वेगळेच होते. आरोपांनुसार सियाचे चेतन चौधरीसोबत प्रेमसंबंध होते आणि तिला हे लग्न मान्य नव्हते. इथे पहिला प्रश्न निर्माण होतो. जर एखाद्या मुलीला लग्न मान्य नसेल, तर तिने ते स्पष्टपणे सांगितले का नाही? तिला तसे




सांगण्याचं स्वातंत्र्य होते का नाही? आणि जर होते, तर तिने खोटेपणाचा मार्ग का निवडला?

आजही अनेक घरांमध्ये मुलांच्या भावना ऐकून घेण्यापेक्षा त्यांच्यासाठी निर्णय घेण्याची पद्धत आहे. मुलगा किंवा मुलगी प्रेमात आहे हे समजले की, अनेक पालक संतापतात. संवाद करण्याऐवजी बाहेर पडण्यास बंदी घालतात. त्यामुळे मुले सत्य सांगण्याऐवजी गोष्टी लपवायला शिकतात. सुरुवातीला छोटे वाटणारे खोटे नंतर मोठ्या संकटाचे कारण ठरते.

या प्रकरणाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे भावनिक अपरिपक्वता. आजची पिढी अत्यंत हुशार आहे. तंत्रज्ञान हाताळण्यात ती जगात कुठेही मागे नाही. पण नकार स्वीकारण्याची ताकद किती जणांमध्ये आहे? प्रेमभंग सहन करण्याची क्षमता किती जणांमध्ये आहे? एखादे नाते संपले तर त्यातून सावरून पुढे जाण्याची मानसिकता किती जणांमध्ये आहे? आपल्या शिक्षण व्यवस्थेत गणित, विज्ञान, तंत्रज्ञान, व्यवस्थापन आणि करिअर यावर भर दिला जातो. पण भावनिक शिक्षणाचे काय? विद्यार्थ्यांना नातेसंबंध कसे सांभाळायचे, अपयश कसे स्वीकारायचे, रागावर नियंत्रण कसे ठेवायचे, मानसिक तणावाशी कसे लढायचे हे शिकवले जाते का? दुर्दैवाने याचं उत्तर बहुतेक वेळा 'नाही' असेच आहे. आज सोशल मीडियाने प्रेमाचे एक अवास्तव चित्र उभे केले आहे. या प्रकरणात आणखी एक बाब म्हणजे खून करूनही सत्य लपवता येईल असा झालेला भ्रम. आजच्या डिजिटल युगात परफेक्ट क्राईम नावाची गोष्ट जवळजवळ अस्तित्वात नाही. मोबाईल लोकेशन, सीसीटीव्ही, कॉल रेकॉर्ड, सोशल मीडिया संदेश, आर्थिक व्यवहार आणि इतर तांत्रिक पुरावे तपास यंत्रणांना सत्यापर्यंत पोहोचवतात. कितीही नियोजन केले तरी गुन्हा कायमचा लपून राहत नाही. एकदा गुन्हा केला की त्याचे ओझे आयुष्यभर वाहावे लागते. न्यायालयीन खटले वर्षानुवर्षे चालतात. तरूणाई एवढी हतबल कशी होते. सियाने चेतनच्या सोबत जे केले, त्यामुळे एकाच वेळी तिघांची वाताहात झाली. तीन कुटुंब उद्ध्वस्त झाली. वीस वर्षाच्या एका कोवळ्या मुलीच्या मनात असे विचार आले तरी कसे असतील? समाजात मानहानी होते. आणि शेवटी शिक्षा टळली तरी आयुष्य पूर्वीसारखे राहत नाही. या घटनेत सर्वात मोठे नुकसान झाले ते केतन अग्रवालच्या कुटुंबाचे. ज्यांच्या डोळ्यांसमोर मुलाचे लग्न होणार होते, ज्यांनी त्याच्या भविष्यासाठी स्वप्ने रंगवली होती, त्या कुटुंबाने एका क्षणात सर्व काही गमावले. पैसा, प्रतिष्ठा आणि यश यापैकी काहीही त्यांचे दुःख भरून काढू शकत नाही.

पण याचबरोबर समाजानेही काही धडे घेण्याची गरज आहे. नाते टिकत नसेल तर ते सन्मानाने संपवता येते. पण एखाद्याचा जीव घेणे हा कोणत्याही समस्येचा उपाय असू शकत नाही. या घटनेने प्रत्येक पालक, प्रत्येक तरुण, प्रत्येक शिक्षक आणि प्रत्येक नागरिकाला एक प्रश्न विचारला आहे तो म्हणजे आपण आपल्या मुलांना यशस्वी बनवत आहोत, पण त्यांना भावनिकदृष्ट्या सक्षम बनवत आहोत का?या प्रश्नांची उत्तरे जर आपण प्रामाणिकपणे शोधली, तर कदाचित भविष्यात एखादा केतन वाचेल, एखादे कुटुंब उद्ध्वस्त होण्यापासून वाचेल आणि समाज म्हणून आपण अधिक समंजस आणि अधिक माणूसकी जपणारे बनू.

**वैष्णवी भोगले**

# कर्जखाते 'आधार' संलग्न

**नैसर्गिक संकट व कर्जबाजारीपणाच्या गर्तेत अडकलेल्या शेतकरी बांधवांना पुन्हा सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' सुरू केली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकरी बांधवांनी आपले पिककर्जखाते आधार संलग्न करणे आवश्यक आहे. याबाबत माहिती देणारा लेख....**




राज्य शासनाने राज्यातील बळीराजाला मोठा दिलासा देण्यासाठी घोषित केलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती' अंमलबजावणी आता अंतिम टप्प्यात आहे. या योजनेचा थेट लाभ शेतकऱ्यांना लवकर मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी आपली आधार क्रमांकाची माहिती बँकेच्या शाखेत द्यावी असे आवाहन सहकार विभागाने केले आहे.

आधार प्रमाणीकरण पूर्ण होताच, जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर लाभाची रक्कम जमा करण्याचे सहकार विभागाचे नियोजन आहे. या महत्त्वाकांक्षी योजनेमुळे महाराष्ट्रातील सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना सुमारे ३६ हजार ५०० कोटी रुपयांची आर्थिक मदत मिळणार आहे. सहकार आयुक्त व निबंधक तसेच जिल्हा बँकर्स समितीकडून व्यापारी आणि सहकारी बँकांना पात्र शेतकऱ्यांचे आधार क्रमांक घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. योजनेच्या पारदर्शक अंमलबजावणीसाठी सर्व बँकांकडील पात्र शेतकऱ्यांची कर्ज खात्याची माहिती अपलोड झाल्यानंतर पात्र शेतकऱ्यांना स्वतंत्र विशिष्ट कर्ज खातेनिहाय नंबर दिला जाणार आहे. पात्र शेतकऱ्यांची यादी बँक शाखा, ग्रामपंचायत, तलाठी कार्यालय आणि पोर्टलवर प्रसिद्ध केली जाणार आहे.

आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतर शासनाकडून थेट संबंधित शेतकऱ्याच्या कर्जखात्यात लाभाची रक्कम जमा केली जाणार आहे. या योजनेचा लाभ मिळालेल्या शेकऱ्यांना चालू हंगामासाठी नव्याने कर्ज पुरवठा करण्याच्या सूचना सर्व बँकांना देण्यात आल्या आहेत.या योजनेमधील पात्र सर्व शेतकरी नवीन पीक कर्ज घेऊ शकतील.या योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये आणि तरतुदी पुढील प्रमाणे आहेत. या योजनेअंतर्गत २ लाख रुपयांपर्यंतची अल्पमुदतीची पीक कर्जमुक्ती केली जाईल. यामध्ये थकीत, पुनर्गठित आणि फेरपुनर्गठित कर्जांचाही समावेश आहे. ज्या शेतकऱ्यांचे कर्ज २ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे, त्यांच्यासाठी विशेष तरतूद करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी दोन लाखावरील रक्कम बँकेत भरल्यानंतर त्यांना दोन लाखाच्या कर्जमुक्तीचा लाभ देण्यात देणार आहे.

नियमित कर्जफेड करणाऱ्यांना ५० हजारांचे प्रोत्साहन देण्यासाठी तरतूद केली आहे. प्रामाणिकपणे व नियमित कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी त्यांना ५० हजार रुपयांपर्यंतचे प्रोत्साहनपर अनुदान दिले जाणार आहे. विशेष म्हणजे, यापूर्वीच्या कर्जमाफी योजनांचा लाभ घेतलेले शेतकरीही या प्रोत्साहनपर लाभासाठी पात्र असणार आहेत.

या योजनेचा उद्देश केवळ कर्जमाफी देणे एवढाच नसून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, त्यांचा आत्मविश्वास वाढविणे आणि राज्यातील शेती क्षेत्राला नवसंजीवनी देणे हा आहे. शेतकऱ्यांनी कोणत्याही विलंबाशिवाय बँकेत जाऊन आपले कर्ज खाते आधारशी संलग्न करून घ्यावे.असे आवाहन सहकार विभागाकडून करण्यात आले आहे.

**विभागीय माहिती कार्यालय, अमरावती**

# जीव उधळून हिमतीने काम करणाऱ्या पत्रकारांसाठी एक धडा!




हे आहेत आर. राजगोपाल. कोलकाता येथे राहतात. समाजासाठी देशासाठी सतत धडपडणारे पत्रकार. वडील गांधीवादी विचारांचे. रिटायर्ड प्रोफेसर. राजगोपाल यांनी पत्रकारितेचे व्रत स्वीकारले. चाळीस वर्षे सतत सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारणारी पत्रकारिता केली. इकोनॉमीक टाईम्स, बिजनेस स्टँडर्ड, इंडिया टुडे अशा जबरा मिडिया ग्रुप बरोबर काम केले. २०१६ ते २०२३ पर्यंत ते 'द टेलिग्राफ' या कोलकाता येथून प्रकाशित होणाऱ्या दैनिकाचे संपादक होते. संपूर्ण देशाला निर्भीड पत्रकारिता काय असते हे त्यांनी दाखवले. त्यांच्या काळातील 'टेलिग्राफ'चे फ्रंट पेज सत्ताधाऱ्यांना धडकी भरवणारे असायचे. कोट्यावधी वाचक टेलिग्राफ चे अतिशय कलात्मक आणि व्यंगात्मक असलेले मुखपृष्ठ अतिशय आवडीने आणि कुतूहलाने बघायचे. सरकारच्या डोळ्यात घुसणारा काटा म्हणूनही त्यांच्याकडे पाहिले जायचे.

प. बंगालमध्ये अचानक वाऱ्याने दिशा बदलली. तेथील राजकीय समीकरणे बदलली. सत्तेची समीकरणे बदलली. भाजपने संपूर्ण राज्याचा ताबा घेतला.राजगोपाल आता निवृत्त झालेले आहेत. वडिलांचा कित्ता गिरवून त्यांची कन्यासुद्धा पत्रकार बनते. अमेरिकेत असते. तिला भेटायला अधूनमधून राजगोपाल जात असतात. त्यांच्याकडे अमेरिकेचा दहा वर्षांचा व्हिसा आहे. अचानक मुलीचे लग्न ठरते. तिच्या लग्नासाठी अमेरिकेला जायचे नियोजन करतात. पासपोर्ट रिन्युअल साठी अर्ज करतात. पण पासपोर्ट रिन्यू होत नाही. ते बरेच दिवस वाट पाहतात. तेव्हा त्यांना सांगण्यात येतं की त्यांचे नाव मतदार यादीत नाही. मागच्यावेळी जो एसआयआर करण्यात आला त्यावेळी लाखो लोकांची नावे मतदार यादीतून काढण्यात आली होती. त्यामध्ये यांचेही नाव असते. त्यामुळे पोलीस त्यांना संशयित समजत आहेत. त्यांची केस घुसखोराचे मूल्यमापन करण्यासाठी स्थापन केलेल्या कमिटीकडे देण्यात येते. म्हणून पासपोर्ट रिन्यू करत नाही.

इतका मोठा पत्रकार. इतका प्रतिष्ठित संपादक. मग असे कसे झाले? तर त्यांना सांगण्यात येतं की २००२ च्या मतदार यादीमध्ये त्यांचे नाव नाही. राजगोपाल यांना मोठा धक्का बसतो. पासपोर्ट दाखवले जाते. २५वर्षांपासून राहत असल्याचा पुरावा दाखवला जातो. घर, दार, सरकारी दरबारी असलेली कागदपत्रे दाखवली जातात. पण संघर्ष संपत नाही. इतका प्रभावशाली व्यक्ती एकदम हतबल होतो. सत्तेपुढे शहाणपण चालत नसतं. ते पुन्हा सिद्ध होतं.प्रेस क्लब ऑफ इंडिया, एडिटर्स गिल्ड या पत्रकारांच्या संघटना सरकारला पत्र लिहितात. एका प्रतिष्ठित पत्रकाराला दिल्या जाणाऱ्या वागणुकीचा आणि अन्यायाचा निषेध करतात. पण आज राजगोपाल साहेब प्रचंड तणावात आहेत. जुने डाक्युमेंट खंगाळत आहेत. पाच पन्नास वर्षांपूर्वीचे दहावीचे प्रमाणपत्र शोधून काढत आहेत. आपल्या मुलीच्या लग्नात सहभागी होता येईल की नाही हा प्रश्न त्यांना सतावत आहे. आपल्या सारख्या ख्यातनाम पत्रकारावर जर ही वेळ येत असेल तर मतदार यादीतून वगळण्यात आलेल्या इतर लाखो सामान्य लोकांचे काय हाल होत असतील, असा विचार करून त्यांना जास्त त्रास होत आहे.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्या वृत्तपत्रासाठी त्यांनी जीवाचे रान केले आणि त्या वृत्तपत्राला लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचवले त्या वृत्तपत्राने सुद्धा त्यांच्या प्रिंट एडिशन मध्ये त्यांच्या या लोकप्रिय संपादकावर होत असलेल्या अन्यायाबद्दल आवाज उठवला नाही.आपले कुटुंब, आपली सुरक्षा अशा कोणत्याही गोष्टींची पर्वा न करता जीव उधळून हिमतीने काम करणाऱ्या पत्रकारांसाठी हा एक धडा आहे!

**-दिलीप लाठी**

# 'पेडोफेलिया'माणसातल्या विकार, विकृतींचा विषय




'तिघी' या सिनेमात 'पेडोफेलिया'चा संदर्भ येतो. सिनेमातल्या आईला जेव्हा आपल्या नवऱ्याचे सत्य कळते तेव्हा ती त्याच्याशी संबंध तोडते. पण ती त्याला हेही म्हणते की तू आजारी आहेस. डॉक्टरांची मदत घे,बरा हो. पेडोफेलियासारख्या गंभीर मुद्द्यावर ती स्त्री नवऱ्याला शांतपणे सल्ला देते हे मला फारच आवडले होते. आई म्हणून ती आपले कर्तव्य करतेच;पण 'तुला उपचारांची गरज आहे' हे सांगण्याची प्रगल्भता तिच्यात आहे हे फार आश्वासक होते. सिनेमातला हा प्रसंग बघताना एक जुनी जाहिरात आठवली. बऱ्याच वर्षांपूर्वी थिएटरमध्ये पाहिली होती. एक मध्यमवयीन गृहस्थ (सागर देशमुख) लिफ्टमध्ये शिरतो. त्याच्यामागे एक लहान मुलगा बास्केटबॉलशी खेळत आत शिरतो. त्या गृहस्थाच्या चेहऱ्यावर अस्वस्थ भाव आहेत. लिफ्टचे दार बंद होते. तो गृहस्थ अस्वस्थपणे मूलाकडे अधूनमधून बघतोय. थोड्या वेळाने लिफ्ट थांबते. दार उघडते. मुलगा बॉलशी खेळतच बाहेर पडतो. पाठोपाठ हा गृहस्थही बाहेर पडतो. त्याच्या चेहऱ्यावरचे भाव तसेच आहेत. जाहिरात इथे संपते आणि स्क्रीनवर कॅप्शन झळकते-'डू यू लाइक चिल्ड्रेन इन अ वे यू शुड नॉट हेल्प इज ॲव्हलेबल.' त्यानंतर संबंधित संस्थेचे नाव, हेल्पलाइन नंबर दिसतो.

पेडोफेलियासारख्या विषयालादेखील समजून घेता येऊ शकते, किंबहुना माणसातल्या सर्व प्रकारच्या विकार, विकृतींना समजून घेण्याचा प्रयत्न केला गेला तरच त्या प्रश्नांवर काही उत्तर मिळण्याची शक्यता असते हे ज्या समाजाला समजते तो समाज एक प्रगल्भ समाज असतो. मला असे बरेचदा वाटते की लैंगिक गुन्ह्यांच्या संदर्भात बोलताना पुरुषांच्या लैंगिक वर्तनाबरोबरच त्यांच्या 'लैंगिक मानसा'बाबत जास्तीत जास्त बोललजायला हवे.त्यावर साधकबाधक चर्चा व्हायला हवी. हे लिहिण्याचे एक कारण म्हणजे काही दिवसांपूर्वी मंगला सामंत गेल्या. पुरूषांच्या लैंगिकतेच्या अभ्यासाबाबत आग्रही असणाऱ्या स्त्रीवादी अभ्यासक म्हणून माझा त्यांच्याशी परिचय होता. परिचय झाला तो अर्थातच 'मिळून साऱ्याजणी'मुळे. त्यांच्याशी जेव्हा जेव्हा गप्पा व्हायच्या तेव्हा त्या पुरूषांबरोबर काम करणे किती आवश्यक आहे हे आग्रहाने सांगायच्या. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांमधील पुरूषांना लैंगिक समुपदेशन देणारी केंद्रे उघडली गेली पाहिजेत असे त्यांचे म्हणणे होते. त्याबाबत आमचा थोडा विचारही झाला होता; पण तो पुढे गेला नाही. अशा केंद्रांची खरंच फार गरज वाटते. (पुण्यात 'नारी समता मंचा'तर्फे 'पुरूष संवाद केंद्र' चालवले जाते).

पुरूषांचे लैंगिक मानस, त्यांचा सेक्स ड्राइव्ह (लिबिडो) हा महत्त्वाचा विषय अशाकरता आहे की तो अत्यंत धोकादायक वळण घेऊ शकतो हे आपल्याला वारंवार दिसते (माध्यमिक शाळेतला एक मित्र आठवतो. तो मानसिकदृष्ट्या अस्थिर होता. आणि लैंगिकदृष्ट्या अस्वस्थ होता. त्याच्याकडून त्या काळात काही वेड-वाकडे घडले नाही; पण त्याचे वागणे थोडे विचित्र होते. तो अतिरिक्त प्रमाणात हस्तमैथुन करत असे. त्याचे डोके ताळ्यावर नसण्याचा संबंध त्यांच्या लैंगिक उपासमारीशी किंवा 'इनऑर्डिनेट सेक्शुअल डिझायर'शी होता का असा आज प्रश्न पडतो.त्या वयातच त्याला मानसोपचारतज्ज्ञांकडे नेले असते तर कदाचित काही फरक पडला असता.आजही तो मानसिकदृष्ट्या अस्थिरच आहे. घरची मंडळी त्याला बाहेर जाऊ देत नाहीत असे कळले). त्यामुळे पुरूषाची सेक्शुअल हेल्थ ठीक आहे की नाही हे बघणे गरजेचे ठरते. स्त्री-पुरुष दोघांच्याही संदर्भात 'राइट टू सेक्स' आणि 'सेक्स ऑडिट' अशा दोन कल्पना लेखांमधून मांडल्या होत्या. त्यावर समुपदेशक, मानसोपचारतज्ज्ञ, सेक्सॉलॉजिस्ट यांच्याशी बोलून काही विचार झाला तर कदाचित त्याला काही आकार येऊ शकेल.

२०१९ साली 'उद्याचा मराठवाडा' या दिवाळी अंकात 'कामस्वातंत्र्य' या विषयावरील एक विभागाचे संपादन केले होते. त्यात मंगलाताईंनी 'कामशमन : वहिवाटेची बिकट वाट' हा लेख लिहिला होता. लेखात त्यांनी पुरूषांच्या लैंगिक (दु)वर्तनावर प्रकाश टाकला होता. लेखातले काही उतारे देतो -

पुरूषाची कामेच्छा तीव्र असण्यामागील कारणांचा अजून शोध घेतल्यास असे लक्षात येते की स्त्रीमधील स्त्री-बीज आणि पुरूषामधील शुक्राणू यांच्या संयोगाने जर गर्भधारणा नाही झाली तर ती बीजे शरीरात ठेवली जात नाहीत. ती शरीराबाहेर टाकली जातात. स्त्रीमध्ये तिचं बीज मासिक पाळीद्वारे बाहेर टाकले जाते तर पुरूषामध्ये ते वीर्यस्खलनाद्वारे बाहेर पडत असते. पुरूषबीजाचा संयोग स्त्रीबीजाशी होणार नसला तरी त्याला शरीराबाहेर बाहेर पडावेच लागतं. त्यातही पुरूषामध्ये त्याचे बीज हे पुरूषाच्या शिस्नाच्या 'इरेक्शन' आणि 'इज्यॅक्युलेशन' या क्रियेने वीर्यरूपात बाहेर पडत असते. ही प्रक्रिया माणसाच्या मज्जासंस्थेशी कशी जोडलेली असते हे आपण आधी पाहिले. अर्थात वीर्य बाहेर टाकण्याकरता पुरूष लिंगाची जी ताठर स्थिती यावी लागते त्या स्थितीसाठी पुरूषाने काम-उत्तेजित होण्याची गरज असते. पुरूषाची शारीरिक आणि म्हणून मानसिक गरज या अर्थाने हे अनिवार्य असेल तर मग त्या उत्तेजनेसाठी पुरूष विविध मार्ग अवलंबून पाहणार हे ओघाने आलंच. हे मार्ग प्रत्येक पुरूषागणिक वेगवेगळे असू शकतात. म्हणजे कुणाला सुंदर स्त्रीकडे निव्वळ पाहून उत्तेजित व्हायला होते, कुणाला स्त्रीच्या आवाजामुळे उत्तेजित व्हायला होते, कुणाला स्त्रीचे कपडे पाहण्याचा नाद असतो, कुणाला तिचे फोटो, कुणाला स्त्रीचे शरीरवर्णन, तर कुणाला तिच्या जवळिकीचे सीन (बेड सीन्स) पाहून उत्तेजना येते. कामुक आवाजातील गाणी ऐकावीशी वाटतात. कुणाला स्त्रीबरोबर कामुक हावभावांचे नृत्य करावंसे वाटते. कुणी पुरूष वेश्यांकडे जाऊन, कुणी डान्सबारमध्ये किंवा पब्समध्ये जाऊन तर कुणी तमाशाला जाऊन, कुणी स्त्रियांना अश्लील मेसेज लिहून, स्त्री-शरीराची चित्रे, वर्णने, शिल्पे घडवून किंवा निरखून, पोर्न फिल्म पाहून - अनेक प्रकारांनी पुरूष आपली कामभावना उत्तेजित करू पाहतात. कामोत्तेजना आल्यावर तिचे शमन हा महत्त्वाचा मुद्दा असतो. बरेचजण त्याकरता हस्तमैथुनाचा आधार घेतात. कारण पुरूषाचे बीज शरीराबाहेर पडणे ही क्रिया अंतिमतः त्याच्या कामशमनातून होणार असते. ते शमन पुरुष हस्तमैथुनाद्वारे करू पहातो. एकूण पुरूष बीज बाहेर पडण्याची ही नैसर्गिक धडपड आहे. तसंच हे वीर्य बाहेर न पडल्यास पुरूष अस्वस्थ आणि ताणाखाली राहतो. अखेरीस त्याला झोपेत स्वप्नावस्था आणून त्याचे बीज वीर्याद्वारे बाहेर टाकण्याचे काम त्याच्या मेंदूकडून पार पाडले जाते.

याउलट स्त्री-बीज बाहेर टाकण्याची प्रक्रिया ही शरीरांतर्गत असते. ते बाहेर पडण्यासाठी स्त्रीला कामोत्तेजना येण्याची गरज नसते. त्यामुळे स्त्रीचे लक्ष वेधून घेण्यासाठी पुरूष जे वरील मार्ग वापरतो ते स्त्रीला पुरूषासाठी वापरण्याची गरज नसते, तो तिचा शरीरधर्म नसतो. स्त्रिया सभ्य व शालीन आणि पुरुष असभ्य असे जे दोन भाग आपण करून ठेवले आहेत त्याबाबतच मग प्रश्न उभे रहातात. विशेषतः पुरूष जे कामोत्तेजनाचे वरील उपाय अमलात आणतो ते अश्लील समजले जातात. स्त्री-पुरूषांच्या बीज-उत्सर्जनातील हा मोठा फरक समजून घेणे हे पुरूषाला समजून घेण्यासाठी अत्यंत महत्वाचे आहे. पुरूषाला स्त्रीदर्शन इतके महत्त्वाचे का वाटते, तिचे सान्निध्य किंवा स्पर्श हवासा का वाटतो, साहित्यातून स्त्री-शरीराची वर्णने करण्यात आणि वाचण्यात तो का रमतो, तो सेक्सविषयक सिनेमांना गर्दी का करतो याबाबत आपल्याकडून सातत्याने दुर्लक्ष झालेले आहे. या वर्तनाच्या मुळाशी जावे असे कुणाला वाटत नाही.

बीज शरीराबाहेर पडण्याची पुरूषाची नैसर्गिक गरज समजून घेतली जात नाही. त्याच्या या कामशमनाच्या प्रयत्नांचा सर्वसाधारणपणे उपहास केला गेलेला आहे. हस्तमैथुन हा तर पुरूषांचा आजारदेखील समजला गेला आहे. यातून होत राहिलेल्या लैंगिक दमनामुळे, आपल्या कामशमनासाठी स्त्रीवरील लैंगिक अत्याचाराचे, विनयभंगाचे नवेनवे चोरटे मार्ग पुरूष वापरून पाहतो. आपल्या या वर्तनामागे निसर्गाचा कार्यभाग काय हे पुरूषालाही न समजल्यामुळे त्याला तो 'पुरूषार्थ' वाटू लागतो आणि त्यामुळे स्त्रीला उपद्रव होईल अशा पद्धतीने कामशमन करणाऱ्या पुरूषांची संख्या वाढत जाते. त्यातून काही पुरूष विकृत मार्गाचा अवलंब करतात जो अखेर गंभीर गुन्हा ठरतो. अशा पुरूषांना कडक शिक्षा ठोठावून काहीही निष्पन्न होत नाही हे आपण अनुभवतो कारण त्याच्या कामशमनाच्या कोंडमाऱ्यावर, आणि त्यातून पुरूषावर ओढवलेल्या अगतिकतेवर वास्तव उपाय शोधले जात नाहीत. जन्मठेप, फाशी यासारखे कठोर उपायदेखील वरवरचेच ठरतात. पुरूषांमधील कामेच्छा आणि पितृसत्ताक पद्धतीने केलेले त्यांच्यावरील कुसंस्कार या दोन्हीमुळे समाजासाठी, विशेषतः स्त्रियांसाठी, फार अडचणी निर्माण करून ठेवल्या आहेत. पुरुष हा पितृसत्तेचा निर्माताही आहे आणि एका अर्थी बळीहीआहे. त्याची लैंगिक अडचण समजू शकली तरी त्याच्यातली हिंसा, स्त्रीला कमी लेखण्याची पुरुषी मानसिकता हे मुद्दे गंभीर आहेत. स्त्रीला बाहेर फिरताना सुरक्षित न वाटणे हे त्या समाजाचे मोठे अपयश तर आहेच; पण त्या समाजातल्या पुरुषांच्या 'लिबिडो'चे नीट नियोजन होत नाही आहे याचेही ते निदर्शक आहे. दिवसागणिक लैंगिक गुन्हे वाढत असण्याच्या काळात आपण पुरूषकेंद्री विचार करून काही काम करणार की नाही हा खरा प्रश्न आहे. मंगलाताई असा विचार करत होत्या. त्यांच्याशी बोलताना बरे वाटायचे. त्या करारी फेमिनिस्ट होत्या; पण त्यांना पुरूषांचा 'लिबिडो प्रश्न' सुटल्याशिवाय स्त्रीप्रश्न सुटायला मदत होणार नाही हेही कळले होते. त्यामुळे त्यांच्याबद्दल आस्था वाटायची. माझे 'पुरुषपणाचे प्रश्न' त्यांच्याशी डिस्कस करता यायचे. अर्थात मी 'मिळून साऱ्याजणी'तला एक पुरूष सदस्य होतो. त्यामुळे मला खरे तर ती संधी आधीपासूनच मिळाली होती. आसपास स्त्रिया असल्या, आपल्याला भरपूर मैत्रिणी असल्या आणि त्यांच्याशी आपल्याला मनमोकळेपणाने बोलता येऊ शकले तर पुरूष म्हणूनचे आपले काही गुंते सुटायला किती मदत होते याचा मला चांगलाच अनुभव आहे. त्यामुळे 'स्त्री विरुद्ध पुरूष' अशी विचित्र, अर्थहीन, मूळ प्रश्नाला भरकटवणारी, पूर्णपणे अनावश्यक अशी आजची 'बायनरी' पाहिली की मंगलाताईंची आठवण होते. त्यांच्यासारखा सम्यक विचार करता आला तर 'समाजस्वास्थ्य' सुधारायला मोठीच मदत होईल.

मंगलाताईंच्या स्मृतीला अभिवादन!

**-उत्पल व्हीबी**

# १५० दिवसांचा आढावा; घोषणांपासून अंमलबजावणीकडे आता शहराची नजर

## पाणी, रस्ते, सिटी बस, गटार योजना, विमानतळ, आवाससह हजारो कोटींच्या प्रकल्पांची माहिती

■ प्रतिनिधी | अकोला ■

महापालिकेतील शहर सुधार आघाडीने सत्तेच्या पहिल्या १५० दिवसांचा प्रगती अहवाल सादर करत अकोला शहराच्या पायाभूत विकासासाठी हाती घेतलेल्या तसेच प्रस्तावित प्रकल्पांचा विस्तृत आढावा मांडला. पाणीपुरवठा, भुयारी गटार, अंतर्गत रस्ते, सार्वजनिक वाहतूक, स्वच्छता, गृहनिर्माण, आरोग्य, शिक्षण आणि नागरी सुविधांशी संबंधित विविध योजनांची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. अनेक प्रकल्पांसाठी निधी उपलब्ध झाल्याचा दावा करण्यात आला असला, तरी काही योजना अद्याप प्रशासकीय मंजुरी व अंमलबजावणीच्या प्रक्रियेत असल्याने त्यांच्या प्रत्यक्ष परिणामांकडे शहराचे लक्ष लागले आहे.

मूर्तिजापूर रोडवरील हॉटेल आरजी येथे झालेल्या पत्रकार परिषदेत खासदार अनुप धोत्रे, राज्य विधिमंडळाचे मुख्य प्रतोद तथा आमदार रणधीर सावरकर, महापौर शारदा खेडकर, स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल, उपमहापौर अमोल गोगे, रफिक सिद्दिकी, गटनेता पवन महल्ले, सुनील मेश्राम यांच्यासह आघाडीतील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

### दीर्घकालीन पाणीपुरवठ्यावर भर

शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन बुलढाणा जिल्ह्यातील जिगाव प्रकल्पातून अकोल्यासाठी पाणी आरक्षण मंजूर करण्यात आल्याचे सांगण्यात आले. ५५० कोटी रुपयांच्या योजनेपैकी २२५ कोटी रुपये प्राप्त झाले असून उर्वरित काम पुढील दीड ते दोन वर्षांत पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी सांगितले. ही योजना पूर्ण झाल्यानंतर शहराला नियमित पाणीपुरवठा करण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक आणि मंदिर विकास**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य पुतळ्यासाठी १५ कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येणार असल्याचे महापौर शारदा खेडकर यांनी सांगितले. तसेच श्री राजराजेश्वर मंदिर विकासासाठी ३१.८० कोटी रुपयांचा सुधारित प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आल्याची माहिती आमदार रणधीर सावरकर यांनी दिली.

**घोषणांनंतर अंमलबजावणीची अपेक्षा :** पत्रकार परिषदेत मांडण्यात आलेल्या प्रकल्पांमधून शहराच्या दीर्घकालीन पायाभूत विकासाचा आराखडा स्पष्ट होत असला, तरी अनेक योजनांचे यश निधीची वेळेवर उपलब्धता, प्रशासकीय मंजुरी, कामांची गुणवत्ता आणि निश्चित मुदतीत अंमलबजावणी यावर अवलंबून राहणार आहे. त्यामुळे सादर झालेला १५० दिवसांचा प्रगती अहवाल हा केवळ घोषणांचा दस्तऐवज न ठरता प्रत्यक्ष विकासात किती रूपांतरित होतो, याकडे अकोलेकरांचे लक्ष लागले आहे.

**सार्वजनिक वाहतुकीला चालना**

१५ ऑगस्टपासून अकोल्यात शहर बस सेवा सुरू करण्याचे नियोजन जाहीर करण्यात आले. प्रारंभी २० किलोमीटरच्या परिघात सेवा सुरू होणार असून त्यासाठी आवश्यक बसथांबे आणि रस्ते विकसित केले जातील. खा. अनुप धोत्रे यांच्या प्रयत्नांतून ४२ ई-बस मंजूर झाल्याचेही सांगण्यात आले.

## शहर सुधार आघाडीच्या विकासाचा 'ब्ल्यू प्रिंट' सादर



**प्रधानमंत्री आवास आणि सार्वजनिक सुविधा**

प्रधानमंत्री आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात स्वतःची जागा नसलेल्या लाभार्थ्यांसाठी शहरातील २९ ठिकाणी भूखंड उपलब्ध करून देण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला. शहरात ५० सुलभ शौचालये आणि १५ आधुनिक 'पे अँड युज' स्वच्छतागृहे उभारण्याची माहिती महापौर शारदा खेडकर यांनी दिली.

**विमानतळ, औद्योगिक संपर्क आणि सांस्कृतिक प्रकल्प :** अकोला विमानतळ धावपट्टी विस्तारीकरणाचा प्रश्न निकाली लागल्याचा दावा करण्यात आला. औद्योगिक वसाहतीकडे जाणाऱ्या भुयारी मार्गाचे काम प्रगतीपथावर असल्याचे सांगण्यात आले. सांस्कृतिक भवन आणि अत्याधुनिक तरणतलावाचे लोकार्पण १५ ऑगस्ट रोजी करण्याचे नियोजन असल्याची माहितीही देण्यात आली.

### प्रमुख पायाभूत प्रकल्पांची माहिती

गुडधी येथे केंद्रीय विद्यालयासाठी जागा उपलब्ध झाली असून तात्पुरत्या स्वरूपात हरिहर पेठ येथील जिल्हा परिषद शाळेत वर्ग सुरू करण्यात येणार आहेत. डाबकी रोड, न्यू तापडिया नगर आणि गुडधी येथील उड्डाणपूल पूर्णत्वाच्या मार्गावर असल्याचे सांगण्यात आले. शिवापूर येथील जिल्हा रुग्णालय, पोलीस निवासस्थाने आणि नवीन तहसील कार्यालय यांच्याबाबतही प्रगतीची माहिती देण्यात आली.

### स्वच्छता आणि नागरी सुविधांवर भर

शहरातील कचरा व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी शंभर टक्के कचरा संकलनाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यासाठी नवीन कंत्राटदार नियुक्त करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगण्यात आले. नवीन पथदिवे, प्रमुख चौकांमध्ये एलईडी स्क्रीन, मोफत वाय-फाय सुविधा, नागरिकांच्या तक्रारींसाठी स्वतंत्र संकेतस्थळ आणि आधुनिक सार्वजनिक स्वच्छतागृहांची उभारणी यांचाही आराखडा मांडण्यात आला.

### भुयारी गटारानंतर रस्त्यांच्या पुनर्बांधणीचा आराखडा

अमृत योजना टप्पा-दोन अंतर्गत सुरू असलेल्या भुयारी गटार योजनेमुळे शहरातील अनेक रस्ते खोदण्यात आले आहेत. या रस्त्यांच्या पुनर्बांधणीसाठी सुमारे ६०० कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे. तसेच भुयारी गटार योजनेच्या पुढील टप्प्यासाठी ६५० कोटी रुपयांचा स्वतंत्र प्रस्तावही सादर करण्यात आला असल्याची माहिती देण्यात आली.

# बालविवाहाची 'कुजबुज' की मोठे रॅकेट?

## अल्पवयीन मुलीचा विवाह, पोलिस तपासावर प्रश्न; 'त्या' ग्रामपंचायतीच्या भूमिकेचीही चर्चा

■ विशेष प्रतिनिधी ■

**अकोट :** अकोट तालुक्यातील एका ग्रामपंचायत हद्दीत २३ जून रोजी एका अल्पवयीन मुलीचा विवाह घाईगडबडीत लावण्यात आल्याची गंभीर चर्चा तालुकाभर रंगली आहे. या विवाहाची माहिती स्थानिक यंत्रणांपर्यंत पोहोचूनही प्रकरण दडपण्यात आल्याची कुजबुज आता अधिकच तीव्र झाली असून, पोलिसांच्या प्राथमिक तपासापासून ग्रामपंचायतीच्या कथित भूमिकेपर्यंत अनेक प्रश्न अनुत्तरित असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ स्तरावर निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

विश्वसनीय सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित अल्पवयीन मुलीचा विवाह झाल्याची माहिती अकोट ग्रामीण पोलिसांपर्यंत पोहोचली होती. त्यानंतर काही स्तरावर पडताळणीही झाल्याचे सांगितले जाते. मात्र, त्या तपासाचा निष्कर्ष काय निघाला, कोणती कागदपत्रे तपासण्यात आली, मुलीचे वय कशाच्या आधारे निश्चित करण्यात आले आणि पुढील कारवाई का झाली नाही, याबाबत कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही.या प्रकरणात आणखी गंभीर दावा म्हणजे, संबंधित बीटशी वर्तमान स्थितीत संबंध नसलेल्या एका पोलिस कर्मचाऱ्याने कथितरीत्या हस्तक्षेप करून प्रकरण 'मिटविण्याचा' प्रयत्न केला आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची दिशाभूल झाल्याची चर्चा स्थानिक पातळीवर सुरू आहे. या दाव्याला अद्याप अधिकृत दुजोरा मिळालेला नसला तरी, अशा चर्चांमुळे पोलिस यंत्रणेच्या कार्यपद्धतीबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. दरम्यान, सर्वाधिक चर्चेचा विषय ठरली आहे ती 'त्या' गावातील ग्रामपंचायत. स्थानिक सूत्रांच्या दाव्यानुसार, विवाहाची माहिती ग्रामपंचायतीतील जबाबदार पदाधिकारी आणि सदस्यांना होती. एवढेच नव्हे, तर काही पदाधिकाऱ्यांनी या विवाहासाठी पुढाकार घेतल्याचाही आरोप केला जात आहे. त्यासाठी मुलीच्या वयाबाबत बनावट नोंदी घेत



दस्तावेज व अन्य कागदपत्रे तयार केल्याची खमंग चर्चा रंगू लागली आहे. तथापि, या आरोपांची स्वतंत्र पडताळणी अद्याप झालेली नाही आणि संबंधित ग्रामपंचायत किंवा पदाधिकाऱ्यांची अधिकृत बाजू समोर आलेली नाही.

बालविवाह हा केवळ सामाजिक अनिष्ट प्रघात नसून तो बालविवाह प्रतिबंध अधिनियम, २००६ अंतर्गत दंडनीय गुन्हा आहे. अल्पवयीन मुलगा किंवा मुलीचा विवाह लावणे, त्यासाठी प्रोत्साहन देणे, मदत करणे किंवा माहिती असूनही आवश्यक ती कारवाई न करणे, या बाबींची चौकशी कायद्याच्या चौकटीत होऊ शकते. त्यामुळे या प्रकरणात कोणाची भूमिका काय होती, याचा तपास दस्तऐवज, साक्षीदार आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारे होणे आवश्यक असल्याचे कायदेतज्ज्ञांचे मत आहे.

**प्रश्न अनेक आहेत...**

जर विवाहाची माहिती स्थानिक पातळीवर सर्वांनाच होती, तर तो रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना का करण्यात आली नाही? संबंधित मुलीच्या वयाची पडताळणी कशी झाली? पोलिसांकडे माहिती आल्यानंतर वरिष्ठांना कोणता अहवाल देण्यात आला? आणि जर कोणत्याही स्तरावर निष्काळजीपणा किंवा दिशाभूल झाली असेल, तर त्याची जबाबदारी निश्चित होणार का? या सर्व प्रश्नांची उत्तरे केवळ सखोल आणि निष्पक्ष चौकशीतूनच समोर येऊ शकतात. त्यामुळे जिल्हा पोलिस प्रशासनाने या प्रकरणातील सर्व नोंदी, तपासाची कागदपत्रे, संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका आणि ग्रामपंचायतीशी संबंधित दाव्यांची स्वतंत्र पडताळणी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

सध्या या प्रकरणातील आरोप आणि दावे अधिकृतरीत्या सिद्ध झालेले नाहीत. संबंधित सर्व पक्षांची भूमिका समोर आल्यानंतरच संपूर्ण सत्य स्पष्ट होणार आहे. मात्र, बालविवाहासारख्या गंभीर विषयात कोणत्याही प्रकारचा संशय राहू नये, यासाठी पारदर्शक आणि निष्पक्ष चौकशी हीच काळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

# अकोला-अकोट मार्गावर २८ जणांचे बळी; भरपावसात उद्धवसेनेचा रास्तारोको

## आ. नितीन देशमुखांनी केली अधिकाऱ्यांची कानउघाडणी; एनएचएआयच्या अधिकाऱ्यांशी होणार बैठक

■ प्रतिनिधी | अकोला ■

'२८ निष्पाप नागरिकांचा जीव गेल्यानंतरही प्रशासनाला जाग येत नसेल, तर अशा यंत्रणेचा काय उपयोग?' असा संतप्त सवाल उपस्थित करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपनेते आमदार नितीन देशमुख यांनी शनिवारी भरपावसात अकोला-अकोट महामार्गावर गांधीग्राम येथे रास्ता रोको आंदोलन छेडत जिल्हाप्रशासन, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण तसेच जिल्हा परिषद प्रशासनावर जोरदार हल्लाबोल केला.

जवळपास नऊ वर्षे आणि सुमारे २०० कोटी रुपयांचा खर्च होऊनही अकोला-अकोट व देवरी फाटा-शेगाव सिमेंट रस्ता आजही मृत्यूचा सापळा बनल्याचा आरोप आंदोलक शिवसैनिकांनी केला. रस्त्यावरील निकृष्ट कामामुळे वारंवार अपघात होत असून निष्पाप नागरिकांचा बळी जात आहे. या पार्श्वभूमीवर अकोल्यात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणच्या (एनएचएआय) वरिष्ठ अभियंत्यांची व आमदार नितीन देशमुख यांची संयुक्त बैठक होणार आहे. रस्त्याच्या मध्यभागी आणि कडेला मोठमोठ्या भेगा पडल्या आहेत, अनेक ठिकाणी कॉंक्रीट खचले आहे. हे आंदोलन आमदार नितीन देशमुख व जिल्हाप्रमुख गोपाल दातकर यांच्या नेतृत्वाखाली झाले. यावेळी जिल्हाप्रमुख मुकेश मुरूमकार, उपजिल्हाप्रमुख विकास पागृत, दिलीप बोचे,



उपजिल्हाप्रमुख तथा नगरसेवक शंकर लंगोटे, जिल्हासंघटक भूषण भिरड, तालुका प्रमुख संजय भांबेरे, शहरप्रमुख आशिष गावंडे (अकोला पश्चिम), शहर प्रमुख राहुल कराळे(अकोला पूर्व), मनपा गटनेता विजय इंगळे, युवासेना जिल्हाप्रमुख तथा नगरसेवक अभय खुमकर, माजी जि.प. सदस्य डॉ. प्रशांत अढाऊ, युवासेना शहरप्रमुख विक्की इंगळे, सोनू औतकार, साकलेन खान पठाण, अबरार खान, सुमित तायडे, यश कंवर, अमित भोजने, आर्यन वानखडे, अनिकेत ढोकणे, प्रणव शिरसाट, कुशल शिरसाट, सौरभ वाघोडे, अक्षय वाघोडे, अवी गावंडे, गोपाल इंगळे, आनंदराव अढाऊ, संजय मांजरे, वासुदेव वक्टे, प्रदीप फुकट, विठ्ठल पाचपोर, मुन्ना साखरकर, संतोष मोडक, शरद बुंदे, विलास वसु, संतोष जगताप, नितीन कोल्हे, गोपाल वावरे, ॲड गजानन परनाटे, गणेश बोर्डे, ज्ञानेश्वर पागधुणे, मंगेश भांबेरे, विजु पाटील भांबेरे, रणजित सावंग, नितीन सावंग, निलेश खारोडे,बाळु आवारे, प्रल्हाद सरदार,शिवा देशमुख, मनीष ढोरे, अतुल काठोळे, एकनाथ दांदळे, रामचंद्र घावट, परनाटे, हरीश शर्मा, विनोद वावरे, बंटी मोडक, अमरदीप ढोले, विजु जाधव, ज्ञानेश्वर जाधव, प्रमोद इंगळे, मुरलीधर देशमुख,सागर अढाऊ, सचिन काठोळे, दिलीप परनाटे, रामाभाऊ सराटे, दत्ता बोर्डे गोवर्धन बावणे, संदीप बावणे, छोटु परनाटे, मुन्ना परनाटे, श्रीहरी पंडित,संदीप ढोरे, विनोद इंगळे, रवींद्र इंगळे यांसह शेकडो शिवसैनिक व ग्रामस्थ उपस्थित होते. आंदोलनामुळे सुमारे दोन किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

**अपूर्ण रस्त्यावर टोलची तयारी; संतापाचा उद्रेक**

रस्ता अद्याप पूर्ण झालेला नसताना अकोला-अकोट मार्गावर टोल वसुलीसाठी शेड आणि इमारती उभारण्यात आल्याने आंदोलकांनी तीव्र संताप व्यक्त केला. नागरिकांना सुरक्षित रस्ता देता आला नाही, मात्र टोल वसुलीची घाई कशासाठी, असा सवाल उपस्थित करण्यात आला.

**पावसातच भेगा बुजवण्याचा 'देखावा'**

आंदोलनाची माहिती मिळताच सकाळपासून अकोला ते गांधीग्रामदरम्यान रस्त्यावरील भेगा सिमेंटने बुजवण्याची लगबग सुरू झाली. मात्र भरपावसात टाकलेले सिमेंट काही वेळातच वाहून गेल्याने दुरुस्तीचा फोलपणा उघड झाला.


### जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ९१२/२०२६ — प्रोसेस नं.७९५५/२०२६
चौ.ता. ०३/०८/२०२६ — दिनांक : २४/०६/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती पदिमनी भिवाजी बनसोड रा. पंचशिल झेंडा जवळ, इंदिरा नगर, अकोट फैल, अकोला, ता. जि. अकोला. २. सौ. मिना संतोष कांबळे (मिना भिवाजी बनसोड) रा. चांदमारी फैल, खामगाव, ता. खामगाव, जि. बुलढाणा.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : भिवाजी पुंजाजी बनसोड
**पत्ता :-** रा. पंचशिल झेंडा जवळ, इंदिरा नगर, अकोट फैल, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत भिवाजी पुंजाजी बनसोड यांचे दि. ०४/०४/१९९० रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०३/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २४/०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर सुचना

सर्व जनतेस व वित्तीय संस्थेस ह्या जाहीर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, मोहम्मद इजराउल हक आगा महेमूद उल हक रा. बुलढाणा ता. जि. बुलढाणा, यांनी खालील वर्णनाची मालमत्ता आय.सि.आय.सि. आय. होम फायनान्स कंपनी लि. येथे गहाण ठेवुन कर्ज मिळण्याकरिता अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन :** मौजे जांभरून ग्रा.पं. सागवन ता. जि. बुलढाणा च्या हद्दीतील शेत सर्व्हे क्र. १६ चा वि. उपविभागीय अधिकारी बुलढाणा यांच्या फाईलावरील मह. प्र. क्र. एन ए पी - ३४ / जांभरून/३०/२०१६-१७ आदेश दि. ०७/०७/२०१७ प्रमाणे पारित ले-आउट नकाशातील प्लॉट क्र. ९ ज्याचे क्षेत्रफळ १६३.५७चौ.मी. असून, ज्यास चतुर्सिमा : पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : प्लॉट क्र. १०, ऊत्तरेस : रस्ता व दक्षिणेस : प्लॉट क्र. ८.

येणे प्रमाणे वरील मालमत्तेचे दस्त क्र. ४४०६ दि ०७/०९/२०१७ रोजीचे मुळ खरेदीखत जे मालमत्तेचे साखळी दस्त आहे ते हरविले/गहाळ झाले आहे, त्याकरिता पो.स्टे. बुलढाणा शहर येथे दि. ०३/०७/२०२६ रोजी तक्रार दाखल केली आहे.

त्याअर्थी जर वरील मालमत्तेवर कोणाचे काही कर्ज, गहाण, बोजा, हक्क, अधिकार अथवा ताबा असल्यास त्यांनी सदर सुचना प्रकाशीत झाल्या पासुन ७ (सात) दिवसात खालील नमुद पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानीशी आक्षेप नोंदवावा. अन्यथा कोणाचाही कसल्याही स्वरुपाचा आक्षेप नाही असे समजुन आय. सि. आय. सि. आय. होम फायनान्स कंपनी लि. हे वरील मालमत्ता गहाण ठेवुन कर्जाची रक्कम वितरीत करतील. त्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत वा ऊजर चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. ०४/०७/२०२६

**अधिवक्ता : संजीव रा. बोचरे,**
संतोष नगर, आगाशे गुरुकुल,
मलकापुर रोड, अकोला - ४४४००४
मोबा. ९८९०४४४८२४

### जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १०१९/२०२६ — प्रोसेस नं. ८३४५/२०२६
चौ.ता. १३/०८/२०२६ — दिनांक : ०३/०७/२०२६

**अर्जदार :** १. रेखा दिपककुमार जैन रा. साई मंदिर जवळ, गोकुळ कॉलनी, जवाहर नगर, अकोला, ता. जि. अकोला. २. अजय दिपक जैन रा. डी-१ ५०४, शिवसागर सीएचएस फेझ नं. २, मानिकवाघ, हॉटल ब्रम्ह लेन समोर, सिंहगड रोड, पुणे, ता. जि. पुणे. ३. आशिष दिपक जैन, रा. मा-लक्ष्मी अव्हेन्यू, प्लॉट नं. २७ प्रतिक जिम्स जवळ, सेक्टर ३६, कामोठे, नवी मुंबई, पनवेल जि. पनवेल.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : दिपककुमार मनोहरलाल जैन
**पत्ता :-** रा. गोकुळ कॉलनी, जवाहर नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या मयत दिपककुमार मनोहरलाल जैन यांचे दि. १४/०५/२०२० रोजी गोकुळ कॉलनी, जवाहर नगर,

अकोला. ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याच प्रकारची हरकत असल्यास दिनांक १३/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०३/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ९०७/२०२६ — प्रोसेस नं.७९६०/२०२६
चौ.ता. ०६/०८/२०२६ — दिनांक : २४/०६/२०२६

**अर्जदार :** १. लता कैलास सुर्यवंशी २. प्रीती निखिल भजगवरे ३. धीरज कैलास सुर्यवंशी सर्व रा. गुडधी, ता. जि. अकोला. ४. सुवर्णा गजानन सहारे रा. मु पो खैरखेड, ता. अकोट, जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : कैलास बाजीराव सुर्यवंशी
**पत्ता :-** रा. गुडधी, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत कैलास बाजीराव सुर्यवंशी यांचे दि. २८/१०/२०२५ रोजी गुडधी, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्ज़दार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०६/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २४/०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि.सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ९८४/२०२६ — प्रोसेस नं. ८१८५/२०२६
चौ.ता. १०/०८/२०२६ — दिनांक : ०१/०७/२०२६

**अर्जदार :** १. रूपाली संदिप तायडे मो. क्र. ९७६४८२५२२० २. प्राची संदिप तायडे ३. दिव्यानी संदिप तायडे ४. श्रुती संदिप तायडे सर्व रा. कौलखेड जहाँ, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : संदिप मधुकर तायडे
**पत्ता :-** रा. व्दारा रूपाली संदिप तायडे रा. कौलखेड जहाँ, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत संदिप मधुकर तायडे यांचे दि. ११/०५/२०२६ रोजी राहते घरी कौलखेड जहाँ, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १०/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०१/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ९८९/२०२६ — प्रोसेस नं.८२८६/२०२६
चौ.ता. १२/०८/२०२६ — दिनांक : ०२/०७/२०२६

**अर्जदार :** १. विजय काशिराम आगळे २. संजय काशिराम आगळे रा. मु. कुंभारी पो. बाभुळगाव जहागीर, ता. जि. अकोला. मो. क्र. ९५७९३४५५३२ ३. सविता बाळकृष्ण कराळे रा. मु. पो. तराळा, ता. मंगरूळपीर, जि. वाशिम.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. काशिराम सुखदेव आगळे २. शांताबाई काशिराम आगळे
**पत्ता :-** रा. मु. कुंभारी पो. बाभुळगाव जहागीर, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत काशिराम सुखदेव आगळे यांचे दि. १७/ १२/ २०२१ रोजी व तसेच मयत शांताबाई काशिराम आगळे यांचे दि. २०/०८/२०११ रोजी राहते घरी कुंभारी, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबंब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १२/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०२/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला



जनमाध्यम — जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २०७**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# कर्जमुक्तीचा लाभ मिळेपर्यंत थकीत रक्कमेवर व्याज नाही

## शासनाचे जिल्हा सहकारी बँक व सोसायट्यांना निर्देश

**वर्धा/जनमाध्यम**




पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना आणखी एक मोठा दिलासा देण्यात आला आहे. योजनेचा प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा होईपर्यंत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका तसेच विविध कार्यकारी सहकारी संस्थांनी पात्र थकीत पीककर्जाच्या रकमेवर कोणत्याही प्रकारची व्याज आकारणी करू नये, असे आदेश देण्यात आले आहे.

कर्जमुक्ती योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. शासन निर्णयानुसार ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली पात्र पीककर्जे या योजनेसाठी ग्राह्य धरण्यात आली आहेत. अशा पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार असून, दोन लाख रुपयांपेक्षा अधिक कर्ज असलेल्या शेतकऱ्यांना अतिरिक्त रक्कम भरल्यानंतर एकवेळ समाझोता योजनेचा लाभ मिळणार आहे. तसेच नियमित पीककर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे. या योजनेत अल्पमुदतीची पीककर्जे तसेच पुनर्गठित आणि फेरपुनर्गठित पीककर्जांचाही समावेश करण्यात आला आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी मानक कार्यपद्धती (SOP) निश्चित करण्यात आली असून,पात्र कर्जखात्यांची माहिती संगणकीय प्रणालीवर अपलोड करणे, कर्जखात्यांचे पडताळणीकरण, आधार प्रमाणीकरण आणि त्यानंतर कर्जमाफीची रक्कम संबंधित कर्जखात्यात हस्तांतरित करण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

ही संपूर्ण प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी काही कालावधी लागणार आहे. त्यामुळे कर्जमाफीची रक्कम प्रत्यक्ष खात्यात जमा होण्यापूर्वी शेतकऱ्यांच्या कर्जावर व्याज आकारल्यास त्यांच्यावर अतिरिक्त आर्थिक भार पडू शकतो. हे लक्षात घेऊन पात्र शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी प्रत्यक्ष लाभ मिळेपर्यंत थकीत पीककर्जाच्या रकमेवर व्याज आकारणी न करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या आदेशामुळे पात्र शेतकऱ्यांच्या थकबाकीत अनावश्यक वाढ होणार नसून, कर्जमुक्तीनंतर त्यांना नव्याने पीककर्ज उपलब्ध होण्याचाही मार्ग अधिक सुलभ होणार आहे. कर्जमुक्ती योजनेची पारदर्शक आणि परिणामकारक अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी राज्यातील सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि विविध कार्यकारी सहकारी संस्थांनी या आदेशाची तातडीने अंमलबजावणी करावी, असे आदेश देण्यात आले आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७९अ अंतर्गत लोकहिताच्या दृष्टीने हा आदेश जारी करण्यात आला असून, योजनेतील कर्जमुक्ती व एकवेळ समजोता योजनेस पात्र असलेल्या शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळेपर्यंत पात्र थकीत कर्जावर व्याज आकारणी न करण्याचे निर्देश सर्व संबंधित यंत्रणांना देण्यात आले आहेत.

# उपस्थितीवरून अध्यक्षांना नोटीस

## सभागृहाबाहेर स्वाक्षऱ्यांचा ठपका; तीन दिवसांत खुलासा,अन्यथा पदच्युतीचा प्रस्ताव

**पुलगाव/जनमाध्यम**

पुलगाव नगरपरिषदेच्या विशेष सभेतील कथित बनावट उपस्थिती प्रकरणाने आता गंभीर वळण घेतले आहे. सभागृहात उपस्थित नसतानाही उपस्थिती नोंदविणे आणि कामकाजाच्या नियमांचे उल्लंघन केल्याचा ठपका ठेवत नगरपरिषदेच्या अध्यक्षा कविता सुनील ब्राम्हणकर यांना तीन दिवसांत लेखी खुलासा सादर करण्याची नोटीस बजावण्यात आली आहे. समाधानकारक खुलासा न मिळाल्यास अध्यक्षपदावरून दूर करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविण्याची कार्यवाही होणार असल्याने पुलगावच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

देवळी-पुलगाव विधानसभा मतदारसंघाचे आ.राजेश बकाने यांनी नगरपरिषदेत सभेतील उपस्थिती नोंद, शासकीय अभिलेखातील कथित फेरफार आणि आर्थिक व्यवहारांबाबत तक्रार केली होती. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आदेशानुसार नगरपरिषद आर्वीचे मुख्याधिकारी तथा चौकशी समितीचे अध्यक्ष यांनी या प्रकरणाची चौकशी करून अहवाल सादर केला.

चौकशी अहवालात ६ एप्रिल २०२६ रोजीची विशेष सभा नियोजित वेळेत सुरू झाली नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. सुरुवातीला केवळ चार सदस्यांनी सभागृहात उपस्थित राहून स्वाक्षऱ्या केल्या. त्यानंतर काही वेळाने अध्यक्षा आणि इतर सदस्यांनी सभागृहाबाहेर उपस्थिती नोंदवहीवर स्वाक्षऱ्या केल्याचे चौकशीत आढळून आले. ही बाब महाराष्ट्र नगरपालिका (कामकाज चालविणे) नियम, १९६६ मधील नियम ४ (१) च्या तरतुदींशी विसंगत असल्याचा निष्कर्ष समितीने नोंदविला आहे.

या अहवालाच्या आधारे जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित प्रकरणात नियमोचित कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम ४२ आणि ४४ अंतर्गत अध्यक्षांना पदावरून दूर करण्याचा प्रस्ताव का पाठवू नये, याबाबत तीन दिवसांत लेखी खुलासा मागविण्यात आला आहे.

खुलासा वेळेत न सादर केल्यास किंवा तो असमाधानकारक ठरल्यास एकतर्फी कारवाईचा प्रस्ताव पुढे सरकविण्यात येणार असल्याचे नोटिशीत स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे पुलगाव नगरपरिषदेतील हा वाद आता प्रशासकीय आणि राजकीयदृष्ट्या अधिक चिघळण्याची चिन्हे दिसत आहेत.

**संक्षिप्त**

### अवैध वाळू वाहतुकीवर महसूल विभागाची कारवाई

**वर्धा**-अवैध वाळू उपसा व वाहतुकीविरोधात महसूल विभागाने धडक कारवाई करत ट्रकसह सुमारे १२ लाख ४६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई इंझापूर शिवारात करण्यात आली. तहसीलदार संदीप पुंडेकर गस्त घालत असताना सीजी-०८ एएम-३५९८ क्रमांकाचा ट्रक संशयास्पद आढळला. तपासणीदरम्यान ट्रकमध्ये दहा ब्रास वाळू आढळून आली. चालकाकडे गौणखनिज वाहतुकीची कोणतीही वैध परवानगी अथवा कागदपत्रे नसल्याचे स्पष्ट झाल्यानंतर ट्रक व वाळूसाठा जप्त करण्यात आला. मंडळ अधिकाऱ्यांच्या तक्रारीवरून सावंगी (मेघे) पोलिसांनी एजाज शहा बाबर शहा व अली एजाज, दोघेही अमरावती येथील रहिवासी, यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

### रेल्वेतून पडून प्रवाशाचा मृत्यू

**वर्धा**-रेल्वेतून पडल्याने एका प्रवाशाचा दुर्दैवी मृत्यू झाला. पिपरा शिवारात ही घटना उघडकीस आली. मृताची ओळख बापून मदन शाहू (३६, रा. बीरबुली) अशी झाली आहे. प्राथमिक माहितीनुसार, प्रवासादरम्यान तोल जाऊन ते रेल्वेतून खाली पडले. या अपघातात त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच सिंदी (रेल्वे) पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला असून आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# स्वप्नांना मिळाले बळ सन्मानातून उजळली महिलांच्या नव्या वाटचालीची दिशा

**वर्धा/जनमाध्यम**

आत्मविश्वास, स्वावलंबन आणि जिद्दीच्या बळावर महिलांनी आयुष्याला नवी दिशा द्यावी, हा संदेश देणारा सावित्रीबाई सोशल असोसिएशनचा महिला सन्मान सोहळा व माहिती मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. शासनाच्या विविध योजनांची माहिती, महिला सुरक्षेचे मार्गदर्शन आणि कर्तृत्ववान महिलांचा गौरव यामुळे हा कार्यक्रम प्रेरणेचा उत्सव ठरला.

कार्यक्रमाच्या आयोजक अरुणा धोटे यांनी महिलांनी केवळ स्वतः सक्षम होण्यापुरते मर्यादित न राहता इतर महिलांनाही स्वावलंबनाच्या प्रवासात सोबत घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमात पोलीस निरीक्षक पोर्णिमा राजखुंडे, प्रकल्प अधिकारी गीतांजली निकम, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी तृप्ती चव्हाण आणि उपविभागीय कृषी अधिकारी वैशाली शिंदे यांनी महिला सुरक्षा, कायदेशीर हक्क, स्वयंरोजगार, कृषीपूरक व्यवसाय आणि शासनाच्या विविध योजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.



कार्यक्रमातील सर्वाधिक भावस्पर्शी क्षण ठरला तो संचिति बोभाटे हिच्या सत्काराचा. अत्यंत प्रतिकूल आर्थिक परिस्थितीत आईच्या खंबीर पाठबळावर आणि स्वतःच्या अथक परिश्रमाच्या जोरावर तिने पॉलिटेक्निक परीक्षेत ९४.३५ टक्के गुण मिळवून यशाचे शिखर गाठले. प्रकल्प अधिकारी गीतांजली निकम यांच्या हस्ते तिचा सन्मान करण्यात आला. तिच्या संघर्षमय यशकथेने उपस्थित महिलांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. परिस्थिती नव्हे, तर जिद्द माणसाला मोठे बनवते, हा संदेश तिच्या सत्कारातून अधोरेखित झाला.

यावेळी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचाही गौरव करण्यात आला. उपस्थित महिलांनी शासनाच्या योजनांविषयी, रोजगाराच्या संधी, आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक नेतृत्वाबाबत मान्यवरांशी संवाद साधून मार्गदर्शनाचा लाभ घेतला. कार्यक्रमाला जिल्ह्यातील विविध भागांतून महिलांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

समारोपात अरुणा धोटे यांनी उपस्थितांचे आभार मानत, महिलांच्या सन्मानासाठी, स्वावलंबनासाठी आणि सामाजिक सक्षमीकरणासाठी सावित्रीबाई सोशल असोसिएशन अशाच लोकाभिमुख उपक्रमांचे सातत्याने आयोजन करणार असल्याचा विश्वास व्यक्त केला.सकाळच्या शैलीतील ही बातमी सामाजिक आणि भावनिक अंग अधिक ठळक करत, प्रेरणादायी स्वरूपात मांडण्यात आली आहे.

# 'एक पत्र भगवान के नाम' स्पर्धेत अलका जाजू प्रथम

**वर्धा/जनमाध्यम**

मनातील श्रद्धा, कृतज्ञता आणि भावनांना शब्दरूप देत वर्ध्याच्या अलका राजकुमार जाजू यांनी राष्ट्रीय स्तरावरील 'एक पत्र भगवान के नाम' या पत्रलेखन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून जिल्ह्याचा गौरव वाढविला आहे.

नागपूरच्या ज्योती माहेश्वरी महिला मंडळाने हरवलेल्या पत्रलेखन संस्कृतीला पुन्हा उजाळा देण्यासाठी ही स्पर्धा आयोजित केली होती. ५० वर्षांवरील महिला-पुरुषांसाठी खुल्या असलेल्या या स्पर्धेत स्वहस्ताक्षरात पत्र लिहिणे अनिवार्य होते. स्पर्धकांनी देवाशी संवाद साधत मनातील वेदना, तक्रारी, कृतज्ञता आणि स्वप्ने शब्दबद्ध केली. अलका जाजू यांनी आपल्या प्रभावी लेखनशैलीतून भावविश्व साकारत परीक्षकांची मने जिंकली. यापूर्वीही निबंध, परिसंवाद, नाट्यलेखन, आत्मकथा आदी साहित्यप्रकारांत त्यांनी जिल्हा, विदर्भ, राज्य



आणि राष्ट्रीय स्तरावर अनेक पुरस्कार प्राप्त केले आहेत. या यशाबद्दल पर्यावरण अभ्यासक किरण मुंदडा, विदर्भ प्रादेशिक महिला संघटनेच्या माजी अध्यक्षा ज्योती बाहेती, मंडळाच्या अध्यक्षा ज्योती भूतडा, सचिव अर्पणा टावरी, माजी अध्यक्षा अर्चना बिंझानी, प्रा.डॉ. ललित राठी यांच्यासह अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले. या यशामुळे वर्ध्याच्या साहित्यविश्वात आनंदाचे वातावरण असून, पत्रलेखनाच्या संस्कृतीला नवी प्रेरणा मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.

# व्हिजन ३०० कोटी' वृक्षलागवड मोहिमेंतर्गत जिल्हाधिका-यांच्या हस्ते वृक्षरोपण



**वर्धा/जनमाध्यम**

महाराष्ट्र शासनाच्या व्हिजन ३०० कोटी' वृक्षलागवड मोहिमेंतर्गत आलोडी येथील राखीव वन सर्वे क्रमांक ७१ मध्ये जिल्हाधिकारी वान्मथी सी यांच्या हस्ते वृक्षारोपन करण्यात आले.

वर्धा प्रादेशिक वनविभागाच्यावतीने आयोजित वृक्षारोपन कार्यक्रमास पोलिस अधिक्षक सौरभकुमार अग्रवाल, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमन, उपवनसंरक्षक हरवीर सिंह, विभागीय वन अधिकारी सुहास बढेकर, सहाय्यक वनसंरक्षक तेंदू व वन्यजीव हरिलाल सरोदे, वनपरिक्षेत्र अधिकारी वैशाली भलावी, निसर्ग सेवा समितीचे अध्यक्ष मुरलीधर बेलखोडे तसेच साटोडा गावचे सरपंच गौरव गावंडे व इतर सदस्य या कार्यक्रमात सहभागी झाले होते. नागरिकांनी व्हिजन ३०० कोटी वृक्षलागवड मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवून आपल्या परिसरातील खुल्या जागेवर मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपन करावे, असे आवाहन यावेळी जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी केले. या वृक्षारोपण मोहिमेमध्ये 'न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, वर्धा' येथील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून वृक्षारोपणात हातभार लावला. तसेच, साटोडा आणि आलोडी येथील स्थानिक ग्रामस्थांनीही मोठ्या उत्साहाने वृक्षलागवड करून आपला सहभाग नोंदवला. या प्रसंगी उपवनसंरक्षक कार्यालय वर्धा, सामाजिक वनीकरण विभाग आणि वर्धा व हिंगणी वनपरिक्षेत्रातील सर्व वनपाल, वनरक्षक आणि वनमजूर बहुसंख्येने उपस्थित होते.

# पीएम यशस्वी शिष्यवृत्ती योजनेच्या लाभासाठी संकेत स्थळावर नोंदणी करावी

**वर्धा/जनमाध्यम**

इतर मागास वर्ग, आर्थिकदृष्ट्या मागास वर्ग तसेच विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी भारत सरकारच्यावतीने पीएम यशस्वी पोष्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती यांना राबविण्यात येत आहे. या योजनेचा विद्यार्थ्यांना लाभ मिळवून देण्यासाठी महाविद्यालय, उच्च माध्यमिक विद्यालयांनी आपल्या महाविद्यालयाची राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टलवर नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. योजनेचा विद्यार्थ्यांना लाभ मिळवून देण्यासाठी महाविद्यालयाची पोर्टलवर नोंदणी असणे आवश्यक आहे. ज्या महाविद्यालयांची पोर्टलवर अद्याप पर्यंत नोंदणी झालेली नाही त्यांनी तात्काळ नोंदणी करुन घ्यावी.तसेच पुर्वी नोंदणीकृत संस्थांनी आपले संस्थात्मक प्रोफाईल अद्यावत करुन विद्यार्थ्यांच्या अर्ज पडताळणीची कार्यवाही वेळेत पुर्ण करावी.

महाविद्यालयांनी पोर्टलवर नोंदणी करुन विद्यार्थ्यांना योजनेची माहिती उपलब्ध करुन द्यावी व अर्ज भरण्यास मार्गदर्शन करावे तसेच पात्र विद्यार्थ्यांचा एकही अर्ज शिष्यवृत्तीपासुन वंचित राहणार नाही यांची दक्षता घ्यावी.महाविद्यालयानी एनएसपी पोर्टल https://scholarships.gov.in यावर नोंदणी करावी, संस्थेचा नोडल अधिकारी नियुक्त करावा. संस्थेची प्रोफाईल अद्यावत करावी, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनेची माहिती द्यावी. विद्यार्थ्यांचा अर्ज वेळेत पडताळणी करावा.पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज सादर होण्यासाठी विशेष मोहिम राबवावी, असे इतर मागास बहुजन कल्याणच्या सहाय्यक संचालकांनी कळविले आहे.

# हरिनामाच्या गजरात न्हाऊन निघाले काजळसरा

## सुरसंगम महिला भजन मंडळाने जपली भक्तीची अखंड परंपरा

**देवळी/जनमाध्यम**

देवळी तालुक्यातील काजळसरा येथील सुरसंगम महिला भजन मंडळ गेल्या अनेक वर्षांपासून हरिनामाचा अखंड गजर घुमवत वारकरी संप्रदायाची समृद्ध परंपरा जपण्याचे पवित्र कार्य करीत आहे. भक्ती, संस्कार आणि समाजप्रबोधनाचा सुंदर मिलाफ घडविणाऱ्या या मंडळाने आपल्या सुरेल भजन-कीर्तनातून असंख्य भाविकांच्या मनात श्रद्धेचा दिवा प्रज्वलित केला आहे.

दरवर्षी श्री गजानन महाराज मंदिरात प्रकटदिन, ऋषीपंचमी आणि रामनवमी उत्सवानिमित्त मंडळ भावपूर्ण भजन सेवा सादर करते. आषाढी वारीत पंढरपूर येथे विठुरायाच्या दर्शनासाठी सहभागी होत हरिनामाच्या गजरात भक्तीरूपी सेवा अर्पण केली जाते. याशिवाय गौळ येथील लोटांगण महाराज मंदिर, अधिकमासानिमित्त श्री कोटेश्वर मंदिर, वाटखेडा, पुलगाव येथील स्वामी समर्थ मंदिर, देवळीतील राम मंदिर, मिरनाथ व खटेश्वर मंदिरातही मंडळाने भजन-कीर्तनातून भक्तिमय वातावरण निर्माण केले आहे.

मंडळाच्या प्रमुख गायिका वनिता सुदाम राऊत आणि माया वसंत राऊत आपल्या मधुर आवाजाने भाविकांना भक्तिरसात तल्लीन करतात. सुनंदा मारोतराव बिजवार या वीणेची साथ देत असून बापूराव शिंदे मृदंगवादन, श्याम वानखेडे पेटीवादन करतात. तसेच मीना शियाणे, शालू शियाणे, पंपिता ठाकरे, पार्वता नेहारे, सुदाम राऊत, मारोतराव मडावी आणि नरहरी झाडे हे टाळकरी म्हणून निस्वार्थ भावनेने सेवा बजावत आहेत.

हरिनामाचा प्रसार, वारकरी संस्कारांची जपणूक आणि समाजात अध्यात्माची गोडी निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य



या मंडळामार्फत सातत्याने सुरू आहे. कोणत्याही प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता भक्तीची अखंड ज्योत तेवत ठेवणाऱ्या या मंडळाच्या कार्याचे परिसरात सर्वत्र कौतुक होत असून, त्यांच्या सुरेल भजनातून अनेकांच्या आयुष्यात श्रद्धा, समाधान आणि सकारात्मकतेचा नवा प्रकाश फुलत आहे.

### भोवळ येऊन कोसळलेल्या व्यक्तीचा मृत्यू

**वर्धा** - भोवळ येऊन अचानक कोसळलेल्या व्यक्तीचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याची घटना आर्वी तालुक्यात घडली. सुभाष रामचंद्र चौधरी (५५, रा. खडकी-शिरपूर) यांना अचानक भोवळ आल्याने ते खाली पडले. कुटुंबीयांनी त्यांना तातडीने रुग्णालयात नेले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले. घटनेनंतर आर्वी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून शवविच्छेदनासाठी मृतदेह पाठविण्यात आला आहे. मृत्यूचे नेमके कारण वैद्यकीय अहवालानंतर स्पष्ट होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# पोकरा योजनेचा फज्जा! पेरणी संपली

## मोफत बियाणे मात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेच नाही

**आष्टी शहीद/जनमाध्यम**

शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, शेतीला हवामान बदलाशी जुळवून घेण्यासाठी सक्षम करणे आणि उत्पादन खर्च कमी करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने सुरू केलेल्या पोकरा (POCRA) योजनेच्या अंमलबजावणीचा बोजवारा उडाल्याचे चित्र आष्टी तालुक्यात दिसून येत आहे. योजनेत समाविष्ट गावांतील पात्र शेतकऱ्यांना मोफत बियाणे देण्याची घोषणा झाली; मात्र पेरणीचा हंगाम जवळपास संपत आला तरी एकाही शेतकऱ्याच्या हातात बियाणे पडले नसल्याने शासनाच्या कारभाराबाबत तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

यंदा वेळेत झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांनी खरीप हंगामाच्या तयारीला सुरुवात केली. पोकरा योजनेअंतर्गत मोफत बियाण्यांचे वाटप होणार असल्याने अनेक शेतकऱ्यांनी बाजारातून बियाणे खरेदी करण्यास विलंब केला. मात्र दिवसेंदिवस वेळ निघून जात असतानाही कृषी विभागाकडून कोणतीही स्पष्ट माहिती मिळाली नाही. अखेर पेरणीची वेळ हातातून जाऊ नये म्हणून अनेकांना खासगी विक्रेत्यांकडून जादा दराने बियाणे खरेदी करावे लागले. काही शेतकऱ्यांनी सावकारांकडून किंवा बँकांकडून कर्ज घेऊन पेरणी उरकली.

शेतीचे वाढते खर्च, खतांचे दर, मजुरी आणि हवामानातील अनिश्चितता यामुळे आधीच अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना शासनाच्या मदतीची मोठी अपेक्षा होती. मात्र योजनेचा लाभच वेळेत न मिळाल्याने त्यांच्या आर्थिक अडचणी आणखी वाढल्या आहेत. पेरणी झाल्यानंतर बियाणे मिळून काय उपयोग असा प्रश्न शेतकरी उपस्थित करीत आहेत.

विशेष म्हणजे ज्या गावांचा पोकरा योजनेत समावेश करण्यात आला आहे, त्या गावांतील शेतकऱ्यांनाच लाभ मिळत नसल्याने संपूर्ण योजनेच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनांचा गाजावाजा मोठा केला जातो; मात्र प्रत्यक्षात लाभार्थ्यांपर्यंत सुविधा वेळेत पोहोचत नसल्याचे हे आणखी एक उदाहरण असल्याची चर्चा शेतकरी वर्गात सुरू आहे.

शेतकऱ्यांनी बियाणे वितरणातील दिरंगाईची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली असून, संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. तसेच लाभापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत किंवा बियाण्यांच्या खर्चाची भरपाई तातडीने द्यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, प्रशासनाने त्वरित दखल घेऊन ठोस निर्णय घेतला



नाही, तर शेतकरी संघटनांच्या नेतृत्वाखाली तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. खरीप हंगामाच्या तोंडावरच शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनेची अशी झालेली अवस्था पाहता, योजना कागदावर आणि खर्च शेतकऱ्यांच्या खिशातून' अशी संतप्त प्रतिक्रिया ग्रामीण भागातून उमटत आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २१८**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# स्वतंत्र दिव्यांग मंत्रालयाचे जनक आमदार बच्चुभाऊ कडू....
# सामान्य जनतेचा बुलंद आवाज, शेतकरी नेते, गोरगरिबांचे कैवारी

महायुती शासनाने शेतकऱ्यांची कर्जमाफीचा निर्णयाचे सर्व स्तरावरून कौतुक होत आहे .मात्र शासनाला हा निर्णय भाग घेण्यासाठी विभाग आंदोलन ,उपोषणाच्या माध्यमातून महत्वूर्ण भूमिका बजावणारे नेतृत्व म्हणजे शिवसेना शिंदे गटाचे विद्यमान विधानपरिषद आमदार बच्चूभाऊ कडू यांना ओळखले जाते .सोबतच देशातलं पहिलं दिव्यांग कल्याण मंत्रालयाची स्थापना करण्याची किमया साकार करण्यासाठीं गेल्या २५ वर्षापासून लढा देणारे,राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निकटवर्तीय ,शेतकरी नेते ,गोरगरिबांचे कैवारी, अनाथाचे नाथ , दिव्यांगाचे हृदयसम्राट,रुग्णसेवक, शेतमजूर व तरुणाचा बुलंद आवाज , अचलपूर मतदार संघाचा सर्वागीण विकास करणारे विकासपुरुष , आंदोलनाचे जनक राज्याचे माजी राज्यमंत्री व शिवसेना शिंदे गटाचे विधानपरिषद आमदार बच्चूभाऊ कडू यांचा आज ५ जुलैला वाढदिवस . महाराष्ट्र राज्याचा राजकारणात स्वतःचा नेतृत्वाने शून्यातून विश्व निर्माण करून राज्यातील सामान्य माणसाच्या मनावर राज्य करणारे लोकनेते म्हणून शिवसेना शिंदे गटाचे विधानपरिषद आमदार बच्चुभाऊ कडू सर्विकडे परिचित आहे . अमरावती जिल्ह्यातील अचलपूर मतदार संघातून सलग चौथ्यांदा अपक्ष उमेदवार म्हणून विधानसभेच्या निवडणुकीत आमदार म्हणून निवडून येवून नवीन रेकॉर्ड विद्यमान विधानपरिषद आमदार आमदार बच्चुभाऊ कडू यांनी बनविला होता . आता शिवसेना शिंदे गटाचे विधानपरिषद आमदार म्हणून त्यांनी मुंबई येथे सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात अचलपूर मतदार संघासह राज्यातील विविध मुद्दे मांडून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

अचलपूर मतदार संघाचे आमदार म्हणून त्यांनी २० वर्ष नेतृत्व केले .यात अचलपूर मतदार संघातील तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी या उद्देशाने नोकरी आपल्या दारी या उपक्रमांतर्गत भव्य - रोजगार मेळाव्याचा माध्यमातून नामवंत कंपनी मध्ये १५०० तरुणांची निवड होवून रोजगारा ची संधी अचलपूर मतदार संघाचे तत्कालीन आमदार म्हणून बच्चुभाऊ कडू यांनी उपलब्ध करून दिली होती. तसेच थोर समाज सुधारक यांची जयंती व स्व. इंदिराबाई बाबाराव कडू यांच्या प्रथम पुण्य स्मरण निमित्त अचलपूर मतदार संघात संपन्न झालेल्या महाआरोग्य शिबिरामध्ये एकूण ७ हजार नागरिकांनी लाभ घेतला होता. तसेच असंख्य रुग्णांवर महागडी शस्त्रक्रिया निःशुल्क करून असंख्य रुग्णांना नवीन जीवनदान देण्याचे काम गेल्या अनेक वर्षांपासून विद्यमान विधानपरिषद आमदार म्हणून बच्चुभाऊ कडू करीत असल्याने राज्यात नव्हे तर संपूर्ण देशात रुग्णसेवक म्हणून विधानपरिषद आमदार बच्चुभाऊ कडू परिचित आहे. विशेष म्हणजे शेतकऱ्यांचा कर्जमाफीच्या मागणीसाठी राज्यात विविध ठिकाणी आयोजित आंदोलन ,उपोषण ,पायदळ रॅलीने शासनाचे लक्ष वेधले होते. त्यानंतर महायुती शासनाने कर्जमाफीच्या निर्णयाची घोषणा करीत यंदा जून महिन्यापासून या निर्णयाची अंमलबजावणी करणे सुरू झाले आहे. अमरावती जिल्ह्यात राज्य शासनाकडून सर्वात जास्त निधी अचलपूर तालुक्याचा सर्वांगीण विकासासाठी खेचून आणणारे एकमेव तत्कालीन विधानसभा आमदार म्हणून बच्चूभाऊ कडू यांना ओळखले जात आहे .

सामान्य माणसाच्या हक्कासाठी,हितासाठी, न्यायासाठी सदैव २४ तास उपलब्ध राहून उपस्थितीत असलेल्या त्या ठिकाणी जनता दरबाराच्या माध्यमातून असंख्य नागरिकाच्या समस्या जागेवर सोडवून देण्यासाठी संपूर्ण राज्यात शिवसेना शिंदे गटाचे विधानपरिषद आमदार म्हणून बच्चूभाऊ कडू यांना ओळखले जाते . शेतकरी, शेतमजूर, विधवा, निराधार, बेरोजगार, अपंग बांधवाच्या विविध मागण्यासाठी राज्य व देशपातळीवर विधानपरिषद आमदार बच्चुभाऊ कडू यांनी केलेले विविध आंदोलन,उपोषण आजही सामान्य माणसाच्या स्मरणात आहे .विधानपरिषद आमदार बच्चुभाऊ कडू यांनी गेल्या २५ वर्षापासून दिव्यांगाच्या हक्कासाठी दिलेल्या लढ्याची दखल घेऊन राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देशातलं पहिलं दिव्यांग कल्याण मंत्रालयाची घोषणा केली होती . या विभागाचे अध्यक्ष म्हणून बच्चुभाऊ कडू यांनी विविध स्तुत्य उपक्रम राबविले होते .तसेच अमरावती जिल्हा मध्यवर्ती बँकेचे विद्यमान अध्यक्ष म्हणून बच्चुभाऊ कडू यांनी खातेदारासाठी नावीन्यपूर्ण योजना राबवित आहे .आणि विधानसभा आमदार म्हणून कार्य करीत असताना गेल्या २० वर्षाच्या कार्यकाळात अचलपूर मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी कोट्यवधी रुपयांचा निधीतून मतदार संघाचा विकास झपाट्याने झाला आहे . यामध्ये परतवाडा शहरात स्वतंत्र नेत्र रुग्णालय निर्मिती ,अचलपूर मध्ये भव्य दिव्य न्यायालयाचे ईमारत निर्मिती ,आदिवासीं मुला - मुलीसाठी ४ भव्य - दिव्य वसतिगृहाची निर्मिती , अचलपूर - परतवाडा जुळ्या शहरातील मुख्य रस्त्याचे कायापालट, दोनशे कोटीच्या निधीतून मतदार संघात विविध ठिकाणी विविध झालेली विकासकामे, सापण मध्यम प्रकल्प , जुळवा शहर व चांदूर बाजार येथे न.प. वैशिष्ट्य पुर्ण निधि अंतर्गत विविध विकासकामे, मतदार संघातील तीर्थ स्थळाचा विकास , परतवाडा शहरात २०० बेडचे नवीन रुग्णालय, श्री डी प्ल्यानेटीरीयम ची निर्मिती, चिखलदारा येथे स्काय वॉक चे काम प्रगतीपथावर आदी मुलभूत सुविधा मतदार संघात उपलब्ध झाल्याने नागरिकांमध्ये त्यांच्या कार्याचे आजही कौतुक केले जाते . गेल्या २०२४ वर्षात संपन्न झालेल्या विधानसभा निवडणुकीत आ. बच्चुभाऊ कडू यांचा कमी मतांनी पराभव झाला .आता प्रहार जनशक्ती पक्षाचे काय होणार ? याकडे सर्वांचे लक्ष लागले होते .मात्र सामान्य माणसाच्या हक्कासाठी , हितासाठी लढण्याची असलेली भूमिका अजून मोठ्या प्रमाणात राबवून शेतकऱ्याचा कर्जमाफीच्या मुद्द्यासाठी विद्यमान विधानपरिषद आमदार बच्चूभाऊ कडू यांनी पिंजून काढला .गुरुकुंज मोझरी,रायगड ,नागपूर आदी भागात विधानपरिषद आमदार बच्चूभाऊ कडू यांनी आंदोलन,उपोषण ,पायदळ यात्रा केली .कर्जमाफीची मागणी जोर धरत होती .यामध्ये शेतकरी नेते राजू शेट्टी,माजी आमदार महादेव जानकर,माजी आमदार वामनराव चटप ,रविकांत तुपकर यांच्या सह विविध नेते मंडळी ,शेतकऱ्यांनी सहभाग घेतला.आणि राज्य शासनाने कर्जमाफी करण्याची घोषणा केली.यानंतर सध्या स्थितीत सुरू असलेल्या जून महिन्यापासून कर्जमाफी करण्याची प्रत्यक्षात प्रक्रिया सुरू झालेली आहे .यानंतर राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निकटवर्तीय म्हणून बच्चूभाऊ कडू परिचित आहे. या वर्षी संपन्न झालेल्या विधानपरिषद निवडणुकीत राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बच्चूभाऊ कडू यांना उमेदवारी देत सर्व विरोधकांना मोठा धक्का दिला.सामाजिक क्षेत्रात प्रहार पक्ष कार्य करीत राहून शिवसेना शिंदे गटाचे विधानपरिषद आमदार बच्चूभाऊ कडू यांना विदर्भाची मोठी जबाबदारी देण्यात आली आहे. यानंतर संपूर्ण विदर्भात शिवसेना शिंदे गटाचे विधानपरिषद आमदार बच्चूभाऊ कडू यांच्या उपस्थितीत कार्यकर्ते मेळावे ,नेत्याची सभा ,बैठका संपन्न होत आहे .मेळघाट आणि अचलपूर मतदार संघात शिवसेना शिंदे गटाचे विधानपरिषद आमदार बच्चूभाऊ कडू यांच्या नेतृत्वाखाली शाखेचे उद्घाटन ही संपन्न झाले .यंदा सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात विधानपरिषद सभागृहात शेतकरी ,शेतमजूर , बंद फिणले मील ,आरोग्य व्यवस्था ,प्रलंबीत घरकुल प्रकरणे,नुकसान भरपाई पासून वंचित शेतकरी , प्रलंबीत अचलपूर जिल्हा निर्मिती आदी मुद्द्यांना मांडून सामान्यांना न्याय मिळवून देण्याचे काम आजही आमदार बच्चूभाऊ करीत आहे. शेतकऱ्याचा कर्ज माफिसाठी आसूड यात्रा ,अन्नत्याग आंदोलन आजही सामान्य माणसाच्या स्मरणात आहे .विधानपरिषद आमदार आणि राज्याचे माजी राज्यमंत्री बच्चुभाऊ कडू यांनी विविध मोठी पदे भूषविली असताना सुद्धा गावा मध्ये गेल्यानंतर तरूनासोबत कब्बडी खेळणारा, सामान्यांना आजही आपलस वाटणारा , अपंग बांधवाचा आधार , स्वच्छता मोहीम राबविणारे लोकनेते म्हणून आ. बच्चुभाऊ कडू परिचित आहे . दर वर्षी जानेवारी महिन्यात प्रसिध्द बहिरम येथे विदर्भ केसरी शंकरपट बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात केले जाते .विधानसभा आमदार असताना बच्चुभाऊ कडू यांनी मतदार संघात राबविलेल्या राहुटी आपल्या दारी या उपक्रमाची दखल राज्य शासनाने घेतली आहे हे विशेष .



अमरावती जिल्ह्यातील नव्हें तर राज्यातील निराधार, विधवा, वंचित नागरिकांना घरकुल योजनेचा लाभ मिळावा या साठी कच्चा मातीचे पालघर ते विधानभवन या आंदोलनाची दखल घेवून राज्याचे तत्कालीम मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आंदोलन स्थळी भेट दिली होती . विशेष म्हणजे विधानपरिषद आ. बच्चुभाऊ कडू यांनी १०० चा वर रक्तदान केले आहे .रुग्णसेवा हिच ईश्वर सेवेच्या ब्रीदवाक्यानुसार मतदार संघात अनेक वेळी महा आरोग्य शिबिराचे आयोजन केले आहे .यामुळे सर्व सामान्य नागरिकांना यांचा मोठा लाभ झाला आहे . राज्याचे राज्यमंत्री म्हणून जबाबदारी असताना कोरोना काळात अचलपूर मतदार संघ व अकोला जिल्ह्याला कोरोनाच्या संक्रमणापासून रोखण्यासाठी विद्यमान विधानपरिषद आ. बच्चुभाऊ कडू यांची मुख्य भूमिका साकारली होती.त्यावेळी आपल्या जीवाची पर्वा न करता विविध रुग्णालय , कार्यालयांत वेळोवेळी संबंधीत अधिकाऱ्यांशी चर्चा करून अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले होते .आ. बच्चुभाऊ कडू यांच्या प्रयत्नामुळे परतवाडा शहरात भव्य - दिव्य परतवाडा बस स्थानक इमारतीची निर्मिती , अचलपूर व सरमसपुरा पोलिस स्टेशनची निर्मिती करण्यात आली होती .अचलपूर मतदार संघामध्ये जिल्हा निर्मितीच्या दृष्टीने अनेक मूलभूत सुविधा आ. बच्चूभाऊ कडू यांच्या मुळे उपलब्ध झाली आहे .तसेच जुळवा शहरातील अनेक मुख्य चौकाचे सौंदर्यीकरण सुद्धा करण्यात आले आहे .या सर्व बाबींमुळे सामान्य जनतेशी असलेला संपर्क आजही कायम ठेवल्याने शिवसेना शिंदे गटाचे विधानपरिषद आ. बच्चूभाऊ कडू यांना लोकनायक म्हणून नवीन ओळख मिळाली आहे . आजही कुरळपूर्ना येथे विधानपरिषद आ. बच्चूभाऊ कडू यांचा जनता दरबार होत असतो . यामध्ये अचलपूर तालुका नव्हे तर राज्यातील अनेक जिल्ह्यातील नागरिक आपआपल्या समस्या मांडतात. या समस्या बाबत संपूर्ण माहिती घेवून विधानपरिषद आ. बच्चूभाऊ कडू संबंधित अधिकारी शी चर्चा करून त्या समस्या मार्गी लावून सामान्य नागरिकाला न्याय मिळवून देतात .यामुळे च संपूर्ण राज्यात त्यांची लोकप्रियता वाढली आहे. नुकतेच संपन्न झालेल्या विधानपरिषद निवडणुकीत भाजपा पक्षाचे उमेदवार प्रवीण पोटे पाटील यांच्या विजयात ही महायुतीचे मित्र पक्ष म्हणून शिवसेना शिंदे गटाचे विधानपरिषद आमदार बच्चूभाऊ कडू यांनी मोठी भूमिका बजावली आहे. चांदूरबाजार नगर परिषद,कृषी उत्पन्न बाजार समिती विधानपरिषद आमदार बच्चूभाऊ कडू यांच्या ताब्यात आहे .यामुळे विदर्भाची जबाबदारी पक्ष संघटनेची राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना शिंदे गटाचे विधानपरिषद आमदार बच्चुभाऊ कडू यांच्या सोपविल्याने ती यशस्वीरित्या पूर्ण होणार यात काही शंका नाही .आज सामान्य जनतेचा बुलंद आवाज , विकासपुरुष, अभ्यासू व आक्रमक नेतृत्व शिवसेना शिंदे गटाचे विधानपरिषद आमदार बच्चुभाऊ कडू यांना वाढदिवसानिमित्त व पुढील यशस्वी वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा.

**-हरिष पुरोहित,** अचलपूर
**मो.९४२२८५८०१४**

---


## फ्लॅट विकणे आहे

टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल आणि एक रूम असा फ्लॅट आहे.

**संपर्क:**
**९४२२८५७१६९, ९४२२९१८५६९**


## CHANGE IN NAME

**OLD NAME**
**ABDU MUJEEB**
**NEW NAME**
**ABDU MUJIB ABDUL HAMID**
**-ADDRESS-**
**REHAN PARK, MORSHI - 444905**

## जाहीर नोटीस

सेवा सहकारी संस्था मंगरुळ र.नं. ७५६ तालुका मोर्शी, जिल्हा अमरावती या संस्थेच्या सर्व सभासदांना जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, सेवा सहकारी संस्था म.मंगरुळ र.नं. ७५६ या संस्थेचा अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बैंक म. अमरावती या बँकेच्या प्रतिनिधी निवडणुकी संबंधाने प्रतिनिधी निवड निवडणुकीचा कार्यक्रम दिनांक २/७/२०२६ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता सदर. संस्थेचा प्रतिनिधी निवडणुक कार्यक्रम ग्रामपंचायत कार्यालय मंगरुळ व मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मोर्शी यांचे कार्यालयात प्रसिध्द करण्यात आलेला असुन सदर संस्थेच्या सभासदांनी नोंद घ्यावी.

विषय-: अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म. अमरावती या बँकेच्या प्रतिनिधी निवडणुकी संबंधाने प्रतिनिधीची निवड करणे. विषेश सर्वसाधारण सभा दिनांक ११/७/२०२६ वेळ सकाळी १०.०० वाजता पासून.

स्थळ - ग्रा. पं. कार्यालय मंगरुळ ता. मोर्शी.

**प्रमोद वर्धेकर**
**प्राधिकृत अधिकारी**
सेवा सहकारी संस्था मंगरुळ र.नं.७५६, ता. मोर्शी.


जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक- प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २९७**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com


## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

**आर.एम.जे.सी.क्र.३२३/२०२६** **ने.ता.२१.०८.२०२६**

**अर्जदार :**
१. **मंगेश अशोक चर्जन,** वय ४१ वर्षे, व्यवसाय-मजूरी
२. **भूषण अशोकराव चर्जन,** वय ३९ वर्षे, व्यवसाय-मजूरी
दोन्ही रा.वाठाचापुरा, करजंगाव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
३. **प्रगती पुरुषोत्तम भेले,** वय ४४ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.टाकरखेडा मोरे, ता.अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक अशोक बापुरावजी चर्जन** यांचा **मृत्यू दि.०६/११/२०२१** रोजी **रा.करजगांव, ता.चांदूर बाजार,जि.अमरावती** येथे झालेला आहे. तसेच **मृतक रजनी अशोकराव चर्जन** हिचा मृत्यू **दि.२७/०६/२०२१** रोजी रा.टाकरखेडा मोरे, ता.अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती येथे झालेला आहे. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार मयतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे.त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.३२३/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाण्पत्र देण्यात येईल.

आज दि.०३.०७.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय,चांदूर बाजार

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.१२२१/२०२६**
**कपील + दोन वि.निरंक**
**पुढील ता.०५.०८.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. **Kapil Ramesh Kharpe,** Age 35 Yrs. Occu.: Business
R/o. Near Nilesh Medical, Bhaji Bazar, Amravati
2. **Nirmala Rameshrao Kharpe,** Age 63 Yrs. Occu.: Housewife
R/o. Brahman Wadi, Bhaji Bazar, Amravati
3. **Kirti Shashikant Raut,** Age 39 Yrs. Occu.: House wife
R/o 107, Vishavshila Colony Galli, No.2,
Near Gaurao Cement Depo. VMV, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :-** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Ramesh Pandurangji Kharpe** हे दि.२१.०४.२०२६ रोजी अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार Kapil Ramesh Kharpe + 2** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Kapil Ramesh Kharpe + 2** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**२५.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिधी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

---

## जाहीर नोटीस
## वि. दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि. अमरावती यांचे न्यायालय

किरकोळ अर्ज क्र. २६९/२०२५ ने.ता. ०३/०८/२०२५

**अर्जदारः-१. दिपक चवराजी वाकपांजर,** वय - ६६ वर्ष, व्यवसाय- शेती
**२.शरद चवराजी वाकपांजर,** वय - ५४ वर्ष, व्यवसाय- शेती
**३. प्रकाश चवरे उर्फ चवराजी वाकपांजर,** वय - ४६ वर्ष, व्यवसाय- शेती
रा. १ ते ३ रा. थिलोरी, ता. दर्यापूर, जि. अमरावती
**४. बैबीनंदाबाई देवानंद वाकोडे,** वय - ५१ वर्ष, व्यवसाय- घरकाम रा. खरवाडी, ता. चंद्रूर बाजार, जि. अमरावती
**५. वनमाला अशोक वरघट**, वय - ६४ वर्ष, व्यवसाय- घरकाम रा. पावर हाऊस रोड, कारंजा बायपास जवळ, विद्युत कॉलनी, मुर्तिजापूर, ता. मुर्तिजापूर, जि. अकोला

**– विरुध्द –गैरअर्जदारः-निरंक**

या जाहीर नोटीस द्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **चवराजी डोमाजी वाकपांजर** हे दिनांक १९/०३/२०२१ रोजी मरण पावले आहेत.अर्जदार यांनी मुतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट चे कलम २ प्रमाणे वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत** न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मुतकाचे वारस ठरविण्यास येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन :- मयत चवराजी डोमाजी वाकपांजर** यांचे नावे मौजा थिलोरी, ता. दर्यापूर, जि. अमरावती येथील ग्राम. अंतर्गत मालमत्ता क्र. २६१ क्षेत्रफळ १८४० चौ.फूट (१७०.९४०० चौ.मि.) व मालमत्ता क्र. २६२ क्षेत्रफळ २५५५ चौ.फूट (२३७.३७०० चौ.मि.) येणेप्रमाणे मिळकत आहे. सदर मिळकतीची बाजारभाव किंमत २०,००० रु. आहे.

आज दि. ०४/०७/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
**सहा. अधीक्षक(प्रशासन)**
**दिवाणी न्यायालय व.स्तर दर्यापूर**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.१२६५/२०२६
**वर्षा व इतर विरुध्द निरंक**
पुढील ता.१४.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Smt. Varsha Sachin Palaskar, Age 41 Yrs. Occu.: Household
2. Sai Sachin Palaskar, Age 15 Yrs. Occu.: Education
3. Naryani Sachin Palaskar, Age 6 Yrs. Occu.: Education
Applicant no. 2 & 3 minor through natural guardian by applicant no.1
4. Aruna Ramesh Palaskar, Age 67 Yrs. Occu.: Nil
All R/o. Akoli Road, Near Vitthal Temple, Kondeshwar Vidyut Colony, Sai Nagar, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **सचिन रमेश पळसकर** हे दिनांक २३.०४.२०२६ रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **वर्षा व इतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **वर्षा व इतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **३०.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

## जाहीर नोटीस

माझे पक्षकार नामे **श्रीमती मुबारकबी कदीरुद्दीन तर्फे वारस साबीर अहेमद उर्फ राजू कदीरुद्दीन, रा.रहेमत नगर, गल्ली नं.२, अमरावती, जि.अमरावती** व इतर यांनी दिलेल्या माहिती, अधिकार व सुचनेवरुन आम जनतेस नोटीस देण्यात येते की, त्या शेत मालमत्तेचे वर्णन खालील प्रमाणे -

"मौजा-नांदगाव पेठ भाग-२, ता.जि.अमरावती येथील शेत स.नं./गट नं.४१५/२, भो.वर्ग-१, आ.रु. १६.२०/-,क्षेत्रफळ ३.०७ हे.आर." यापुढे "दावा मिळकत" असे संबोधण्यात येईल. ही स्थावर मिळकत माझे पक्षकाराचे वडिलोपार्जित एकत्र कुटुंबातील मिळकत असून त्यामध्ये माझे पक्षकाराचे व त्यासोबत इतर लोकांचे सामायिक हित संबंध आहे. त्याबाबतचा वाद मा.जिल्हा न्यायाधिश, अमरावती यांचे न्यायालयात रे.दि.अ.नं.९२/२०२३ "श्रीमती मुबारकबी व इतर" ..वि.. कमरुनबी व इतर" ने.ता. ८.७.२०२६ अन्वये वाटणीपत्र करुन व ताबा मिळण्याबाबत अपिल प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

विशेष स्त्रोताकडून मिळालेल्या माहितीनुसार सदर वाद मिळकती संदर्भातील प्रकरण न्यायप्रविष्ठ असतांना प्रतिवादी मय्यत हसनखॉ हयातखॉ यांचे वारस रा.नांदगाव पेठ हे त्रयस्थ व्यक्तीला विकण्याच्या मनःस्थितीत आहे. ज्यामुळे माझे पक्षकाराचे हितसंबंध दुखावल्या जाऊन अपरिमित हानी होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. करीता आम जनतेस सदर नोटीसव्दारे सूचित करण्यात येते की, वरील वर्णनाच्या शेत जमिनी संदर्भात कोणीही कुठलाही व्यवहार करुन त्रयस्त व्यक्तीचे हितसंबंध निर्माण करु नये. असे झाल्यास त्यापासून होणारे परिणाम व कायदेशिर कार्यवाहीला ते जबाबदार असेल याची कृपया नोंद घ्यावी.

करिता जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

**दिनांक १३/०६/२०२६**
**अमरावती**

**सही /-**
**ॲड.राजेंद्र ए.सायरे**
कार्यालयः- २४, स्वराज, वंदन लेआउट, आशियाड कॉलनी, शेगाव रोड, अमरावती
**मो.-९९२११३३८०४**

---

## जाहीर नोटीस

माझ्या पक्षकाराने दिलेल्या माहिती व अधिकारानुसार सर्व जनतेस या जाहीर नोटिसव्दारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार नामे **सौ.जयश्री निलेश फेरन,** रा.शिवर, ता.दर्यापूर, जि.अमरावती यांनी इंडिया शेल्टर फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड शाखा अमरावती मधून गृह लोन मिळावे या करिता अर्ज केलेला असून खालीलप्रमाणे नमुद मालमत्ता रजिस्टर खरेदी क्र.३०१२/२०११ नामे **श्री विनायक पुंडलिक व-हाडे** यांची झेरॉक्स काढण्याकरिता नेते वेळी गहाळ झाली असून तरी अशा नावाची खरेदीखत कुणाला सापडल्यास अथवा खरेदी नुसार मालमत्ता बाबत कुणीही कर्ज/गहाण/बोजा आढळल्यास अथवा कुठलाही या मालमत्ताबाबत पैशाचा व्यवहार झाल्यास ०३ दिवसात खालील पत्यावर कागदपत्रासहीत संपर्क करावा.

**दिनांक ०४/०७/२०२६**

**ॲड. अनिकेत देशमुख**
**इंडिया शेल्टर फायनान्स कॉ.लि.**
**अमरावती, मो.-९५६१२४८२१५**

---

## सायटेशन/जाहिरनामा
## विद्यमान व्यवहार न्यायाधिश साहेब (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र. ६९२/२०२६ ने.ता. ९०/०६/२०२६

**अर्जदार- १) श्रीमती रेखाताई धनराजराव अंबाडकर,** वय- ४३ वर्ष, व्यवसाय - घरकाम
**२) श्री.अक्षय धनराज अंबाडकर,** वय- ३२ वर्ष, व्यवसाय - शेती
**३) श्री.अमर धनराज अंबाडकर,** वय- ३० वर्ष, व्यवसाय - शेती
सर्व रा. चिंचोली गवळी, ता. मोर्शी, जि. अमरावती.

**// विरुध्द // कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब, (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबत **सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे** प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं. १ चे पती तर अर्जदार नं. २ व ३ चे वडील नामे **धनराज शंकरराव अंबाडकर** हे दिनांक १२/०८/२०२५ रोजी **Chincholi Gavali, Tq. Morshi, Dist-Amravati** येथे मयत झालेले आहे. त्यांचे मृत्युनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे तसेच मयताचे नाव असलेल्या शासकिय व निमशासकिय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदारांशिवाय ईतर कोणतेही वारस नाही तेव्हा या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणांवर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आंत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक :- ०२/०७/२०२०

शिक्का
**आदेशान्वये**
**सहायक अधीक्षक**
**दिवाणी. न्यायालय, मोर्शी.**

---

## जाहीर नोटीस

**अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधीश-२ यांचे न्यायालय**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१३५/२०२६** **ने.ता.१३/०७/२०२६**

**अर्जदार :- १.स्मिता सुरेंद्र गवळी**
**वय ५० वर्षे, व्यवसाय-घरकाम**
**रा. मित्रांगण रेसिडेंन्सी, पाण्याची टाकी जवळ,**
**शेगांव-रहाटगांव रोड, व्हीएमव्ही, अमरावती**

**-----वि----**

**गैरअर्जदार :- निरंक**

**अपंग व्यक्तीचे हक्क अधिनियम, २०१६ चे कलम १४ नुसार पालक नियुक्ती/संरक्षक नेमणूक करण्याकरिता अर्ज**

ज्याअर्थी वरील अर्जदार स्मिता सुरेंद्र गवळी आपल्या कुटुंबासह वरील ठिकाणची कायमची रहिवासी आहे. अर्जदार हिचे पती नामे सुरेद्र नागोरावजी गवळी यांचे दिनांक ०६/११/२०२३ रोजी राहते घरी अमरावती येथे झाले. अर्जदार हिला नामे देवांश सुरेंद्र गवळी व अभिनव सुरेंद्र गवळी ही दोन मुले आहेत. अर्जदार हिचा मोठा मुलगा देवांश हा सध्या २३ वर्षाचा असून तो सुरुवातीपासून कायमस्वरुपी मानसिक दृष्टया कमजोर आहे. अर्जदार ही कुटुंबप्रमुख असून घराची संपूर्ण जबाबदारी तिच्यावरच आहे. दोन्ही मुलाला सांभाळण्याची, पालनपोषण,शिक्षण व देखरेख करण्याची जबाबदारी सुध्दा अर्जदार हिच्यावर आहे. अर्जदार हिला तिचा मुलगा देवांशच्या उज्वल भविष्याकरिता योग्य वाटेल ती सर्व कामे सरंक्षक म्हणून करायची असल्याने अर्जदार हिला संरक्षक म्हणून नेमणुक करण्याकरिता अर्जदारांनी वि.जिल्हा व सत्र न्यायाधिश-२, अमरावती यांच्या न्यायालयात रितसर अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाविरुध्द कारण दाखविण्यास अगर काही हरकती घ्यावयाचे असल्यास/अर्जदाराचे सर्व नातलग व हितसंबंधी आणि सर्वत्र लोकांस जाहीर नोटिस देण्यात येते की, त्यांनी दिनांक १३/०७/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता वि.जिल्हा व सत्र न्यायाधिश-२, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदहू अर्जाची एकतर्फी सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०३ /०७/२०२५ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दीसाठी दिला असे.

**अमरावती**
**दिनांक ०३.०७.२०२६**

शिक्का
**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक (न्यायिक विभाग)**
**जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती**

---

## जाहीर नोटीस

**नोटीस देणार :-** सरफराज सलाहोदद्दीन काझी अजीजोदद्दीन
**Sarfaraz Salahuddin Quazi Azizuddin**
वय - ६५ वर्ष, व्यवसाय- वैद्यकीय जामा मस्जिद
जवळ यासीनपुरा दर्यापूर ता. दर्यापूर जि. अमरावती - ४४४८०३

**तर्फे**
**ॲड. डि.बी. अग्रवाल**
मुर्तीजापुर रोड गणेशपुर
ता. दर्यापूर जि. अमरावती

मी खालील सही करणार जाहिर नोटीस देतो की,

१. आमचे उपरोक्त पक्षकार हे डॉक्टर असुन त्यांचे नांव **सरफराज सलाहोदद्दीन काझी अजीजोदद्दीन, Sarfaraz Salahuddin Quazi Azizuddin** असे आहे. हे नांव त्यांचे आधार कार्ड, पॅन कार्ड, रेशन कार्ड, शाळेचे टि.सी वर नमुद आहे. परंतु महाराष्ट्र स्टेट बोर्ड पुणे यांनी पाठविलेल्या प्रमाणपत्रात **काझी सरफराज सलाहोदद्दीन अजीजोदद्दीन Quazi Sarfaraz Salahuddin Azizuddin** असे दर्शविण्यात आले आहे. त्यांचे प्रोटोकॉल नुसार अडनाव हे समोर घ्यावे लागते. म्हणुन **सरफराज सलाहोदद्दीन काझी अजीजोदद्दीन Sarfaraz Salahuddin Quazi Azizuddin** चे जागी **काझी सरफराज सलाहोदद्दीन अजीजोदद्दीन Quazi Sarfaraz Salahuddin Azizuddin** असे दर्शविण्यात आले आहे. ही दोन्ही नांवे एकाच व्यक्तींची असुन बोर्डाच्या नियमानुसार काझी आडनाव समोर दर्शविले आहे. या नावाबाबत कोणाला काही आक्षेप असल्यास खालील पत्यावर कळवावे. करीता जाहिर नोटीस दिली आहे.

दि. /०७/२०२६

शिक्का
सही
**ॲड. डि.बी. अग्रवाल गणेशपुर**
मोबा.क. ७५८०८५२०१

---

**नमुना ९**
**। नियम १४ व २४ पहा ।**

**महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, १९६६ यांच्या कलम १५० (२) अन्वये सूचना**

**तालुका :- अमरावती** **गाव :- माळेगाव मा.**

गावच्या फेरफाराच्या नोंदवहीत खाली विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे जमिनीतील अधिकारांच्या संपादनासंबंधी नोंद करण्यात आली आहे.

| फेरफाराच्या नोंदवहीतील नोंदीचा अनुक्रमांक किवा तारीख | संपादन केलेल्या अधिकाराचे स्वरुप : | ज्यातील अधिकार संपादन करण्यात आले आहे ते भुमापन व उपविभाग क्रमांक १०५ |
|---|---|---|
| १२८४ | नोंदीचा प्रकारः- मृत्यु पत्र / व्यवस्थापत्र<br>माहिती मिळालेचा दिनांकः- ३०/०५/२०२६<br>फेरफाराचा दिनांकः- ३०/०५/२०२६, यांनी अर्ज दिला की कै. भिमराव रंगराव हे ह्या दिनांक रोजी मयत झाले/झाल्या असुन त्यांनी लिहुन ठेवले अनोंदणीकृत मृत्युपत्राचा दि. त्यांची आपल्या मालकीच्या मिळकती खालीलप्रमाणे हस्तांतरीत केल्या आहेत :-गट/सर्व्हे क्रमांक १०५ - अर्णव अंकुश कदम अपाक वडील अंकुश (खाता क्रमांक :-८४३) लागवडयोग्य क्षेत्र ०.०००० हे.आर.चौ.मी पोटखराब क्षेत्र ०.०००० हे.आर.चौ.मी दुय्यम निबंधक --निवडा-- जिल्हा अमरावती यांचेकडील मृत्यु पत्र / व्यवस्थापत्र दस्त क्रमांक दिनांक या मृत्युपत्राप्रमाणे मयत व्यक्तीचे नाव कमी करुन मृत्युपत्राप्रमाणे नावे दाखल केली.मृत्युपत्राची प्रत, मृत्यु नोंदीचा दाखला इत्यादी कागदपत्रे दसरी दाखल असे. | |


आणि ज्याअर्थी , तुमचा उक्त फेरफारात हितसंबंध आहे असे अधिकार अभिलेखावरुन / फेरफाराच्या नोंदवहीवरुन मला वाटते ; आणि ज्याअर्थी उक्त फेरफारात तुमचा हितसंबंध आहे असे मानण्यास मला संयुक्तिक कारण आहे. त्याअर्थी आता मी, प्रवीण अण्णाजी पाटील ज्या ठिकाणी उपरोक्त जमीन आहे त्या गावाचा ग्राम महसूल अधिकारी याव्दारे , उक्त फेरफाराच्या नोंदी संबंधी तुम्हांस सूचना देत आहे व ही सूचना मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत उक्त नोंदीसंबंधी तुमची हरकत कोणतीही असल्यास , ती तोंडी किंवा लेखी पाठविण्यास तुम्हांस फर्मावित आहे. ग्राम महसूल अधिकारी माळेगाव मा. यांच्याकडे उक्त पंधरा दिवसांच्या मुदतीत कोणतीही हरकत त्यांचेकडे न मिळाल्यास , उक्त नोंदीस तुमची संमती आहे , असे गृहीत धरले जाईल , कृपया याची नोंद घ्यावी .

**ठिकाण : माळेगाव मा.**
**दिनांक : ३०/०५/२०२६**
नाव : पत्ता :
चावडीवर नोटीस प्रदर्शित केल्याची
तारीख : ३०/५/२६
भिमराव रंगराव

**ग्राम महसूल अधिकारी ( सही व शिक्का )**
**. ग्राम महसूल अधिकारी**
**कापुसतळणी, साझा क्र. ३९**
**ता.जि अमरावती.**
**दिनांक ३०.०५.२६.**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### अपघाताला निमंत्रण!

चांदूरबाजार तालुक्यातील तळवेल ते जवळा शहापूर मार्गावर झाडाच्या फांद्या रस्त्याच्या मध्यभागी झुकलेल्या अवस्थेत असून वाहनचालकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. कोणतीही मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी संबंधित प्रशासनाने तातडीने फांद्यांची छाटणी करून रस्ता सुरक्षित करावा, अशी नागरिकांची मागणी आहे. **छायाचित्र :-संतोष शेंडे,** टाकरखेडा शंभू

### वऱ्हा ते माळेगांव रोडची दुरावस्था

**कुऱ्हा-**बऱ्याच वर्षापासून वऱ्हा ते माळेगांव ६ कि.मी. पर्यंत असलेला रोड इतका खराब झाला आहे की, रोडला जागोजागी मोठ मोठे खड्डे पडल्यामुळे वाहनधारकांना आपली वाहने कशा पध्दतीने चालवावी अशी भयानक परिस्थिती असून दुचाकी वाहन तर चालवितांना बरीच कसरत करावी लागते पण केव्हा खड्यात पडेल आणि अपघात होईल. याचा काही भरोसा नाही. तेव्हा वऱ्हा ते माळेगांव पर्यंतच्या ६ कि.मी. अंतराच्या रोडची दुरुस्ती करावी अशी मागणी वऱ्हा व माळेगांव ग्रामस्थांची असून त्वरीत संबंधीत विभागाने व या भागाचे जनप्रतिनिधी यांनी लक्ष वेधून वरील रोडला पडलेल्या खड्यापासून होणाऱ्या वाहनधारकांना आपली वाहने सुरक्षीत व अपघात होणार नाही याची दखल घ्यावी. असे या रोडवर चालणाऱ्या दुचाकी इतर मोठे वाहन धारकांची सुद्धा मागणी आहे.



### श्री वसंतराव नाईक शेतकरी पुरस्काराने उमेश बगणे सन्मानित

**टाकरखेडा शंभू-** चांदूर बाजार तालुक्यातील शहापूर येथील प्रगतिशील व प्रयोगशील शेतकरी उमेश रामराव बगणे यांना नुकताच महाराष्ट्र शासनाचा मानाचा श्री वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.शेती हा केवळ व्यवसाय नसून समाजाला दिशा देणारे कार्य आहे या तत्त्वावर चालणारे शहापूर या लहानश गावातील उमेश बगणे यांनी आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब करून उत्पादन वाढ, गुणवत्तापूर्वक पीक व्यवस्थापन,आणि प्रयोगशील शेतीच्या माध्यमातून राज्यभर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत राज्य शासनाने त्यांना वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कार जाहीर केला होता.नुकताच मुंबई येथील डोम, सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम वरळी येथे आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरण समारंभात राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री,कृषी मंत्री दत्ता भरणे यांच्या हस्ते श्री बगणे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. उमेश बगणे यांच्या या यशाबद्दल ग्रामस्थ शेतकरी सामाजिक संस्था आणि विविध स्तरातील मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

### विद्यापीठाच्या उन्हाळी-२०२६ बीसीए अभ्यासक्रमाची पूनर्परीक्षा १३ जुलैला

**अमरावती-**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची उन्हाळी - २०२६ बी.सी.ए. (आर्टीफिशियल इंटेलिजन्स अ‍ॅन्ड मशिन



लर्निंग) सेमि.-३ (एनईपी) आणि बी.सी.ए. (डेटा सायन्स) सेमि.-३ (एनईपी) ची पूनर्परीक्षा १३ जुलै रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रावर नमूद परीक्षा केंद्रांवर घेण्यात येणार असल्याचे परीक्षा व मूल्यमापन विभागाकडून कळविण्यात आले आहे.विद्यार्थ्यांनी त्यांना देण्यात आलेले प्रवेशपत्र परीक्षेच्यावेळी सोबत आणावेत. तसेच सदर पूनर्परीक्षेबाबत संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना कळवावे, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी केले आहे. यासंदर्भात सर्वसंबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य, केंद्राधिकारी, महाविद्यालये, परीक्षा केंद्रांना कळविण्यात आले असून विद्यार्थ्यांनी सुध्दा आपापल्या महाविद्यालयांशी संपर्क साधून माहिती करुन घ्यावी, असे आवाहन केले आहे. अधिक माहितीकरीता विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील परीक्षा विभागाच्या अधिका-यांच्या क्रमांकावर संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

## निधन

### सविता पोकळे



**कुऱ्हा-**येथील शहिद भगतसिंग सार्वजनिक वाचनालयाचे ग्रंथपाल दिपकराव पांडूरंगजी पोकळे यांची धर्मपत्नी सविता दिपकराव पोकळे हिचे वयाच्या ४६ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, मुली, असा बराच मोठा आप्त परिवार आहे.स्व. सविता पोकळे यांच्या अंत्यविधी करिता सर्वच स्तरावरील नातेवाईक व गावकरी उपस्थित होते. यावेळी सामूहीक श्रध्दांजली देण्यांत आली.

### परमेश्वर इंगळे



**काटपुर-**काटपुर येथिल परमेश्वर महादेव इंगळे (वय ४०) यांचे शुक्रवारी ३जुलै रोजी सकाळी मेंदूच्या झटक्याने निधन झाले. अकस्मात झालेल्या निधनामुळे संपूर्ण इंगळे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून संपूर्ण गावात शोककळा पसरली.त्यांचे पक्षात वडील,पत्नी,दोन मुले, दोन भाऊ, बहीण असा बराच मोठा आप्तपरिवार असून शुक्रवारी दुपारी ममदापूर येथील स्मशानभूमीत असंख्य आप्तस्वकीय मित्रमंडळी व गावकऱ्यांचे उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आला.

# जीर्ण शाळांत चिमुकल्यांचे शिक्षण धोकादायक

## जिल्ह्यातील २३० वर्गखोल्या व १३७ शाळा जीर्ण

**अमरावती/का.प्र.**

नवीन शैक्षणिक वर्ष सुरू झाले तरी अमरावती जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांची दुरवस्था कायम असून हजारो विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. जिल्ह्यातील १५७१ शाळांपैकी १३७शाळा अत्यंत खस्ताहाल (जीर्ण) झाल्या असून तब्बल २३० वर्गखोल्या धोकादायक म्हणून जाहीर करण्यात आल्या आहेत. टपकती छपरे आणि भेगाळलेल्या भिंतींच्या सावटाखालीच चिमुरड्यांना शिक्षण घ्यावे लागत असल्याने पालकांमध्ये कमालीची भीती पसरली आहे. या शाळांच्या दुरुस्तीसाठी तयार करण्यात आलेल्या ११ कोटी ८८ लाख ९० हजार रुपयांच्या प्रस्तावाला अजूनही मंजुरी मिळालेली नाही.

जिल्ह्यातील धारणी आणि चिखलदरा या मेळघाटातील दुर्गम भागांसह एकूण १४ तालुक्यांमधील शाळांचे सर्वेक्षण करण्यात आले होते. उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये ही दुरुस्तीची कामे पूर्ण होणे अपेक्षित होते, परंतु शाळा सुरू होऊनही अद्याप प्रशासकीय पातळीवर निधी उपलब्ध न झाल्याने कामे रखडली आहेत. त्यामुळे ऐन पावसाळ्यात विद्यार्थ्यांना अशा धोकादायक इमारतींमध्ये बसावे




लागत आहे. दुसरीकडे, नवीन वर्गखोल्यांच्या बांधकामाचा बोजवारा उडाला आहे. जिल्हा परिषदेने १३ कोटी रुपये खर्च करून १०८ शाळांमध्ये १२५ नवीन वर्गखोल्या बांधण्याचा प्रस्ताव तयार केला होता. मात्र, मार्च २०२६ अखेरपर्यंत या योजनेवर बजेटमधील एकही रुपया खर्च होऊ शकला नाही. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांनी सांगितले की, दुरुस्तीच्या निधीसाठी जिल्हा नियोजन समितिडे मागणी करण्यात आली आहे. उपलब्ध निधीतून आदेश दिले असून अतिरिक्त निधातून प्राधान्यक्रमाने कामे सुरू करण्याचे निधीसाठी प्रयत्न सुरू आहेत. या गंभीर परिस्थितीवर त्वरित तोडगा काढून प्रशासनाने शाळांचे स्ट्रक्चरल ऑडिट करावे आणि विद्यार्थ्यांसाठी पर्यायी सुरक्षित व्यवस्था करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

### धोकादायक वर्ग आणि रखडलेला निधी

अमरावती जिल्ह्यातील १३७शाळा कमालीच्या जर्जर झाल्या असून २३० वर्गखोल्यांमध्ये बसणे मृत्यूला आमंत्रण देण्यासारखे आहे. ११ कोटी ८८ लाख ९० हजार रुपयांचा दुरुस्ती प्रस्ताव लालफितीत अडकला असून नवीन खोल्यांसाठीचा १३ कोटीं निधीही पडून आहे. लोकप्रतिनिधींनी याकडे लक्ष देऊन चिमुरड्यांचा जीव वाचवावा आणि शाळांची दुरुस्ती तातडीने करावी.

## बियाणी चौकातील हॉटेलला आग; २० लाखांचे साहित्य खाक

**अमरावती/का.प्र**

इंधन हेडक्वार्टर हॉटेल', बियाणी चौक येथे शुक्रवारी सकाळी ११.३० वाजताच्या सुमारास भीषण आग लागली. ही आग विझविण्यासाठी अग्निशमन दलाच्या जवानांना जवळपास तासभराचा कालावधी लागला; मात्र तेवढ्या वेळात हॉटेलमधील अंदाजे २० लाखांचे साहित्य जळून खाक झाले. दरम्यान, पावसाच्या दिवसांतही नेमकी ही आग कशाने लागली, यामागील अधिकृत कारण स्पष्ट होऊ शकले नाही. महापालिकेच्या मुख्य अग्निशमन विभागाला पोलीस कंट्रोल रूम (शहर) येथून सदर हॉटेलमध्ये आग लागल्याची माहिती प्राप्त झाली होती. माहिती मिळताच अग्निशमन अधीक्षक मिळविले व आग इतरत्र पसरण्यापासून रोखली. हॉटेल मालकाने दिलेल्या माहितीनुसार या आगीत अंदाजे २० लाखांचे आर्थिक नुकसान झाले आहे.



सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी अथवा कोणालाही दुखापत झालेली नाही. ही आग विझविण्यासाठी फायरमन हर्षद दहातोंडे, विशाल भगत, मोहन वानखडे, मो. ताहीर, राहुल घोडे, प्रशांत गोडे, जयकुमार वानखडे, वाहन चालक मनोहर राठोड, शेख तोशिफ, कासम खान, नरेंद्र कोकणे, राजू शेंडे यांनी शर्थीचे प्रयत्न केले. पंधरे, केंद्रप्रमुख सोनकांबळे तसेच पाळी प्रमुख मनोज इंगोले यांनी अग्निशमन दलाची वाहने व कर्मचारी तात्काळ घटनास्थळी रवाना केले. अग्निशमन दलाच्या जवानांनी शर्थीचे प्रयत्न करित आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळविले व आग इतरत्र पसरण्यापासून रोखली. हॉटेल मालकाने दिलेल्या माहितीनुसार या आगीत अंदाजे २० लाखांचे आर्थिक नुकसान झाले आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी अथवा कोणालाही दुखापत झालेली नाही. ही आग विझविण्यासाठी फायरमन हर्षद दहातोंडे, विशाल भगत, मोहन वानखडे, मो. ताहीर, राहुल घोडे, प्रशांत गोडे, जयकुमार वानखडे, वाहन चालक मनोहर राठोड, शेख तोशिफ, कासम खान, नरेंद्र कोकणे, राजू शेंडे यांनी शर्थीचे प्रयत्न केले.

## विद्यापीठाचा उत्कृष्ट खेळाडू पुरस्कार अनामिका डेका



**अमरावती/का.प्र.**

श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील बी.पी.एड. द्वितीय वर्षातील विद्यार्थिनी अनामिका डेका हिने अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तायकांडो क्रीडा स्पर्धेमध्ये सुवर्णपदक व राष्ट्रीय तायकांडो क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राला कास्य पदक मिळून दिले. तसेच नम्रता तायडे बी.पी.एड द्वितीय वर्ष हिला अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तायकांडो क्रीडा स्पर्धेमध्ये कास्य पदक तसेच वैष्णवी गिरी हिने त्या संघामध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्यामुळे सन्माननीय कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या हस्ते उत्कृष्ट खेळाडू पुरस्कार प्रदान करण्यात आले या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख व कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी व सचीव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष गावंडे, डॉ. पुष्पलता देशमुख, तायकांडो गेम इन्चार्ज डॉ.सुशांत कुकडे, प्रशिक्षक बलवंत बोबडे तसेच सर्व शिक्षक व कर्मचारी व विद्यार्थीतर्फे अभिनंदन करण्यात आले.

## विजया रहाटकर यांना कैटतर्फे 'भारत व्यापार महोत्सवाचे निमंत्रण'

**अमरावती-** राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांच्या अमरावती दौऱ्यानिमित्त शासकीय विश्रामगृहात त्यांचे आत्मीय आणि सन्मानपूर्वक स्वागत करण्यात आले. यावेळी भारतीय जनता पक्ष विदर्भ संघटनाचे समन्वयक दिनेश सूर्यवंशी यांच्या उपस्थितीत कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स (कॅट) विदर्भ प्रांताचे अध्यक्ष विनोद कलंत्री तसेच एकवीरा महिला कॅट अमरावती जिल्हाध्यक्षा डॉ. कुंजन वेद यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला.

यावेळी कॅटच्या शिष्टमंडळाने १२ ते १५ ऑगस्टदरम्यान नवी दिल्लीतील भारत मंडपम, प्रगती मैदान येथे आयोजित करण्यात आलेल्या भारत व्यापार महोत्सवात सहभागी होण्यासाठी श्रीमती रहाटकर यांना औपचारिक निमंत्रण दिले. भेटीदरम्यान राष्ट्रीय महिला आयोगाच्या कार्यपद्धती आणि महिलांच्या सक्षमीकरणातील भूमिकेवरही चर्चा झाली. ३१ जानेवारी १९९२ रोजी भारत सरकारने स्थापन केलेला राष्ट्रीय महिला आयोग हा महिलांच्या संवैधानिक व कायदेशीर हक्कांचे संरक्षण, लैंगिक समानतेला प्रोत्साहन तसेच महिलांवरील अत्याचार, भेदभाव आणि छळाच्या प्रकरणांमध्ये प्रभावी हस्तक्षेप करणारा महत्त्वाचा वैधानिक आयोग आहे. महिलांशी संबंधित कायद्यांचे पुनरावलोकन, आवश्यक सुधारणा सुचविणे, महिला सुरक्षा, शिक्षण, रोजगार आणि समान संधी यासंदर्भात शासनाला मार्गदर्शन करणे तसेच महिलांना त्यांच्या हक्कांबाबत जागरूक करणे ही आयोगाची प्रमुख कार्ये आहेत. कॅट विदर्भ प्रांताचे अध्यक्ष विनोद कलंत्री आणि डॉ. कुंजन वेद यांनी या भेटीसाठी श्रीमती विजया रहाटकर यांचे आभार मानले. तसेच ही अर्थपूर्ण भेट भारतीय जनता पक्ष विदर्भ संघटनाचे समन्वयक दिनेश सूर्यवंशी यांच्या विशेष सहकार्य आणि समन्वयामुळे शक्य झाल्याबद्दल त्यांचेही विशेष आभार व्यक्त केले.



## नारायणदास लढ्ढा हायस्कूलमध्ये नवागतांचा प्रवेशोत्सव उत्साहात

**अमरावती/वार्ताहर**

ब्रिजलाल बियाणी शिक्षा समिती द्वारा संचालित स्थानिक नारायणदास लढ्ढा हायस्कूल, अमरावती येथे इयत्ता पाचवीच्या नवागत विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव आनंद, संस्कार, ज्ञान आणि पर्यावरणप्रेमाचा सुरेख संगम घडवत अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. संपूर्ण शाळा मंगलमय वातावरण, टाळ्यांचा कडकडाट, विठ्ठल नामाच्या गजरासह लेझीमच्या तालाने आणि विद्यार्थ्यांच्या निरागस हास्याने अक्षरशः बहरून गेली.

कार्यक्रमाची सुरुवात प्रत्येक नवागत विद्यार्थ्याला पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या कापडी पिशवीत रोपटे भेट देऊन करण्यात आली. 'एक विद्यार्थी-एक वृक्ष' हा संदेश हृदयाशी बाळगत विद्यार्थ्यांनी हातात रोपे घेऊन काढलेल्या वृक्षदिंडीने परिसर हिरव्या भविष्याचा संकल्पासह दुमदुमून गेला. विठ्ठल–रुक्मिणीच्या वेशभूषेतील सार्थक होटे व केतकी चाळसे ह्या विद्यार्थ्यांनी रोपट्याच्या पालखीसह वृक्षदिंडीचे आकर्षण वाढवत भक्तिमय वातावरणाची निर्मिती केली. त्यानंतर शाळेच्या मुख्याध्यापिका एस.ए. माळवे व शाळेतील सर्व शिक्षकांच्या हस्ते नवागत विद्यार्थ्यांचे पारंपरिक पद्धतीने औक्षण, स्वागत मुकुट आणि स्वागत बॅज लावून जल्लोषात स्वागत करण्यात



आले. भक्ती गीतांच्या सुरेल तालावर आणि टाळ्यांच्या गजरात कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या अमरावती महानगरपालिकेच्या अंबापेठ प्रभागाच्या लोकप्रिय नगरसेविका लवीना हर्षे यांचे स्वागत शाळेच्या मुख्याध्यापिका एस.ए.माळवे यांनी सुंदर रोपटे देऊन केले.लवीना हर्षे यांनी नवप्रवेशित विद्यार्थ्यांना शालेय पाठ्यपुस्तके वितरीत केली व उज्ज्वल शैक्षणिक वाटचालीसाठी शुभाशीर्वाद देत शिक्षणासोबत संस्कार आणि पर्यावरण संवर्धनाची जाणीव जोपासण्याचे आवाहन केले. कार्यक्रमात मेदिनी घड्याळ पाटील हिने सादर केलेला 'मी नारायणदास लढ्ढा हायस्कूल बोलते' हा एकपात्री प्रयोग उपस्थितांच्या मनाचा ठाव घेणारा ठरला. इयत्ता पाचवीतील नवप्रवेशित विद्यार्थी गीतेश अनासाने व इयत्ता सातवीतील समृद्धी अडसोड यांनी सादर केलेल्या अभंग व प्रार्थनेने संपूर्ण वातावरण भक्तिरसाने भारावून गेले होते. त्यानंतर शाळेच्या मुख्याध्यापिका, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या हस्ते उर्वरित विद्यार्थ्यांना नवीन पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. नवीन पुस्तकांचा सुगंध,हातात मिळालेली नवीन पुस्तकांचा आनंद आणि नव्या शैक्षणिक प्रवासाची उत्सुकता विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे झळकत होती. कार्यक्रमाच्या शेवटी पोषण आहार योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना स्वादिष्ट पुलाव व शिरा देण्यात आला. दिवसभरातील प्रत्येक उपक्रमाचा मनमुराद आनंद घेतलेल्या चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर समाधान, उत्साह आणि आनंद अक्षरशः ओसंडून वाहत होता. संस्कार, पर्यावरण, ज्ञान आणि आनंद यांचा अविस्मरणीय संगम घडविणारा हा प्रवेशोत्सव विद्यार्थ्यांसह सर्व उपस्थितांच्या स्मरणात दीर्घकाळ राहील, अशी भावना सर्वांनी व्यक्त करत शाळेच्या प्रवेशोत्सवाचा समारोप करण्यात आला.

## शेतीच्या वहिवाटीचा रस्ता जेसीबीने खोदून बंद

### शेतकऱ्यांची विभागीय आयुक्तांकडे धाव; पेरणीपूर्वी रस्ता खुला करण्याची व संबंधितांवर कारवाईची मागणी

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**

भातकुली तालुक्यातील पूर्णानगर येथील शेतीच्या वहिवाटीचा पांदण रस्ता जेसीबीच्या सहाय्याने चार ते पाच ठिकाणी खोदून बंद करण्यात आल्याचा आरोप करत शेतकऱ्यांनी विभागीय आयुक्तांकडे तक्रार दाखल केली आहे.पेरणीचा हंगाम तोंडावर असताना रस्ता बंद झाल्यामुळे शेतीची मशागत, पेरणी तसेच शेतमालाची ने-आण अडचणीत आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. पूर्णानगर येथील गजेंद्रसिंह दुर्गासिंह गहरवाल यांनी दिलेल्या निवेदनानुसार, पूर्णानगर स्टॉपपासून पूर्वेकडे सुमारे तीन किलोमीटर अंतरावरील वहिवाटीच्या रस्त्यावर संबंधित व्यक्तीने जेसीबीने मोठ्या नाल्या खोदून रस्ता बंद केला असून, शेतकऱ्यांना दमदाटी केली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या रस्त्याचा वापर पूर्णानगर, आसेगाव पूर्णा, टाकरखेडा पूर्णा व पोहरा पूर्णा परिसरातील अनेक शेतकरी करतात. यापूर्वीही याच रस्त्यावरून वाद निर्माण झाला होता. त्यावेळी



तहसीलदारांनी चौकशी करून न्यायालयाचा अंतिम निर्णय होईपर्यंत रस्ता 'जैसे थे' ठेवण्याचे आदेश दिले होते. मात्र, त्याकडे दुर्लक्ष करून पुन्हा रस्ता बंद करण्यात आल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. या प्रकरणाची तातडीने चौकशी करून रस्ता पूर्ववत खुला करावा, संबंधितांवर कारवाई करावी आणि शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि उपविभागीय अधिकारी यांच्याकडे ३ जुलैला करण्यात आली आहे.निवेदनासोबत तहसीलदारांच्या पूर्वीच्या आदेशाची प्रत तसेच संबंधित शेतजमिनीचा ७/१२ उतारा जोडण्यात आला असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

## कला व विज्ञान महाविद्यालयात वनमहोत्सव

**कुऱ्हा-**कला व विज्ञान महाविद्यालय कु-हा राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने महाराष्ट्र शासन तसेच संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या निर्देशानुसार महाविद्यालयात वनमहोत्सव कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आला. पर्यावरण संवर्धन, वृक्षसंवर्धन आणि हरित परिसर निर्मितीचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ. अतुल वानखोडे महात्मा फुले महाविद्यालय, अमरावती यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी



स्वीकारली पाहिजे, असे प्रतिपादन केले.प्राचार्य,प्रमुख अतिथी, प्राध्यापक, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण करून पर्यावरण संरक्षणाची सामूहिक शपथ घेतली.'एक विद्यार्थी – एक वृक्ष' हा संदेश देत प्रत्येक विद्यार्थ्याने लावलेल्या वृक्षाची नियमित काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन रा.से.यो विभागामार्फत डॉ. निशा जोशी यांनी केले. उपस्थित मान्यवरांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण झाली असून समाजात हरित पर्यावरणाचा संदेश प्रभावीपणे पोहोचविण्यात यश आले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्र वंदना आणि वंदे मातरम् गीताने झाली.

# धारणी-परतवाडा मार्गावर झाड कोसळले

## -वाहतूक पूर्णपणे ठप्प, वाहनांच्या रांगा



**धारणी/प्रतिनिधीः-** मेळघाटा परिसरात सतत होणाऱ्या मुसळधार पावसामुळे धारणी-परतवाडा मुख्य मार्गावर घटांग जवळ आज शनिवार ४ जुलैच्या पहाटे २ वाजताच्या सुमारास विशाल झाड कोसळल्याने वाहतूक ठप्प झाली आहे. मार्गाच्या दोन्हीकडे वाहनांच्या लांब रांगा लागलेल्या आहे. यामुळे बिकट परिस्थिती येथे निर्माण झाली होती. माहिती नुसार धारणी परतवाडा मार्गावर घटांग जवळ जोरदार पाऊस आणि वाऱ्यामुळे एक मोठे झाड मुळासकट उखडून थेट रस्त्यावर कोसळले. त्यामुळे रस्त्याचा संपूर्ण भाग बंद झाला.धारणी आणि परतवाडा दरम्यानची वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली.खाजगी वाहने, बसेस आणि मालवाहू वाहने मिळून शेकडो वाहने रस्त्याच्या दोन्ही बाजूला ☞(पान २ वर)

# लालखडीत सराईत आरोपीकडून पिस्तूल जप्त

## एक जिवंत काडतूसही जप्त



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील वाढत्या गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी सुरू असलेल्या विशेष मोहिमेत गुन्हे शाखेला आणखी एक यश मिळाले आहे. लालखडी परिसरात अवैधरित्या पिस्तूल बाळगून फिरणाऱ्या एका सराईत आरोपीला पोलिसांनी रंगेहात पकडत त्याच्याकडून देशी बनावटीचे पिस्तूल आणि जिवंत काडतूस जप्त केले.

गुन्हे शाखेचे पथक नियमित गस्त घालत असताना लालखडी परिसरात एक व्यक्ती अग्निशस्त्र घेऊन संशयास्पद हालचाली करत असल्याची गुप्त माहिती मिळाली. ☞(पान २ वर)

# पत्नीच्या अंत्यविधीनंतर सोन्याचे दागिने ठेवलेली बॅग हरविली

## २५ लाखांचे दागिने फिर्यादीला केले परत



**अमरावती/प्रतिनिधीः-** पत्नीच्या गंभीर आजारपणाशी झुंज देत असतानाच लाखो रुपयांचे सोन्याचे दागिने हरवल्याने संकटात सापडलेल्या एका कुटुंबाला राजापेठ पोलिसांनी मोठा दिलासा दिला आहे. तब्बल २५ लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने आणि महत्त्वाची कागदपत्रे ☞(पान २ वर)





























### मुंबईचा पाऊस!

खुदा करे ऐसा समां पैदा हो,
तेरी किस्मत में भी एक नया मुकाम पैदा हो...

तू ऑफिस के लिए निकले जैसे-तैसे
और रास्ते में ही एक 'ट्रॅफिक जाम' पैदा हो!



### गालिब आणि पावसाळा!

ये कैसा महिना है गालिब....?
दुपार को उन्हाळा! रात्री को पावसाळा!

अन पहाटे को हिवाळा!
अगर ऐसाही चलता रहा,
तो शेत मे क्या उगेंगा ...... रताळा!


# सारांश
जनमाध्यम — एक प्रतिष्ठित सवय

❑ रविवार, ५ जुलै २०२६ ❑ E-paper - www.janmadhyam.com


# अंतरिक्ष वसाहतवादावर कायद्यांचा वचक हवाच !


डॉ. अंजली कुलकर्णी


**स्पेस एक्सने अंतराळात हजारो उपग्रहांचे जाळे उभारले आहे. ज्याद्वारे जगभरात अतिवेगवान इंटरनेट सेवा दिली जाते. स्पेस एक्सच्या यशामुळे जागतिक अर्थव्यवस्थेने नवीन ऐतिहासिक टप्पे गाठले असले, तरी त्यमुळे एका नव्या वादास तोंड फुटले आहे.**



काही नैसर्गिक संसाधने कोणत्याही एका देशाच्या मालकीची नसतात, तर ती संपूर्ण मानवजातीची आहेत, असे मानले जाते. पण खासगी क्षेत्राला प्रोत्साहन देणाऱ्या अंतराळ क्षेत्रातील सध्याच्या घडामोडी पाहता नवा अंतरिक्ष वसाहतवाद निर्माण होतो की काय अशी साधार भीती निर्माण झाली आहे. अंतराळातील व्यावसायिक वर्चस्वावर आरूढ झालेल्या इलॉन मस्क या उद्योगपतीवर जगातील पहिला ट्रिलियानियर असे नुकतेच शिक्कामोर्तब झाले. वैश्विक पातळीवर हे त्यांचा नवनिर्मितीचा ध्यास, संशोधनातील नवीन वाटा शोधण्याची त्यांची जिद्द, जोखीम घेण्याचे धाडस आणि तंत्रज्ञानातील त्यांची बौद्धिक उंची यांचे फलित मानले जाते. परंपरागत स्पर्धेच्या पलीकडे जाऊन नवीन क्षितिजावर स्वत:च्या नवनिर्मितीचा ठसा उमटवून वेगळे साम्राज्य (कॉस्मिक कॅपिटॅलिझम) उभारण्याच्या त्यांच्या प्रयत्नांना चांगलाच प्रतिसाद मिळत आहे.

उद्योगपती इलॉन मस्क यांच्या या 'पराक्रमा'ची तुलना व्यवस्थापन शास्त्रातील 'ब्ल्यू ओशन रणनीती'शी केली जाते. निळा महासागर सिद्धांत हा डब्ल्यू चॅनकिम आणि रेणेमॉ मॉबॉर्न(र्म्हिवर्स्र्हिंहाा ईर्ल्दुहा) यांनी मांडलेला व्यावसायिक रणनीतीचा क्रांतिकारी दृष्टिकोन आहे.

प्राध्यापकांनी १०० वर्षांच्या कालावधीतील (१८८०-२०००) ३० वेगवेगळ्या उद्योगांमधील १५० धोरणात्मक घडामोडींचे विश्लेषण करणारा एक अनुभवाधारित अभ्यास केला. त्यात त्यांना असे आढळले की, सर्वांत यशस्वी कंपन्या आपल्या प्रतिस्पर्ध्यांना हरविण्याची चिंता करत नव्हत्या, त्याऐवजी त्यांनी बाजारात पूर्णपणे नवीन मागणी निर्माण करून स्पर्धेला अप्रासंगिक ठरविले. त्यातूनच अंतरिक्ष भांडवलशाहीचा उदय झाला. ब्ल्यू ओशन स्ट्रॅटेजी हा केवळ सिद्धांत नसून ती एक शक्तिशाली कार्यपद्धती मानली जाते. ती पारंपरिक स्पर्धेची बंधने तोडून, विविध व्यवसायांत(अस्तित्वात नसलेल्या पण उमलू शकणाऱ्या) सध्याच्या मागणीच्या पलीकडे पहाण्याचे धाडस करून बाजारपेठेच्या सीमांची पुनर्रचना करण्यास, मूल्यवर्धन करण्यास उद्युक्त करते. ब्ल्यू ओशन ही संकल्पना स्पर्धाविरहित बाजारपेठेसाठी वापरली जाते. ही संकल्पना, हा सिद्धांत अशा उद्योगांचे प्रतिनिधित्व करते जे अजून अस्तित्वातही नाहीत.

इलॉन मस्क यांच्या नवीन उत्पादनांमुळे ('स्पेस एक्स' आणि 'टेस्ला') भांडवल शाहीतील एकाधिकारशाहीच्या एका नवीन पर्वाचा उदय झाला असे म्हटले जाते.

एक्सने अंतराळ यात्रेस शासकीय एकाधिकारातून बाहेर काढून मुक्त बाजारपेठेत रूपांतरीत केले. पूर्वी शीतयुद्धाच्या काळात अंतरिक्ष अन्वेषण ही शासनाच्या विविध अभिकर्त्यांची (एजन्सीज) एकाधिकारशाही मानली जात होती. (उदा. नासा, इस्रो इ.) स्पेस एक्सने त्यांत बदल करून खासगीकरणाच्या नव्या युगाची केवळ सुरुवात न करता त्यात आमूलाग्र क्रांती केली.

स्पेस एक्सने अंतराळात हजारो उपग्रहांचे जाळे उभारले आहे. ज्याद्वारे जगभरात अतिवेगवान इंटरनेट सेवा दिली जाते. स्पेस एक्सच्या यशामुळे जागतिक अर्थव्यवस्थेने नवीन ऐतिहासिक टप्पे गाठले असले, तरी त्यमुळे एका नव्या वादास तोंड फुटले आहे. स्पेस एक्सचे 'स्टारशिप अंतराळयान' आणि 'सुपर हेवी रॉकेट' ही एक पूर्णपणे पुनर्वापर करण्यायोग्य वाहतूक प्रणाली आहे. ती पृथ्वीच्या कक्षेत चंद्रावर, मंगळावर आणि त्या पलीकडे अंतराळात मालवाहतुकीसाठी तयार केली आहे. मानवास 'बहुग्रहीय' निवासी बनविणे हा त्यामागचा उद्देश आहे. स्पेस एक्स आणि ब्ल्यू ओरिजिनसारख्या खासगी अंतराळ संस्थांनी पुनर्वापर करता येण्याजोगी रॉकेट्स (उदा. फालकन हेवी) विकसित केल्यामुळे अवकाश मोहिमेचा खर्च मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे. तसेच खासगी पर्यटनाची सुरुवात आणि स्टारलिंक सारख्या उपग्रहांच्या माध्यमातून इंटरनेट कनेक्टिव्हिटी शक्य झाली आहे. चौथी औद्योगिक क्रांती आणि अवकाश भ्रमण यांचे एक सकारात्मक, परस्परपूरक नाते आहे.

वैज्ञानिक प्रगती आणि तंत्रज्ञानाच्या संगमामुळे अवकाश संशोधनात प्रगती होत आहे तर अवकाशातील प्रगतीमुळे नवीन तंत्रज्ञान आणि प्रयोगांची निर्मिती होत आहे. ब्लॉकचेन तंत्रज्ञान, एआय, थ्रीडी प्रिंटिंग, पदार्थ विज्ञान, नॅनोटेक्नॉलॉजी व बायोटेक्नॉलॉजीमधील प्रगतीमुळे लहान उपग्रहांच्या क्षमतेत वाढ होत आहे आणि प्रक्षेपण खर्चात घट होत आहे. परिणामी संशोधनातही सुलभता व नवीन क्षमता निर्माण झाली आहे. अंतरिक्ष भांडवलशाही ही बाह्य अवकाशाचे व्यापारीकरण, अवकाश संशोधनाचे खासगीकरण (न्यू स्पेस) आणि खगोलीय संसाधनांचे उत्खनन याद्वारे चालविली जाणारी एक उदयोन्मुख आर्थिक प्रणाली आहे. ती पृथ्वी आधारित उद्योगांकडून 'भांडवल संचया'चे 'अंतिम सीमे'कडे स्थानांतरण करते. पृथ्वीवरील संसाधनांच्या मर्यादांवर मात करून अवकाश आधारित मालमत्ता, कक्षीय उत्पादन व लघुग्रह खाणकामाचा उपयोग जागतिक विकासासाठी करणे हा त्यामागील उद्देश आहे.

वैश्विक भांडवलशाही दुर्मीळ धातू, हेलियम-३, आणि पाण्याने समृद्ध असलेल्या खगोलीय उपग्रहांना लक्ष्य करून पृथ्वीवरील संसाधनांची कमतरता दूर करण्याचा प्रयत्न करीत आहे. अंतराळ संस्था आणि खासगी संस्था दुर्गम अंतराळ पदार्थांचे व्यापारयोग्य, लाभप्रद, वस्तूंमध्ये रूपांतर करण्यासाठी लघुग्रहांचा पट्टा आणि चंद्राचे अन्वेषण करत आहेत. तसेच अंतराळ भांडवलशाहीत 'अवकाश पर्यटन आणि पायाभूत सुविधा' या बाजारपेठेचे वेगाने व्यापारीकरण होत आहे. खासगी कंपन्या (उदा. स्पेस एक्स, ब्ल्यू ओरिजिन) अवकाश पर्यटन आणि व्यावसायिक कक्षीय स्थानकांसाठी पायाभरणी करत आहेत.

**अन्न हा केवळ व्यापाराचा विषय नसून सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न आहे. ही समस्या अशीच राहिल्यास आपल्या ताटातील अन्न हे पोषणाचे साधन न राहता आजारांचे निमंत्रण ठरण्याचा धोका कायम राहील. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत आपण अनेकदा आरोग्याची काळजी घेत असल्याचा समज करून घेतो. सकाळच्या चहात साखर कमी करतो, व्यायाम करतो, महागडे प्रोटीन सप्लिमेंट्स घेतो, डॉक्टरांचा सल्ला पाळतो. पण या सर्व प्रयत्नांनंतरही एक प्रश्न कायम राहतो, आपण जे खातो ते खरोखर अन्न आहे की रसायनांचे मिश्रण?**

# आरोग्यावर मूक हल्ला


प्रा. डॉ. दयानंद जाधवर




अन्न हा केवळ व्यापाराचा विषय नसून सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न आहे. ही समस्या अशीच राहिल्यास आपल्या ताटातील अन्न हे पोषणाचे साधन न राहता आजारांचे निमंत्रण ठरण्याचा धोका कायम राहील. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत आपण अनेकदा आरोग्याची काळजी घेत असल्याचा समज करून घेतो. सकाळच्या चहात साखर कमी करतो, व्यायाम करतो, महागडे प्रोटीन सप्लिमेंट्स घेतो, डॉक्टरांचा सल्ला पाळतो. पण या सर्व प्रयत्नांनंतरही एक प्रश्न कायम राहतो, आपण जे खातो ते खरोखर अन्न आहे की रसायनांचे मिश्रण? महाराष्ट्रात अलीकडेच अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी राज्यभर सुरू केलेल्या धाडसत्रामुळे अनेक धक्कादायक वास्तव समोर येत आहेत.

पुण्यासह राज्यातील विविध भागांमध्ये खवा, पनीर, तूप, दूध, खाद्यतेल, कृत्रिम रंग मिसळलेला आंबा आणि इतर संशयित खाद्यपदार्थांचे लाखो रुपयांचे साठे जप्त करण्यात आले. काही ठिकाणी बनावट दूधनिर्मिती केंद्रे, अस्वच्छ पनीर कारखाने आणि भेसळयुक्त खाद्यपदार्थ तयार करणाऱ्या यंत्रणांवरही कारवाई झाली. या कारवाया पाहताना सामान्य नागरिकाच्या मनात एक प्रश्न उभा राहतो, आपण रोज जे खातो ते खरोखर अन्नच आहे का? गेल्या काही दशकांपासून आपण भेसळीच्या बातम्या वाचत आलो आहोत. कधी दुधात पाणी मिसळल्याचे उघड होते, कधी सिंथेटिक दूध तयार करणाऱ्या टोळ्या पकडल्या जातात, तर कधी खवा, पनीर, तूप आणि मिठाईमध्ये निकृष्ट पदार्थ मिसळल्याचे समोर येते. काही महिन्यांपूर्वी पुण्यातील कारवाईत कोट्यवधी रुपयांचे भेसळयुक्त दूध, पनीर, तूप व दुग्धजन्य पदार्थ जप्त करण्यात आले होते. प्रयोगशाळेच्या अहवालांमध्ये काही नमुने मानवाच्या आरोग्यासाठी असुरक्षित असल्याचे आढळून आले. एकेकाळी आपल्या घरातील गाय-म्हशीच्या दुधापासून तयार होणारे लोणी, तूप आणि ताक ही आरोग्याची प्रतीके मानली जात होती. आज त्याच दूधसाखळीबद्दल संशय निर्माण होऊ लागला आहे. शहरातील ग्राहकाला दूध, पनीर, चीज, आइस्क्रीम, दही आणि मिठाई यांचे आकर्षक पॅकेज दिसते; पण त्या पॅकेजच्या मागे गुणवत्ता आहे की भेसळ, हा प्रश्न अधिक गंभीर होत चालला आहे.

आज परिस्थिती अशी आहे की सकाळच्या चहातील साखरेपासून ते रात्रीच्या जेवणापर्यंत प्रत्येक पदार्थाबाबत ग्राहकाला सतर्क राहावे लागत आहे. भारतातील अन्नबाजार झपाट्याने बदलत आहे. उत्पादन वाढविण्याची स्पर्धा, कमी खर्चात अधिक नफा मिळविण्याची मानसिकता आणि ग्राहकांच्या आकर्षकतेचा फायदा घेण्याची प्रवृत्ती यामुळे अन्नाच्या गुणवत्तेचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. आज बाजारात मिळणारे अनेक खाद्यपदार्थ पूर्वीच्या नैसर्गिक स्वरूपापेक्षा अधिक चमकदार, अधिक रंगीत आणि अधिक काळ टिकणारे झाले आहेत. पण या आकर्षकतेची किंमत अनेकदा ग्राहकांच्या आरोग्याला मोजावी लागत आहे.

अन्न भेसळ हा भारतासाठी नवीन विषय नाही. पूर्वी दुधात पाणी मिसळणे, मसाल्यांमध्ये निकृष्ट पदार्थ मिसळणे किंवा धान्यात भेसळ करणे एवढ्यापुरती ही समस्या मर्यादित होती.

मात्र आधुनिक अन्न उद्योगाच्या विस्तारानंतर भेसळीचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे झाले आहे. अनेक वेळा भेसळ डोळ्यांना दिसत नाही; ती केवळ प्रयोगशाळेतील तपासणीतच उघड होते.

दूध, तेल, मसाले, मिठाई, प्रक्रिया केलेले पदार्थ आणि फास्ट फूड यांमध्ये विविध रसायनांचा वापर होत असल्याच्या घटना वेळोवेळी समोर येतात. काही प्रकरणांमध्ये हळदीत कृत्रिम रंग, तिखटात रंगद्रव्ये, मिठाईमध्ये निकृष्ट दर्जाचे घटक किंवा तेलामध्ये पुनर्वापराचे प्रमाण आढळले आहे. अशा घटना अपवादात्मक असल्या तरी त्या ग्राहकांच्या विश्वासाला तडा देणाऱ्या आहेत. नॉनव्हेज उद्योगाबाबतही अनेक प्रश्न उपस्थित केले जातात. पोल्ट्री उद्योगातील प्रतिजैविकांचा वापर, पशुखाद्याची गुणवत्ता, तसेच मत्स्यव्यवसायात साठवणूक आणि वाहतुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या पद्धती यांबाबत सातत्याने चर्चा होत असते. काही राज्यांमध्ये माशांमध्ये फॉर्मेलिनसारखे रसायन आढळल्याच्या घटनांनी ग्राहकांची चिंता वाढविली होती. सर्व उत्पादक किंवा सर्व विक्रेते दोषी आहेत असे म्हणणे चुकीचे ठरेल; मात्र अशा घटना अन्नसुरक्षेच्या व्यवस्थेतील त्रुटी अधोरेखित करतात.

फास्ट फूड संस्कृतीने हा प्रश्न आणखी गुंतागुंतीचा केला आहे. चटकदार चव, आकर्षक रंग आणि त्वरित उपलब्धता यामुळे प्रक्रिया केलेल्या पदार्थांचे सेवन वाढले आहे. वारंवार वापरलेले तेल, जास्त मीठ, जास्त साखर आणि जास्त चरबी असलेले पदार्थ दीर्घकालीन आरोग्य समस्यांना निमंत्रण देऊ शकतात. मधुमेह, लठ्ठपणा, उच्च रक्तदाब आणि हृदयविकार यांसारख्या जीवनशैलीजन्य आजारांमध्ये वाढ होत असल्याची नोंद आरोग्य तज्ज्ञ सातत्याने करीत आहेत. या समस्येचा दुसरा पैलू म्हणजे अर्थकारण. अन्न उद्योग हा लाखो कोटी रुपयांचा व्यवसाय आहे. त्यामुळे गुणवत्ता नियंत्रण, तपासणी आणि नियमांची अंमलबजावणी ही मोठी जबाबदारी बनते. भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरण (ऋडडअख) तसेच राज्य यंत्रणा काम करत असल्या तरी देशाच्या विशाल आकारमानामुळे तपासणी यंत्रणेवर मोठा ताण आहे. परिणामी ग्राहकांची जागरूकता हीच पहिली संरक्षणरेषा ठरते.

आज गरज आहे ती भीती निर्माण करण्याची नाही, तर वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारण्याची. प्रत्येक चमकदार वस्तू गुणवत्तापूर्ण असेलच असे नाही आणि प्रत्येक प्रक्रिया केलेला पदार्थ विषारी असेलच असेही नाही. मात्र ग्राहक म्हणून आपण अधिक सजग होणे आवश्यक आहे.

स्थानिक, ताज्या अन्नपदार्थांना प्राधान्य देणे, अन्नपदार्थांवरील लेबले वाचणे, प्रमाणित उत्पादने वापरणे व अनावश्यक प्रक्रिया केलेल्या पदार्थांचे सेवन कमी करणे ही काळाची गरज आहे. आर्थिक विकासाचा खरा अर्थ नागरिकांचे आरोग्य सुरक्षित असणे हा आहे.

जर ताटातील अन्नच संशयाच्या भोवऱ्यात अडकले असेल, तर विकासाची आकडेवारी व जीडीपी वाढ सामान्य माणसासाठी कितपत अर्थपूर्ण ठरेल? म्हणूनच अन्नसुरक्षा ही केवळ आरोग्याची नव्हे तर आर्थिक विकास, मानवी भांडवल आणि सामाजिक न्यायाचीदेखील बाब आहे. निरोगी भारताचा पाया रुग्णालयात नव्हे, तर शुद्ध अन्नाच्या ताटात आहे.

# चांद्रविवरांची गणती

**आज गोष्ट चंद्रावरच्या विवरांची. म्हणजे सोप्या भाषेत खड्ड्यांची पृथ्वीवरच्या अनेक गावांत आणि शहरांत खड्डे असतातचष्ठ मग चांद्रविवरांचं वैशिष्ट्य ते काय? अभ्यासाच्या दृष्टीने या विवरांना खूप महत्त्व आहे. चंद्रावर यान पाठवताना यापैकी खोल खड्डे (विवरं) टाळून योग्य ठिकाणी ते उतरवणं ही एक कसोटीच असते.**



जुलै महिना पावसाचा या तसाच चंद्राचासुद्धा! २० जुलै १९६९ या दिवशी माणसाने चंद्र पादाक्रांत केला. त्यावेळी एसएससीला असलेल्या माझ्यासारख्या विद्यार्थ्यांना या गोष्टीचं अमाप कुतूहल वाटलं होतं. दुसऱ्या दिवशी शाळेत अनेक मराठी वृत्तपत्रांचं वाचन झाले. आमचे विज्ञानाचे मास्तर म्हणाले, 'तुमच्या पिढीने एका वेगवान युगात प्रवेश केला आहे. हा वेग माणसाला कुठवर घेऊन जाईल सांगता यायचं नाही.'

त्यांचं म्हणणं खरं होतं. व्हाएजरच्या रूपाने एक मानवनिर्मित यान सौरमाला ओलांडूनही आता पुढची वाटचाल करतंय. सर्वच क्षेत्रात विज्ञानापायी वेग आलाय. वेगवान प्रवास, वेगवान संपर्कयंत्रणा. काही तासात दूरवर जाण्याची आणि क्षणार्धात पृथ्वीच्या दुसऱ्या टोकावर राहणाऱ्या सुहृदांशी संवाद करण्याची संधी. यापुढे विज्ञानाच्या वेगाविषयी जेन-झी आणि पुढच्या काय त्या अल्फा-बीटा-गॅमा वगैरे पिढ्यांना काहीच वाटणार नाही, पण १९६९ चा मानवी पराक्रम स्तिमित करणारा होता. अर्थात त्याचा आरंभ १९६१ मध्ये युरी गागारिनच्या पहिल्या वहिल्या मानवी अंतराळ प्रवासाने झाला होता.

तेव्हापासून जागं झालं चंद्राविषयीचं वैज्ञानिक कुतूहल. पुढे खगोलशास्त्राचा अभ्यास करताना, दुर्बिणीतून वेगवेगळ्या तिथींना चंद्रदर्शन करताना, चंद्राविषयीची अनेक कोडी उलगडत गेली. अहमदाबादच्या 'पीआरएल' संस्थेत चंद्रावरती खरीखुरी माती पाहिली आणि त्या अबीर-बुक्क्यासारख्या काळ्या मातीने परप्रकाशित 'शुभ्र' चंद्राविषयीचे काही भ्रम आणि कविकल्पना दूर झाल्या. आता चंद्राकडे सजगतेने पाहणं होतं.

आज गोष्ट चंद्रावरच्या विवरांची. म्हणजे सोप्या भाषेत खड्ड्यांची पृथ्वीवरच्या अनेक गावांत आणि शहरांत खड्डे असतातचष्ठ मग चांद्रविवरांचं वैशिष्ट्य ते काय? अभ्यासाच्या दृष्टीने या विवरांना खूप महत्त्व आहे. चंद्रावर यान पाठवताना यापैकी खोल खड्डे (विवरं) टाळून योग्य ठिकाणी ते उतरवणं ही एक कसोटीच असते. शेवटच्या क्षणीही सारा डाव कसा फसतो हे आपण चांद्रयान – २ च्या चंद्रावतरणाच्या वेळी 'याचि डोळा' अनुभवलंय. त्यामुळे उद्या चंद्रावर वसाहत करायची तर तिथला 'प्रदेश' नीट समजून नको घ्यायला? तशी छोटी छोटी चांद्रविवरं मोजायची तर त्यांची संख्या खूपच भरेल. परंतु आंतरराष्ट्रीय खगोल संस्थेने ज्या प्रमुख चांद्रविवरांना मान्यता दिली आहे त्याची संख्या सुमारे ९१३७ एवढी आहे. त्यापैकी १६७५ विवरांचा काल (डेटिंग) निश्चित करता आलेला आहे.

गंमत म्हणजे विवरासाठीचा 'क्रेटर' शब्द इंग्लिशमध्ये आलाय तो ग्रीक भाषेतील शब्दावरून आणि त्याचा अर्थ 'व्हेसल' किंवा 'वाडगा' असा होतो. गॅलिलिओ यांनी सर्वप्रथम, दुर्बिणीद्वारा अवकाशाचा वेध घेतला. त्यावेळी त्यांना म्हणजे ३० नोव्हेंबर १६०९ च्या रात्री चंद्रनिरीक्षण करताना लक्षात आलं की, एकतर चंद्राचा आकार पूर्णपणे 'गोल' नाही आणि गुळगुळीत गोलक तर मुळीच नाही. उलट चांद्रपृष्ठावर डोंगर, दऱ्या आणि गोलाकार खड्डेसुद्धा आहेत. त्याला त्यांनी 'कपा'सारखे (कप-लाइक डिप्रेशन) खड्डे म्हटलं. त्यानंतर १७९१ मध्ये जोहान श्रोटर यांनी या खड्ड्यांना विवर (क्रेटर) म्हटलं. पृथ्वीवरच्या ज्वालामुखीजन्य विवरांकडून त्याना हा शब्द सुचला. चंद्रावरही कधीकाळी व्होल्कॅनिक इरप्शन किंवा ज्वालामुखी उसळले होतेच. त्यात भर म्हणजे लाखो अवकाशी दगड-धोंड्यांनी चांद्रपृष्ठावर लाखो वर्षे सतत मारा केला. परिणामी चंद्राचा पृथ्वीवरून 'मोहक' वाटणारा 'चेहरा' पार खडबडीत झाला.

आजमितीलाही चंद्रावर अशनी पडणं (कमी झालेलं असलं तरी) थांबलेलं नाही. नित्यनवी विवरं तिथे जन्म घेतच असतात. काही वेळा जुन्या विवरांचा आकार बदलतात. १७ मार्च २०१३ रोजी चंद्रावर एक मोठा अशनी अंतराळातून दाणकन् कोसळला. या ४० किलो वजनाच्या अशनीने ताशी ९०,००० किलोमीटर वेगाने चांद्रपृष्ठाला धडक दिली. 'नासा'च्या 'ल्युनार इम्पॅक्ट क्वेटर'चा अभ्यास करणारा एक विभागच आहे. जगातल्या इतर खगोलीय संस्थासुद्धा अशी मोजदाद करत असतात. कॅनडामधल्या टोरॅन्टो विद्यापीठाशी निगडित असलेल्या अभ्यासकांनी २०१८ मध्ये चंद्रावरची ७००० विवरं नोंदली होती. आता हा अभ्यास आणखी सखोल पद्धतीने होत असून चंद्राच्या ३८ दशलक्ष वर्ग पृष्ठावरची सुमारे १,०९,००० विवरं नोंदली गेली आहेत. या सर्व विवरांचा अभ्यास सहज करता येतो, कारण चांद्रपृष्ठावर पाणी (नद्या-ओढे वगैरे) नाहीत. वातावरणही फारच विरळ. त्यामुळे वाऱ्याने धूळ उडवून विवर नष्ट केलं असंही घडत नाही. चांद्रपृष्ठावर एकदा झालेला किंवा केलेला 'इम्पॅक्ट' तसाच राहतो.

# 'ईठा' चित्रपटात त्यांचं खरं नाव का वापरलं नाही?




श्रद्धा कपूरच्या आगामी 'ईठा' या चित्रपटाचा टीझर नुकताच प्रदर्शित झाला. दिग्गज लावणी कलाकार विठाबाई नारायणगावकर यांच्या जीवनावर आधारित असलेला हा चित्रपट वादात सापडला आहे, कारण त्यांच्या कुटुंबाने चित्रपटाच्या नावावर आक्षेप घेतला. विठाबाईंचं नाव चित्रपटाच्या शीर्षकातून का वगळलं असा प्रश्न त्यांनी विचारला आणि या नामवंत लोककलावंताला योग्य सन्मान देण्यासाठी नाव बदलण्याची मागणी केली.

पुढे जोशी म्हणाला, 'पण या प्रकरणात, जर कुटुंब खरं नाव वापरू देण्यास तयार असेल, तर ते चित्रपटाच्या फायद्याचंच ठरेल. कुटुंब किंवा इतर कोणालाही खरं नाव वापरल्यास आक्षेप नाही,

यामुळे चित्रपटाची विश्वासार्हता वाढेल. कारण निर्मात्यांनी ही कथा ज्याची आहे, त्यांना श्रेय दिलंच आहे.'

पाटील यांनी 'एनडीटीव्ही'शी बोलताना सांगितलं की, त्यांचा आक्षेप चित्रपटाला नसून फक्त त्याच्या नावाला आहे. 'विठाबाई नारायणगावकर या आधीच राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळालेल्या कलाकार आणि राष्ट्रपती पुरस्कार विजेत्या होत्या. ग्रामीण महाराष्ट्रात लोक त्यांना प्रेमाने 'ईठा' म्हणायचे.

एक मोठं प्रोडक्शन हाऊस, लक्ष्मण उतेकर यांच्यासारखे नावाजलेले दिग्दर्शक आणि श्रद्धा कपूर एकत्र येऊन एवढा मोठा आणत आहेत. त्यामुळे संपूर्ण भारतातील आणि अगदी जगभरातील लोकही हा चित्रपट पाहतील. त्यामुळे जर त्यांचं मूळ नाव वापरलं तर ते आणखी चांगलं होईल,' असं ते म्हणाले.

तसेच चित्रपटाचे नाव 'ईठा' ठेवल्यामुळे पुढच्या पिढीचा गोंधळ उडू शकतो. भविष्यात कोणाला त्यांच्याबद्दल माहिती हवी असेल तर ते 'विठाबाई' ऐवजी 'ईठा' नावाने शोधतील. त्यामुळे त्यांचं मूळ नाव बदलू नये. जर मूळ नाव ठेवलं, तर आम्हालाही आनंद होईल आणि त्यांच्या कुटुंबालाही आनंद होईल, असं ते म्हणाले.

विठाबाई नारायणगावकर यांच्या कुटुंबियांची मागणी काय?

चित्रपट निर्मात्यांनी हा चित्रपट बनवण्यापूर्वी विठाबाई नारायणगावकर यांच्या कुटुंबाकडून कोणतेही हक्क घेतले नाहीत किंवा त्यांच्याशी सविस्तर चर्चाही केली नाही. मात्र, विठाबाई नारायणगावकर यांचे नातू आणि 'विठाबाई नारायणगावकर तमाशा मंडळाचे' प्रमुख मोहित नारायणगावकर यांनी सांगितलं की कुटुंबाचा चित्रपटाला कोणताही विरोध नाही.

चित्रटाचं स्वागत करतो पण चित्रपटाचे नाव 'ईठा' ऐवजी 'विठा नारायणगावकर' किंवा 'विठाबाई नारायणगावकर' असे असावे, अशी विनंती निर्मात्यांना आहे. दरम्यान या संपूर्ण वादाबद्दल दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर, श्रद्धा कपूर किंवा मॅडॉक फिल्म्स यांपैकी कोणीही कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही.

### वाद टाळण्याचा प्रयत्न

या वादावर 'ईठा' चित्रपटात महत्त्वाची भूमिका साकारणारा अभिनेता अनंत जोशीने प्रतिक्रिया दिली आहे. दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर आणि निर्माते दिनेश विजान यांनी चित्रपटासाठी विठाबाईंचं मूळ नाव का वापरलं नाही, याचं कारण त्याने सांगितलं. 'झूम'शी बोलताना तो म्हणाला, 'सध्या आपण ज्या काळात जगतोय, ते पाहता मॅडॉक फिल्म्स आणि लक्ष्मण सर स्वतःला कोणत्याही वादापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत. जेव्हा तुम्ही खऱ्या व्यक्तींची आणि त्यांची खरी नावं वापरता, तेव्हा बरेचदा वाद नि माण होतात. त्यामुळे सुरुवातीला हा वाद टाळणं एवढाच त्यामागचा उद्देश होता.'

### 'ईठा' चित्रपटाच्या नावावरून वाद

'टीव्ही९ मराठी'च्या वृत्तानुसार, विठाबाई नारायणगावकर यांच्या कुटुंबाने आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने या चित्रपटाच्या नावावर आक्षेप घेतला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या चित्रपट आणि सांस्कृतिक विभागाने चित्रपटाचं नाव विठाबाईंच्या नावावरून का नाही ठेवलं, असा प्रश्न त्यांनी विचारला. तसेच विठाबाईंचा वारसा जपणं आणि त्यांचा आदर व्हायला हवा आणि चित्रपटाच्या नावातून लावणी आणि तमाशा क्षेत्रातील त्यांचं अथांग योगदान दिसून यायला हवं, असं त्यांनी म्हटलं.

# हे आता थांबायला हवं...

अक्षय खन्ना अलीकडच्या काळात त्याच्या दमदार कलाकृतींमुळे प्रचंड चर्चेत आला. अभिनेता गेली अनेक वर्षे इंडस्ट्रीत काम करत आहे पण, गेल्या दोन वर्षांपासून त्याच्या लोकप्रियतेत प्रचंड वाढ झाली असून सोशल मीडियामुळे तरूणांमध्ये त्याची जबरदस्त क्रेझ आहे. २०२५मध्ये प्रदर्शित झालेल्या 'छावा'मधील औरंगजेबाच्या भूमिकेतून त्याने सगळ्यांना अवाक केलं. त्यानंतर 'धुरंधर'सारख्या सुपरहिट चित्रपटात खलनायक साकारत अनेकांकडून कौतुकाची थाप मिळवली. यातील भूमिकेमुळे तर कित्येक दिवस सोशल मीडियासह प्रेक्षकांच्या मनावर त्याने राज्य केलं असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही.

आदित्य धर दिग्दर्शित आणि रणवीर सिंह अभिनीत 'धुरंधर' चित्रपटात त्याने रहमान डकैत ही खलनायकाची भूमिका साकारली होती. यातील त्याच्या अभिनयाने, स्टाईलने आणि हटके अंदाजाने अनेकांना भुरळ घातली. त्यामुळे सर्वत्र त्याची इतकी चर्चा सुरू झाली की कलाकार मंडळींनाही त्यांचं कौतुक करण्याचा मोह आवरला नाही पण, आता याच लोकप्रियतेबद्दल अक्षय खन्नाने प्रतिक्रिया दिली आहे. याबद्दल त्याच्या आगामी 'इक्का' या चित्रपटाचे दिग्दर्शक सिद्धार्थ पी. मल्होत्रा यांनी सांगितलं आहे.


इक्कामधून एकत्र झळकणार सनी देओल – अक्षय खन्ना

'छावा' आणि 'धुरंधर'सारखे ब्लॉकबस्टर चित्रपट दिल्यानंतर अक्षय खन्ना आता 'इक्का' या कोर्टरूम ड्रामामधून झळकणार आहे. त्यामुळे आता थिएटरमध्ये धुमाकुळ घातल्यानंतर या चित्रपटाच्या माध्यमातून अक्षय खन्ना ओटीटी गाजवण्यासाठीही सज्ज आहे. 'इक्का' या चित्रपटात बॉलीवूड अभिनेता सनी देओल मुख्य भूमिकेत आहे तर अक्षय खन्ना यामधून पुन्हा एकदा खलनायकाच्या भूमिकेत झळकणार आहे. बॉलीवूडमधील या दोन दमदार अभिनेत्याने एकाच कलाकृतीतून पाहणं प्रेक्षकांसाठी परवणी ठरेल. स्क्रीनला दिलेल्या मुलाखतीत दिग्दर्शक सिद्धार्थ पी. मल्होत्रा यांनी कोर्टरूम ड्रामाबद्दलचं त्यांचं प्रेम, सनी देओलच्या दमदार प्रतिमेला जपत त्याला नव्या कायदेशीर भूमिकेत दाखवण्याचं आव्हान, 'धुरंधर'नंतर अक्षय खन्नाबरोबर पुन्हा काम करण्याचा अनुभव आणि आताचे प्रेक्षक आणि त्यांचा चित्रपटांकडे पाहण्याचा बदलेला दृष्टीकोण याबद्दल मनमोकळेपणाने संवाद साधला आहे.

दिग्दर्शक म्हणाले, 'या प्रकारच्या कथांकडे मी इतका का ओढलो जातो, हे मलाही माहीत नाही. माझ्या पहिल्या 'वी आर फॅमिली' चित्रपटापासून हा विषय माझ्या मनात आहे. खरं तर हा चित्रपट मला खूप आधीच बनवायचा होता. धर्मा प्रॉडक्शन्समध्ये असल्यापासून मी ही कथा पडद्यावर आणण्याचा प्रयत्न करत होतो. मी करण जोहरला सांगितलं होतं, मला हा चित्रपट करायचा आहे. त्यानेही होकार दिला, पण ते घडलं नाही. त्यानंतर मी आदित्य चोप्राकडे गेलो. आदित्यने माझ्याबरोबर पटकथेवर काम केलं आणि इक्कामध्ये त्यांना त्याचं श्रेयही देण्यात आलं आहे. या चित्रपटाचा प्रवास खूप मोठा होता. अखेर सनी देओल, अक्षय खन्ना आणि नेटफ्लिक्सबरोबर हा चित्रपट ज्या पद्धतीने तयार झाला आहे, त्यापेक्षा चांगलं काही होऊच शकत नव्हतं.'

दिग्दर्शक पुढे याबद्दल म्हणाले, 'हिचकीनंतर माझ्यासमोर ही कथा आली आणि मला वाटलं, ही गोष्ट प्रेक्षकांपर्यंत पोहोचलीच पाहिजे.

त्यानंतर मी महाराज चित्रपट केला. त्यानंतर नेटफ्लिक्ससाठी सनी सरांबरोबर दुसऱ्या एका चित्रपटावर काम करत होतो. मात्र काही कारणांमुळे तो चित्रपट होऊ शकला नाही.



# धर्मावर श्रध्दा......

मनोरंजन विश्वात असे अनेक कलाकार आहेत जे सर्वधर्मसमभाव यावर विश्वास ठेवतात आणि सर्व देवांची पूजा अर्चा करतात. परंतु, काही वेळा यामुळे त्यांच्यावर टीकासुद्धा होते. असंच काहीसं बॉलीवूड अभिनेत्री आणि मॉडेल सांदस मोफकीर बरोबरही झालं.

सध्या तिच्या नव्या स्किनकेअर ब्रँड 'मोरोमा'मुळे चर्चेत ती आहेत. मात्र, ब्रँड लाँचपेक्षा तिच्या घरी पार पडलेल्या पूजेमुळे ती अधिक चर्चेत आली आहे. या पूजेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर काही नेटकऱ्यांनी ती मुस्लीम असूनही पूजा का केली, असा प्रश्न उपस्थित केला. यावर आता सांदसने स्पष्ट आणि सडेतोड उत्तर दिलं आहे.

म्हणून मुस्लीम असूनही केली पूजा

सांदसने तिच्या घरी विधिवत पूजा-अर्चा केली. व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये तिने पिवळ्या रंगाचा ड्रेस परिधान केला असून पारंपरिक लूकमध्ये पाहायला मिळाली. हातात पूजेचं ताट घेऊन देवाची आरती करताना दिसत आहे. यावेळी तिच्या टीममधील सदस्यही उपस्थित होते. नव्या व्यवसायाची शुभ सुरुवात व्हावी, या उद्देशाने तिने या पूजेचं आयोजन केलं होतं. हा व्हिडीओ शेअर करताना सांदसने सांगितलं की, तिने तिच्या नव्या प्रवासाची सुरुवात देवाचा आशीर्वाद घेऊन केली आहे. तिच्या ब्रँडची योग्य दिशेने वाटचाल सुरू राहावी, संपूर्ण टीम सुरक्षित राहावी आणि प्रत्येकाच्या मनात चांगले विचार कायम राहोत, अशी तिने प्रार्थना केली. तसेच, कोणतंही यश एकट्याचं नसतं, तर संपूर्ण टीमच्या मेहनतीवर, विश्वासावर आणि एकजुटीवर ते उभं राहतं, असंही तिने म्हटलं.

मात्र, हा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर सोशल मीडियावरील नेटकऱ्यांनी ती मुस्लीम असूनही हिंदू पद्धतीने पूजा का केली, असा प्रश्न उपस्थित केला. ट्रोलिंग वाढल्यानंतर सांदसने यावर स्पष्ट भूमिका मांडली. मुस्लीम असल्याचा मला अभिमान आहे आणि माझा धर्म हा माझ्या ओळखीचा महत्त्वाचा भाग आहे, असं तिने ठामपणे सांगितलं. सांदसने सांगितलं की, तिच्या टीममध्ये अनेक हिंदू लोक आहेत. नव्या व्यवसायाची सुरुवात करण्यापूर्वी या खास प्रसंगी तिच्या टीमलाही आध्यात्मिकदृष्ट्या जोडलेलं वाटावं, अशी तिची इच्छा होती. ती म्हणाली, 'ज्या प्रकारे माझी टीम माझ्या मुस्लीम धार्मिक कार्यक्रमांचा आदर करते, त्याचप्रमाणे मीही त्यांच्या श्रद्धा आणि धार्मिक परंपरांचा सन्मान करते. एक चांगली टीम तीच असते, जिथे प्रत्येकजण आपापल्या धर्मावर श्रद्धा ठेवत असतानाच एकमेकांच्या विश्वासाचाही आदर करतो.'



# करिश्मा बद्दल ऐकलेल्या गोष्टी खोट्या



बॉलिवूड अभिनेत्री शिल्पा शिरोडकर यांनी नुकताच १९९४ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'गोपी किशन' चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान घडलेला एक खास आणि फारसा न ऐकलेला किस्सा सांगितला. या आठवणीतून त्यांनी अभिनेत्री करिश्मा कपूरच्या साधेपणाचे आणि सहकलाकारांविषयीच्या आदराचे कौतुक केले. अनेकजण करिश्माबद्दल वेगवेगळ्या चर्चा करत असत, पण प्रत्यक्षात ती कशी वागायची, याचा अनुभव शिल्पांनी सर्वांसमोर मांडला.

शिल्पा शिरोडकर या 'इंडियाज बेस्ट डान्सर सीझन ५' या रिअ?लिटी शोमध्ये विशेष पाहुण्या म्हणून सहभागी झाल्या होत्या. यावेळी त्यांनी 'गोपी किशन' चित्रपटाच्या शूटिंगमधील आठवणींना उजाळा दिला. त्या म्हणाल्या की, त्या काळात आजच्यासारख्या कलाकारांसाठी व्हॅनिटी व्हॅनची सुविधा नव्हती. मर्यादित साधनांमध्येच संपूर्ण चित्रपटाचे चित्रीकरण केले जात असे.

शिल्पा यांनी सांगितले की, चित्रपटाचे शूटिंग भल्ला बंगल्यात सुरू होते. त्या ठिकाणी संपूर्ण कलाकारांसाठी फक्त दोन मेकअप रूम उपलब्ध होत्या. त्या दिवशी त्यांचे आणि सुनील शेट्टी यांचे चित्रीकरण असल्यामुळे दोघांसाठी स्वतंत्र मेकअप रूमची व्यवस्था करण्यात आली होती. मात्र, दुसऱ्या दिवशी करिश्मा कपूरच्या शूटिंगचे वेळापत्रक असल्याचे समजताच निर्मिती टीमसमोर अडचण निर्माण झाली. तीन कलाकारांसाठी फक्त दोन मेकअप रूम कशा पुरणार, असा प्रश्न त्यांच्यासमोर होता.

ही अडचण दूर करण्यासाठी निर्मिती टीमने शिल्पा शिरोडकर यांच्याकडे मदत मागितली. त्यावर शिल्पा यांनी कोणताही विचार न करता एक सोपा उपाय सुचवला. त्या म्हणाल्या की, त्या आणि सुनील शेट्टी एकाच मेकअप रूमचा वापर करतील आणि मोठी खोली करिश्मा कपूरला द्यावी. करिश्मा त्या सेटवर पहिल्यांदाच शूटिंगसाठी येत असल्याने तिची योग्य व्यवस्था व्हावी, अशी त्यांची इच्छा होती. शिल्पांच्या मते, त्यांना या व्यवस्थेबाबत कोणतीही अडचण नव्हती, कारण कलाकारांना फक्त मेकअप करून पोशाख बदलायचा होता.

मात्र, दुसऱ्या दिवशी करिश्मा कपूर सेटवर आल्यानंतर संपूर्ण परिस्थिती बदलली. तिने सर्व कलाकार आणि युनिट सदस्यांची भेट घेतली. काही वेळानंतर तिला मेकअप रूमच्या व्यवस्थेबद्दल माहिती मिळाली. हे समजताच तिने लगेच विचारले की, 'जर फक्त दोनच मेकअप रूम असतील, तर सुनील शेट्टी कुठे तयार होत आहेत?'

# क्रिती सेनॉनची रोमँटिक पोस्ट

बॉलीवूड अभिनेत्री क्रिती सेनॉन ही तिच्या 'कॉकटेल २' चित्रपटामुळे चर्चेमध्ये आली आहे. शाहिद कपूर व रश्मिका मंदानासह तिने या सिनेमामध्ये मुख्य भूमिका साकारली असून तिच्या अभिनयाचे सर्वत्र कौतुक झाले आहे. क्रिती ही तिच्या चित्रपटांसह वैयक्तिक आयुष्यामुळेसुद्धा चर्चेत असते. काही दिवसांपासून क्रिती आणि तिचा कथित बॉयफ्रेंड कबीर यांच्या ब्रेकअपच्या चर्चांना उधाण आले होते. कबीरचा दुसऱ्या मुलीसह फोटो व्हायरल झाल्याने त्याने क्रितीबरोबर नाते संपवल्याच्या चर्चा सुरु होत्या. मात्र, आता क्रितीने या चर्चांना पूर्णपणे थांबवले असून बिझनेसमन कबीर बहियासह तिने खास फोटो शेअर केला आहे, यामुळे क्रिती व कबीर यांचे ब्रेकअप न होता त्यांचे नाते अजूनही टिकून असल्याचे जाहीर झाले आहे.

क्रिती सेनॉन ही सोशल मीडियावर सक्रिय असून ती तिच्या वैयक्तिक आयुष्याच्या अपडेट चाहत्यांशी शेअर करत असते. नुकतेच तिने इन्स्टाग्रामवर अर्धे वर्ष पूर्ण झाल्यामुळे काही खास फोटो पोस्ट केले आहेत. गेल्या सहा महिन्यांत काढलेले हे फोटो तिने शेअर केले आहेत. या पोस्टमध्ये सुट्ट्यांचे क्षण, कुटुंबासह घालवलेला वेळ, तिचे सेल्फी आणि पडद्यामागचे काही खास क्षण शेअर केले आहेत. रश्मिकासह शूटिंगवेळी घेतलेला फोटोचा यामध्ये समावेश आहे. यातील सर्वात जास्त चर्चा ही तिच्या कथित बॉयफ्रेंडच्या फोटोची रंगली आहे. तिने इन्स्टाग्रामवर कबीर बहियासह एक खास फोटो पोस्ट केला असून, यामध्ये दोघेही एका 'लाइव्ह परफॉर्मन्स'चा आनंद घेताना दिसत आहेत.



### क्रिती सेनॉनचा बॉयफ्रेंडसह खास फोटो

या फोटोमध्ये कबीरने पारंपरिक पोशाख परिधान केला असून शेरवानी स्टाईल केली आहे, तर क्रितीने कॅज्युअल काळी 'हुडी' स्टाईल केली आहे. दोघेही एकमेकांच्या खांद्यावर हात ठेवून लाईव्ह परफॉर्मन्स बघत असल्याचे दिसून येत आहे. पाठीमागून काढलेल्या या फोटोमध्ये त्यांचे चेहरे स्पष्टपणे दिसत नसले तरी चाहत्यांनी त्यांना ओळखले आहे.

क्रिती व कबीर यांच्या ब्रेकअपच्या चर्चा रंगलेल्या असताना तिने शेअर केलेल्या फोटोमुळे त्यांच्यातील ब्रेकअपच्या अफवा पूर्णपणे खोट्या असल्याची खात्री चाहत्यांना पटली आहे. हे फोटो शेअर करताना क्रितीने कॅप्शनमध्ये लिहिले आहे, 'अर्ध्या वर्षाची झलक! काही क्षण जे कधीच 'इन्स्टाग्राम'वर आले नाहीतष्ठ (आणि काही कधीच येणार नाहीत).' या कॅप्शनमुळे तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दलची उत्सुकता तिने आणखी वाढवली आहे.

सोशल मीडियावर कबीरचा एक फोटो तुफान व्हायरल झाला होता. यामध्ये तो दुसऱ्या महिलेसह लग्नाला उपस्थित असल्याचे दिसून आले होते.

हा फोटो व्हायरल झाल्यानंतर क्रिती आणि कबीर यांच्यात ब्रेकअप झाला असल्याचा दावा केला जात होता. मात्र, आता त्या केवळ अफवा असून ते अजूनही एकमेकांना डेट करत असल्याचे क्रितीने अप्रत्यक्षरित्या जाहीर केले आहे.

# रात्री तोंडात लवंग ठेवून झोपताय?



दिवसभराचा थकवा असूनही रात्री अंथरुणावर पडल्यावर अनेकांना बऱ्याचदा झोप लागत नाही; तर मध्यरात्री गाढ झोपेत असताना काहीजण अचानक खडबडून जागे होतात. परिणामी अपुरी झोप होणे ही आता एक सामान्य समस्या झाल्याने अनेकांनी त्यावर घरगुती उपाय शोधण्यास सुरुवात केली आहे. यादरम्यान रात्री झोपण्यापूर्वी तोंडात लवंग ठेवल्यास खूप चांगली आणि शांत झोप लागते, असा दावा समाजमाध्यमांवर केला जात आहे; पण या दाव्यात खरंच काही तथ्य आहे का? त्याबाबत तज्ज्ञ काय सांगतात?

**शरीरासाठी झोप का महत्त्वाची आहे?**

झोप ही केवळ विश्रांतीसाठीच नव्हे तर शरीरातील अनेक प्रक्रियांसाठी महत्त्वाची असते. दिवसभराच्या थकव्यानंतर मेंदूला पुन्हा ताजेतवाने करण्यासाठी शरीराला झोपेची अत्यंत आवश्यकता असते. शरीरातील रोगप्रतिकारशक्ती मजबूत ठेवण्याचे काम झोपेद्वारे होते. त्याशिवाय स्मरणशक्ती सुधारण्याची प्रक्रियाही झोपेदरम्यानच घडते.

पुरेशी झोप घेतल्यास मधुमेहासह हृदयविकार आणि लठ्ठपणा यांसारख्या गंभीर आजारांचा धोका कमी होतो. त्यामुळेच झोपेची वेळ आणि कालावधी याकडे गांभीर्याने लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे. तज्ज्ञांच्या मते, विचारांमधील फेरबदल ही पद्धत झोपेच्या समस्यांवर नैसर्गिक उपाय म्हणून काम करू शकते. या पद्धतीचा रात्री नियमित वापर केल्यास मेंदू शांत होऊन लवकर झोप येण्यास मदत होते.

**लवंगामुळे चांगली झोप लागते का?**

मुंबईतील परळ येथील ग्लेनईगल्स रुग्णालयातील तज्ज्ञ डॉ. हरीश चाफळे यांनी लवंग आणि झोपेच्या दाव्याबाबत स्पष्ट भूमिका मांडली. रात्री झोपण्यापूर्वी तोंडात चावलेली लवंग ठेवल्याने झोपेचा दर्जा सुधारतो किंवा चांगली झोप येते, याचा कोणताही वैज्ञानिक पुरावा उपलब्ध नाही. मात्र, लवंगामध्ये असलेल्या सौम्य शांत करणाऱ्या गुणधर्मांमुळे काही व्यक्तींना थोडा आराम वाटू शकतो. तरीही निरोगी आणि शांत झोप येण्यासाठी चांगल्या सवयी अंगीकारणे हेच सर्वाधिक महत्त्वाचे आहे. झोपेची वेळ ठरवणे सोपे असले तरीही आजच्या धावपळीच्या जीवनात तिचे पालन करण्यात अनेकदा दुर्लक्ष होते. मात्र, काही सोप्या सवयी अंगीकारल्यास निरोगी आणि दर्जेदार झोपेची सवय सहज लावता येऊ शकते, असे डॉ. हरीश यांनी स्पष्ट केले.

**लवंग खरोखरच मन शांत करते का?**

लवंगामध्ये 'युजेनॉल' सारखी अनेक नैसर्गिक संयुगे असतात, जे आपल्या शरीरातील पेशींना खराब होण्यापासून वाचवण्याचे मुख्य काम करतात. याशिवाय त्यामध्ये शरीराला सौम्य आराम देणारे गुणधर्मदेखील आढळून येतात; परंतु या घटकांचा झोपेवर आणि मानसिक ताण कमी करण्यावर थेट काही परिणाम होतो का? हे अद्याप कोणत्याही संशोधनातून सिद्ध झालेले नाही. लवंग खाल्ल्यामुळे जर कोणाला आराम वाटत असेल, तर तो अतिशय किरकोळ असू शकतो. त्यामुळेच या उपायाकडे झोपेच्या समस्येवरील उपचार म्हणून पाहिले जाऊ शकत नाही, असे डॉ. हरीश यांनी दी इंडियन एक्स्प्रेसला सांगितले.

**तोंडात लवंग ठेवून झोपणे सुरक्षित आहे का?**

झोपण्यापूर्वी तोंडात लवंग ठेवण्याचा उपाय अनेकजण करत असले, तरी ती पूर्णपणे सुरक्षित आहे, असे म्हणता येणार नाही. रात्री तोंडात लवंग ठेवून झोपल्यास ती झोपेत चुकून श्वासनलिकेत जाण्याचा किंवा घशात अडकण्याचा धोका असू शकतो. विशेषतः झोपेत लवंग श्वासावाटे आत गेल्यास गंभीर समस्या निर्माण होऊ शकते. तसेच, दीर्घकाळ लवंग तोंडात ठेवल्यास काही व्यक्तींमध्ये हिरड्या किंवा तोंडातील ऊतींना त्रास होण्याची शक्यता असते. लवंगाचे कमी प्रमाणात सेवन सामान्यतः सुरक्षित मानले जाते; पण तिचा अतिवापर केल्यास काही दुष्परिणाम दिसू शकतात. लवंगाचे जास्त प्रमाणात सेवन केल्यास तोंडात जळजळ होणे, पोटदुखी किंवा अस्वस्थता जाणवणे, तसेच काही व्यक्तींमध्ये ?लर्जीची प्रतिक्रिया होऊ शकते, असा इशारा डॉ. हरीश यांनी दिला.

**लवंग झोपेसाठी रामबाण उपाय नाही**

झोपण्यापूर्वी लवंग तोंडात ठेवल्याने झोपेची गुणवत्ता लक्षणीयरीत्या सुधारते, हा केवळ एक समज असून त्यामागे ठोस वैज्ञानिक पुरावे नाहीत, असेही डॉ. चाफळे यांनी स्पष्ट केले. झोपण्यापूर्वी तोंडात लवंग ठेवणे हा पारंपरिक घरगुती उपाय असला तरी झोप सुधारण्यासाठी वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झालेला उपाय नाही. सुरक्षित पद्धतीने वापरल्यास काही व्यक्तींना थोडासा आराम किंवा मानसिक समाधान मिळू शकते. मात्र, निद्रानाश किंवा झोपेच्या इतर समस्यांवर ती प्रभावी उपचार ठरू शकत नाही, ज्यांना झोपेशी संबंधित समस्या आहेत, त्यांनी घरगुती उपायांवर अवलंबून न राहता वैद्यकीय सल्ला घ्यावा असेही त्यांनी नमूद केले.

**शांत झोप येण्यासाठी काय करावे?**

तज्ज्ञांच्या मते, काही सोप्या सवयी अंगीकारल्यास निरोगी आणि दर्जेदार झोपेची सवय सहज लावता येऊ शकते. चांगल्या आरोग्यासाठी प्रत्येकाने दररोज झोपण्याची आणि सकाळी उठण्याची एकच वेळ निश्चित करायला हवी. अगदी सुट्टीच्या दिवशीही याच वेळापत्रकाचे पालन करायला हवे. रात्री झोपण्याआधी बेडरूममधील लाईट्स बंद केल्यास अंधारात लवकर झोप येते. झोपण्यापूर्वी किमान एक तास मोबाईल, लॅपटॉप किंवा टीव्ही पाहणे बंद करायला हवे; त्याऐवजी एखादे पुस्तक वाचण्याची सवय लावल्यास लवकर झोप येते. रात्री जड जेवण किंवा मद्यपान केल्यास झोपेच्या चक्रात अडथळा येतो. त्याऐवजी सुका मेवा किंवा फळांसारखे हलक्या पदार्थांचे सेवन करायला हवे, जेणेकरून रक्तातील साखर संतुलित ठेवण्यास मदत होते. सकाळी उठल्यानंतर नियमित योगा किंवा व्यायाम केल्यास रात्री अधिकच शांत झोप



# दात घासण्याची 'ही' पद्धत चुकीची!

दं ततज्ज्ञांच्या मते, ब्रश करताना होणाऱ्या काही चुका दातांवरील संरक्षणात्मक थर म्हणजेच एनॅमल झिजवतात आणि हिरड्यांत सूज किंवा रक्त येण्याची समस्या निर्माण करू शकतात.म्दात स्वच्छ आणि चमकदार ठेवण्यासाठी आपण रोज ब्रश करतो, तोंड ताजेतवाने राहावे म्हणून माउथवॉशचाही वापर करतो. तरीही काही दिवसांनी थंड किंवा गरम काहीही खाल्ले की दात कळायला लागतात. कधी हिरड्यांतून रक्त येते, तर कधी दाढ दुखू लागते. तोंडाची स्वच्छता ठेवूनही ओरल हेल्थ चांगली राहत नाही. यामागचे एक मोठे कारण म्हणजे दात स्वच्छ करण्याची चुकीची पद्धत. अनेकदा नकळत केलेल्या काही छोट्या चुका दात आणि हिरड्यांना मोठे नुकसान पोहोचवू शकतात. दंततज्ज्ञांच्या मते, ब्रश करताना होणाऱ्या काही चुका दातांवरील संरक्षणात्मक थर म्हणजेच एनॅमल

# हळद त्वचेला फायदेशीर

ह ळद हा भारतीय स्वयंपाकातील सर्वांत महत्त्वाच्या मसाल्यांपैकी एक आहे. तिचा वापर डाळ, भाजी, आमटी, सांबार, बिर्याणी, लोणचे आणि विविध प्रकारच्या ग्रेव्हीमध्ये रंग, चव व सुगंध वाढवण्यासाठी केला जातो. हळदीमध्ये असलेले कर्क्युमिन हे नैसर्गिक संयुग अँटिऑक्सिडंट आणि दाहशामक गुणधर्मांसाठी ओळखले जाते. त्यामुळे हळद हा केवळ हा गरम मसाला नसून, ती भारतीय आहाराचा आरोग्यदायी भाग मानली जाते. पारंपरिक भारतीय घरांमध्ये हळदीचा वापर स्वयंपाकाबरोबरच दूध, घरगुती उपाय आणि धार्मिक विधींमध्येही मोठ्या प्रमाणावर केला जातो. त्याशिवाय हळदीचा वापर सौंदर्यप्रसाधन म्हणूनदेखील केला जातो.

हळदीचा वापर भारतीय परंपरेत सौंदर्यप्रसाधन म्हणूनही अनेक वर्षांपासून केला जात आहे. फेसपॅक, उटणे, स्किन केअर क्रीम, साबण आणि हर्बलच्या सौंदर्य उत्पादनांमध्ये हळदीचा समावेश केला जातो. हळदीतील कर्क्युमिन हा घटक अँटिऑक्सिडंट व दाहशामक या गुणधर्मांसाठी ओळखला जातो. त्यामुळे त्वचेची निगा राखण्यास मदत होऊ शकते. लग्न समारंभातील हळद लावण्याची परंपराही त्वचेचा नैसर्गिक उजाळा वाढवण्याशी जोडली जाते. परंतु, प्रत्येकाच्या त्वचेसाठी हळद लावणे फायदेशीर नाही.

हळद अनेकांच्या त्वचेसाठी फायदेशीर ठरू शकते. मात्र, संवेदनशील त्वचा असलेल्या काही व्यक्तींमध्ये तिचा वापर केल्याने दुष्परिणाम दिसू शकतात. काहींना त्वचेवर लालसरपणा, खाज, जळजळ, पुरळ किंवा कोरडेपणा जाणवू शकतो. विशेषतः हळद जास्त वेळ चेहऱ्यावर ठेवणे किंवा वारंवार वापरणे त्वचेला त्रासदायक ठरू शकते. त्यामुळे संवेदनशील त्वचा असल्यास हळदीचा कोणताही फेसपॅक



किंवा सौंदर्यप्रसाधन वापरण्यापूर्वी हाताच्या आतील भागावर पॅच टेस्ट करावी. त्रास जाणवल्यास वापर त्वरित थांबवावा आणि आवश्यक असल्यास त्वचारोगतज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

कोरड्या त्वचेवर हळदीचा वापर करताना काळजी घेणे आवश्यक आहे. हळद स्वतः सर्वांसाठी कोरडेपणा निर्माण करते, असे नाही; परंतु काही घरगुती फेसपॅकमध्ये ती बेसन, माती किंवा इतर घटकांसोबत वापरल्यास त्वचा अधिक कोरडी वाटू शकते. त्यामुळे कोरडी त्वचा असलेल्या व्यक्तींना ताण जाणवणे, खवले पडणे किंवा सौम्य जळजळ होणे असे त्रास शक्यता असते. अशा त्वचेसाठी हळद वापरताना दही, दूध, कोरफड जेल किंवा मध यांसारख्या मॉइश्चरायझिंग घटकांसोबत वापरणे अधिक योग्य ठरू शकते. वापरानंतर सौम्य मॉइश्चरायझर लावणे आणि प्रथम पॅच टेस्ट करणेही महत्त्वाचे आहे.

एक्झिमा किंवा सोरायसिस असलेल्या व्यक्तींनी त्वचेवर हळद लावताना विशेष काळजी घ्यावी.

काही संशोधनांमध्ये हळदीतील कर्क्युमिन या घटकाचे दाहशामक गुणधर्म दिसून आले असले तरी हळद सर्वांनाच सारखाच फायदा देईल, असे निश्चितपणे सांगता येत नाही. काही लोकांमध्ये हळद किंवा हळदयुक्त उत्पादनांमुळे त्वचेची जळजळ, लालसरपणा, खाज किंवा ॲलर्जिक प्रतिक्रिया वाढू शकते. त्यामुळे एक्झिमा किंवा सोरायसिस असल्यास कोणतेही घरगुती उपाय करण्यापूर्वी त्वचारोगत ज्ञांचा सल्ला घेणे योग्य ठरते.

# आल्याचा चहा आरोग्यासाठी चांगला

आ ल्याचा चहा अनेकांच्या दिवसाची सुरुवात करण्याचा अविभाज्य भाग असतो. सर्दी-खोकला, अपचन किंवा थकवा दूर करण्यासाठीही अनेकजण आल्याचा चहा आवर्जून पितात. मात्र, तो आरोग्यासाठी फायदेशीर आहे म्हणून दिवसातून वारंवार पिणे योग्य नाही. तज्ज्ञांच्या मते, आल्याचे अतिसेवन काही लोकांसाठी त्रासदायक ठरू शकते.

दिवसातून किती आलं सुरक्षित?



आरोग्य तज्ज्ञांच्या मते, दिवसाला ४ ग्रॅमपेक्षा जास्त आल्याचे सेवन टाळावे. केवळ चहातून हे प्रमाण गाठणे कठीण असले, तरी दिवसभर आल्याचा चहा, काढा किंवा आल्याचे इतर पदार्थ घेतल्यास हे प्रमाण सहज वाढू शकते.

या व्यक्तींनी विशेष काळजी घ्यावी- पित्ताशयाशी संबंधित आजार असलेले, कमी रक्तदाबाचा त्रास असलेले, रक्तदाबाची औषधे घेणारे, रक्त पातळ करणारी औषधे घेणारे, रक्तस्रावाचा त्रास असलेले.

# घरातील नकारात्मकता दूर करा......

घ राचे मुख्य द्वार नेहमी स्वच्छ ठेवा. लिंबाचा रस मिसळलेल्या पाण्याने दरवाजांची कुलपे आणि खिडक्या स्वच्छ करा.

असे केल्याने घरात सकारात्मक ऊर्जेचा प्रवाह चालू राहील. दररोज सकाळी घर स्वच्छ केल्यानंतर, पाण्यात खडे मीठ घालून मॉपने स्वच्छ करा. जर तुम्ही हे दररोज करू शकत नसाल तर हे काम मंगळवार आणि शनिवारी करा.

असे केल्याने नकारात्मक ऊर्जा नाहीशी होईल आणि सकारात्मक ऊर्जा प्रवेश करेल.




# अंडी की सोयाबीन?



सो याबीन हे वनस्पतीजन्य प्रथिनांचे सर्वोत्तम स्रोत मानले जाते. त्यात शरीरासाठी आवश्यक असलेली सर्व नऊ अत्यावश्यक अमिनो ॲसिड्स असतात. १०० ग्रॅम सुक्या सोया चंक्समध्ये सुमारे ५२ ग्रॅम प्रथिने आणि १३ ग्रॅम फायबर असते. तसेच त्यात चरबी कमी असल्याने ते हृदयाच्या आरोग्यासाठी आणि वजन नियंत्रणासाठीही उपयुक्त मानले जाते. दुसरीकडे, अंडी हे उच्च दर्जाच्या प्रथिनांचे उत्तम स्रोत आहेत.

एका अंड्यात साधारण ६ ग्रॅम प्रथिने मिळतात. याशिवाय व्हिटॅमिन बी१२, व्हिटॅमिन डी, कोलीन आणि आरोग्यदायी चरबीसारखे महत्त्वाचे पोषक घटकही अंड्यांमधून मिळतात. अंड्यातील प्रथिने शरीराला सहज पचतात आणि प्रभावीपणे शोषली जातात.

प्रथिनांची तुलना- १०० ग्रॅम सुक्या सोया चंक्स- सुमारे ५२ ग्रॅम प्रथिने २५ ग्रॅम सुक्या सोया चंक्स- १३ ग्रॅम प्रथिने

मग सर्वोत्तम पर्याय कोणता?

प्रथिनांच्या प्रमाणाच्या बाबतीत सोयाबीन आघाडीवर असले, तरी प्रथिनांची गुणवत्ता, पचनक्षमता आणि पोषक मूल्यांचा विचार केला तर अंडी अधिक प्रभावी मानली जातात. अंड्यांमध्ये असलेले व्हिटॅमिन बी- १२ आणि कोलीनसारखे काही महत्त्वाचे पोषक घटक सोयामध्ये नसतात किंवा अत्यल्प प्रमाणात असतात.

त्यामुळे, अंड्यांऐवजी केवळ सोयाबीन दिल्यास प्रथिनांची गरज काही प्रमाणात पूर्ण होऊ शकते;

मात्र इतर आवश्यक पोषक घटकांची भरपाई करण्यासाठी आहारात अतिरिक्त पोषक पदार्थांचा समावेश करणे गरजेचे ठरते. त्यामुळे तज्ज्ञांच्या मते, मुलांच्या संतुलित पोषणासाठी एकाच पदार्थावर अवलंबून न राहता विविध अन्नघटकांचा समावेश असलेला आहार अधिक योग्य ठरतो.

# पावसाळ्यात कुरडूची भाजी का खावी?

पा वसाळ्यात बाजारात विविध प्रकारच्या हिरव्या पालेभाज्या उपलब्ध होतात. या भाज्या चविष्ट असण्यासोबतच पौष्टिकही असतात. आयुर्वेदानुसार या दिवसांत योग्य भाज्यांचा आहारात समावेश केल्यास रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास आणि शरीर निरोगी ठेवण्यास मदत होते. अशाच पावसाळ्यात मिळणाऱ्या ङङकुरडूच्या पानांबद्दलङङ आयुर्वेद तज्ज्ञांनी महत्त्वाची माहिती दिली आहे. आयुर्वेद तज्ज्ञांच्या मते, कुरडूची पाने ही केवळ पावसाळ्यात उपलब्ध होणारी पालेभाजी असून ती आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर मानली जाते. या पानांचा भाजी, सॅलड किंवा इतर पदार्थांमध्ये वापर करता येतो.

कुरडूची पाने खाण्याचे फायदेआयुर्वेदात कुरडूची पाने रक्तशुद्धी करणारी मानली जातात.

शरीरातील सूज कमी करण्यास आणि सांधेदुखीचा त्रास कमी करण्यास मदत होऊ शकते.पावसाळ्यातील आहारात या पानांचा समावेश केल्यास शरीराला आवश्यक पोषक घटक मिळण्यास मदत होते.

नियमित आणि संतुलित प्रमाणात सेवन केल्यास एकूण आरोग्याला फायदा होऊ शकतो.

रक्त शुद्ध होते हा आयुर्वेदातील पारंपरिक उल्लेख आहे. आधुनिक वैद्यकीय शास्त्रात याबाबत मर्यादित वैज्ञानिक पुरावे उपलब्ध आहेत. त्यामुळे कोणत्याही आरोग्य समस्येसाठी डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

**पावसाळ्यात खाण्यासाठी इतर उपयुक्त भाज्या**

**कारले:** व्हिटॅमिन सीचा चांगला स्रोत असून रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास मदत करते.

परवळ: यकृताच्या आरोग्यासाठी उपयुक्त मानली जाते.

**दुधी भोपळा:** शरीराला थंडावा देतो, पचनास मदत करतो आणि त्यात व्हिटॅमिन बी, सी, मॅग्नेशियम, फॉस्फरस व लोह असते.

**टिंडा:** कॅरोटीन, जीवनसत्त्वे आणि अँटीऑक्सिडंट्सचा स्रोत.

**दोडका:** चण्याच्या डाळीसोबत बनविल्यास पौष्टिक आणि चविष्ट ठरतो.

**भेंडी:** व्हिटॅमिन केचा चांगला स्रोत असून हृदयाच्या आरोग्यासाठी उपयुक्त मानली जाते.

# फ्रिजशिवाय टोमॅटो ठेवा ताजे



टो मॅटो हा स्वयंपाक घरातील अत्यावश्यक घटक आहे. मात्र, जास्त प्रमाणात आणलेले टोमॅटो काही दिवसांतच मऊ पडणे किंवा खराब होणे ही सामान्य समस्या आहे. अनेकजण ते थेट फ्रिजमध्ये ठेवतात, पण प्रत्येक वेळी हा सर्वोत्तम पर्याय ठरत नाही. खाद्यतज्ज्ञांच्या मते, कच्चे किंवा अर्धवट पिकलेले टोमॅटो फ्रिजमध्ये ठेवल्यास त्यांच्या नैसर्गिक चवीवर आणि पोतावर परिणाम होऊ शकतो. थंड तापमानामुळे पिकण्याची प्रक्रिया थांबते आणि टोमॅटोची चव कमी होऊन गर दाणेदार होण्याची शक्यता असते.

देठाची बाजू खाली ठेवून साठवा- यामुळे टोमॅटोतील ओलावा कमी प्रमाणात बाहेर पडतो आणि ते अधिक काळ रसदार राहतात.

देठावर हलका टेप लावा- जागेची अडचण असल्यास देठाच्या भागावर हलक्या हाताने टेप लावल्यास ओलावा टिकून राहण्यास मदत होते.

थेट सूर्यप्रकाशापासून दूर ठेवा – उष्णता आणि सूर्यप्रकाशामुळे टोमॅटो लवकर मऊ होतात.

एकाच थरात ठेवा- टोमॅटो एकावर एक रचल्यास दाबामुळे ते लवकर खराब होऊ शकतात.

केळी आणि सफरचंदापासून दूर ठेवा- ही फळे इथिलीन वायू सोडतात, ज्यामुळे टोमॅटो झपाट्याने पिकून सडण्याची शक्यता वाढते.

वापरण्यापूर्वीच धुवा- आधीच धुतल्यास अतिरिक्त ओलाव्यामुळे बुरशी येण्याचा धोका वाढतो.

टोमॅटो पूर्णपणे पिकलेले असतील आणि ते लगेच वापरणार नसाल, तर फ्रिजमध्ये ठेवणे योग्य ठरते. मात्र, खाण्याच्या किंवा स्वयंपाकासाठी वापरण्याच्या सुमारे ङङ३० मिनिटे आधी ते बाहेर काढल्यास त्यांची चव आणि सुगंध अधिक चांगला अनुभवता येतो.

या सोप्या उपायांचा अवलंब केल्यास फ्रिजशिवायही टोमॅटो अधिक काळ ताजे, रसदार आणि चविष्ट राहू शकतात.

> तुम्ही आयकर विवरणपत्र दाखल करणार असाल तर तुमच्यासाठी ही कामाची बातमी आहे. यावर्षी, आटीआर भरण्याची अंतिम मुदत ३१ जुलै आहे त्यामुळे, करदात्यांनी आपल्या टॅक्सचे आगाऊ नियोजन करणे आणि सर्व नियमांविषयी माहिती ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे, जेणेकरून कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागणार नाही.

# तुम्ही आगाऊ टॅक्स तर भरत नाहीत ना?




तुम्ही आयकर विवरणपत्र दाखल करणार असाल तर तुमच्यासाठी ही कामाची बातमी आहे. यावर्षी, घ्ङें भरण्याची अंतिम मुदत ३१ जुलै आहे त्यामुळे, करदात्यांनी आपल्या टॅक्सचे आगाऊ नियोजन करणे आणि सर्व नियमांविषयी माहिती ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे, जेणेकरून कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागणार नाही.

### करदात्यांना कलम ८७Aचा फायदा

आयकर विवरणपत्र म्हणजे ITR दाखल करण्याची डेडलाईन जसजशी जवळ येत आहे तसतसं करदात्यांमध्ये संभ्रम वाढत आहे.काही जण जुन्या करप्रणालीनुसार घ्ङें भरण्याची गरज आहे की नाही याबाबत संभ्रमात सापडले आहेत तर, काही जण नवीन करप्रणालीतील फायदे जाणून घेत आहेत. पण तुम्हाला माहित्येय का की तुम्ही नवीन किंवा जुनी करप्रणाली निवडली तरी, आयकर कायद्यात अशी तरतूद आहे जी जी दोन्ही करप्रणालींअंतर्गत हजारो रुपयांची कर बचत करण्यास मदत करू शकते.

यासाठी तुम्ही आयटीआर दाखल करताना इन्कम टॅक्स कायद्यातील कलम ८७Aचा लाभ घेऊ शकता. सरकारने नवीन करप्रणालीसाठी हे कलम अद्ययावत केले आहे, पण दोन्ही करप्रणालींअंतर्गत सवलती सारख्याच आहेत.

### कलम ८७A काय आहे?

प्राप्तिकर कायद्यातील कलम ८७ँA काय आहे? त्याअंतर्गत किती कर सवलत मिळते? आयकर कायद्याच्या या कलमांतर्गत करदात्यांना एका विशिष्ट मर्यादेपर्यंत उत्पन्नावर पूर्णपणे कर सूटचा दावा करता येतो.

कलम ८७अ जुन्या करप्रणालीमध्ये उपलब्ध आहे, तर आता नवीन करप्रणालीमध्ये अपडेट करून ११५BAC(1A) केले गेले असून ही दोन्ही कलमे केवळ विशिष्ट उत्पन्नापर्यंत कर सवलत देतात.

### जुन्या करप्रणालीत किती सूट मिळते?

आयकर कायद्यातील कलम ८७A नुसार करदात्याच्या पाच लाख रुपयांपर्यंतच्या वार्षिक उत्पन्नावर कर सूटचा फायदा मिळतो. म्हणजे सरकार तुमच्या वार्षिक उत्पन्नाचे कॅल्क्युलेशन करते पण, वसूल करत नाही आणि संपूर्ण रक्कम करमुक्त असते.

जुन्या नियमांनुसार ५ लाख रुपयांपर्यंत उत्पन्नावर १२,५०० रुपये कर लागतो, जो कलम ८७Aअंतर्गत पूर्णपणे माफ केला गेला आहे. मात्र, उत्पन्न ५ लाख रुपयांवर पोहोचले तर, करदात्यांना ही रक्कम जोडून संपूर्ण उत्पन्नावर कर आकारला जातो आणि या सवलतीचा लाभ मिळत नाही.

### नवीन करप्रणालीनुसार किती सूट?

तुम्ही नव्या करप्रणालीतून आयकर विवरणपत्र दाखल करत असाल तर तुम्हाला कलम ८७A ऐवजी कलम ११५BAC(1A) अंतर्गत कर सवलतीचा लाभ मिळेल. या कलमांतर्गत करदात्यांना ६०,००० रुपयांची कर सवलत किंवा रिबेट मिळू शकते.

सरकारने नवीन कर प्रणालीअंतर्गत १२ लाख रुपयेपर्यंत वार्षिक उत्पन्नावर पूर्णपणे कर सवलत दिली असून अंदाजे ६०,००० रुपयांच्या उत्पन्नावर कर आकारला जातो, पण संपूर्ण रक्कम माफ केली जाते. मात्र लक्षात घ्या की तुमचे वार्षिक उत्पन्न १२ लाखांपेक्षा जास्त असेल तर संपूर्ण रकमेवर कर आकारला जाईल आणि तुम्हाला या कलमांतर्गत कोणतीही सूट मिळणार नाही.

### कलम ८७Aचा फायदा कोणाला?

फक्त वैयक्तिक करदात्यांना आयकर कायद्यातील या कलमाचा फायदा मिळतो. म्हणजे कंपन्या, हिंदू अविभक्त कुटुंबे किंवा hUFs आणि अनिवासी भारतीय या सूटचा लाभ घेऊ शकत नाहीत. त्याचप्रमाणे, तुम्ही शेअर्स विकून दीर्घकालीन किंवा अल्पकालीन भांडवली नफा कमावला असेल, तरीही या सूटचा फायदा मिळू शकणार नाही. याशिवाय लॉटरी, गेम शो किंवा विशेष कर दर आकारल्या जाणाऱ्या इतर उत्पन्नावरही हा लाभ उपलब्ध नाही.

### ITR मध्ये रिबेटचा दावा कसा करायचा

सर्वप्रथम तुमचे संपूर्ण वार्षिक उत्पन्न कॅल्क्युलेट करा. त्यानंतर, करपात्र उत्पन्न मोजण्यासाठी कोणतीही सूट आणि वजावट काढून टाका. तुमचे करपात्र उत्पन्न तुमच्या ITR मध्ये नमूद करा आणि तुमचे उत्पन्न विहित मर्यादेत असेल, तर कलम ८७A अंतर्गत सवलतीचा दावा दाखल करा. आयकर विभागाने आयटीआर-२ आणि आयटीआर-३ मध्ये देखील ही सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

### मार्जिनल रिलीफ म्हणजे काय?

नव्या करप्रणालीत तुमचे वार्षिक उत्पन्न १२ लाखांपेक्षा जास्त आहे आणि देय कर १२ लाख रुपयांवरील अतिरिक्त उत्पन्नापेक्षा जास्त असेल, तर तुम्ही मार्जिनल रिलिफसाठी पात्र ठरता. उदाहरणार्थ तुमचे करपात्र उत्पन्न १२.१५ लाख रुपये आहे, म्हणजे १२ लाखांच्या लिमिटपेक्षा १५ रुपयांनी जास्त असेल, तर सामान्य परिस्थितीत, यावर ६२,६५० रुपये कर लागतो. मात्र, मार्जिनल रिलिफचा दावा केल्यानंतर १५००० रुपयांपर्यंत कमी होईल. ४% आरोग्य आणि एज्युकेशन सेंस जोडल्यानंतर तुमची कर देयता ६२,६५० रुपयांवरून १५,६०० रुपयांपर्यंत कमी होईल.

# रोबोटिक सर्जरीः नवसंजीवनी



> आता तर कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरातून होऊ लागलेली रोबोटिक सर्जरी अचूक व परिणामकारक ठरत असल्याचे सिद्ध झाले आहे. अनेक कठीण व गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया रोबोटिक तंत्रज्ञानाच्या आधारे यशस्वी झाल्या आहेत. विशेषतः कर्करोग, यकृत तसेच मेंदूसंदर्भातील दुर्धर आजारांच्या बाबतीत त्याचा जास्त उपयोग होत आहे.

**श्रीरंग काटेकर**

विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात वैद्यकीय क्षेत्रात पारंपरिक पद्धतीने होणारी शस्त्रक्रिया आता काल बाह्य होत आहेत. एआय तंत्रज्ञान वापरून होणारी रोबोटिक सर्जरी अधिक अचूक व परिणामकारक असल्यामुळे रुग्णांसाठी नवसंजीवनी ठरत आहे. आज जागतिक डॉक्टर दिन. त्यानिमित्त या नवीन पर्वाचा घेतलेला मागोवा. मानवी शरीरावरील शस्त्रक्रियांचा इतिहास खूप जुना मानला जात असला तरी शस्त्रक्रिया म्हटले की, लोकांना धडकी भरते. शरीराची अत्यंत कुशलतेने चिरफाड करून आजाराचे कारण असलेल्या घातक घटकाला शरीराबाहेर काढण्यासाठी शस्त्रक्रिया केली जाते. मानवी शरीरातील दुर्धर आजार हा जेव्हा औषधोपचारांना साथ देत नाही त्यावेळी शस्त्रक्रियेशिवाय डॉक्टरांपुढे पर्याय उरत नाही. मात्र अलीकडच्या काळात वैद्यकीय क्षेत्रात घडत असलेल्या या नवक्रांतीमुळे प्रक्रिया अधिक सुलभ व कमी वेदनादायी होत आहे. त्यामुळे रुग्णांना मोठा दिलासा मिळत आहे.

आता तर कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरातून होऊ लागलेली रोबोटिक सर्जरी अचूक व परिणामकारक ठरत असल्याचे सिद्ध झाले आहे. अनेक कठीण व गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया रोबोटिक तंत्रज्ञानाच्या आधारे यशस्वी झाल्या आहेत. विशेषतः कर्करोग, यकृत तसेच मेंदूसंदर्भातील दुर्धर आजारांच्या बाबतीत त्याचा जास्त उपयोग होत आहे. यामध्ये कर्करोग, मेंदूतील गाठी अगदी अलगदपणे रोबोटिक सर्जरीच्या माध्यमातून काढता येणे शक्य झाले आहे. गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया अनेकदा रुग्णांसाठी जीवघेण्या ठरतात. काळाच्या ओघात आता वैद्यकीय सेवा क्षेत्रात आमूलाग्र बदल झाल्याने शरीरातील कोणत्याही अवयवांमधील शस्त्रक्रिया सहजपणे करता येणे शक्य झाले आहे.

विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात वैद्यकीय क्षेत्र हे आता हायटेक बनले आहे. रोबोटिक तंत्रज्ञानाच्या साह्याने शस्त्रक्रिया करण्याकडे रुग्ण व डॉक्टरांचा कल वाढला आहे. अचूकपणे शस्त्रक्रिया यशस्वी करण्यासाठी ही कार्यप्रणाली उपयुक्त ठरत आहे. या शस्त्रक्रियेदरम्यान रुग्णांना कमी वेदना व कमी रक्तस्त्राव होत असल्याने रोबोटिक शस्त्रक्रियेला रुग्णांची अधिक पसंती मिळत आहे. रोबोटिक शस्त्रक्रियेदरम्यान संसर्गाचा धोका हा कमी जाणवतो. तसेच रुग्णालयात कमी कालावधीचा मुक्काम, पैशांची बचत हे रोबोटिक शस्त्रक्रियेचे फायदे आहेत. शस्त्रक्रिया तंत्रात आधुनिकीकरण होत असल्याने यापुढील काळातही रुग्णांना अधिक जलद गतीने सेवा देणे शक्य होणार आहे असे तज्ज्ञ डॉक्टरांचे मत आहे.

रोबोटिक तंत्रज्ञानावर आधारित शस्त्रक्रियेची मागणी आता सर्वच स्तरांवर जोर धरू लागली आहे. शहरी भागाप्रमाणेच आता ग्रामीण भागातील रुग्ण रोबोटिक शस्त्रक्रियेला प्राधान्य देत आहेत. सातारा शहरातील अनेक रुग्णालयांमध्ये या तंत्रज्ञानावर आधारित शस्त्रक्रिया करण्याचा कल वाढत असून अनेक रुग्णालयांनी याबाबत सोयीसुविधा उपलब्ध केल्या आहेत. ॅप्रोस्कोपीद्वारे होणारी शस्त्रक्रिया सातारा जिल्ह्यातील अनेक नामवंत हॉस्पिटलमध्ये केली जाते. हा रोबोटिक शस्त्रक्रियेपूर्वीचा पहिला टप्पा मानला जातो. रोबोटिक तंत्रज्ञानावर आधारित शस्त्रक्रियेचे नवे पर्व आता सुरू झाल्याने अनेक जटिल व गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया आता सुलभ पद्धतीने यशस्वी करता येणे शक्य झाले आहे.

आधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेऊन तज्ञ डॉक्टरांच्या साह्याने होणारी ही शस्त्रक्रिया अचूकपणे व रुग्णांना कमी वेदना देणारी ठरत असल्याने रुग्णांमधील भीतीचे प्रमाण कमी झाले आहे. आपल्या देशातही या तंत्रज्ञानाचा आधारे यशस्वीपणे शस्त्रक्रिया होत असल्याने नजीकच्या काळात रोबोटिक शस्त्रक्रिया ही रुग्णांसाठी एक वरदान ठरणार आहे.

# अयोध्येतील संशयकल्लोळ

अयोध्येतील प्रभू श्रीरामचंद्रांच्या मंदिरातील कोट्यवधी रुपयांच्या देणग्यांतील कथित अपहाराची वृत्ते आणि त्यावरून सुरू झालेल्या गदारोळाने देशभरातील हिंदू बांधवांची पायाखालची जमीन सरकल्यासारखी अवस्था न व्हावी तरच नवल! शेकडो वर्षांच्या संघर्षानंतर प्रत्यक्षात साकारलेल्या राम मंदिराबाबत इतक्यात असे काही कानावर येईल, याची कोणी कल्पनाही केली नसावी.

मंदिराच्या दानपात्रात भाविकांनी अर्पण केलेला पैसा, दागिने आणि संपत्तीचा गैरव्यवहार झाल्याचे आरोप काही दिवसांपासून सुरू आहेतच; परंतु आता त्यात तथ्य असल्याचे समोर आल्याने मंदिराचे व्यवस्थापन बघणारे श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासच आरोपीच्या पिंजऱ्यात आहे. या गैरव्यवहाराचा गुन्हा नोंदविणे दूर, साधी तक्रारही अद्याप दाखल झालेली नाही; परंतु स्थानिक पोलिस, तसेच राज्य सरकारने नेमलेल्या विशेष चौकशी समितीने काही संशयितांना हेरले, त्यांच्या घरझडतीत लाखो रुपये मिळाल्याने आर्थिक घोटाळ्यावर एकप्रकारे शिक्कामोर्तबच झाले. त्यामुळे ही केवळ राजकीय चिखलफेक आणि रामलल्लाची बदनामी असल्याचा दावा करणाऱ्यांची बोलतीच बंद झाली आहे. आरोपांत 'राम' नसता, तर एव्हाना 'जय श्रीराम'चा सामूहिक प्रतिध्वनीही ऐकू आलाच असता. राम जन्मभूमीनिर्माण समिती आणि विश्व हिंदू परिषदेने जलदगती चौकशीची मागणी करून 'हे आरोप म्हणजे हिंदुधर्माचा आरोप' वगैरे भाषा करणाऱ्यांचे दात घशात घातले आहेत.

राम मंदिराशी निगडित कोणताही मुद्दा भाजपसह हिंदुत्ववादी नेत्यांसाठी राष्ट्रीय ठरत असतो, म्हणून देणग्यांतील कथित गैरव्यवहारापासून हा पक्ष तसेच राज्य आणि केंद्र सरकारलाही नामानिराळे राहता येणार नाही. सरकारने भिडभाड न बाळगता याचा सोक्षमोक्ष लावावा, दोषींना कठोर शासन करावे, जेणेकरून देवालयांतील हुंडीवर दरोडा घालण्याच्या प्रकारांनाही चाप लागू शकेल. बाकी अयोध्येचा राम अलीकडेच जगभरातील श्रीमंत देवालयांच्या यादीत आला आहेच; यापुढे त्याचा कारभार अधिक पारदर्शी असावा, प्रत्येक रुपयाचा चोख हिशेब ठेवला जाऊन भाविकांचे दान सत्पात्री लागावे.

तसे घडल्यास प्रभू श्रीरामचंद्राच्या आदर्श आयुष्याप्रमाणे या मंदिराचा सर्वांना हेवा वाटेल, त्याचा आदर्श संपूर्ण जगापुढे शेकडो वर्षे टिकू शकेल.



> इराणने दीर्घकाळापासून दावा केला आहे की त्याचा अणुकार्यक्रम शांततापूर्ण उद्देशांसाठी आहे. मुख्य अणुकराराचा अंतिम तोडगा अद्याप दूर असल्याने या देशाचे भवितव्य तात्पुरत्या तडजोडीवर अवलंबून आहे. इराणचा युरेनियमचा साठा हस्तगत करण्यासाठी ट्रम्प आपले सैन्य जमिनीवर उतरवतील, असे मानले जात होते; प्रत्यक्षात तसे झाले नाही. आता मात्र जर ट्रम्प यात इराणला थोपविण्यात अयशस्वी ठरले, तर इराणचे नेतृत्व पुन्हा एकदा आण्विक शस्त्रास्त्रांची निर्मिती करण्यासाठी प्रयत्नशील राहील, यात शंका नाही. इराणला संयुक्त राष्ट्रांच्या अणु निरीक्षकांना पुन्हा देशात प्रवेश द्यावा लागेल.

# युद्धात कोण जिंकले?



**डॉ.मनीष सोनवणे**

अमेरिकेने इस्त्रायलच्या आक्षेपांना बाजूला सारून इराणसोबत शांतता करार केला. त्यामुळे सध्या इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू राजकीयदृष्ट्या एकटे पडले आहेत. गेल्या वर्षापर्यंत या संघर्षामध्ये इस्त्रायलची बाजू वरचढ होती. इस्त्रायलने लेबनॉनमधून हिजबुल्ला हचा प्रभाव बऱ्यापैकी कमी केला होता; तर दक्षिणेत हमासला मोडीत काढले होते; तसेच सीरियामध्ये आपल्याला हवे तसे सत्तांतर घडवून आणले होते. इराण हा इस्त्रायलच्या 'ग्रेटर इस्त्रायल' निर्मितीच्या मार्गातील सर्वांत मोठा अडथळा समजला जातो. जून २०२५ मध्ये अमेरिकेने इराणच्या अणुप्रकल्पांवर हवाई हल्ले केले. त्यादरम्यान आयातुल्ला खामेनी यांची देशावरील पकड काहीशी ढिली पडली होती. शिया पंथीय इराण आंतरराष्ट्रीय स्तरावर एकटा पडल्यामुळे अमेरिकेला त्याच्यावर लष्करी कारवाई करण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली होती. इराणमधील अंतर्गत आंदोलनांना अनेकदा अमेरिका आणि इस्त्रायलने फूस लावल्याचे किंवा खतपाणी घातल्याचे दिसून आले आहे.

यापूर्वी २००९ मधील 'ग्रीन मूव्हमेंट', २०१९ मध्ये तेलाच्या वाढलेल्या किमतींविरोधात निर्माण झालेला आर्थिक असंतोष, आणि २०२२ मधील राजकीय हत्यांनंतर पेटलेले आंदोलन, या सर्वांनी खामेनी यांच्या सत्तेला मोठे हादरे दिले होते. इस्त्रायलच्या गुप्तचर संघटनेला अशी खात्री होती की, इराणच्या खोमेनी राजवटीचा पाया भुसभुशीत आहे. या राजवटीला आता खिंडीत पकडले तर तेथे हुकूमशाहीचा पराभव होऊन लोकशाही सरकार अस्तित्वात येईल असा त्यांचा कयास होता. त्यामुळे नेतान्याहू यांनी ट्रम्प यांना भरीस घातले. राजकारणात कितीही मजबूत पकड असली, तरी बलाढ्य सत्तेचा पाया कधीतरी कमकुवत होतो आणि ती पत्त्यासारखी कोसळते; परंतु विरोधक राष्ट्राने तिला अंतर्गत संघर्षातूनच कोसळू दिले पाहिजे; कारण बाह्य हस्तक्षेपामुळे त्याची उलट प्रतिक्रियादेखील येऊ शकते हे ट्रम्प व त्यांच्या समर्थकांनी लक्षात घेतले नाही.

इराण म्हणजे व्हेनेझुएला नाही; तसेच 'खामेनी' ही केवळ एक व्यक्ती नसून ती एक संस्था आहे हे समजून घेणेदेखील गरजेचे होते. वास्तविक इराणच्या नवीन पिढीला क्रांतीबाबत आता फारसे स्वारस्य राहिलेले नाही; त्यांना इराण हे एक प्रगत राष्ट्र म्हणून स्वतःची स्वतंत्र धोरणे निश्चित करणारे सार्वभौम राष्ट्र हवे आहे. इस्त्रायलचे उद्दिष्ट इराणचे राजकीय नेतृत्व बदलण्याचे होते तर अमेरिकेला आपले व्यापारी हित साध्य करायचे होते; परंतु आता खामेनी यांच्या मृत्यूनंतर तिथल्या कट्टरतावादाने पुन्हा एकदा उचल खाल्ली आणि त्यापुढे व्यवहारवाद बाजूला पडला आहे. इस्त्रायलमध्ये देखील सार्वत्रिक निवडणुका नजीक आल्या आहेत. सध्याच्या नेतान्याहू सरकारला देखील काठावरचे बहुमत आहे. त्यामुळे देशात युद्धज्वर कसा टिकवून ठेवता येईल, यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असतात.

या संपूर्ण संघर्षात करार होत असताना लेबनॉन आणि इराणचा युरेनियम प्रकल्प हे दोन कळीचे मुद्दे राहिले. इस्त्रायल या कराराचा भाग नसल्याने, लेबनॉन आणि इराणमधील तणाव पूर्णपणे थांबण्याची शक्यता कमी आहे. या संघर्षात हमास, हिजबुल्लाह आणि हुथी यांसारखे 'नॉन-स्टेट ?क्टर्स' देखील सहभागी आहेत. लेबनॉनमधील 'हिजबुल्लाह' सारख्या संघटनांना मिळणाऱ्या आर्थिक पुरवठ्यावर कोणतीही ठोस बंदी घालण्यात आलेली नाही. दुसरीकडे संघर्षाच्या काळातच नेतान्याहू यांनी आपल्या लष्करासाठीचा अर्थसंकल्प वाढवून घेतला आहे; अशा परिस्थितीत या शांतता कराराचे भवितव्य धोक्यात येऊ शकते. सध्या इराणची अर्थव्यवस्था प्रचंड कमकुवत झाली आहे. जागतिक निर्बंधांमुळे इराणच्या अर्थव्यवस्थेला स्वतःला सावरणे अजून तरी शक्य झालेले नाही. या युद्धात इराणची मोठ्या प्रमाणात हानी झाली असल्यामुळे, निर्बंधांमुळे आपला जवळपास शंभर अब्ज डॉलर एवढा गोठवलेला निधी पुनर्रचनेसाठी परत मिळावा, अशी मागणी इराणने अमेरिककडे केली आहे. त्याबाबत सकारात्मक चर्चा सुरू असून, यामुळे अमेरिकन कंपन्यांना इराणच्या पुनर्रचनेत कंत्राटे मिळतील. साहजिकच, ट्रम्प यांच्या जवळच्या कंपन्या याचा फायदा घेण्यास तयार आहेत.

इराणने दीर्घकाळापासून दावा केला आहे की त्याचा अणुकार्यक्रम शांततापूर्ण उद्देशांसाठी आहे. मुख्य अणुकराराचा अंतिम तोडगा अद्याप दूर असल्याने या देशाचे भवितव्य तात्पुरत्या तडजोडीवर अवलंबून आहे. इराणचा युरेनियमचा साठा हस्तगत करण्यासाठी ट्रम्प आपले सैन्य जमिनीवर उतरवतील, असे मानले जात होते;

प्रत्यक्षात तसे झाले नाही. आता मात्र जर ट्रम्प यात इराणला थोपविण्यात अयशस्वी ठरले, तर इराणचे नेतृत्व पुन्हा एकदा आण्विक शस्त्रास्त्रांची निर्मिती करण्यासाठी प्रयत्नशील राहील, यात शंका नाही. इराणला संयुक्त राष्ट्रांच्या अणु निरीक्षकांना पुन्हा देशात प्रवेश द्यावा लागेल. त्याबाबत आताच दोन्ही पक्षा कडून शाब्दिक चकमकी घडत आहेत. याशिवाय इराणच्या राजकीय निर्णय प्रक्रियेत 'आयआरजीसी'सारख्या लष्करी दलांची देखील महत्त्वाची भूमिका असते, ते या करारास कसा प्रतिसाद देतात हे पाहणे देखील महत्त्वाचे आहे. अमेरिकेच्या यापूर्वीच्या ४६ अध्यक्षांनी जे धाडस दाखवले नाही, ते ट्रम्प यांना करून दाखवायचे होते. ट्रम्प यांनी केलेली लष्करी कारवाई काही प्रमाणात यशस्वी ठरली असली, तरी इराणमधील त्यांचे राजकीय उद्दिष्ट पूर्णपणे साध्य होऊ शकलेले नाही. त्यामुळे यापुढे असे धाडसी लष्करी प्रयोग करण्यापेक्षा, संवादादरम्यान उथळ भाषा न वापरता, प्रभावी मुत्सद्देगिरीचा वापर करून त्यांनी अधिकृत राजकीय संस्थांच्या माध्यमातून योग्य निर्णय घेणे गरजेचे आहे.

सोव्हिएत युनियनचा अस्त झाल्यानंतर इराक युद्धात अमेरिकेने आपली दहा वर्षे नाहक घालवली. आता तिथल्या नवीन पिढीला देखील हे उमजले आहे की, इराण युद्धासारख्या संघर्षात पुढची आणखी काही वर्षे घालवणे कोणालाही परवडणारे नाही.

कोणत्याही युद्धात कुणीही पूर्णतः जिंकत नाही किंवा हरत नाही, याउलट युद्धानंतर केवळ नवीन व्यापारी करार जन्माला येत असतात. चीनची वाढती अर्थव्यवस्था आणि जागतिक व्यापारातील त्याचा वाढता सहभाग पाहता, अमेरिकेला यापुढे अशी युद्धे परवडणारी नाहीत; दुसरीकडे इराणचे मित्रदेश देखील आता कमकुवत झाले आहेत. युद्ध सुरू झाले तेव्हाची आणि आताची परिस्थिती यात कोणाचा फायदा झाला आणि अमेरिकेची उद्दिष्टे खरोखरच साध्य झाली का, हा मोठा प्रश्न आहे. इस्त्रायल आणि अमेरिकेसारख्या महासत्तांसमोर एकटा असूनही इराण तब्बल चाळीस दिवस सातत्याने होणारे बॉम्बहल्ले सहन करत टिकून राहिला, हे विसरून चालणार नाही. वाटाघाटीतून जे मिळेल ते मिळवावे; परंतु जे आधीच कमावले आहे ते विसरू नये, असेच यापूर्वी इस्त्रायल व अमेरिकेचे धोरण राहिले आहे. त्यामुळे होर्मुझची सामुद्रधुनी इराणच्या नियंत्रणात असणे अमेरिकेला कधीही मान्य होणार नाही. वाढलेले गॅसचे भाव व आगामी नोव्हेंबरमधील देशांतर्गत निवडणुकीचे गणित लक्षात घेऊन ट्रम्प यांनी हा करार घाईघाईत केला आहे. या करारातून सध्याच्या युद्धजन्य परिस्थितीचे स्वरूप शीतयुद्धात झाले आहे. परंतु जग अजूनही पूर्ण शांततेच्या प्रतीक्षेत आहे. सध्याचा करार अंतिम नसला तरी परस्पर सहमतीने यातून दीर्घकालीन शांततेचा मार्ग मोकळा होऊ शकतो तूर्तास अशी अपेक्षा ठेवण्यास हरकत नाही.

(लेखक मालेगाव महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख आहेत.)

# तोतयांना मोकळे रान

आपला मोबाइल क्रमांक दडवून खऱ्या-खोट्या नावांनिशी संवादाची मुभा देणाऱ्या 'यूजरनेम' या व्हॉट्सअॅपच्या नियोजित सुविधेबाबत खबरदारी घेण्याची केंद्र सरकारची भूमिका योग्यच आहे. याबाबत केंद्राने व्हॉट्सअॅप चालवणाऱ्या मेटा कंपनीला नोटीस बजावली आहे; तसेच याविषयी संपूर्ण स्पष्टीकरण आणि व्यापक चर्चेविना ही सुविधा सुरू न करण्याचे निर्देशसुद्धा कोट्यवधी वापरकर्त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक आहेत. एकीकडे ओळख लपवून होणाऱ्या सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण, हा चिंतेचा विषय ठरत असतानाच अशा सुविधांना परवानगी देण्याबाबत सरकारला काळजी वाटणे साहजिक आहे. ही सुविधा वापरकर्त्यांच्या फायद्याची असून, तिच्या सुरक्षिततेबाबत काळजी घेतल्याचा दावा 'मेटा'ने केला आहे; मात्र त्याच्या वापरातून अनेक धोक्यांना निमंत्रण मिळताना प्रथमदर्शनी तरी दिसते.

बदलत्या काळात संवाद-संपर्काची अनेक साधने दररोज बाजारात दाखल होत असली, तरी 'व्हॉट्सअॅप'ने आपल्या सुलभ-वैशिष्ट्यपूर्ण रचनेमुळे जगभरातील संपर्काच्या क्षेत्रात जवळपास मक्तेदारी निर्माण केली आहे.